# समरांगण हे जीवन ज्यांचे




सौ. प्रिया प्रभू

मुखपृष्ठ : सर्वोदय प्रिन्टर्स, मुंबई–४

# समरांगण हे जीवन ज्यांचे

सौ. प्रिया अशोक प्रभू

तरुण भारत प्रेस प्रकाशन,
बेळगाव



बालपणी ज्यानी माझे कोडकौतुक केले
ते माझे आजोबा कै. तात्या
यांच्या प्रेमळ स्मृतीस

प्रकाशक:
किरण बाबुराव ठाकुर
तरुण भारत प्रेस, समादेवी गल्ली,
बेळगाव.

सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन
प्रथमावृत्ती मे १९७५

मुखपृष्ठ:
रवींद्र परांजपे आर्टिस्ट, मुंबई

किंमत– १५ रुपये

मुद्रक
जी. आर. तेंडोलकर
तरुण भारत प्रेस समादेवी गल्ली,
बेळगाव.

# अनुक्रम


| | |
|---|---|
| प्रस्तावना | |
| मनोगत | |
| निवेदन | |
| व्यक्तिचित्र :कौटुंबिक जीवन | १ |
| आधी ते राजकारण | १४ |
| गोमंतकाचा मुक्तिसंग्राम | ४२ |
| शैक्षणिक कार्य | ४९ |
| अन्यायाला फुटते वाचा! | ५६ |
| (पांगिरे प्रकरण) | |
| ज्योति रामा राजगिरे प्रकरण | ६४ |
| शामराव देशमुख प्रकरण | ७२ |
| महाराष्ट्र– म्हैसूर सीमेचे आंदोलन | ८० |
| वृत्तपत्र क्षेत्रातील कर्तृत्वाबद्दल गौरव | ९४ |
| ओघळलेले मोती | १०७ |
| निवडक संपादकीय | १२२ |
| असा मी गौरीहर पूजिला! | १४५ |
| परिचितांच्या दृष्टीतून | १५४ |
| परिशिष्ट | १७४ |

# प्रस्तावना

बेळगावचे ख्यातनाम पुढारी आणि पत्रकार श्री. बाबुराव ठाकुर यांचे चरित्र प्रसिद्ध होत आहे ही फार चांगली गोष्ट आहे. त्याहूनही चांगली गोष्ट अशी की हे चरित्र खुद्द त्यांच्या



कन्येने लिहिले आहे. आणि ते लिहितानाच तिचा जो दृष्टिकोन आहे तो याहूनही सरस आहे. ती म्हणते, '... या त्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वापेक्षा मला त्यांचे जे अधिक जवळून दैनंदिन दर्शन झालेले आहे, ते माझे वडील म्हणून. त्यांच्या संबंधी काही ऐकताना, वाचताना, विचार करताना, आणि आता प्रत्यक्षपणे लिहिताना, मला त्यांचे हे पिता म्हणून होणारे दर्शन दूर करता येणे अशक्य होते... हा भावनेचा पडदा क्षणभर दूर करायचा ठरविला तरी तो मला दूर करता येणार नाही. त्यामुळे काकांच्या कोणत्याही कार्याकडे पाहताना माझी दृष्टी कन्येची राहाते, आणि माझ्या लेखनाला साहजिकच काही मर्यादा पडतात हेही मला जाणवते. एखाद्या व्यक्तीचे चरित्र लिहिताना लेखकाला जे ताटस्थ्य स्वीकारावे लागते ते ताटस्थ्यही माझ्याकडून सांभाळले जात नाही, आणि एखाद्या घटनेचा अन्वयार्थ आपल्याच बाजूने लावण्याचा प्रयत्न केला जातो. माझे काका कुठे चुकतीलच कसे, अशी भाबडी श्रद्धा या विवेचनाच्या मागे उभी रहाते. माझ्या या भूमिकेमुळे प्रस्तुत चरित्रग्रंथाला ऐतिहासिक मूल्यमापनाचे निकष लावण्याची वृथा धडपड मी करणार नाही.' अशा प्रांजळ जाणिवेने लिहिलेल्या चरित्राला एक प्रकारची आगळी सचोटी आपोआपच प्राप्त होते. आणि तिचा प्रत्यय या पुस्तकात ठिकठिकाणी येतो.

पण खरे म्हणजे अशा प्रकारच्या चरित्रातून जो इतिहास निष्पन्न होतो त्यापेक्षा चरित्रनायकाचे जे व्यक्तिचित्र उमटते ते अधिक महत्त्वाचे असते आणि बाबुराव ठाकुरांचे एक जिव्हाळ्याने मुसमुसलेले चित्र या चरित्रातून जे उमटते ते खरोखर चित्ताला वेध लावते. पण एखाद्या पुरुषाची

ओळख कन्येपेक्षा पत्नीला अधिक खोल व्हावी हे साध्या गणिती दृष्टीने स्पष्ट आहे. ती ओळख अधिक वर्षाची असते. पण याहीपेक्षा, जीवनाचे पेचप्रसंग पतिपत्नींनी ज्या हिमतीने आणि हिकमतीने सोडविलेले असतात. तसे ते पिता कन्येने सोडविले असण्याचा संभव थोडा. ते काहीही असले तरी या पुस्तकाच्या ११ व्या प्रकरणात बाबुरावांच्या पत्नी सौ. स्नेहलता ठाकुर यांनी जो 'असा मी गौरीहर पूजिला' आहे, त्यात बाबुरावांच्या व्यक्तिमत्त्वांचे जे दर्शन होते त्याला साऱ्या पुस्तकात तोड नाही.

मला जे बाबुराव ठाकुर माहीत आहेत आणि ज्यांची उत्तम प्रतिमा या पुस्तकातून प्रत्ययास येते, ते म्हणजे सकृतदर्शनी काहीसे राकट पण अंतर्यामी अतिशय कोमल आणि स्नेहपूर्ण असे सद्‌गृहस्थ. बाबुरावांचे पहिले दर्शन थोडेसे करडेच असते. त्यांचा शर्ट, जाकिट, धोतराचा आखूड काचा आणि बेळगावी चपला हा पोशाख या सकृतदर्शनाला उठावच आणतो. पण एकदा त्यांनी आपले शुभ्र हास्य करून तुमच्याशी बोलण्यास सुरुवात केली की त्यांच्या स्नेहाळ अगत्यपूर्ण व्यक्तित्वाचा लगेच प्रत्यय येतो.

हे जे त्यांचे दर्शन आहे ते त्यांच्या आजवरच्या कार्याला आणि कारकीर्दीला अनुरुप असेच आहे. एका फौजदाराच्या या सुपुत्राने वयाच्या १८/१९ व्या वर्षी देशाच्या राष्ट्रीय व्रतात त्यागपूर्ण भाग घेण्यास सुरुवात केली, आणि आज ७५ व्या वर्षीही हे त्यांचे खडतर व्रत सुटलेले नाही. पण हे त्यांचे व्रत म्हणजे अरण्यात जाऊन वैयक्तिक मोक्षासाठी केलेली एकाकी तपश्चर्या नव्हे. ती त्यांनी समाजात राहून समाजाच्या कल्याणासाठी समाजाच्या कलाने केलेली तपश्चर्या आहे; आणि येथेच त्यांच्या स्नेहाळ सहकारवृत्तीला आवाहन आणि आव्हान मिळाले. हे त्यानी किती आणि कसे पेलले याची हकीगत या पुस्तकात रसाळपणे सांगितलेली आहे. सार्वजनिक कार्य हे सर्वप्रथम सहकारबुद्धीस आवाहन असते; या बुद्धीचा विकास ज्याच्या ठिकाणी झालेला नाही, त्याने सार्वजनिक कार्याच्या वाटेस जाऊ नये. त्याग, कष्ट, दीर्घोद्योग वगैरे गोष्टी यासाठी तर लागतातच, पण मुख्यत: निष्ठा आणि विश्वासबुद्धी यांचा तेथे कस लागतो. निरनिराळ्या आंदोलनांच्या नायकांची चरित्रे जर आपण अभ्यासली तर जी एक गोष्ट ताबडतोब ध्यानात येते ती ही की यशस्वी नेते, सहकाऱ्यांच्या बाबतीत भाग्यवंत असतात. पण ही गोष्ट मूलत: भाग्याची नसते, कर्तृत्वाची असते, स्नेहल, निष्ठाशाली, विश्वासपूर्ण वृत्तीची ती कमाई असते. महात्मा गांधींच्या आयुष्यात अनेक चमत्कार घडले. पण माझ्या दृष्टीने सर्वात अर्थपूर्ण चमत्कार त्यानी संपादिलेल्या सहकाऱ्यांचा होता! किती नानाविध पण अव्वल दर्जाचे सहकारी त्यांनी स्वत:भोवती गोळा केले! एकाच वेळी स्टालीन, ट्रॉट्स्की आणि बुखारीन यांची निष्ठा संपादन करण्याचा लेनिनचा चमत्कार त्याच्या १९१७ सालच्या फिनलंडमधील आगमनापेक्षा मोठा होता. टिटोच्या या बाबतीतल्या वैशिष्ट्याची परीक्षा १९४८ साली त्याने स्टालीनशी बेबनाव पुकारला तेव्हा झाली आणि टिटो त्या सत्वपरीक्षेस उतरला. महाराष्ट्राच्या इतिहासात शिवाजी महाराजांचे चरित्र आठवले म्हणजे त्यांच्या तानाजी, नेताजी, बाजी प्रभृती सहकाऱ्यांची समर्पणवृत्ती आठवते. त्यागाच्या आणि चारित्र्याच्या दृष्टीने पाहिले तर आगरकर हे लो. टिळकांहून रेसभरही कमी नव्हेत, पण टिळकांना जसे सहकारी मिळविता आले तसे आगरकरांना मिळविता आले नाहीत, पण स्वातंत्र्यसंपादनाच्या आणि राष्ट्रीय बांधणीच्या कार्यात मौलाना अबुल कलम आझाद, रफीउद्दिन किडवाई, लालबहादूर शास्त्री, आणि गोविंद वल्लभपंत यासारखे सहकारी त्यांनी जे जोडले त्यांच्या स्नेहाने आणि सहकार्याने त्याचे कर्तृत्व उजळलेले आहे. (असे सहकारी जोडण्याचा आणि त्यांचा निकराचा विश्वास कमावण्याचा वारसा इंदिरा गांधींना मिळाला आहे का हे अजून सिद्ध व्हायचे आहे.) राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरून प्रादेशिक पातळीवर उतरले म्हणजे उदाहरणांचा झगमगाट बराच कमी होतो, पण तेथेही स्नेही आणि सहकारी संपादन करण्यासाठी जे गुण लागतात त्यांचे मूल्य तेच असते. या

गुणांचा आविष्कार व्यक्तिगणिक विशिष्ट असतो, पण त्यांची मूळजात तीच असते.

श्री. बाबुराव ठाकुर यांना त्यांच्या कार्यात श्री. अण्णासाहेब लट्ठे, डॉ. हेरेकर, श्री.शिवराव कोप्पळ, श्री. बापूसाहेब देशपांडे, पुंडलिकजी कातगडे, प्रभृतींचे जे सहकार्य मिळाले त्याचे रहस्य बाबुरावांच्या व्यक्तित्वात शोधावे लागेल. या सहकाऱ्यांचे व्यक्तित्व आणि बाबुरावांचे व्यक्तित्व यांचे परस्पर नाते कसे जुळले होते आणि आहे, याची कल्पना यांच्यापैकी काही दिवंगतांवरचे बाबुरावांचे जे मृत्यूलेख या पुस्तकात संग्रहित केले आहेत त्यांच्यावरून नजर टाकल्याने येईल. या लेखात, डॉ. हेरेकरांच्या सार्वजनिक कार्यावरील निष्ठेचा आणि प्रेमळ आपुलकीचा ते उल्लेख करतात. अण्णासाहेब लट्ठे यांच्या निगर्वी वृत्तीची, सुखदु:खाच्या संवादाची आणि अंत:करणाच्या स्निग्धतेची त्यांना खोल आठवण होते, शिवराव कोप्पळ यांची धीरोदात्त जिद्द त्यांच्या नजरेपुढे उभी राहाते, आणि बापुसाहेब देशपांड्यांची सर्वगामी बुद्धी, मनाचा समतोलपणा आणि जातिवंत औदार्य यांनी त्यांची स्मृती गहिवरून येते. या गुणांना प्रतिसाद देणारे व्यक्तित्व सहकंपित झाल्याखेरीज त्याचा असा भावनिक आविष्कार होणार नाही हे उघड आहे.

सौ. प्रिया प्रभूंच्या या चरित्राला ऐतिहासिक निकष लावायचे नसले तरी त्यातून जो इतिहास आविष्कृत होतो तो अर्थपूर्ण आहे. महात्मा गांधींची असहकाराची चळवळ, सविनय कायदेभंगाची चळवळ, ':भारत छोडो' ची चळवळ, गोमंतक मुक्तीची चळवळ आणि अद्याप चालू असलेली सीमाप्रदेश मुक्तीची चळवळ अशा कालानुक्रमाने आविष्कार होणाऱ्या चळवळींशी आणि आंदोलनांशी बाबुरावांचे चरित्र  निगडित आहे आणि त्यांचे पत्रकारित्व हा या व्यापक चरित्राचाच एक भाग आहे. त्यांचे पत्रकारित्व हे त्यांच्या सार्वजनिक जीवनाचे कारणही आहे आणि फलितही आहे आणि त्याच दृष्टीने त्याचे मूल्यमापन करायला हवे. बाबुराव ठाकुर हे  माझ्यासारखे लेखणीच्या आणि वैचारिक उत्साहाच्या आधाराने बनलेले पत्रकार नव्हेत. माझ्यासारख्या राजधानीच्या शहरात पत्रकारित्व करणाऱ्या पत्रकारांना राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय प्रश्नांच्या थोड्याबहुत अभ्यासाच्या बळावर प्रसंग साजरे करून नेता येतात. जिल्हापत्रकारांची गोष्ट निराळी असते. त्यांचे जिल्ह्यातले आणि सभोवतालच्या प्रदेशातले वाचक आपल्या स्थानिक प्रश्नांशी हा पत्रकार किती समरस झाला आहे, त्या प्रश्नांना तोंड फोडण्यास आणि ते तडीस नेण्यास त्याची लेखणी किती समर्थ आहे, यावरून त्याची योग्यता ठरवितात. म्हणजे त्याचे पत्रकारित्व त्याच्या भोवतालच्या प्रश्नाशी निगडीत असते. अर्थात जिल्ह्याच्या आणि तालुक्याच्या ठिकाणी सरकारी आणि पक्षीय जाहिरातींच्या मलिद्यावर चालणारी, किंबहुना त्यासाठीच जन्माला आलेली आणि आपल्या संपादकांची आणि संचालकांची पोशाखी शोभा वाढविणारी वर्तमानपत्रे असतात. ही वर्तमानपत्रे म्हणजे स्वत:लाच दिलेली मानपत्रे होत. पण पेचप्रसंगाच्या समयी या वर्तमानपत्रांना आपल्या तोंडाला मुखवटे घालावे लागतात किंवा तोंडे लपवावी लागतात. पण बाबुरावांचे पत्रकारित्व या जातीचे नाही. प्रथमपासून ते एक सतीचे वाणच आहे. कुसुमाग्रजांनी वर्णिल्याप्रमाणे यज्ञकुंडासाठी तयार केलेली ती समिधा आहे. या कुंडातून व्यावहारिक यशाची ज्वाला निघाली तर तो एक अकल्पित योगायोग होय. श्री. बाबुराव ठाकुर हे माझ्यासारखे अभ्यासिकेतून संपादकीय दालनात उडी मारलेले पत्रकार नव्हेत. सार्वजनिक जीवनाच्या चवाठ्यावरून संपादकीय दालनात प्रवेश केलेले आणि त्या संपादकीय दालनास सार्वजनिक  चवाठा बनविलेले पत्रकार आहेत. यादृष्टीने त्यांची पत्रकारिता ही महाराष्ट्रीय पत्रकारितेच्या परंपरेत चपखल बसणारी पत्रकारिता आहे. या परंपरेवर जो सांस्कृतिक फुलोरा जमा झाला त्याचा फायदा माझ्यासारख्या पत्रकाराला मिळतो, पण बाबुरावांचे नाते मूळ परंपरेशी आहे.

टिळक–आगरकरांच्या अभिजात परंपरेशी नाते सांगणारी ही पत्रकारिता असल्यामुळे लेखणीपेक्षा करणीकडे तिचे अधिक लक्ष असते. बाबुराव हे असे संपादक आहेत की जे आपल्या

लेखणीचा अभिमान बहुतकरून मिरवीतच नाहीत. मग त्यांचे वैशिष्ट्य कशात आहे? याचे उत्तर या पुस्तकात बाबुरावांच्या सार्वजनिक जीवनाचा जो आलेख आहे त्यात मिळेल. बाबुरावांनी, अनेक सार्वजनिक अन्यायांना वाचा फोडण्यासाठी आपल्या लेखणीचे रुपांतर भाल्यात केले. बाबुरावांचे नाव मी प्रथम ऐकले ते अशाच एका प्रकरणी. हे प्रकरण म्हणजे काशीबाई हणबर प्रकरण. या प्रकरणाची हृदयद्रावक हकीकत लेखिकेने पाचव्या प्रकरणात सांगितली आहे. इतिहासाच्या पानावर पडलेले रक्ताचे डाग ताजे करून दाखविण्याची लेखिकेची शक्ती या प्रकरणात चांगली प्रत्ययास येते. लोकमान्य टिळकांच्या जीवनाविषयी मला नेहमी वाटत आलेले आहे की त्यांच्या आयुष्यात 'ताईमहाराज' एवढे एकच प्रकरण घडले असते तर त्यांचे अलौकिक असामान्यत्व प्रस्थापित झाले असते. कारण या प्रकरणाने टिळकांची पुरी सत्वपरीक्षा झाली. बाबुरावांच्या सार्वजनिक जीवनात काशीबाई हणबरं प्रकरणास थोडेसे असेच स्थान आहे. त्याने त्यांची देखील सत्वपरीक्षा केली आणि त्या परीक्षेस ते उतरले. अर्थात बाबुरावांनी इतरही अशीच काही प्रकरणे लढविली आणि त्या प्रकरणांच्या हकीगतींनी या पुस्तकाचा कस वाढविला आहे.

आनंदाची गोष्ट अशी की महाराष्ट्राने बाबुरावांच्या पत्रकारितेचा योग्य तो सन्मान केला. बेळगावच्या पत्रकारपरिषदेचे ते स्वागताध्यक्ष होते. जळगावच्या पत्रकारपरिषदेचे ते अध्यक्ष झाले आणि मुंबई पत्रकार संघाने त्यांना महनीय प्रवक्ते म्हणून पाचारण केले. वास्तववाद कोळून प्यालेल्या नानासाहेब परुळेकरांनी, 'सकाळ' पत्राच्या रौप्यमहोत्सवाच्या निमित्ताने करंदीकर–किर्लोस्करांच्या बरोबरीने त्यांचा सत्कार केला, याचे विशेष महत्त्व आहे. या सन्मानांची हकीगत देताना लेखिकेला वाटलेल्या रास्त अभिमानात माझ्यासारख्या थोड्या दूरच्या स्नेह्यांनाही आनंद वाटतो, हे सौ. प्रिया प्रभू यांनी नमूद करून ठेवावे.

वृत्तपत्र म्हणजे प्रचाराचे साधन अशी सर्वसाधारण लोकांची धारणा असते. सर्वसाधारण वर्तमानपत्राचे स्वरुप पुष्कळदा असेच असते. पण अस्सल वर्तमानपत्र हे प्रचाराचे साधन नसून शिक्षणाचे साधन असते. पत्रकारितेच्या स्वाभाविक स्वरुपानेच ही जबाबदारी त्याच्या डोक्यावर दिलेली आहे. वर्तमानपत्र हे लोकशाहीचे अपत्यही आहे आणि साधनही आहे. वृत्तपत्र हे लोकशाहीतच वृत्तपत्र ठरते, हुकूमशाहीत ते राजपत्र असते. वृत्तपत्राचे प्रमुख कार्य लोकमत तयार करणे किंवा त्याला वळण लावणे हे होय. लोकमत ही लोकशाहीची कळ असते, आणि म्हणूनच लोकशाही ही सर्व राज्यपद्धतीत विशेष नैसर्गिक अशी राज्यपद्धती आहे. नैसर्गिक म्हणजे निसर्गाच्या नियमांना धरून असलेली. होमिओस्टेसिस हा निसर्गाचा एक महत्त्वाचा नियम आहे, होमिओस्टेसिसचे तत्त्व म्हणजे नैसर्गिक अवस्थेवर कायम राखण्याचे तत्त्व. एक उदाहरण देतो. ९८.६ फॅरेनहाईट हे आपल्या शरीराचे नैसर्गिक तपमान आहे. हे शक्य तो अबाधित राहावे अशी आपल्या शरीराची रचना असते. काही कारणाने (हवेतले तपमान वाढल्यामुळे वगैरे) अंगातले तपमान वर जाऊ लागले तर घाम वगैरे येतो आणि हे तपमान उतरू लागते. शरीराचे तपमान खाली उतरु लागले तर हुडहुडी भरून किंवा दांत वाजून तपमान वर चढण्यास मदत होते. रक्तातली साखर कमी झाली तर यकृतात साठविलेली साखर मोकळी होऊन रक्तातले साखरेचे प्रमाण कायम राखण्यास मदत होते. आपल्या शरीरात होमिओस्टेसिसच्या अशा अनेक क्रियाला अव्याहत सुरु होतात. त्यातल्या काही फार महत्त्वाच्या बिघडल्या तर मनुष्य आजारी पडतो. अर्थात या तत्वाला काही नैसर्गिक मर्यादा आहेत. आपले शरीर हे सभोवतालच्या निसर्गाशी देवघेव करून जगते, आणि आपल्या शारीरिक होमिओस्टेसिसला या देवघेवीच्या तत्त्वाशी जुळवून घ्यावे लागते. मला असे म्हणायचे आहे की लोकशाहीत हे होमिओस्टेसिसचे तत्व थोडेबहुत कार्यान्वित असते. लोकसत्ताक सरकार हे लोकमताने निवडून आलेले सरकार असते, आणि ठराविक मुदतीने त्याला पुन:पुन्हा लोकमताचा शिक्कामोर्तब करून घ्यावा लागतो. लोकसत्ताक सरकार लोकमतापासून दूर

सरकले, म्हणजे त्याच्या धोरणाचा लोकहिताशी विसंवाद होऊ लागला, की लोकमत बिघडू लागते, आणि पुढच्या निवडणुकीत लोकांची मते मिळावी म्हणून सरकारला लोकांची आराधना करावी लागते, म्हणजे आपल्या धोरणात थोडाबहुत बदल करावा लागतो, म्हणून लोकमत ही लोकशाहीची होमिओस्टेटिक कळ असते. ही कळ दाबण्याची शक्ती, म्हणजे लोकमत निर्माण करण्याची शक्ती वृत्तपत्रात असते. म्हणून वृत्तपत्रांना मी लोकशाहीची होमिओस्टेटिक शक्ती मानतो.

आता एवढे खरे की वृत्तपत्र हे लोकमत निर्माण करण्याचे एकमेव साधन नव्हे. रेडिओ, टेलिव्हिजन, सभामिरवणुकी इत्यादी इतरही साधने असतात पण लिखित शब्द हा बराच काळ लोकांच्या नजरेसमोर राहतो, आणि पुन:पुन्हा तो लोकांच्या नजरेसमोर आणता येतो. दुसरी गोष्ट हीही खरी की आजची आपली सरकारे लोकमताची खुली निर्मिती होऊ देत नाहीत. ती स्वत:च आपली साधने न्याय्य अन्याय्य पद्धतीने वापरुन लोकमत भ्रष्ट करण्याचे प्रयत्न करतात. आजच्या बिहार– सरकारचे 'सर्चलाईट' व 'प्रदीप' पत्राबद्दलचे धोरण हे याचे नागडे निर्लज्ज उदाहरण आहे. म्हणजे शरीराच्या बाबतीत होमिओस्टेसिसचा नियम जसा आणि जितक्या प्रमाणात लागू पडतो. तितक्या प्रमाणात तो लोकशाहीच्या कारभारात लागू पडत नाही. होमिओस्टेसिसचा नियम पाळला जाणे हे शरीराच्या हिताचे असते तर लोकशाही सरकारांना ते अनेकदा गैरहिताचे वाटते. होमिओस्टेसिसचे तत्व पाळणे ही शरीराची प्रकृती असते तर लोकशाही सरकारांना कित्येकदा ती विकृत वाटते आणि त्याच्या पालनात अडथळे आणण्याची ताकद त्यांजपाशी असते. आणि म्हणूनच हे तत्व पाळण्याची कोशिस, म्हणजे विधायक आणि विरोधक टीकेने लोकमताला वळण लावण्याची कोशिस पत्रकाराने कसोशीने केली पाहिजे म्हणजे त्याने आपले लोकसत्ताक स्वातंत्र्य अबाधित राखण्याचा कसोशीने प्रयत्न केला पाहिजे. म्हणूनच वृत्तपत्रीय स्वातंत्र्य ही लोकशाहीची एक नस मानली जाते.

लोकशिक्षण ही या स्वातंत्र्याची उपासना असते, तर प्रचार हा त्याचा दुरुपयोग असतो, शिक्षक सुद्धा आपल्या व्यवसायाचा दुरुपयोग करू शकतोच. प्रचारी शिक्षक हा आपल्या व्यवसायाचा दुरुपयोगच करीत असतो. खऱ्या शिक्षकाची वृत्ती ही सत्यसंशोधनाची वृत्ती असते. आपल्या विद्यार्थ्यांना वस्तुस्थिती सांगावी आणि वस्तुस्थिती शोधून काढण्यासाठी विद्यार्थ्यांची मानसिक तयारी करावी हे खऱ्या शिक्षकाचे कर्तव्य असते. आता सारे शिक्षक आपल्या व्यवसायाच्या पावित्र्याने प्रभावित झालेले असतात असे नाही.त्याचप्रमाणे आपल्या व्यवसायाची वेश्यागिरी करणारेही अनेक पत्रकार असतात. अशा पत्रकारांना (आणि त्याही अगोदर त्यांच्या वृत्तपत्रांच्या संचालकांना) प्रलोभने वगैरे दाखविण्याची विद्या लोकसत्ताक राज्यात मंत्र्यांनी आणि अधिकाऱ्यांनी आत्मसात केलेली असते. पण हाडाचा पत्रकार आपले लोकमताला शिक्षित करण्याचे कार्य प्रामाणिक इर्षेने करीत असतो. या दृष्टीने संपादकाची खुर्ची आणि शिक्षकाची खुर्ची यात एक आत्मीय नाते असते.

बाबुराव ठाकुर यांच्या ठिकाणी ही शिक्षकाची बुद्धि स्वाभाविकपणेच वसत आहे असे दिसते. म्हणून त्यांनी वर्तमानपत्र काढले आणि चालविले. त्याचप्रमाणे शैक्षणिक संस्था काढल्या आणि चालविल्या. बाबुरावांच्या कर्तृत्वाचा ओघ वृत्तपत्रीय रकान्यातून जितका वहातो तितकाच तो शैक्षणिक संस्थांच्या कचेऱ्यातून वाहतो. त्यांच्या वृत्तपत्रीय उद्योगात जी सार्वजनिक बुद्धि दिसते तीच त्यांच्या शैक्षणिक कार्यात दिसते. या दृष्टीने आचार्य अत्र्यांनी, आपल्या बेळगावच्या अध्यक्षीय भाषणात, बाबुरावांच्या शैक्षणिक कार्याचा जो गौरवपूर्वक उल्लेख केला तो अतिशय उचित होता.

पण पुण्या–मुंबईच्या लोकांना बाबुरावांची जी ओळख आहे ती बेळगाव निपाणीच्या सीमासंग्रामाचे एक झुंजार नेते म्हणून आहे. या संग्रामातील बाबुरावांच्या भूमिकेचे जे एक वैशिष्ठ्य आहे तिचा योग्य उल्लेख लेखिकेने केला आहे. या त्यांच्या भूमिकेत प्रादेशिक अभिमान नाही तर न्यायावरील निष्ठा आहे. न्यायाची चाड आणि अन्यायाची चीड यांनी

बाबुराव या सीमासंग्रामास प्रवृत्त झालेले आहेत. त्यांची मूल भूमिका द्विभाषिक सीमाप्रदेशात वावरणाऱ्या कोणत्याही कार्यकर्त्याला शोभेल अशीच होती. ती मूलत: राष्ट्रीय होती. केवळ राष्ट्रीय भूमिकेवरूनच आहे. नव्हे, तर सीमाप्रदेशातील दैनंदिन अनुभवाची गोष्ट म्हणून त्यांचा भाषावार राज्यरचनेला विरोधच होता. पण एकदा भाषावार राज्यव्यवस्था करायचे ठरल्यानंतर बहुसंख्य मराठी भाषिक लोकांना न्याय मिळाला पाहिजे, असा आग्रह त्यांनी धरला आणि या आग्रहात आणि त्याच्या पुरस्कारात त्यांचे स्वाभाविक कणखर दिल व्यक्त झाले.

पण आम्हाला महाराष्ट्रात घाला असे जेव्हा सीमाभागातील जनता म्हणते तेव्हा आपण कार्य स्वीकारीत आहोत याचा मात्र सखोल विचार तिने केला पाहिजे. आजच्या महाराष्ट्राची एक सामाजिक प्रकृती आहे, आणि या प्रकृतीशी आपले नाते जुळते का याचा विचार तिने केला पाहिजे. आजच्या महाराष्ट्रात एकच जात (किंवा जमात) सुमारे ५० टक्क्यांची आहे. आणि तिला विरोध करू शकेल अशी दुसरी जात अगर जमात नाही. तेव्हा महाराष्ट्राचा कारभार या जातीच्या कलाने मुख्यत: चालावा आणि त्याच्या राज्यकर्त्यांना अशी एखादी जमात प्रबळ नसलेल्या समाज व्यवस्थेच्या दृष्टीने विचार करता येऊ नये ही अगदी स्वाभाविक गोष्ट आहे. आजच्या महाराष्ट्रात कोकण विभागाचे प्रश्न सुटत नाहीत, कारण राज्यकर्त्यांना कोकणचे प्रश्न कळतच नाहीत. कोकणात कोणतीही एक प्रबल (dominant) अशी जात अगर जमात नाही. म्हणून कोकणच्या समाज व्यवस्थेला एक आगळे स्वरुप प्राप्त झाले आहे. हे स्वरुप राज्यकर्त्यांच्या ध्यानात येऊ शकत नाही, आणि त्यातून निर्माण झालेले प्रश्न त्यांना कळत नाहीत. त्यांच्या डोळ्यांना जो चष्मा लावलेला असतो त्यातून या प्रश्नांचे आकलन त्यांना होत नाही. म्हणून कोकणच्या एखाद्या अल्पसंखीय मंत्रीपद देऊन किंवा प्रदेशाध्यक्षपद बहाल करून ते कोकणचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करतात, आणि फसतात आणि सोबत कोकणच्या लोकांना फसवितात.

माझ्या समजुतीप्रमाणे सीमाप्रदेशातील निदान त्याच्या काही महत्त्वाच्या भागांची समाजव्यवस्था कोकणच्या समाज व्यवस्थेप्रमाणेच आहे. म्हणजे तेथे कोणतीही एक जात किंवा जमात प्रबल नाही. (लिंगायत, जैन आणि कानडीभाषिक लोकांनी कुणबी– मराठ्यांच्या बहुमताला छेद दिला आहे) म्हणून या भागांनी महाराष्ट्रात येऊन उपेक्षेचे धनी व्हावे असे मला वाटत नाही. याचा अर्थ सीमाप्रदेशातील जनतेने कर्नाटकाच्या प्रतिकूल प्रभुत्वाखाली राहावे असा नाही. माझ्या मते, सीमाप्रदेशातील जनतेने गोमंतकात सामील होण्याचा निर्णय घ्यावा. या निर्णयाने दोन तीन प्रश्न एकदम सुटतील. सीमा प्रदेशाचे भांडण हे मुख्यत: कर्नाटक आणि महाराष्ट्र यांच्या नेत्यांमधील भांडण असल्याने हा प्रदेश निराळ्याच राज्यात गेल्याने त्यापैकी कोणत्याच नेतृत्वाला पराभवाचा फटका बसल्यासारखे वाटणार नाही. पराभव असला तर दोघांचा असेल, आणि विजय सीमा प्रदेशातील जनतेचा असेल. दुसरी गोष्ट म्हणजे गोमंतकाची समाजव्यवसथा ही कोकणच्या समाजव्यवस्थेसारखी आहे. म्हणजे तेथे कोणतीच एक जात किंवा जमात प्रधान नाही. त्यामुळे सीमाप्रदेशीय समाजव्यवस्थेचे गोमंतकीय समाजव्यवस्थेशी स्वाभाविक नाते जमेल. तिसरी गोष्ट अशी की त्यांचे भाषिक सामंजस्यही नीट जुळेल. चवथी महत्त्वाची गोष्ट ही की सीमाप्रदेशाचा भाग आत आल्याने गोमंतकाचा 'राज्या'च्या घडणीसाठी आवश्यक तो भौगोलिक विस्तार होईल आणि गोमंतकाला भाषिक सामाजिक सांस्कृतिकच नव्हे तर भौगोलिक दृष्टीनेही राज्याचा अधिकार मिळणे शक्य होईल, आणि सध्याचा दिल्लीचा चमत्कारिक सासुरवास बंद होईल. उद्या कोकणचा भाग गोमंतकात सामील झाला. (आणि व्हायला हवाच) तर ही भौगोलिक व्यवस्था अधिक निरामय बनेल. म्हणजे बेळगावचा भाग आल्याने गोमंतकीयांच्या दृष्टीने जी थोडीशी उलाढाल होईल ती स्वस्थ्य होण्यास मदत होईल. म्हणून मला वाटते की अनेक अर्थांनी ही मागणी सीमाप्रदेशीय (निदान त्याच्या बऱ्याच भागातील) लोकांच्याच नव्हे, गोमंतकाच्याच नव्हे, तर राष्ट्रीय हिताच्या

दृष्टीने सुद्धा, उपकारक ठरेल. (हे शक्य आहे की अनेक गोमंतकीय आणि अनेक महाराष्ट्रीय, स्वार्थी बुद्धीने, या सुचनेस विरोध करतील. पण तो मोडून काढला पाहिजे). म्हणून एका नव्हे तर अनेक अर्थानी ही सूचना अतिशय विधायक स्वरुपाची आहे. श्री. एस. एम. जोशी यांनी ही सूचना केली. तेव्हा हा सारा विचार त्यांच्या पुढे होता की नाही मला माहीत नाही, पण त्यांच्या त्या सुचनेत मोठी वर्धिष्णू शक्यता आहे, आणि त्या दृष्टीने तिचा विचार व्हायला हवा.

एका प्रभावी माध्यमातून हा विचार मांडण्याची, आणि त्याहीपेक्षा अधिक म्हणजे एका सच्च्या देशभक्ताचा आणि समाजसेवकाचा गौरव करण्याची संधी या प्रस्तावनेच्या द्वारे दिल्याबद्दल मी लेखिकेचा अतिशय आभारी आहे. हे पुस्तक लेखनाच्या हौसेतून निर्माण झालेले नाही, पण त्यात लेखणीचा उत्तम विलास आहे. विशेष म्हणजे 'कौशल्य सारे रचनेत आहे.' या म्हणीचा प्रत्यय या पुस्तकाने येतो या पुस्तकाची रचना फार चांगली आहे. चरित्रनायकाकडे पाहण्याची लेखिकेची दृष्टी जात्याच किती समर्थ आहे, याचा या रचनेमुळे पुरावा मिळतो आणि म्हणून मी तिचे अभिनंदन करतो.

**प्रभाकर पाध्ये**

**पुणे २९-९-१९७४**

# मनोगत



हा चरित्रग्रंथ म्हणजे माझी एक धडपड आहे. पण ही धडपड म्हणजे माझी लेखिका होण्याची धडपड नव्हे. माझ्या वडिलांविषयी माझ्या मनात नितांत आदर आहे. त्यांच्या जीवनाबद्दल मी आजपर्यंत बरेचसे ऐकलेले आणि वाचलेले आहे. त्यांचे अलिकडचे कार्य तर मी अगदी जवळून पाहिलेले आहे. या ऐकण्या पाहण्यातून मला त्यांच्या जीवनकार्याचे जे दर्शन झाले, त्यामुळे माझे वडील या नात्याने त्यांच्याबद्दल माझ्या मनात असलेला नितांत आदर आणखी दुणावला. याच आदरामधून मला मधूनमधून असे वाटू लागावयाचे की काकांच्या मी न पाहिलेल्या जीवनाबद्दलची माहिती अधिकाधिक जमवावी व शक्य झाले तर त्यांच्या आठवणी लिहून काढाव्यात आणि त्या दृष्टीने माझे प्रयत्न चालू झाले.

मी घरच्या वडील मंडळीना हळूहळू जुन्या गोष्टी विचारु लागले. काकांच्या लहानपणाबद्दलची थोडीबहुत माहिती मिळत गेली. नंतर त्यांच्या सार्वजनिक कार्याची माहिती घेण्यासाठी त्यांच्या

स्नेह्या सोबत्यांना भेटण्याचा मी प्रयत्न केला. त्यांचे अनेक जवळचे स्नेही आज दुर्दैवाने दिवंगत झालेले आहेत. जे हयात आहेत त्यांना वार्धक्याने ग्रासलेले आहे. शेवटी काकांच्या पेक्षा वयाने लहान पण त्यांच्या बरोबर काम केलेल्या मित्रानाही मी भेटले. निरनिराळी माहिती मिळत गेली. या सर्वांमध्ये मला खरा आधार मिळत गेला तो काकांच्या एका जीवश्च्यकंठश्च्य सोबत्याचा ज्याच्या सहवासात काका रात्रंदिवस अद्यापिही राहतात. ‘त्या ‘तरुण भारता’चा ! काकांच्या या सोबत्याला विस्मरणाची बाधा कधीच होणे शक्य नाही. आपल्या जन्मकाळापासून जे जे घडत गेले, ते ते सर्व आपल्या कुवतीप्रमाणे त्याने जपून ठेवलेले आहे. त्याचा हा आधार मिळाला आणि अर्थातच माझ्या लेखनाला अधिक प्रेरणा लाभली. प्रथम आठवणीच्या स्वरुपात लेखन करण्याचा माझा विचार होता. पण मिळालेली माहिती एवढी वाढत गेली की, तिची अनेक प्रकरणात विभागणी करावी लागली व प्रत्यक्षात हा ग्रंथ साकार झाला.

ग्रंथ साकार झाला खरा, पण तो परिपूर्ण झाला असे म्हणणारी मी कोण! उलट त्यातील अनेक उणीवा मला जाणवत आहेत. ज्या घटना मी प्रत्यक्ष पाहिलेल्या नाहीत, त्या घटनांचा अन्वयार्थ लावताना माझा उडालेला गोंधळ अद्यापही माझ्या मनातून पूर्णपणे दूर झालेला नाही. राजकारणासारख्या प्रकरणात (त्या क्षेत्राशी संपूर्णपणे अनभिज्ञ असलेल्या) माझी जी त्रेधातिरपीट उडाली, त्यामुळे हे ग्रंथलेखन माझ्या हातून पुरे होईल असे वाटले नव्हते. पण अनेकांचे सहाय्य घेऊन हे प्रकरण मी कसेतरी निभावून नेले.

या ग्रंथलेखनाबाबत माहिती जमविण्यासाठी वास्तविक पाहता मला अनेकजणांकडे जावे लागू नये, कारण प्रत्यक्ष माझे वडील घरी असतात. आणि त्यांच्याच संबंधीचे मी लेखन करीत असताना, मला त्यांच्याकडून जवळजवळ सर्व माहिती मिळविता आली असती, पण आमच्या काकांच्या स्वभावामुळे ते शक्य झाले नाही. मी त्यांच्या संबंधी ग्रंथ लिहित आहे याची कल्पना बरेच दिवस मी त्यांना होऊ दिली नव्हती, कारण त्यांच्या स्वभावाविषयीची भीती! पुढे त्यांना ते समजले. त्यावेळी त्यांनी आपल्याला ही गोष्ट पसंत नसल्याचे स्पष्ट सांगितले. ‘एका सामान्य माणसाचे चरित्र लिहिण्यापेक्षा काहीतरी दुसरे लेखन कर!’ असा सल्ला त्यानी मला दिला. पण स्वत:ला सामान्य म्हणणाऱ्या या माणसाच्या अंगी काहीतरी असामान्यत्व आहे, असे मला आढळून आले. त्यामुळे काकांचा विरोध पत्करूनही मी माझे लेखन तसेच पुढे चालू ठेवले आणि आता हा ग्रंथ पूर्ण झाला.

ग्रंथाच्या शेवटच्या प्रकरणासाठी ज्या ज्या व्यक्तीनी आपले लेख पाठविले त्या सर्वाचे आभार मानणे माझे कर्तव्य आहे. ग्रंथांच्या अंतर्बाह्य सजावटीसाठीही अनेकांचे सहाय्य झालेले आहे. प्रत्यक्ष ग्रंथलेखन करताना मी जमविलेल्या माहितीची सुसंगत मांडणी करण्यासाठी प्रा. सुरेश दामोदर जोशी यांचे वारंवार सहाय्य झाले आहे. हस्तलिखिताची पुनर्रचना करण्याच्या कामी मला श्री. पुंडलीकजी यांचे बहुमोल सहाय्य झाले. या सर्वांचे आणि इतरत्र उल्लेखिलेल्या अनेक व्यक्तींचे माझ्यावर मोठे ऋण झाले आहे. औपचारिक आभार मानून ते ओझे दूर करता येणार नाही. अनेकांच्या ऋणाचे हे ओझे कायमचे वाहण्यातच मला आनंद आहे.

**– सौ. प्रिया अ. प्रभू**

# निवेदन

प्रस्तुत पुस्तक वाचकांना सादर करताना मला फार आनंद वाटतो. या पुस्तकाचे बहुतेक सारे श्रेय माझी कन्या सौ. प्रिया अशोक प्रभू (पुष्पा ठाकूर) हिजला आहे. तिच्या अविरत श्रमामुळे आणि चिकाटीमुळेच हा ग्रंथ तयार झाला आहे. एरव्ही तो प्रसिद्धीलाही आला नसता. पदवीधर झाल्यानंतर तिने फावल्या वेळात तरुण भारताच्या जुन्या फायली वाचून काढल्या. त्यातील महत्त्वाच्या घटनांची टिपणे घेतली, ज्या ज्या ठिकाणी माझा विशेषेकरून संबंध आला. त्या त्या विषयीचे उतारे तिने लिहून काढले. माझ्या आप्तांकडून माझ्या पूर्वायुष्याची जी काही माहिती गोळा करता येईल, ती तिने गोळा केली. शिवाय माझे स्नेही, मित्रपरिवार यांच्याशी पत्राद्वारे संपर्क साधून माझ्याविषयीची जी काही माहिती मिळेल ती सर्व एकत्रित केली. कित्येक प्रसंगी खेड्यापाड्यातून चालविलेल्या शाळांतील शिक्षकांच्या संमेलनाला ती माझ्याबरोबर उपस्थित राहिली. काही जाहीर सभांना हजर राहून माझ्या कार्याचे तिने अवलोकन केले. जळगाव येथील मराठी पत्रकार परिषदेचा मी ज्यावेळी अध्यक्ष होतो, त्यावेळी त्या परिषदेला ती मुद्दाम उपस्थित राहिली, आणि त्यानिमित्ताने तिने वृत्तपत्रव्यवसायातील अनेकांचा परिचय करून घेतला, आणि पुढे माझ्या संबंधात तिने त्यांच्याशी पत्रव्यवहार केला.

१९४२ च्या‘चले जाव’ आंदोलनात मला जेव्हा अटक झाली, तेव्हा ती अवघी दीड वर्षांची होती. माझ्या एकंदर राजकीय धकाधकीच्या जीवनामुळे मला तिच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरविण्यास फुरसदच मिळाली नाही. लहानपणापासूनच तिच्यामध्ये कलात्मकता होती. म्हणून नृत्य, गायनाची तिची हौस तिचे आजोबा व तिची आई यांनी पुरविली. लहानपणीच तिचे नृत्याचे कार्यक्रम जाहीररीत्या होऊ लागले. पुढे नृत्यकलेचे तिने खास शिक्षणही घेतले. या तिच्या कलेचा चोहोकडे गौरव होऊ लागला. आर्ट्स सर्कलसारख्या संस्थांकडून तिला प्रशस्तिपत्रे व पारितोषिके मिळू लागली. नृत्य– नाट्यादि कलांप्रमाणेच तिला चित्रकलेचीही आवड आहे. त्या कलाक्षेत्रातही तिने पदार्पण केले व चित्रकलेच्या परीक्षा पण दिल्या. नाविन्यपूर्ण अशा सजावटीबद्दल प्रदर्शनातून तिने पारितोषिकेही मिळविली आहेत.

अशाप्रकारे कलाक्षेत्रात भाग घेत असतानाच तिने शिक्षणाकडे व वाचनाकडे सहज दुर्लक्ष केले नाही. वनिता विद्यालयातून एस.एस.एल.सी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर राणी पार्वतीदेवी कॉलेजमधून

तिने बी. ए. ची पदवी संपादन केली. पुढे एक दोन वर्षे ठळकवाडी हायस्कूलमध्ये शिक्षिका म्हणूनही तिने काम केले. हे अध्यापनाचे काम करीत असताना विद्यार्थ्यांचे प्रेम संपादन करण्याचे महत्त्वाचे कार्य तिने केले व विद्यार्थ्यांना एकप्रकारे लळा लावला. कोणतेही काम हाती घेतले तर मन:पूर्वक करावयाचे व ते पूर्ण करण्याची जिद्द बाळगावयाची हा तिचा पहिल्यापासूनचा स्वभाव. त्यामुळेच तिने तरुण भारताच्या एवढ्या जुन्या फायली चाळल्या, टिपणे काढली, संदर्भ गोळा केले. हे काम वास्तविक कंटाळवाणे, अत्यंत जिकीरीचे असते. भूतकालातील गोष्टीना उजाळा द्यावयाचा हे काम तसे थोडे कठीणच! पण तिने ते पार पाडले.

मी माझ्या वृत्तपत्रीय व्यवसायाकरिता रात्री प्रेसमध्ये असताना ती घरी रात्रौ बारा वाजेतोपर्यंत लेखनाचे, संदर्भ शोधून काढण्याचे काम मोठ्या चिकाटीने करीत असे. या कामी तिला प्रो. सुरेश जोशी एम.ए. (त्यावेळचे पार्वतीदेवी कॉलेजचे ग्रंथपाल) यांचे मनोभावे सहाय्य झाले. हे इकडे चालू असतानाच, या संदर्भात तिने केलेल्या पत्रव्यवहाराला अनुसरुन आलेला मजकूर तिच्याकडे बराच गोळा झाला होता. तोही तपासून त्याची संगती लावण्याचे काम तिने केले. माझ्याशी विशेष परिचित असलेल्या पत्रकार स्नेह्यांना गळ घालून तिने काहीतरी लिहावयास त्यांना भाग पाडले. हा सर्व पत्रव्यवहार तिने केव्हा केला व त्याची उत्तरे काय आली याचा मला पत्ताच नव्हता. हे सर्व करीत असताना तिने अडचणी, शंका वा सल्ला याबाबत माझ्याकडे कधीही शब्द टाकला नाही.

तिचे हे लिखाण पूर्ण होऊन काही काळ लोटला. तिने आपल्या लिखाणाची काही प्रकरणे आपल्या मैत्रिणीकडून लिहवून घेतली. हे सर्व झाले तरी माझे तिकडे कधीच लक्ष गेले नाही. 'तिने लिहून ठेवलेल्या मजकुराचे चोपडे नजरेखालून तरी घाला.' अशाप्रकारे मला घरातून वारंवार तगादा व्हावयाचा. पण मी तिकडे जवळजवळ दुर्लक्ष केले.

अशाप्रकारे लिहून ठेवलेल्या या मजकुराच्या वह्या चार वर्षे तशाच पडून होत्या. पुढे जेव्हा ती नाराज वा रुष्ट होईल असे मला वाटू लागले तेव्हाच मी तिकडे लक्ष दिले. पुढे हे बाड मी माझे स्नेही श्री. पुंडलिकजी, कृष्णा मराठे, बा. कृ. गलगली यांना वाचावयास दिले. त्यानी वाचून पाहून त्यावर काही संस्कार केले. काही सूचना केल्या. तरी त्या कामाला गति मिळेना. पुढे वेळात वेळ काढून ते काम एकदाचे हाती घेतले. तिने लिहिलेला मजकूर भरपूर, विविध स्वरुपाचा व पुनरुक्तीचा होता. त्यात छाटाछाट करून शक्य तो रेखीवपणा आणण्याचे काम मी स्वत:हून केले. या कामी तरुण भारताचे सहसंपादक र. के. तेंडोलकर यांचे अत्यंत मोलाचे सहाय्य झाले आणि त्यांनी सर्व मजकूर पुन्हा प्रकरणवार लिहून काढला. तोच आता प्रस्तुत ग्रंथरुपाने वाचकांसमोर येत आहे.

या ग्रंथात अनेक उणीवा राहून गेल्या आहेत. काही ठिकाणी आवश्यक ती भर घालावयाची असूनही ती घालता आलेली नाही, याची मला जाणीव आहे. पन्नास वर्षांच्या माझ्या सार्वजनिक जीवनामध्ये अनेक लहानमोठ्या घडामोडी होऊन गेल्या आहेत. त्याचा वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेला हा पुसटसा वृतांत आहे.

माझी प्रवृत्ती लेखनसुलभ असण्यापेक्षा प्रत्यक्ष कृतीलाच हात घालण्याची. त्यामुळे माझे सर्व आयुष्य कृतिशील बनले आहे. लेखनापेक्षा प्रत्यक्ष कार्याचा व्यापच माझा मोठा. दररोज नवी नवी कामे निघावयाची व त्यांना आकार देऊन ती पार पाडावयाची,हे काम सततचे झाले आहे. काँग्रेसमध्ये असताना. अखंड प्रचाराचे काम करण्यामध्येच सर्व काळवेळ निघून जावयाचा, आणि

त्या कार्याच्या प्रचाराचे साधन म्हणून तरुण भारत पत्राचे संपादन असे हे सव्यसाची काम मला करावे लागले. त्यानंतर राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक या सर्व क्षेत्रात प्रत्यक्ष कार्याचा भार उचलण्याची कामगिरी मी स्वत:च्या डोक्यावर घेतली आहे. आरामखुर्चीत बसून मार्गदर्शन करण्याचे काम मला कधी जमलेले नाही. त्यामुळे अनेकवेळा संभ्रम पडतो की मी कार्यकर्ता आहे की संपादक आहे! आणि आजही तोच प्रकार घडत आहे.

येथे हे स्पष्ट केले पाहिजे की हे माझे आत्मवृत्त नव्हे. आत्मवृत्त लिहावयाचे तर ते काम तसे सोपे नाही. त्याला मोठी स्मरणशक्ती लागते. ती माझ्या ठायी नाही. शिवाय दररोजच्या दररोज टिपणे, टांचणे करून ठेवण्याची सवय पाहिजे. तिचा माझ्या ठिकाणी पूर्ण अभाव आहे आणि स्मरणशक्ती तीव्र नसल्यामुळे स्वत:च माझ्या हातून घडलेल्या काही महत्त्वाच्या गोष्टींची आठवण माझ्या स्नेह्यांकडून मला करून दिली जाते. अशा परिस्थितीत आत्मवृत्त लिहून व्हावयाचे कसे? म्हणून त्याबाबतीत मी पूर्णपणे उदासीन आहे. मला स्वत:ला लिहिण्याची, भरपूर लिहिण्याची तशी हौस नाही. प्रसंगोपात जेव्हा जरुर पडेल तेव्हाच मी लेखणी उचलतो. लेखणी उचलतो म्हणण्यापेक्षा मी तोंडाने मजकूर सांगतो व  दुसऱ्याने तो लिहून घ्यावयाचा असे हे चालते.त्यातही माझ्या हाताच्या अंगठ्याला कंप असल्यामुळे मला फारसे लिहवतच नाही. परिस्थितीनेच भाग पाडल्यामुळे व एका वृत्तपत्राचा संपादक आणि कोणत्याही कार्याचा पाठपुरावा करण्याचे अगत्य, यामुळे मी आजवर एवढे वृत्तपत्रीय लिखाण केले आहे.

मी वृत्तपत्रात स्फुट व प्रदीर्घ लेख बरेच लिहिले आहेत. तथापि ग्रंथरुपाने काही प्रसिद्ध केलेले नाही. माझ्या कन्येने माझ्यासंबंधी जे काही लिहिले ते ग्रंथरुपाने आज वाचकांसमोर येत आहे. या ग्रंथाचे मूल्य अखेर वाचकांनीच ठरवावयाचे आहे.

हे पुस्तक इतक्या आकर्षक स्वरुपात प्रकाशित करण्याच्या कामी छापखान्याच्या कामगार वर्गापैकी कंपोझिटर्स सर्वश्री यल्लाप्पा सातेरी पाटील (अतिवाड), मधुकर हलगेकर, य. कृ. पाटील, नारायण सातेरी पालटी, तसेच मशिन प्रिंटर्स श्री. हरिभाऊ पावसे आणि गुंडू उचगावकर यांनी बरीच मेहनत घेतली आणि त्यावर देखरेख करून ते सुव्यवस्थितपणे पार पाडण्याचे काम चि. किरण ठाकुर याने केले. शिवाय प्रस्तुत ग्रंथात जी छायाचित्रे दिली आहेत, त्यांची निवड करून मांडणी करण्याचे कामही त्यानेच केले आहे.

**– बाबुराव ठाकुर**

प्रकरण पहिले

# व्यक्तिचित्र :कौटुंबिक जीवन

श्री. बाबुराव ठाकुर यांचे नाव आज केवळ बेळगाव शहरालाच नव्हे, तर अवघ्या महाराष्ट्राला परिचित आहे. झुंझार पत्रकार, राजकीय नेता, शिक्षण प्रसारासाठी धडपणारा कार्यकर्ता आणि हरेक सार्वजनिक कार्यात भाग घेणारा सच्चा माणूस अशा विविध अंगानी त्यांचे व्यक्तिमत्त्व आज लोकांसमोर उभे आहे. पण या त्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वापेक्षा मला त्यांचे जे अधिक जवळून दैनंदिन दर्शन झालेले आहे, ते माझे वडील म्हणून. त्यांच्यासंबंधी काही ऐकताना, वाचताना विचार करताना आणि आता प्रत्यक्षपणे लिहितांना, मला त्यांचे हे पिता म्हणून होणारे दर्शन दूर करता येणे अशक्य होते. श्री.बाबुराव ठाकूर यांच्या कोणत्या एखाद्या भाषणाचा वृत्तांत असो, त्यांच्या कार्याचा एखाद्या त्रयस्थाने केलेला गौरव असो किंवा बाबुराव ठाकुर या नावाने त्यांच्या बद्दलची कोणतीही माहिती माझ्या कानावर येवो, मला मात्र या प्रत्येक ठिकाणचा ‘बाबुराव ठाकुर’ हा शब्द पुसट झाल्यासारखा वाटतो, आणि अधिक प्रामुख्याने उभे राहतात ते माझे काका! हे सारे माझ्या काकांच्याबद्दल आहे, हे मी यावेळी विसरु शकत नाही. हा भावनेचा पडदा क्षणभर दूर करायचा ठरवला तरी तो मला दूर करता येत नाही. त्यामुळे काकांच्या कोणत्याही कार्याकडे पाहताना माझी दृष्टी ही कन्येची राहाते, आणि माझ्या लेखनाला साहजिकच काही मर्यादा पडतात, हेही मला जाणवते. एखाद्या व्यक्तीचे चरित्र लिहिताना लेखकाला जे ताटस्थ स्वीकारावे लागते, ते ताटस्थ्यही माझ्याकडून सांभाळले जात नाही, आणि एखाद्या घटनेचा अन्वयार्थ आपल्याच बाजूने लावण्याचा प्रयत्न केला जातो. माझे काका कुठे चुकतीलच कसे, अशी भाबडी श्रद्धा या विवेचनाच्या मागे उभी राहते.

माझ्या या भूमिकेमुळे प्रस्तुत चरित्र ग्रंथाला ऐतिहासिक मूल्यमापनाचे निकष लावण्याची वृथा धडपड मी कधी करणार नाही आणि काकांचीही ती अपेक्षा नसणार. निदान असू नये. कोणत्याही सार्वझनिक व्यक्तीचे जीवन हे अनेक घटनांनी गुंतागुंतीचे झालेले असते. त्या बाबींचा

संपूर्ण जीवनपट जरी डोळ्यासमोर असला, तरी अनेक घटनांचे धागेदोरे परस्परांशी जुळवतांना बराचसा गोंधळ निर्माण होतो. अनेक शंकाकुशंका शिल्लक राहतात. काही वेळा पुरेसा तपशील मिळत नाही. तर अनेक वेळी हाती आलेल्या तपशीलाला आवश्यक तो आधार सापडत नाही. शेवटी अल्पमतीप्रमाणे, डोळ्यांसमोरील घटनांचा कार्यकारणसंबंध जोडण्यापलिकडे काहीच करता येत नाही.

माझ्या काकांच्या बालपणातील आयुष्याचा ज्यावेळी मी शोध घेण्याचा प्रयत्न करू पहाते, त्यावेळी ही अडचण मला सतत जाणवते. सुसंगत घटना एकत्र मिळत नाहीत आणि वयोवृद्ध मंडळीच्याकडून मिळालेल्या ऐकीव माहितीमध्ये सुसंगती सापडत नाही.

काकांच्या आधीच्या पिढीची म्हणजे माझ्या आजोबांच्या कारकीर्दीची जी माहिती मिळते, ती अशी त्रोटकच. कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा गावाजवळील कोरीवडे हे माझ्या आजोबांचे मूळ गांव. पण हे खेडेगाव आता इतिहासजमाच आहे. कारण मी आणि माझी भावंडेच काय,पण माझे काकाही कधी या कोरीवडे गावी गेल्याचे आम्हाला स्मरत नाही. माझे आजोबा कै. राजारामपंत ठाकुर हे शिक्षणाच्या निमित्ताने जे बेळगावी आले ते येथेच स्थायिक झाले.आपले शिक्षण पूर्ण केल्यानंतर येथील बेननस्मिथ मिशन हायस्कूलमध्ये त्यानी शिक्षकाची नोकरी पत्करली. पण त्यांचा खरा पिंड शिक्षकाचा नव्हताच. लवकरच ती नोकरी सोडून ते पोलीस खात्याकडे वळले. हवालदार म्हणून नेमणूक झालेले माझे आजोबा स्वत:च्या कर्तबगारीवर व हुशारीने पुढे फौजदार झाले. आपल्या पोलीस खात्यातील २४ वर्षाच्या कारकीर्दीत त्यानी अनेक धाडसाची कामे केली, मोठमोठे दरोडे व फौजदारी गुन्हे पकडले. त्या काळचा एक कुप्रसिद्ध 'सत्या बेरड' यास धाडसाने पकडल्याबद्दल आजोबांच्या अधिकाऱ्यांनी त्यांचा गौरवही केला होता. घोड्यावर बसण्यात आणि बंदुकीच्या नेमबाजीत पटाईत असलेले माझे आजोबा स्वभावाने रागीट आणि स्वाभिमानी वृत्तीचे होते. घरातील वडील माणसांकडून माझ्या आजोबांचे वर्णन केले जाते ते म्हणजे फौजदारी बाण्याची करारी मुद्रा, जाडसर मिशा, मध्यम उंची, सुदृढ देहयष्टी, कोट, शर्ट व धोतर आणि डोकीस रुमाल हा त्यांचा पोशाख. फौजदारी पेशाला शोभेल अशी 'मोडेन पण वाकणार नाही' ही वृत्ती त्यानी अखेरपर्यंत अंगी बाणवली. त्यासाठी त्यांना वरिष्ठांची गैरमर्जी होऊन फौजदारी नोकरी सोडावी लागली. पण याची फारशी खंतही त्यांना वाटली नाही.

पण मला आठवतात, ते मला चॉकलेट देणारे आजोबा. साऱ्या भावंडांवर माझ्यावर विशेष प्रेम करणारे, मला फिरायला घेऊन जाणारे, बक्षिसाचे आमिष दाखवून माझ्याकडून नाच करून घेणारे आणि एखादी गोष्ट मनाविरुद्ध झाली की, संतापून थयथयाट करणारे,नातवंडांना खेळवणारे, आल्यागेल्यांचे कुशल विचारणारे माझे आजोबा दि. २ जानेवारी १९४७ रोजी आम्हा साऱ्यांना सोडून देवाघरी गेले.

माझ्या आजीचा स्वभाव नेमका त्यांच्या उलट. तिचा प्रेमळ आणि शांत स्वभाव पाहिला की देव्हाऱ्यात मंदपणे जळत राहणाऱ्या समयीची आठवण व्हावी. केवळ घरच्यांवरच प्रेम करणारी नव्हे, तर साऱ्या शेजाऱ्यापाजाऱ्यांना आपलेसे करून टाकणारी माझी आजी संसाराचा प्रचंड व्याप सांभाळताना कधीही चिडलेली दिसत नाही. उलट कोणाच्याही अडीअडचणीला धावून जाण्यास सदैव तयार. आमच्या आजीला मुलेही खूप झाली. पण त्यातील बरीचशी देवाघरी गेली. ज्यांचे पालनपोषण तिने केले त्या माझ्या तीन आत्या– चिमाक्का, शांती आणि सुभद्रा. आणि त्यानंतर माझे वडील व माझे चुलते यशवंतराव. यामध्ये चिमाक्का ही सर्वात मोठी. तिचे लग्न त्यावेळचे

मुंबईचे सुप्रसिद्ध वकील रामचंद्र देसाई यांच्याशी झाले. पण तिला संसारसुख असे लाभले नाही. पदरी अपत्य येऊन अवघ्या पाच वर्षातच ती बालविधवा झाली आणि पुन्हा माहेरी येऊन राहणे तिला क्रमप्राप्त झाले. आज आमच्याकडे असते. काकांच्यासह आम्हा सर्वांनाच वडील व्यक्ती म्हणून तिचा फार आधार आहे. आईप्रमाणेच तिने आम्हा सर्व भावंडांचे पालनपोषण केले आहे. आज आमच्या घरातील सर्वांचेच ते एक श्रद्धास्थान झालेले आहे.

त्यानंतर आमची दुसरी आत्या शांती. हिचा विवाह वसईच्या श्री. बाबुराव बोंद्रे यांच्याशी झाला. आणि सुभद्रा हिचा विवाह बेळगावचे दत्तात्रय तेंडोलकर यांच्याशी झाला. परंतु दुर्दैवाने दोघींचेही विवाहोत्तर आयुष्य लवकरच संपले. माझ्या आजोबांना आपल्या तिन्ही मुलींच्या संसाराची अशी दुर्दशा झालेली पाहावली नाही. त्यांना वेदना झाल्या व ते मनाने पार खचून गेले. आपल्या आयुष्याच्या अखेरपर्यंत त्यांना या वेदना सहन कराव्या लागल्या.

धोंडू उर्फ बाबुराव म्हणजे माझे वडील– काका, यांचा जन्म दिनांक २६ डिसेंबर १८९९ रोजी चंदगड येथील श्रीपादवाडी येथे त्यांच्या आजोळी झाला. काकांच्या पूर्वीची बरीच अपत्ये जगली नव्हती, म्हणून हा तरी मुलगा धोंड्यागुंड्याप्रमाणे धडधाकट राहो, या समजुतीने माझ्या आजीने त्यांचे नाव धोंडू असे ठेवले. पण प्रौढपणी धोंडू या नावातील विचित्रपणा त्यांना जाणवू लागला. म्हणून बाबू या नावाने सर्वजण त्यांना संबोधू लागले. माझे चुलते श्री. यशवंतराव यांचा जन्म काकांच्या पाठोपाठच वर्षा दीड वर्षात झाला. त्यावेळी गावात देवीच्या साथीचा फैलाव झाला होता. त्या महाभयंकर रोगातून आपले मूल वाचले हे पाहून आजोबा आजीने माझ्या चुलत्यांचे नाव यशवंत असे ठेवले.

दोघा भावांचे प्राथमिक शिक्षण बरोबरीने चालू झाले. आपल्या मुलांवर चांगले संस्कार व्हावेत म्हणून माझे आजोबा या दोघांच्या शिक्षणाबाबत फार दक्ष असत. पण काकांचा स्वभाव लहानपणी अधिक हट्टी होता. शाळेला जाण्याची वेळ झाली की, रोजच्या रोज काहीतरी कारण काढून ते रुसून बसत, अथवा लपून रहात. जी गोष्ट शाळेबाबत तीच गोष्ट खाण्यापिण्याबाबत. एकदा म्हणे त्यानी आपल्या आईकडे खाण्यासाठी लाडू मागितला. ‘आक्का, मला आताच्या आता लाडू दे. खूप भूक लागली आहे.’ त्यावर ती म्हणाली, ‘हे पहा, आता जेवणाची वेळ झाली. यावेळी तू लाडू खाल्लास तर तुला जेवण जाणार नाही.’ थोडावेळ थांबून काकानी लाडू मिळतो का वाट पाहिली व रागाने फुणफुणत जाऊन आक्कांनी देवासाठी तुपात भिजवून ठेवलेल्या ताटभर वाती क्षणार्धात पेटवून टाकल्या.

माझे चुलते यशवंतराव यांचा स्वभाव लहानपणी सौम्य आणि शांत होता. शाळा, अभ्यास, खाणे पिणे व साऱ्याच बाबतीत त्यांच्यापाशी एक नियमितपणा होता. बालपणापासूनच त्यांच्या ठिकाणी एक शिस्त बाणली गेली होती. पुढे मोठेपणीही त्यांचे हे शिस्तीचे व टापटिपीचे वागणे काकांच्या धरधोपट वागण्याच्या पार्श्वभूमीवर अधिकच उठून दिसे. शहरी व सुसंस्कृत जीवनाची त्यांना मनापासूनच ओढ असावी असे दिसते. त्यामुळे त्यांचा मित्रपरिवारही एक प्रकारचे परीटघडीचे जीवन जगणारा असाच होता. आपल्या शिस्तबद्ध स्वभावानुसार यशवंतरावांनी आपले बी. ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. १९२४ साली ते इंग्लिश ऑनर्स घेऊन ही परीक्षा पास झाले. त्यानंतर त्यांनी काही काळ एका हायस्कूलमध्ये शिक्षकाची नोकरी केली व पुढे १९२७ साली ते एल. एल. बी. ची परीक्षा उत्तीर्ण झाले. बेळगाव येथेच त्यांनी वकिलीचा व्यवसाय सुरु केला. सुंदर इंग्रजी भाषेत अर्ज अगर मेमोरियल्स तयार करण्यात ख्याति असणारे बेळगाव शहरात जे

थोडे वकील होते, त्यामध्ये श्री. यशवंतरावांची प्रामुख्याने गणना होत असे. इंग्रजीवरील त्यांचा या प्रभूत्वामुळेच कै. अण्णासाहेब लट्ठे यांच्याशी त्यांचा निकटचा स्नेह जुळला होता.

कै. यशवंतरावांचा विवाह कोल्हापुरचे श्री. परशुरामभाऊ उर्फ आबासाहेब परुळेकर यांची कन्या कु. वत्सला हिच्याशी झाला. पण लग्नानंतर त्यानी अवघी १५–२० वर्षेच संसार केला. दैवाला त्यांचे सुरळीत व शिस्तबद्ध जीवन पहावले नाही. १९४८ च्या १९ जानेवारी रोजी कॅन्सरच्या विकाराने मिरज येथे हॉस्पिटलमध्ये ते निधन पावले. आपल्या पत्नीला व एकुलत्या एका मुलीला माघारी ठेवून ते कायमचे निघून गेले.

त्याना वाचनाचा अतिशय नाद होता. आपल्या प्रेमळ आणि परोपकारी स्वभावामुळे त्यांनी ख्रिश्चन, मुस्लिम, पारशी आदी भिन्न समाजातील प्रतिष्ठित लोकांना आपल्याकडे आकर्षून घेतले होते.त्यांचे हे मित्र केवळ वकील म्हणून नव्हे, तर घरचा एक सल्लागार म्हणून त्यांच्याकडे पहात असत. इतका त्यांचा विश्वास त्यांनी संपादन केला होता. त्यामुळे त्यांच्या अंत्यविधीनंतर ख्रिश्चन आणि पारशी यांनी आपल्या प्रार्थना मंदिरामधून त्यांच्यासाठी खास प्रार्थना केल्या. हा मान इतर लोकांना क्वचितच मिळतो.

काकांचे जीवन मात्र असे एकमार्गी कधीच झाले नाही. त्यांचा स्वभाव लहानपणापासूनच धडपड्या. त्यामुळे कॉलेजच्या पदवीपरीक्षेपर्यंत पोहोचणे त्यांच्या प्रवृत्तीला मानवणारे नव्हते. पहिल्यापासूनच अभ्यासापेक्षा अभ्यासेतर गोष्टीमध्येच ते अधिक रमत. खेळाची तर त्यांना खूपच हौस. हॉकी व क्रिकेटमध्ये त्यानी उत्तम प्राविण्य मिळविले होते. त्यांच्या मित्रपरिवाराने चालू केलेल्या आणखी एका उद्योगाला मात्र पुढे फार मोठे व्यापक स्वरुप प्राप्त झाले. युवकांची मनोवृत्ती ही सदैव धडपड करणारी असते. नवीन काहीतरी करण्याची आकांक्षा त्यांना असते. अनेक कल्पनांची चक्रे त्यांच्या डोक्यात फिरत असतात. त्यातील काही कल्पना प्रत्यक्षात उतरतात तर काही विरुन जातात. असा प्रत्यक्षात उतरलेला काकांचा एक मनोरथ म्हणजे भारत वैभव समाजाची स्थापना हा होय. देशस्वातंत्र्याच्या प्रेमाचे त्यांना विद्यार्थिदशेपासूनच वेड लागले होते. आणि आपण समाजासाठी काहीतरी करावे या हेतूने त्यांनी भारत वैभव समाजा'ची (१९१८) स्थापना केली. विद्यार्थ्यांच्या या संस्थेने वाचनालय व ग्रंथालय सुरु केले. शिवाय साक्षरता प्रसारासाठी त्यानी रात्रीच्या शाळा काढल्या. हे कार्य त्यांनी पुढे कित्येक वर्षेपर्यंत चालविले.

एवढ्यावरच हे कार्य थांबले नाही. तर त्यांच्या मित्रसमूहाने 'तरुण भारत' या नावाचे मासिक काढण्याचा संकल्प केला आणि १९१९ सालापासून ते प्रकाशित होऊ लागले. बिकट आर्थिक परिस्थितीतही हे कार्य त्यानी पांच वर्षेपर्यंत नेटाने चालविले. स्वत:चा प्रेस नाही आणि इतर कोणतेही भांडवल नाही. असे असताना छापील मासिक काढण्याची कल्पना कोणालाही पोरकटच वाटावी. पण या पोरकट कल्पनेलाच पुढे प्रौढ स्वरुप प्राप्त झाले. आज काकांचे जीवन होऊन बसलेल्या पत्रकाराच्या उद्योगाचे बीज प्रथम येथे रोवले गेले.

पण काकांची आणि त्यांच्या मित्रमंडळीची उत्साहशक्ती इतकी अमाप होती की, केवळ एखादे मासिक काढून त्यांचे समाधान झाले नाही. त्या काळी स्वातंत्र्य चळवळीचे वारे फार जोरात वाहात होते. लोकमान्य टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाने साऱ्या युवकांच्या मनाची पकड घेतलेली होती, आणि प्रत्येकजण राष्ट्राभिमानाने प्रेरित झाला होता. याचवेळी राजकीय क्षितिजावर म. गांधींचा उदय झाला. आणि लोकमान्यांच्या निधनानंतर त्यानी भारताच्या राजकारणाची सारी सूत्रे आपल्या

हाती घेतली आणि महात्माजींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्याच्या लढ्याला एक वेगळेच वळण मिळाले.

देशभर सर्वत्र सभा, मिरवणुका, बहिष्कार, सत्याग्रह अशा निरनिराळ्या मार्गांनी चळवळीच्या झंझावात पसरत चालला होता. ब्रिटिश सरकारने कितीही दडपशाही केली, तरी प्रत्येक वेळी ही चळवळ अधिक त्वेषाने उफाळून येत असे. जालियनवाला बागेच्या हत्याकांडानंतर (१९१९) म. गांधींनी देशाला 'प्रत्यक्ष प्रतिकारा'च्या चळवळीची एक नवीनच दिशा दाखविली, आणि १९२१ साली ब्रिटिशांशी असहकार पुकारला. कोर्टकचेऱ्या, शाळा–कॉलेज यावरील बहिष्काराची प्रचंड लाट देशभर उसळली. ही चळवळ चालली असतानाच काका सांगली येथील विलिंग्डन कॉलेजमध्ये शिक्षण घेत होते. गांधींच्या हांकेला ओ देऊन देशात हजारो विद्यार्थ्यांनी शाळा कॉलेजांवर बहिष्कार टाकून स्वातंत्र्य संग्रामात उडी घेतली होती. अशावेळी काका कसे स्वस्थ राहतील? त्यांनीही कॉलेजवर बहिष्कार टाकला आणि स्वातंत्र्य संग्रामात उडी घेतली.

हळूहळू सभा, मिरवणुका यात भाग घेणे, निरनिराळ्या राजकीय बैठकांना हजर राहणे, विविध राजकीय प्रश्नांबद्दल बरोबरीच्या मित्रमंडळीत चर्चा करणे यामध्येच काका अधिक रमू लागले. बेळगावातील विद्यार्थ्यांच्या चळवळीचे नेतृत्व  काकांनी पत्करले व स्वयंसेवक संघटना उभारली. पण फौजदारी शिस्तीच्या माझ्या आजोबांना आपल्या मुलाने शिक्षण सोडून चालू केलेली ही सार्वजनिक कार्याची धडपड मान्य नव्हती. त्यामुळे काकांच्या प्रत्येक हालचालीवर माझे आजोबा पाळत ठेवू लागले. आपल्या मुलाने प्रथम आपले शिक्षण पूर्ण करावे. आणि तुरुंगात वगैरे जाण्याचा धोक्याचा मार्ग पत्करू नये, असे त्याना वाटत होते.पण काकांच्यावर याचा फारसा परिणाम झाला नाही. उलट बाप– लेकामध्ये हळूहळू खटके उडू लागले. एखाद्या सभा–मिरवणुकीला हजर राहण्यासाठी काकांनी घरातून बाहेर पडण्यास निघावे आणि आजोबांनी त्यांना अडवावे असे वारंवार होऊ लागले. काहीवेळा या संघर्षाला गंभीर स्वरुप प्राप्त होऊन आजोबांनी संतापून तू आज घरातून बाहेर पडलास तर याद राख! घराला पारखा होशील' असे निर्वाणीचे उद्‌गार काढण्यापर्यंत पाळी येई. पण काकांच्यावर यापैकी कशाचाच परिणाम झाला नाही.

एकदा शहापूरला एक सभा होणार होती. त्या सभेत काकांचे भाषणही होणार होते. सभेवर ब्रिटिशांचे पोलीस नजर ठेवून होते. लाठीहल्ला होऊन धरपकड होणार अशीही एक बातमी होती. माझ्या आजोबांना ही बातमी समजली आणि त्याचवेळी त्यांनी ठरवले की आज आपल्या बाबूला आपण अडवलेच पाहिजे. नाहीतर पुढे फार मोठा गंभीर प्रसंग ओढवेल. या विचाराने त्यांनी काकांना खूप समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. पण ते मनावर न घेता काका सभास्थानाकडे निघून गेले.

आपल्या मुलाला कितीही विरोध केला तरी तो आता या राजकीय चळवळीपासून दूर होण्याची शक्यता फार कमी आहे, ही गोष्ट आता आजोबांच्या लक्षात येऊ लागली. त्यामुळे त्यांचाही उघड विरोध कमी होऊ लागला. उलट आपला मुलगा मोठ्या धैर्याने पुढे जात आहे. सभा गाजवत आहे. चळवळीत अग्रभागी चमकत आहे हे पाहून आजोबाना कौतुक वाटू लागले. बापलेकांचा समोरासमोर अबोला चालू असला तरी माघारी आजोबा आपल्या मुलाबद्दल कौतुकाचे उदगार काढू लागले. पण याचवेळी ब्रिटिश सरकारच्या विरुद्ध चळवळीत उघड उघड भाग घेतो तर आज ना उद्या याच्या जिवाला काही बरे वाईट तर होणार नाही ना, अशी शंका त्यांना बेचैन करू लागली. शेवटी कितीही झाले तरी पित्याचेच मन ते. नाना शंकाकुशंका मनात येऊ लागल्या की आजोबा अनेक वेळा अस्वस्थ होत. रात्ररात्र त्यांना झोप लागत नसे.

शेवटी आजोबांच्या पितृसुलभ मनाने एक व्यावहारिक तडजोड शोधून काढली. आपल्या मुलाचे दोनाचे चार हात केले म्हणजे त्याच्या उपद्व्यापांना आळा बसेल या समजुतीने त्यांनी काकांच्या लग्नाचा बेत ठरविला. माझ्या आजीने तर त्यांच्या या विचाराला एकदम उचलून धरले. ते दोघेही काकांच्या मागे एकसारखा लग्नाचा आग्रह करू लागले. काकांचे धाकटे बंधू यशवंतराव यांचा स्वभाव सरळ व शांत असल्यामुळे त्यांचा जीवनक्रम सुरळीत चालला होता. आईवडिलांच्या लग्नाबाबतच्या विचाराला त्यांनी मान्यता दिल्याने त्याचे लग्नही खूप लवकर म्हणजे काकांच्या लग्नाआधी चारपाच वर्षे होऊन गेले होते. काकांनीच आपल्या लग्नाच्या बाबतीत चालढकल करून चारसहा वर्षे तशीच काढली होती. पण आता मात्र त्यांना आपल्या आईवडिलांच्या विनंतीला मान्यता देण्याखेरीज गत्यंतर नव्हते. मालवणचे सुप्रसिद्ध वकील कै. दे.भ. शंकरराव गव्हाणकर यांची मुलगी तारा हिच्याशी काकांचा विवाह ता. ४ जुलै १९३४ रोजी झाला.

माझ्या आईलाही देशभक्तीचे बाळकडू लहानपणीच मिळाले होते. कारण तिचे वडील हे स्वत: एक देशभक्तच होते. त्यांनी स्वातंत्र्य–आंदोलनात सक्रीय भाग घेतला होता. त्यामुळे त्यांचे संस्कार माझ्या आईवर झाले होते. सभा, मिरवणुका, सत्याग्रह, प्रभातफेऱ्या, सूतकताई या गोष्टी तिला नवीन नव्हत्या. स्वातंत्र्य– चळवळीत धडाडीने भाग घेणाऱ्या एका देशभक्ताशी आपला विवाह होत आहे, याचा तिला आनंद व अभिमान वाटला. आपल्या जीवनाचे सार्थक झाल्यासारखे वाटले.

माझ्या आजोबांचा अंदाज मात्र साफ चुकला. कारण लग्न झाल्यानंतर काका प्रपंचात अधिक लक्ष घालतील अशी त्यांची समजूत होती. पण ती फोल ठरली. ते सदैव सार्वजनिक कार्यातच गुंतलेले असावयाचे. काकांच्या या स्वभावामुळे घरचा बहुतेक सर्व व्यवहार माझे आजोबाच पहात. पुढे पुढे त्यांनी छापखान्याची देखील सर्व जबाबदारी आपल्यावर घेतली होती व एकूण व्यवहारावर त्यांची कडक नजर असे.

१९३७ साली काकांना आयुष्यात दु:खाचा प्रथमच मोठा धक्का बसला, तो मातृवियोगाचा. साऱ्या घरभर सदैव हसतमुखाने वावरणारी. बारीक सारीक गोष्टीत लक्ष घालून आपला नेटका संसार उभा करणारी, मुलांचा हट्ट पुरविणारी, त्यांचे अनेक अपराध पोटात घालून त्यांना मायेने जवळ घेणारी त्यांची आई त्यांना त्यावर्षी सोडून गेली. काकांना फार मोठा आधार तुटल्यासारखा वाटला. तिच्या आधारावरच ते प्रत्येक कार्यात धडाडीने भाग घेत आले होते. अनेक प्रसंगी तिच्या धीराच्या शब्दांतून त्यानी स्फूर्ती घेतली होती.

आईच्या मृत्युमुळे काकांचे मन विषण्ण झाले. तथापि त्यामुळे त्यांच्या सार्वजनिक कार्यात खंड पडला असे नव्हे. पण त्यांचा स्वभाव मात्र अधिकाधिक गंभीर होत चालला. कळत न कळत का होईना. घरच्या कामाकडे लक्ष देणे त्यांना अपरिहार्य वाटू लागले. छापखान्याची सर्व जबाबदारी अद्यापही त्यांचे वडीलच पहात होते. पण तेही आता थकले होते. संसाराचे सर्व ओझे त्यांच्या जिवावर सोपवून पूर्वीइतक्या मोकळेपणाने आता बाहेर पडणे काकांना शक्य नव्हते. तथापि स्वातंत्र्यआंदोलनात भाग घेतल्यामुळे काकांना चार वेळा तुरुंगात जावे लागले. त्यावेळी छापखान्याचा सर्व कारबार आजोबानीच पाहिला. याच काळात छापखान्याच्या झडतीचे व जामिनकीचे काही प्रसंग ओढवले. या आपत्तींना आजोबांनी धैर्याने तोंड दिले. पण माझ्या आजीच्या मृत्यूने तेही आता फार खचून गेले होते. तिच्या माघारी कसाबसा आठदहा वर्षे त्यांनी संसार सांभाळला. आणि १९४७ सालच्या २ जानेवारीला माझे आजोबा दोन मुलगे आणि एक विधवा मुलगी यांना माघारी सोडून कायमचे देवाघरी गेले.

# ठाकुर कुटुंबीय



वडील– कै. राजारामपंत ठाकुर



आई– कै. रमाबाई ठाकुर,




बहीण– श्रीमती चिम्माक्का देसाई



भाऊ– कै. यशवंतराव ठाकुर

# चरित्र लेखिका व तिची भावंडे




डावीकडून– सौ. प्रिया प्रभू, कु. शोमा ठाकुर, चि. किरण ठाकुर, सौ. छाया परुळेकर व सौ. नलिनी धोंड

# सौ. स्नेहलता ठाकुर नातवंडासमवेत



डावीकडून– सौ. स्नेहलता ठाकुर, कु. सविता धोंड, चि. नितीन धोंड व अशोक धोंड

## कै. यशवंतराव ठाकुर यांची कन्या व जामात



श्री. शंकर सखाराम वाघ व सौ. रेखा शं. वाघ

## सौ. माई बा. ठाकुर यांचे वडील



देशभक्त कै. शंकरराव गवाणकर( वकील)
मालवण

काकांच्या मनावर हा दुसरा आघात होता. आता  उरलेल्या कुटुंबात वडील व कर्ते असे काकाच राहिले होते. नाही म्हणावयास घरच्या व्यवहारात बरोबरीने साथ द्यायला त्यांचा धाकटा भाऊ यशवंतराव होता. पण दैवाला भावा भावांची ही साथ फारकाळ पाहवली नाही. आजोबांच्या नंतर वर्षाच्या आतच यशवंतराव कॅन्सरच्या विकाराने निधन पावले आणि आता मात्र काका अक्षरश: पोरके झाले. याचवेळी त्यांच्यावर ओढवलेला आणखी एक दु:खाचा प्रसंग म्हणजे त्यांच्या मामांचा मृत्यू. ते श्रीपाद मामा (श्रीपाद नारायण सामंत) म्हणून ओळखले जात. त्यांनी  बेळगाव येथे बँकेच्या सेवेत बरेच लक्ष घातले होते. बेळगाव बँकेच्या स्थापनेचे श्रेय त्यांनाच आहे.

सार्वजनिक कार्यात धडाडीने भाग घेणाऱ्या आणि त्यातच रमणाऱ्या काकांवर आता कुटुंबाची सर्व जबाबदारी येऊन पडली. स्वातंत्र्य चळवळीला गांधींचे नवे नेतृत्व मिळाले होते. गांधीच्या जीवनाची व तत्वज्ञानाची फार मोठी छाप काकांच्या मनावर पडली होती. आणि त्यांची सारी धडपड त्या दिशेने चालली होती.

संसाराबरोबरच पतीच्या कार्यात भाग घेण्याचे व त्याच्याशी समरस होण्याचे भाग्य फारच थोड्या स्त्रियांना लाभते. माझ्या आईला म्हणजेच माईला हे भाग्य प्रथमपासूनच लाभले. बालपणापासूनच तिच्यावर सार्वजनिक कार्याचे संस्कार झालेले होते.लग्न होऊन स्वत:च्या घरी आल्यानंतर तिच्या या संस्कारांचे अधिक चांगले संगोपन झाले. केवळ गृहिणी म्हणून न राहता, सहचारिणी, सहधर्मिणी म्हणून पतीच्या बरोबरीने कार्य करण्याची संधीही तिला लाभली. घरी सासू सासरे आणि मुले बाळे आणि सदैव येत राहणारे पाहुणे रावळे या सर्वांना सांभाळून माई नेहमी काकांकडे, विशेषत: त्यांच्या सार्वजनिक कार्याकडे आस्थेने लक्ष देई.

पण केवळ घरी बसून बाहेरच्या घडामोडींची माहिती करून घेण्यापुरतीच माईची उत्सुकता मर्यादित नव्हती. ज्या ज्यावेळी संधी मिळत गेली. त्या त्या वेळी तिने काकांच्या बरोबरीने त्यांच्या कार्यात भाग घेतलेला आहे. विशेषत: सत्याग्रह, मोर्चा इत्यादी ठिकाणी महिलांच्या तुकडीचे नेतृत्व करण्यात माई केव्हाच मागे राहिलेली नाही. स्वातंत्र्य चळवळीच्या वेळी काय किंवा अलीकडच्या सीमालढ्याच्या प्रसंगी काय, माईच्या अंगची ही धडाडी चांगलीच दिसून आली. महाराष्ट्र म्हैसूर सीमेच्या प्रश्नाकरिता झालेल्या चळवळीत, मोर्चा व सत्याग्रहामध्ये भाग घेण्याच्या बाबतीत माईने दाखविलेले धाडस मला देखील स्पष्ट आठवते. या सत्याग्रहामध्ये तिला काही काळ कारावास घडला. संसारात गुरफटून गेलेली माई प्रसंग येताच ताडकन संसाराचे सारे पाश तोडून आम्हा मुलांना निक्षून सांगत असे की, ‘मी आज यांच्याबरोबरीने सत्याग्रहात भाग घेणार आहे. आजपासून घर तुम्ही सांभाळा!’ त्यावेळी तिला पोलिसांची, तुरुंगाची किंवा तेथे होणाऱ्या हालअपेष्टांची मुळीच भीती वाटत नसे.

सौ. माईला सार्वजनिक कार्याची बालपणापासूनच आवड असली, तरी तिने आपल्या संसाराची कधी आबाळ होऊ दिली नाही. घरात असलेला कौटुंबिक जिव्हाळा तिने आपल्या संसारात नेहमीच जिवंत ठेवला. आपल्या मुलींच्या मनावर सुयोग्य संस्कार करण्यात तिने कधीच दुर्लक्ष केले नाही. आल्यागेल्यांचे पै– पाहुण्यांचे आदरातिथ्य करावे तर आमच्या माईनेच! सासर माहेरच्या नात्यागोत्याच्या माणसांबरोबरच काकांच्या मित्रमंडळींनाही आमच्या घरी बरोबरीने मान मिळत असे. गरीब–श्रीमंत, लहान– थोर हा भेदभाव तिने कधीच केला नाही. त्यामुळे मला आठवते त्याप्रमाणे, आमच्या घरी आलेला कोणीही अतिथी हसतमुखाने येई आणि हसतमुखाने परत जाई.

सार्वजनिक कार्यात भाग घेणारी स्त्री म्हटले की, साधारणपणे ती परंपरा न जुमानणारी व आधुनिकतेकडे वळणारी असावी, असा ग्रह करून घेतला जातो. पण माझ्या माईने आपल्या जीवनातील भारतीय परंपरा केव्हाच सोडली नाही. सर्व सणवार व उत्सव ती मोठ्या श्रद्धेने साजरे करीत असते.

अशी ही पत्नी माझ्या काकांना लाभली हे त्यांचे भाग्यच! आणि एवढी थोर आई आम्हाला लाभली हे आम्हा मुलांचे परमभाग्य. काका माईची आम्ही एकूण पाच मुले, मोठी नलूताई, दुसरी मी, तिसरी छाया, चौथी शोभा आणि सर्वात धाकटा एकुलता एक भाऊ किरण. माझ्या सर्व भावंडाचे म्हणणे की मी म्हणजे काकांची सर्वात लाडकी! आणि ते थोडेसे खरेही आहे. त्याचे कारण असे की, माझी थोरली बहिण नलूताई जन्मली त्यावेळी काका संपूर्णपणे राजकीय चळवळीच्या कार्यात मग्न होते व ४२ च्या कारावासात होते. त्यानंतर माझा जन्म झाला. त्यामुळे माझे कौतुक थोडेसे अधिक होऊ लागले. आजोबांची तर मी लाडकीच होते. शिवाय काकाही मला अधून मधून आपुलकीने जवळ घेत आपल्याबरोबर बाहेर घेऊन जात. आणि जास्तीत जास्त आपल्या सहवासात ठेवून घेण्याचा प्रयत्न करीत. साहजिकच त्यांना माझा लळा अधिक लागला. पुढे मी शाळा कॉलेजात जाऊ लागल्यावर मलाही आमचे काका म्हणजे कोणी मोठी व्यक्ती आहे, गावातील सारे लोक ज्यांना ओळखतात असे एक पुढारी आहेत, हे मला समजू लागले आणि मोठेपणीही मला त्यांच्याबरोबर हिंडण्याफिरण्यात आनंद वाटू लागला. राजकीय सभांमधून भाषणे करताना काकांचा दिसून येणारा आवेश, प्रतिपक्षावर हल्ला करण्याची त्यांची आक्रमक वृत्ती आणि काही वेळा भावनेच्या आवेगातून येणारा तारस्वर या गोष्टी मनावर ठसल्या. पण यापेक्षा काकांची दुसरी भाषणे मला स्वत:ला अधिक आवडतात. एखाद्या संस्थेच्या कार्यक्रमास काका पाहुणे म्हणून हजर राहतात. अशा ठिकाणी त्यांच्या बोलण्यात शांतपणा आणि सुसूत्रता असते. एखादा विशिष्ट विचार मनावर ठसविण्याचा त्यांचा प्रयत्न असतो.

काकांच्या सार्वजनिक कार्यातून प्रकट होणाऱ्या व्यक्तिमत्त्वापेक्षाही मला अधिक जवळून पहावयास मिळाले ते त्यांचे कौटुंबिक जीवन, माझे वडील म्हणून आणि घरातील कुटुंबप्रमुख म्हणून, जे कळत न कळत त्यांचे माझ्याकडून अवलोकन घडले, त्याचे दर्शन घडवावयाचे म्हटले तर माझ्या बालपणापासूनच्या अनेक घटनांची यादी येथे देत बसावी लागेल. पण साऱ्याच घटना मांडण्याची जरुरी नाही. काही बोलक्याच घटना काकांचे व्यक्तिमत्त्व उभे करण्यास पुरेशा आहेत.

काका सकृतदर्शनी जरी गंभीर व कठोर वाटत असले तरी अंत:करणाचे ते कोमल आहेत. संधी मिळेल तेव्हा ते आमची आस्थेने चौकशी करतात. कधी प्रत्यक्ष आमच्या समोर तर कधी जेवतेवेळी, आमच्या आईसमोर मोजकेच दोन तीन शब्द बोलतील. पण अशा आस्थेने विचारतील की समोरच्या माणसाला त्यांची ममता जाणवल्यावाचून राहत नाही.

घरातील एकाद्या व्यक्तीशी मायेचा लळा लागला की काका तिच्याशी किती आस्थेने वागत याबाबत नेहमीच एक प्रसंग सांगितला जातो. काकांची एक मामी त्यांच्याच वयाची होती. खाण्यापिण्यातून ते खेळण्यापर्यंत प्रत्येक गोष्टीत ते तिला आपल्यात सामावून घेत. चहा प्यावयाच्या वेळी तर प्रत्येक भावंड आपल्या कपातील थोडा थोडा चहा तिच्यासाठी काढून ठेवी. एखादा लाडूसुद्धा तिला मोडून दिल्याशिवाय ते खात नसत. पुढे ही त्यांची मामी, काका तुरुंगात असताना वारली. काका तुरुंगात आहेत, ते सुटून येईपर्यंत आपण जगावे अशी तिची उत्कट इच्छा होती

आणि सर्व प्रकारचे औषधोपचार करून डॉक्टर आपणास बरे करतील ही तिची श्रद्धा होती.पण काका सुटून येण्यापूर्वी आठ दहा दिवस अगोदर ही मामी वारली. काकांना अर्थात याची कल्पना नव्हती. तुरुंगातून सुटल्यानंतर काकांना मिरवणुकीने घरी आणण्यात आले. पण आजुबाजूच्या गर्दीत आपले मामा कुठे दिसत नाहीत म्हणून काकांनी चौकशी केली. तेव्हा त्यांना समजले की आपली जिवाभावाची मामी गेली. काकांनी सारा समारंभ ताबडतोब स्थगित केला आणि ते थेट घरी निघून आले. मामींच्या निधनाने त्यांच्या आयुष्यातील एक फार जिव्हाळ्याने माणूस कायमचे दुरावले!

वडिलांसमोर वचकून असणारे काका आपल्या आईकडे मात्र रुसवाफुगवा करीत. तेथे त्यांचे सारे हट्ट चालत. काय हवे नको ते आईकडे मागत. आईवर त्यांचे अलोट प्रेम. तिच्या शेवटच्यावेळी तर त्यांनी गावातील एकही डॉक्टर शिल्लक ठेवला नाही.

काकांची आपल्या मुलांवर देखील अलोट माया. ते कितीही रागावले तरी ते आम्हा मुलांवर कधीच हात उगारत नसत. फार तर खूप खूप बोलतील. पण अंगाला हात लावणार नाहीत. कुणी शेजारी मुलाला मारताना पाहून काकांचा जीव तळमळतो. ते मुलाच्या आईवडलांजवळ जाऊन विनाकारण मुलाला कां मारता म्हणून चौकशी करतील. पण याचा अर्थ काकांनी आम्हा मुलांना कधी लाडावून ठेवले असा नव्हे. त्यांच्या नजरेचाच धाक इतका आहे की, आम्ही भावंडे चूपचाप होऊन बाजूस राहात असू.

काकांचा स्वभाव रागीट आहे असे सारेजण म्हणतात. थोडेबहुत ते खरेही असेल. पण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की काकांचा स्वभाव रागीट असला तरी तो चिडचिडा नाही. त्यांना राग येतो तो साधारण दोन कारणांमुळे. जिथे जिथे अन्याय दिसेल तिथे तिथे ते तुटून पडतात. खोटे बोलण्याची तर त्यांना चीड आहे. त्यामुळे अशी एकादी घटना घडलीतर काका संतापून जातात. मग ती व्यक्ती घरची असो वा बाहेरची असो! त्यांच्या रागाचे दुसरे एक कारण म्हणजे त्यांना अकारण चैन आणि विलासीपणा आवडत नाही. नटण्यामुरडण्याचा तर त्यांना तिटकारा आहे. त्यामुळे पैसे खर्च करून वारंवार सिनेमा, नाटकाना जाणे आणि पै पाहुण्यांच्या नावाखाली गोडधोड पदार्थाची चंगळ करणे ही गोष्ट त्यांना मनापासून पसंत नसते.

काकांचे दैनंदिन कामकाज म्हणजे एक यांत्रिक जीवनच होऊन बसले आहे. एखाद्या यंत्राला ठराविक काळानंतर विश्रांती तरी मिळत असेल. पण काकांना मात्र रात्री दोन वाजेपर्यंत विश्रांतीचा विचारही करता येत नाही. दैनिक सुरु झाल्यापासून तर ते रात्रौ दोनच्या पूर्वी कधी घरी आले असे झाले नाही. आणि आम्हा सर्वांबरोबरच सकाळी सात साडेसात वाजता ते उठतात. आठ साडेआठ वाजेपर्यंत आपली नित्यकर्मे आटोपून काका एकदा घराबाहेर पडले म्हणजे ते कोठे जातील याचा नेम नाही. त्यांची सकाळची फेरी नित्याची असते. पण ते अमक्याकडेच जातील असे नाही. कधी एखाद्या सहकाऱ्याकडे जातील. दिवसभरातील कामाविषयी चर्चा करतील किंवा मनात आले तर पार्वतीदेवी कॉलेजकडे अथवा ठळकवाडी हायस्कूलकडे चक्कर टाकून येतील. प्रत्येक गोष्ट बारकाईने टिपून घेतील. चारचौघांशी बोलून वस्तुस्थिती समजावून घेतील. थोडक्यात म्हणजे काकांची ही सकाळची फेरी कधी फुकट जात नाही.

दहा साडेदहा वाजेपर्यंत घरी आल्यानंतर स्नान वगैरे आटोपून काका थेट प्रेसकडे निघून जातात. मग दुपारी दोन अडीच वाजेपर्यंत त्यांना घराचे भान नसते. त्यांच्या दुपारच्या जेवणाबाबत

नियमितपणा असेलच असे नाही. कारण प्रेसच्या कामामध्ये अथवा एखाद्या सभा बैठकीमध्ये काका गुंतून गेले की, जेवण्यासाठी हातातले काम अर्धवट सोडून ते येणार नाहीत. मग जेवणास चार साडेचार वाजले तरी त्यांना त्यांची पर्वा नसते. जेवणानंतर तासभर विश्रांति घेतली न घेतली तोच काका उठतात व पुन्हा बेळगावात निघून जातात. त्यानंतर रात्री अकरा वाजेपर्यंत घरी येणे नाही. त्यांच्या या दैनंदिन कार्यक्रमामध्ये आम्हा मुलांची भेट होते ती फक्त सकाळी तासभर. सर्वांच्या बरोबर जेवणाखाण्यासाठी ते हजर राहिले आहेत, असे प्रसंग फार क्वचित येतात. फार तर एकाद्या रविवारी किंवा सुटीच्या दिवशी काका अधिक वेळ घरी राहतील एवढेच.

असा हा घड्याळालाही पुरुन उरणारा कार्यक्रम पाहिल्यानंतर काकांच्या जीवनात मनोरंजनाला काही स्थान मिळणे शक्यच नाही. त्यामुळेच काका म्हणजे एक अरसिक माणूस आहेत, असा त्यांच्याबद्दल अनेकांचा गैरसमज आहे. पण तो खरा नव्हे. कारण संगीत, नाटक आणि इतर सांस्कृतिक कार्यक्रम यांच्याबद्दल काकांच्या मनात जी आस्था आहे, ती आम्हा घरच्या मंडळींच्या लक्षात आल्यावाचून राहिलेली नाही. दैनंदिन कामातून सवड मिळाली तर ते अशा कार्यक्रमांना जातीने हजर राहिलेले मी पाहिले आहे. पण त्यांचा रोजचा व्यापच एवढा मोठा आहे की, अशा अनेक कार्यक्रमाचे निमंत्रण काकांना साभार नाकारावे लागते.

पण काकांना मनापासून आवड आहे ती वाचनाची. अनेक विषयांवरील अनेक ग्रंथांचे वाचन करण्याचे त्यांचे मनसुबे असतात. एक पत्रकार या नात्याने बहुश्रुतता वाढीस लावण्याचा त्यांचा सदैव प्रयत्न असतो. एवढेच नव्हे तर वाचन, चिंतन आणि मनन हे आपले कर्तव्य आहे, तो आपला धर्म आहे अशी काकांची श्रद्धा आहे. पण या दैनंदिन कार्याच्या व्यापामुळे आपणास मनसोक्त वाचन करता येत नाही, याची काकाना खंत आहे. उद्याच्या प्रसिद्ध होणाऱ्या अंकाची तयारी करण्यामध्येच सारा दिवस संपून जातो आणि वाचनासाठी काढून ठेवलेली पुस्तके, मासिके टेबलावरच पडून राहतात. निदान आपल्या मुलांनी तरी खूप खूप वाचावे अशी त्यांची इच्छा असते आणि कधी कधी कळवळ्याने ते म्हणून जातात. 'ज्यावेळी ज्या वयात आम्ही वाचायचं, त्यावेळी त्या वयात आम्ही सार्वजनिक कार्यात झेपावलो होतो. आणि अफाट वाचनाला मुकलो आणि आज तर माझ्या व्यवसायानेच माझं वाचन मारून टाकलं आहे. निदान तुम्ही तरी ही संधी वाया दवडू नका. खूप खूप शिका नि खूप खूप वाचा!'

## प्रकरण दुसरे

# आधी ते राजकारण

१९१८–१९ पासून काकांच्या सार्वजनिक जीवनास सुरुवात झाली. म्हणजे अर्ध शतकाइतका काळ. स्वातंत्र्यपूर्व काळ व स्वातंत्र्योत्तर काळ असे त्याचे दोन भाग प्रामुख्याने पडतात. पहिल्या कालखंडात विशेषत्वाने विचार होतो तो केवळ स्वातंत्र्य चळवळीचा. काकांच्या विद्यार्थीदशेपासून तो म. गांधींच्या देहावसानापर्यंतच्या या काळात अखिल भारतामध्येच नव्हे, तर साऱ्या जगामध्ये अनेक उलाढाली झालेल्या आहेत. सारे मानवी जीवनच ढवळून निघाले आहे, आणि त्याचे सारे स्वरुपच पालटून टाकणारी दोन जागतिक महायुद्धे या कालखंडानी पाहिली आहेत.

काकांच्या सार्वजनिक जीवनाचा दुसरा भाग जो बहुतांशी स्वातंत्र्योत्तर काळात येतो, त्यामध्ये प्रामुख्याने विचार करावा लागतो तो राज्यपुनर्रचनेमुळे निर्माण झालेल्या महाराष्ट्र– म्हैसूर सीमावादाचा आणि त्या संदर्भात कराव्या लागलेल्या आंदोलनाचा. त्याचबरोबर गोमंतकाच्या मुक्ततेसाठी झालेल्या चळवळीचा. तिसरा कालखंड मानावयाचा झाला, तर तो काकांनी केलेल्या सामाजिक कार्याचा आणि बहुतांशी बेळगाव नगरपालिकेशी आलेल्या त्यांच्या संबंधाचा. हा कालखंड असा वेगळा काढता येणार नाही. कारण नगरपालिकेचा कारभार स्वच्छ राहावा यासाठी त्यांनी जसे स्वातंत्र्यपूर्व काळात कार्य केले, तसे ते आजही चालू आहे. सामाजिक नेता आणि पत्रकार या दोन्ही नात्यांनी काकांच्या सर्व कार्याचा आढावा घ्यावा लागेल. असे करताना प्रामुख्याने आधार घ्यावा लागणार आहे, तो म्हणजे त्यांच्या वृत्तपत्राचा म्हणजेच तरुण भारतच्या जुन्या फायलींचा. १९१९ सालापासूनचे, विद्यार्थ्यांनी चालविलेल्या तरुण भारत मासिकांचे जुने अंक काकांच्या सार्वजनिक जीवनाची रुपरेषा दर्शविण्यास समर्थ आहेत.

१९१४ साली लोकमान्य मंडालेच्या तुरुंगातून सुटून आले. 'पुनश्च हरि ओम' म्हणून त्यांनी राजकारणाची सूत्रे हाती घेतली, आणि स्वातंत्र्य चळवळीचे कार्य अधिक व्यापक व्हावे म्हणून काँग्रेस पक्षात प्रवेश केला. १९१६ साली कै. दे. भ. दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली

बेळगाव येथे एक राजकीय प्रांतिक परिषद भरविण्यात आली. हे अधिवेशन, आज ज्या ठिकाणी महिला विद्यालय आहे, त्या ठिकाणी भरले होते. या अधिवेशनाला खुद्द लो. टिळक उपस्थित होते, आणि त्यांच्या होमरुल लीगची स्थापना बेळगाव येथेच झाली. ही घटना भारतीय स्वातंत्र्येतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे.

परिषदेचे अध्यक्ष कै. दादासाहेब खापर्डे यांनी या परिषदेत 'साम्राज्यांतर्गत स्वराज्या'ची घोषणा प्रथमच केली. आणि 'आर्य चाणाक्याचे कारस्थान' या विषयावर काळकर्ते शिवरामपंत परांजपे यांचे प्रभावी भाषण झाले. ते ऐकण्याचे भाग्य काकांना लाभले. त्यावेळी ते विद्यार्थीदशेतच होते.

१९१८ साली पहिले महायुद्ध संपले होते, आणि या काळात भारतीय स्वातंत्र्याच्या आकांक्षांना उधाण आले होते. याचवेळी ब्रिटिश सरकारने व्यक्ति– स्वातंत्र्यावर गदा आणणारा 'रौलेट ॲक्ट' (विनाचौकशी तुरुंगात डांबणारा) पास केला, आणि पाठोपाठ जालियनवाला बागेतील भीषण हत्याकांड घडून आले. त्याने सारा हिंदुस्थान हादरला. देशात सर्वत्र प्रक्षोभ निर्माण झाला. त्याचवेळी म. गांधी हे राजकीय क्षितिजावर चमकू लागले होते. त्यानंतरच्या थोड्याच काळात 'भारतीय असंतोषाच्या' जनकाचे–लोकमान्य टिळकांचे ता. १ ऑगस्ट १९२० रोजी दु:खद निधन झाले आणि सारा हिंदुस्थान शोकसागरात बुडाला.

लोकमान्यांच्या निधनाच्या वेळी म. गांधी त्यांच्या शय्येपाशी होते. याचवेळी 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' ही जी लोकमान्यांची घोषणा होती, ते 'स्वराज्य मी मिळवीनच' अशी प्रतिज्ञा गांधींनी केली आणि स्वराज्याच्या चतु:सूत्रीचा कार्यक्रम जाहीर करून त्यांनी ब्रिटिशांशी असहकार पुकारला. ही झंझावाती चळवळ आसेतुहिमाचल पसरली. शाळा–कॉलेजांवर बहिष्कार टाकून हजारो तरुण बाहेर पडू लागले. वकिलांनी कोर्टावर बहिष्कार घातला आणि बऱ्याच लोकांनी ब्रिटिश सरकारने दिलेल्या पदव्यांचा त्याग केला. परदेशी कापडाच्या होळ्या झाल्या आणि त्याची जागा खादीने घेतली.

लोकमान्यांच्या काळात कायद्याच्या चौकटीत राहून चळवळ करण्याचे दिवस होते, ते मागे पडले आणि म. गांधींनी प्रत्यक्ष प्रतिकाराच्या एका नव्या चळवळीला प्रारंभ केला. ब्रिटिशांच्या कायद्यालाच आव्हान देणाऱ्या या चळवळीने सर्वत्र नवचैतन्य निर्माण झाले आणि हजारो लोक तीत सामील झाले. 'होय, मी कायदा मोडला आहे. त्याबद्दल जी शिक्षा द्यावयाची असेल ती जरुर द्या.' असे आव्हान देणारे हजारो तरुण गांधींच्या नेतृत्वाखाली एकत्र झाले.

त्यावेळी म्हणजे १९२१ साली काका सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजमध्ये शिकत होते. या झंझावाती चळवळीचा परिणाम त्यांच्या मनावर झाला नसता तरच नवल! त्यांनी कॉलेज तर सोडलेच, पण तेथील युवकांचे नेतृत्वही केले. सांगली ही संस्थानी राजवट असल्यामुळे अशा चळवळीला पारखी होती. त्या ठिकाणी काकांनी चळवळीचा डोंब उसळवून दिला.

पुढे बेळगाव येथे आल्यानंतर काकांनी कै. दे. भ. गोविंदराव याळगी यांच्या मार्गदर्शनाखाली स्वयंसेवक संघटनेचे कार्य हाती घेतले. यातूनच पुढे मद्यपान निषेधाची व सरकारी दारुगुत्यासमोर निरोधन (पिकेटिंग) करण्याची चळवळ उभारली गेली. तिचे नेतृत्व काका व कै. शिवराव कोप्पळ यांनी केले. हा हा म्हणता ही चळवळ इतकी फोफावली की दारुगुत्ते सहा महिने अक्षरश: बंद पडले होते. त्यावेळचा एक प्रसंग येथे सांगण्यासारखा आहे.

बेळगाव कँप हद्दीमध्ये भरवस्तीत एक मोठा दारुगुत्ता होता. त्यावर काका व त्यांचे सहकारी

निरोधन करण्यासाठी उभे होते. त्यावेळच्या पोलीस अधिकाऱ्यांचा वेगळाच रुबाब होता. टर्नर आणि रिंग नावांचे अँग्लो इंडियन पो. इन्स्पेक्टर्स घोड्यावर स्वार होऊन शहरातील बंदोबस्ताकरिता दिमाखाने फिरत होते. ते कँपमधील त्या गुत्यापाशी सायं. ५ च्या सुमारास आले. काका त्यावेळी पिकेटिंगमध्ये गुंतले होते. त्यांच्या घोषणा होत्या. 'म. गांधींचा आदेश आहे. महंमद अली, शौकत अल्लीचे फर्मान आहे की दारु पिऊ नका! शराब पीना हराम है!' अशा घोषणा देत ते गुत्याच्या समोर रस्त्यावरून एका टोकापासून दुसऱ्या टोकाला जात होते. त्याचवेळी हे साहेब तेथे आले आणि 'अंग्रेज का राज है! आप शराब खुशीसे पी सकते हो' अशा घोषणा करीत ते आपले घोडे इकडून तिकडे दौडत होते. सरकारला आव्हान देणारे हे अपूर्व दृश्य पहाण्यासाठी हजारो लोक तेथे जमत असत. हा नित्यक्रम चालू होता.

शांततेने चालेल्या या चळवळीचे स्वरुप हळूहळू बदलू लागले आणि अति उत्साहात काही लोकांनी आपल्या हातात कायदा घेऊन मद्यपी लोकांना धडा शिकविण्याचे आरंभिले.

या पिकेटिंगच्या चळवळीतील लोकांनी अति उत्साहामध्ये, दारु पिणाऱ्या कामतगल्लीतील दोघा इसमांची गाढवावरून धिंड काढण्यासही कमी केले नाही. एवढ्यावरच ते थांबले नाहीत, तर गाढवावर बसविण्यापूर्वी त्या दोघांच्या एका बाजूच्या मिशाही काढून टाकण्यात आल्या.

पोलीसांना चळवळीत हस्तक्षेप करण्यास व शहरातील पिकेटिंगवर आघात करण्यास हे आयतेच खुसपट सापडले. पोलिसांनी हे प्रकरण बरेच रंगवले. आणि काही खोटे साक्षीदार हाताशी धरून त्यानी पिकेटिंग करणाऱ्यांवर खटले भरले. त्यात त्यांनी काका व कै. शिवराव कोप्पळ अशा दोघांना आरोपी केले. ही चळवळच मारुन टाकावी, हेच संघटनेचे सूत्रधार आहेत. म्हणून बुद्ध्याच या दोघांची नावे जरी ते गुन्हेगार नव्हते तरी या खटल्यांत गोवून टाकली. पुढे रीतसर हा खटला चालला व काकांसकट पांचही आरोपींना दोन महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावून त्यांना तुरुंगात रवाना करण्याकरिता पोलिसांच्या स्वाधीन केले. त्यावेळी चळवळीचे स्वरुप एवढे प्रचंड होते की, शेकडो लोक त्यांना निरोप देण्यासाठी कोर्टाकडे जमले होते. त्यात अग्रभागी कै. दे. भ. गोविंदराव याळगी (डॉ. अनंतराव याळगी यांचे वडील) हे होते.

पुढे थोड्याच दिवसांनी म. गांधींचे बेळगावला झंझावती चळवळीच्या रुपाने प्रथमच आगमन झाले. त्यांच्या समवेत मौ. शौकतअल्ली हे होते. शौकतअल्लींची प्रचंड देहयष्टी आणि त्यांच्या बाजूला म. गांधींची कृश देहयष्टी हा देखावा मोठा विलक्षण वाटत होता. किल्ल्याच्या मैदानावर यावेळी प्रचंड सभा झाली. या सभेच्या व्यवस्थेचे काम काका आणि कै. शिवराव कोप्पळ यांच्या तरुण संघटनेने केले. प्रथमच त्यावेळी हिंदू व मुस्लिम यांच्या ऐक्याचे अभूतपूर्व दृश्य पहावयास मिळाले. गांधींच्या दर्शनासाठी स्त्री पुरुषांची अलोट गर्दी लोटली होती. 'एका वर्षात स्वराज्य' ही घोषणा सर्वत्र दुमदुमून राहिली होती. 'लोकमान्य टिळक स्वराज्य फंड (एक कोटीचा) या नावाने निधी गोळा करण्यासाठी महात्माजींनी जे आवाहन केले होते, त्याला अनुसरुन त्यांनी स्त्रियांकडे दागिन्यांची मागणी केली, आणि अक्षरश: अनेक स्त्रियांनी आपल्या हातातील सोन्याच्या बांगड्या व बोटातील आंगठ्या गांधींच्या  झोळीत टाकल्या. यावरून त्यावेळी लोकांच्या उत्साहाला केवढे उधाण आले होते ते दिसून येईल.

दरम्यानच्या काळात गांधीजींच्या चळवळीला खूपच जोर चढला होता. बेळगावातील श्री. दत्तोपंत मजली, कृष्णराव करगुप्पीकर, हणमंतराव नाईक नंदगड, कै. केशवराव गोखले, डॉ. रामभाऊ जोशी

पाच्छापूर वगैरे अनेक मंडळी सत्याग्रह करून तुरुंगात गेली होती. काही स्त्रियांनीही पुरुषांच्या बरोबरीने साथ केली होती. त्यामध्ये प्रामुख्याने कै. शिवराव कोप्पळ यांच्या पत्नी सौ. शांताबाई कोप्पळ यांचे धाडस फार मोठे होते. स्वत: निरक्षर असलेल्या या बाईची देशनिष्ठा जाज्वल्य होती. परदेशी कपड्यांवर बहिष्कार टाकून खादी वापरण्याचा आदेश गांधींकडून मिळाल्यावर या बाईने जाडीभरडी, अंगावर बोजड होणारी साडी नेसण्यास प्रारंभ केला. ती भलती अवजड व जाडीभरडी असूनही तिने अखेरपर्यंत खादीचा त्याग केला नाही. पतीच्या बरोबरीने प्रत्येक चळवळीत भाग घेणारी ही बाई पुढेपुढे हजारोंच्या सभेमध्ये अस्खलितपणे भाषणे देऊ लागली. खऱ्या खऱ्या अर्थाने पतीची सहधर्मचारिणी शोभणारी सौ. शांताबाई सारखी स्त्री विरळाच!

## तुरुंग पहाण्याची ही पहिलीच पाळी

तुरुंग पाहण्याची ही काकांची पहिलीच पाळी. आज हेडक्वार्टर्समध्ये ज्या ठिकाणी सरकारी गुदाम आहे, त्या ठिकाणी त्यावेळी तुरुंग होता. काकांनी तुरुंगात पाऊल ठेवले आणि तेथील तो यमदरबार पाहून पहिल्या दिवशी त्यांना ब्रह्मांड आठवले. पण त्यांच्या अंत:करणात स्वातंत्र्याची उर्मी असल्यामुळे त्यांनी आलेल्या संकटाशी मुकाबला करण्याचा मनाशी निश्चयच केला होता. कैद्याचा शिक्का मारून काका व त्यांचे सहकारी यांना जेलचे जाडेभरडे कपडे देण्यात आले. झोपण्यासाठी एक तरट व पांघरण्यासाठी घोंगडे आणि जेवणासाठी एक थाळी पॉट असा सरंजाम ठरला. त्यांना खडी फोडण्याचे व चक्की पिसण्याचे काम देण्यात आले. अमुक एवढी खडी फोडली पाहिजे. अमुक इतके दळण दळले पाहिजे. त्यात काही कसूर झाली तर वॉर्डर बडगा हाणण्यास पाठीमागे उभा राहिलेला! काही दिवस चक्की पिसण्याचे काम केले.त्यात या लोकांची दमछाक झाली. दळणे हे सोपे वाटले होते. पण तसे नाही याचा अनुभव आला. पण काम सुरळीतपणे केल्यावाचून गत्यंतरच नव्हते. नंतर त्यांना खडी फोडण्याचे काम देण्यात आले. सराव नव्हता, पण तेही काम हे लोक मोठ्या कष्टाने पार पाडीत होते.

## तुरुंगातील दिनचर्या अशी होती

सकाळी उठल्याबरोबर कैद्याना शौचाला घेऊन जात. आधुनिक जेल आणि त्यावेळचे जुने जेल यांच्यामध्ये जमीन अस्मानाचे अंतर होते, हे पुढे कळून आले. त्याकाळी शौचकूपाला आडोसा नव्हता. दोन दगडांवर बसून त्यांना शौचविधि उरकावा लागे आणि समोर हातावर वॉर्डर उभा!

त्याकाळी वॉर्डर म्हणजे यमदूताप्रमाणे समजला जाई. जनावरांकडून काम करून घेतात त्याप्रमाणे कैद्याकडून काम करून घ्यावयाचे हा त्याचा खाक्या होता. आणि काहीच कारण नसताना कैद्यांना दंडुक्याचा प्रसाद देणे हा तर त्यांचा नित्याचा सराव झाला होता. कोणीही नवीन कैदी जेलच्या दरवाज्यातून आत शिरताच त्याला चार दोन तडाखे द्यावयाचे! ही पहिली सलामी! याला काही कारण लागत नसे!

हा प्रसंग एकदा काका व त्यांच्या सहकाऱ्यांच्याही वाट्यास आला. शौचास बसण्याकरिता म्हणून शिवराव कोप्पळ हे चार हात दूर उभे होते. इतक्यात सोबतीस असलेल्या एका पिवळ्या पगडीवाल्याने कोप्पळ यांना तडाखा देऊन त्यांच्या मानगुटीस हात घातला. कारण काहीच नव्हते. तोच शिवराव गर्रकन फिरले आणि डोळे लाल करून म्हणाले, ‘भडव्या, कोंबडीची मुंडी मुरगळतात. तसे तुला मुरगळून टाकीन! काय समजलास तू!’ शिवरावांनी आपला अवतार प्रकट केला. हे

पहाताच तो वॉर्डर गर्भगळीत झाला. तुरुंगातील कैदी आणि तो अशाप्रकारे खवळून उठतो, हे दृश्य त्याला अपरिचितच होते. नंतर त्याला कळून आले की, हे कैदी निराळ्या जातींचे आहेत. नेहमीचे हे कैदी नव्हेत.

दोन भाकऱ्या आणि कसल्या तरी पाल्याची भाजी देऊन चार वाजताच यांना कोठडीत बंद करून टाकत असत. दमले भागले तरी रात्री झोप यावयाची कशी! खाली तरट आणि जमीन सपाट म्हणावी तर तीही नाही. गोठावजा सखल–उपर होती. आणि पांघरावयास दिलेल्या घोंगड्यामध्ये व खालच्या जमिनीत पिसवांचे राज्य होते. झोप न आल्यामुळे जिवाची नुसती तळमळ होत होती. अशावेळी लोकमान्य टिळक, परांजपे, सावरकर आणि इतर मोठ्या देशभक्तांनी जुन्या काळी जेलमध्ये कसे दिवस काढले असतील याचे चित्र काकांच्या डोळ्यासमोर उभे राहत असे.

## दरोडेखोरांच्या सान्निध्यात

असे दिवस कंठीत असताना त्याच जेलमध्ये असलेल्या प्रख्यात दरोडेखोरांशी काका व त्यांच्या सहकाऱ्यांचा निकटचा संबंध आला. खडी फोडण्याचे काम त्यांच्याबरोबर यांनाही दिले होते. त्यामुळे काम करताना त्यांच्या व यांच्या गोष्टी चालत असत. या पाच दरोडेखोरांपैकी दोघांची नावे अशी एक सिंदूर लक्ष्म्या व दुसरा नरश्या! सिंदूर लक्ष्म्या हा ताडमाड उंच, सडपातळ व दणकट बांधणीचा आणि नरश्या हा गिड्डा व भल्या ताकदीचा होता. लक्ष्म्या विषयी असे सांगत की, तो पळण्यात इतका पटाईत होता की, घोडेस्वारालाही तो हाती लागत नसे. दिवसाला चाळीस मैल पळण्याची त्याची हिंमत होती.

या लक्ष्म्या– नरश्यानी कर्नाटकाच्या चार जिल्ह्यात नुसता धुमाकूळ घातला होता. अनेक दरोडे त्यांनी घातले होते. ते विलक्षण सामर्थ्यवान आहेत, पोलिसांच्या हातात सापडत नाहीत, आणि सापडलेच तर त्यांच्या हातावर तुरी देऊन केव्हा निसटतील याचा नेम नाही, अशा त्यांच्याविषयी बऱ्याच आख्यायिका पसरल्या होत्या. त्यांच्या विलक्षण सामर्थ्यवान आहेत. पोलिसांच्या हातात हाती शस्त्रास्त्रे होती. यामुळे त्यांचे भय सर्वांनाच वाटे. पोलिसांशी झालेल्या झटापटीत त्या प्रत्येकाच्या शरीराला एकदोन निसटत्या गोळ्या लागलेल्या होत्या. लक्ष्म्या हा ५८ पौंडांचे वजन अवघ्या किरंगळीने खांद्यापर्यंत उचलत असे एवढी त्याची ताकद होती.

या दरोडेखोरांशी नेहमीच काका वगैरे लोकांच्या गप्पा गोष्टी घडत. ते सांगत की आम्ही दरोडे घालतो. श्रीमंताना लुटतो. गोरगरीबांना पैसे देतो. आमच्याशी जे भलेपणाने वागतात त्यांच्याशी आम्ही बरेपणाने वागतो. पण इतरांची आम्ही गय करीत नाही.

नंतरच्या संभाषणात ते राजकीय चळवळीकडे वळले. त्यांच्याही कानावर गांधींच्या गोष्टी गेल्या होत्या. ते सहज बोलताना म्हणाले, '(गांधी अवरू बरे आप्पणी कोडली. वंदे रात्रीयल्ली साहेबर बंगलेगळु सुट्ट बिडुत्तेवी!) गांधींजी आम्हाला परवानगी देऊ देत! आम्ही इथल्या एकाही सायबाचा एकही बंगला शिल्लक ठेवीत नाही. एका रात्रीत जाळून टाकतो! बघा तर बघा!'

## रात्री तमाशा दाखवतो

अशाच गप्पा चालल्या असताना एके दिवशी नरश्याने काका वगैरे मंडळींना विचारले, आज कोणती तिथी आहे? शिवराव बोलून गेले, आज अमावास्या आहे. त्यावर तो म्हणाला, '(इवत्तू

रात्री निमगे तमाशा तोरस्तेवी) आज रात्री तुम्हाला तमाशा दाखवतो' यांना वाटले की, तमाशातली काही गाणी हे म्हणून दाखवणार असतील! पण खरोखरच त्या रात्री त्यांनी विलक्षण तमाशा दाखविला खरा!

या दरोडेखोरांसकट इतर काही कैदी एकाच पडवीत झोपत होते. प्रत्येकाच्या पायामध्ये दोन सांखळ्या व त्याला जोडलेली एक रिंग असावयाची. रात्रीच्यावेळी सर्व कैद्यांच्या साखळीत असलेल्या या रिंगमधून एक भलीमोठी दुसरी सांखळी ओढून ती पलिकडे नेऊन बांधत असत जसे जनावरांना! या दरोडेखोरांनी त्या रात्री तमाशाचा बेत केला होता. आणि त्याच रात्री काका वगैरेंना भिंतीपलिकडच्या लागून असलेल्या दुसऱ्या पडवीत हलविले होते. रात्रीच्या वेळी कोठड्यांचे दरवाजे बंद झाल्यानंतर तेथे गस्त घालणारा पोलीस असे. सर्व सामसूम झाल्यानंतर पोलीस आणि कैदी एकमेकांशी बातचीत करीत असत व चिलीम ओढत असत. या दरोडेखोर कैद्यानी कोणाशी तरी संधान बांधून आधीच बाहेरुन गांजा आणवून घेतला आणि रात्रीच्या गप्पागोष्टी करतांकरता त्यांनी चिलमीत गांजा घालून ती नेहमीप्रमाणे पोलिसांना दिली. त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला याच रात्री दरोडेखोरांनी चलाखी करून साखळी रिंगमधून बाहेर काढली, असे भासवून ती रिंगच्या बाहेरच ठेवली. नंतर मध्यरात्रींच्या सुमारास तुरुंगाच्या कोठडीला असलेल्या दरवाजांचे लोखंडी व लाकडी गज ताकतीने त्यानी पेचले व तोडले आणि ते एकामागून एक कोठडीबाहेर पडले. पलीकडे गांज्याच्या नशेत असलेला पोलीस खडबडून जागा झाला. तोच नरश्याने लाकडी सोटा घेऊन त्याला (सत्तांग बिळू इल्लादरे ह्यणा मलगस्ताने) मेल्यासारखा पड. नाहीतर तुझा येथेच मुडदा पाडतो, असे सांगितले. तो पोलीस बिचारा करणार काय! तो निश्चेष्ट पडून राहिला. नंतर नरश्याने तेथील लाकडी खांबावरचा कंदिल फोडून अंधार केला व ते सर्व जेलच्या भिंतीकडे धावले. जाताना त्यांनी बरोबर कांबळी नेली व महार कैद्याला बरोबर घेतले. त्यांनी कांबळ्याची दोरी वळली आणि महार कैद्याच्या पाठीवर चढून एकाने जेलचा तट गाठला. नंतर क्रमाने सर्वांना त्याने वर घेतले. अशाप्रकारे पाचही जण फरारी झाले. महार कैदी तेवढा खाली राहिला.

## दरोडेखोर पळाले

पळालेले हे दरोडेखोर कैदी किल्ल्याच्या पलीकडे असलेल्या रेल्वे लाईनवर गेले आणि तेथे पायातल्या साखळ्या तोडून तेथून पहाटेस पसार झाले.

हा वेळपावेतो जेलर आणि बंदोबस्तासाठी असलेले आतील पोलीस यांची धावपळ सुरु झाली. बाहेरुन पोलिसांची कुमक आली आणि राईट लेफ्ट सुरु झाले! इतर कैद्यांना दहशत बसावी म्हणूनही जेलच्या एका बाजूने दुसऱ्या बाजूकडे गोळीबाराचा अग्नी सुरु केला. त्यावेळी आपलीही कंबक्ती आता भरली असे काका व शिवराव यांना वाटले. पण तो प्रसंग टळला.

सकाळी उठून पंचनामे वगैरे सुरु झाले. पण दरोडेखोर पळाले ते काही हाती आले नाहीत. काकांनी तुरुंगात पाऊल ठेवले त्यावेळी या दरोडेखोरांविषयी त्यांना काहीही माहिती नव्हती. पण नंतर त्यांना कळून आले की, यांना कोर्टात जबाबासाठी नेत, तेव्हा ते स्वत: अधिकाऱ्यांची उलटतपासणी घेत असत. ती चातुर्यपूर्ण असे. ती ऐकण्याकरिता कोर्टाभोवती शेकडो लोक जमत असत. लक्ष्मा, नरश्या यांच्या आख्यायिका त्याकाळी चार जिल्ह्यांच्या खेड्यापाड्यातून सर्वत्र पसरल्या होत्या.

काकांच्या पहिल्याच कारावासात हा त्यांना थरारुन सोडणारा अनुभव आला. त्यानंतर

काकांची जेलमधून रीतसर सुटका झाली. त्यांच्या स्वागतासाठी शेकडो लोक जेलबाहेर आले होते. त्यानंतर १९२१ ची ही चळवळ पुढे वाढली आणि कालांतराने ओसरली.

प्रारंभी कारावासाबद्दल एकंदरीत जुन्या लोकांच्या कल्पना वेगळ्या होत्या. काकांच्या दूरच्या नातेवाईकांना जेव्हा काकांना तुरुंगवास घडला ही गोष्ट कळून आली त्यावेळी ते म्हणाले, 'आमच्या घराण्यात असे कधी घडले नव्हते. घराण्याला हा कलंक लागला आहे!'

पुढे चौरीचाऱ्याच्या दंग्यानंतर या चळवळीला हिंसक वळण मिळाले म्हणून म. गांधींनी ती मागे घेतली. मं. गांधीना अटक झाली. कोर्टात चाललेल्या खटल्याच्या वेळी त्यांनी कोर्टाला विनंती केली की, 'कायदा मी जरुर मोडलेला आहे. तुमच्या पीनल कोडमध्ये जास्तीत जास्त जेवढी शिक्षा असेल ती मला द्या.' कोर्टाने गांधींना सहा वर्षांची शिक्षा दिली. त्यावेळी त्यांनी आनंद व्यक्त केला आणि ते म्हणाले, 'लोकमान्यांच्या एका थोर पुरुषाच्या बरोबरीने मला शिक्षा दिली म्हणून मी तुमचे आभार मानतो.' पुढे जेलमध्येच त्यांना अपेंडिसायटिसचा आजार झाला. त्यावेळी त्यांच्यावर तातडीची शस्त्रक्रिया झाली म्हणून ते वाचले. पुढे लवकरच गांधींची तुरुंगातून मुक्तता झाली.

## काकीनाडा काँग्रेसमधील एक मनोरंजक प्रसंग

१९२३ साली काकीनाडा येथे काँग्रेसचे अधिवेशन भरले होते. यावेळी म. गांधी तुरुंगातच होते आणि अधिवेशनाचे अध्यक्षस्थान श्री. महंमद अल्ली यांनी स्वीकारले होते. येथे प्रथमच असहकाराच्या चळवळीच्या संदर्भात फेर आणि नाफेर असे काँग्रेसमध्ये दोन तट पडले. या अधिवेशनाला काका स्वयंसेवकांचे एक पथक घेऊन गेले होते. नाफेरवादी (म्हणजे कायदेमंडळावर बहिष्कार घाला म्हणणाऱ्या पक्षाचे) गटाचे नेतृत्व सी. राजगोपालाचारी यांनी केले होते तर फेरवादी चळवळीचे नेतृत्व पं. मोतीलाल नेहरु यांनी केले होते.

या अधिवेशनात बरीच आव्हाने –प्रति आव्हाने झाली. त्यातला एक मोठा मनोरंजक प्रसंग असा नाफेरवाद्यांचे नेतृत्व करणारे सी. राजगोपालचारी यांचा घसा बसला होता, आणि ते लाऊड स्पीकरचे दिवस नव्हते. त्यामुळे मोठीच अडचण निर्माण झाली होती. प्रतिपक्षाकडे चांगले वक्ते होते. अखेर सी. राजगोपालाचारी यानी यातून एक मार्ग काढला. अधिवेशनाचे जनरल सेक्रेटरी गोपाळकृष्णय्या नावाचे गृहस्थ होते. त्यांचा आवाज भलामोठा पहाडी होता. त्यांना त्यांनी जवळ बोलावून घेतले व म्हणाले, 'मी तुमच्या कानात बोलतो व तुम्ही तेच भाषण तुमच्या मुखावाटे प्रकट करा!' राजगोपालाचारी त्यांच्या कानात एकेक वाक्य बोलत होते आणि ते आपल्या मुखावाटे आपल्या घनगंभीर आवाजात ते वाक्य फेकत होते. हा तासभर चाललेला कार्यक्रम मोठा मनोरंजक होता.

## बेळगाव येथे भरलेले काँग्रेसचे अधिवेशन

पुढच्याच वर्षी म्हणजे १९२४ साली म. गांधींच्या अध्यक्षतेखाली बेळगाव येथे काँग्रेसचे अधिवेशन भरले. ठळकवाडी येथे हे अधिवेशन भरले होते. अखिल भारतातील बहुतेक सारे नामवंत पुढारी या अधिवेशनाच्या निमित्ताने बेळगावास आले होते. पं. मोतीलाल नेहरु, चितरंजन दास, लाला लजपतराय, पं. मदनमोहन मालवीय, सरोजिनी नायडू, सुविख्यात थियॉसॉफिस्ट व राष्ट्रीय चळवळीच्या अग्रणी ॲनी बेझंट, स्वामी विवेकानंद, पं. जवाहरलाल नेहरु, आचार्य कृपलानी

अशा सर्व श्रेष्ठ नेत्यांना एकत्र आलेले पहाण्याचे भाग्य बेळगावकरांना लाभले. ठळकवाडी येथील व्हॅक्सिन डेपोजवळील मोकळ्या मैदानावर लहानमोठ्या राहुट्या बांधून शिबिरातील प्रतिनिधींच्या रहाण्याची सोय करण्यात आली होती. पाण्याची विपुलता व्हावी म्हणून एक वेगळी विहीरही खोदण्यात आली होती. ती 'काँग्रेस विहीर' म्हणून विख्यात असून त्यावेळच्या काँग्रेसचे एकमेव स्मारक अशी ती विहीरच आहे. या काँग्रेस अधिवेशनाच्या वेळी डॉ. एन. एस. हर्डीकर यांच्या नेतृत्वाखाली काका व कै. शिवराव कोप्पळ यांनी बेळगाव जिल्हा स्वयंसेवक संघटना स्थापून अधिवेशनाची व्यवस्था राखण्याच्या कामी बरेचसे परिश्रम घेतले.

१९२४ च्या अधिवेशनानंतर म. गांधींच्या नाफेरवादी पक्षाने रचनात्मक कार्याला (स्वदेशी, खादी, ग्रामोद्योग वगैरे) स्वत:ला वाहून घेतले. यानंतर फेरवादी लोकांनी कौन्सिल प्रवेशासाठी धमाल उडविली, आणि सी. आर. दास व पं. मोतीलाल नेहरु यांनी कौन्सिल– प्रवेश केला.

इकडे १९२७ साली कै. सेनापती बापट हे मुळशी सत्याग्रहाच्या प्रचार दौऱ्यावर सत्याग्रही तुकडी घेऊन बेळगाव येथे आले होते. सेनापती बापट स्वरचित असे पोवाडे दणदणीत आवाजात म्हणत असत. काही काळ त्यांनी बेळगाव शहर भारून टाकले होते. पुढे येथे केलेल्या एका भाषणाबद्दल त्यांना राजद्रोहाची दोन वर्षांची शिक्षा झाली. त्यांच्या बेळगावातील दौऱ्याची एकंदर व्यवस्था काका व श्री. सदाशिवराव परांजपे यांच्याकडे होती. त्यावेळी सेनापती बापटांचा 'मुळशीचा पाळणा' बराच गाजला.

काळकर्ते शिवरामपंत परांजपे यांच्या अध्यक्षतेखाली १९२९ साली बेळगावात मराठी साहित्य संमेलन भरले होते. या संमेलनाला काही कन्नड भाषिक तरुणांचा विरोध होता. या विरोधातून त्यांनी त्याचवेळी एक वेगळे कन्नड साहित्य संमेलन भरविले कै. दे.भ. गंगाधरराव देशपांडे हे मराठीला अनुकूल आहेत अशा समजुतीने त्यावेळी या कन्नड तरुणांनी गंगाधररावांचा निषेध केला. यावेळीही काकांनी आपल्या तरुण भारतांतून खूप प्रचार करून वस्तुस्थिती स्पष्ट केली होती.

## प्रचारकार्याचा धुमधडाका

१९२३ साली विद्यार्थ्यांनी सुरु केलेल्या 'तरुण भारत' मासिकाच्या प्रकाशनात खंड पडला होता. ता. १ ऑगस्ट १९२८ रोजी लो. टिळक पुण्यतिथीच्या मुहूर्तावर तरुण भारत साप्ताहिक स्वरुपात सुरु झाले. त्यामुळे काँग्रेसच्या प्रचारकार्याचे ते एक प्रभावी शस्त्र बनले. १९३०–३२ च्या काळातील कायदेभंग आंदोलनाचे प्रचारकार्य तरुण भारतने अत्यंत प्रभावीपणे केले होते, याची साक्ष तरुण भारताचे त्यावेळचे जुने अंक देऊ शकतील. प्रभातफेऱ्या, सायंफेऱ्या, सभा, मिरवणुका आदींचा धुमधडाका उडवून बेळगाव शहर व आसपासची खेडीच नव्हेत तर तिकडे वेंगुर्ला व इकडे अंकोला हा सारा भाग काकांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी अक्षरश: गाजवून सोडला.

देशभक्तीपर पदे गात या प्रभातफेऱ्या शहरातून संचार करीत असत. आबालवृद्ध स्त्री पुरुष त्यामध्ये मुक्तपणे भाग घेत असत. आठवड्याला शहरातील कोणत्या तरी एका चौकात सामुदायिक झेंडावंदन होत असे. त्यावेळी दहा ते पंधरा हजार लोक उपस्थित राहत असत. बेळगावात त्यावेळी प्रभातफेऱ्या काढणारी ५२ पथके होती, आणि मुंबईच्या खालोखाल इतक्या प्रचंड प्रमाणात प्रभातफेऱ्यांचे दर्शन बेळगाव येथेच घडत असे. पुढे भावगीत गायक म्हणून प्रसिद्धीस आलेले श्री. गजाननराव वाटवे हे या प्रभातफेऱ्यांमध्ये प्रामुख्याने भाग घेत असत.

## मिठाच्या सत्याग्रहाचे आंदोलन

१९३० साली कॉंग्रेसने स्वातंत्र्याचे ध्येय घोषित करून त्याच्या प्राप्तीसाठी लढा पुकारला. आणि मिठाच्या सत्याग्रहाचे आंदोलन सुरु केले. खुद्द महात्मा गांधींनी इतिहासप्रसिद्ध 'दांडी कूचसाठी' आपल्या ८० अनुयायांसह प्रयाण केले. त्यामुळे देशभर नवचैतन्याचे वारे वाहू लागले. बेळगाव जिल्हा तरी या बाबतीत मागे कसा राहील? त्यासाठी बेळगाव शहरात कायदेभंगाच्या लढ्याकरिता संघटना बांधून प्रभातफेऱ्या, झेंडावंदन, सभा, मिरवणुकी आदी कार्यक्रम पार पाडण्याचे काम काकांनी अंगावर घेतले. त्या काळात काका बेळगाव जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे सेक्रेटरी होते.

मिठाच्या सत्याग्रहासाठी अंकोल्याच्या बाजूने एक, वेंगुर्ल्याच्या बाजूने एक व बेळगाव जिल्ह्यातून दोन अशी एकूण चार सत्याग्रही पथके पाठविण्यात आली. ती संघटना बांधण्याचे काम काका व त्यांचे सहकारी डॉ. कोवाडकर, कै. शिवराव कोप्पळ वगैरेंनी केले. रात्रीच्यावेळी हातात पेट्रोमॅक्सचे दिवे घ्यावयाचे आणि चौकाचौकात उभे राहून छोटी छोटी भाषणे द्यावयाची, असा प्रचाराचा धुमधडाका त्यांनी सुरु केला. या काळात बेळगाव भागात हजारोंवर सभा झाल्या. खेड्यापाड्यातून सुद्धा प्रभातफेऱ्या निघू लागल्या. सर्व तालुक्यातून चहा, सिगारेट, परदेशी कापड यावर बहिष्कार पडू लागला.

ता. १३ एप्रिल रोजी देशात सर्वत्र मिठाच्या सत्याग्रहाचा आदेश गांधीजींनी दिला होता. बेळगाव शहरात गल्लीवार संघटनेचे जाळे विणले जात होते. या संघटनेमार्फत रोज प्रचंड प्रभातफेऱ्या निघत असत. याच कायदेभंगाच्या काळात म. गांधीची येरवडा जेलमधून मुक्तता झाल्याची बातमी मध्यरात्री येऊन थडकली. तेवढ्या अपरात्री तासाभराच्या आत काकांनी शहरातून प्रचंड मिरवणूक काढली. टाळमृदुंगासह झाडून सारे भजनी मेळे, ताशेवाजंत्र्याचे ताफे, हजारो स्त्री पुरुष नागरिकांचा समुदाय आणि सर्वाच्या अग्रभागी बँडमास्तर कै. बसवाणी यांचा नावाजलेला बँड अशी ही अभूतपूर्व मिरवणूक पहाटेपर्यंत गांवभर फिरली. काकांच्या संघटना कौशल्याची ती मिरवणूक म्हणजे चालती बोलती साक्षच होती. या मिठाच्या सत्याग्रहाबाबत काका, डॉ. कोवाडकर व कै. शिवराव कोप्पळ यांना सहा सहा महिन्याच्या शिक्षा झाल्या.

## तरुणभारताकडून दोन हजारांची जामिनकी

१९३० साली बेळगाव जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या रामदेवगल्लीतील कचेरीला सरकारने सील ठोकले होते. त्यामुळे साऱ्या चळवळीचे केंद्र तरुण भारताची कचेरी व सध्याची इमारत हेच झाले होते. सरकारची त्यावेळी तरुण भारतावर वक्रदृष्टि होतीच आणि त्याच साली निरनिराळ्या कारणाखाली तरुण भारत छापखान्याची तीनचार वेळा पोलिसांकडून वेढा घालून झडती घेण्यात आली होती. आणि पुढे तर प्रेस ऑर्डिनन्स खाली दोन हजारांची रोख जामीनकी ब्रिटिश सरकारने तरुण भारताकडून मागितली होती. त्यामुळे काही महिने तरुण भारतचे प्रकाशन बंद ठेवावे लागले होते. पुढे १९३१ च्या मार्चमध्ये गांधी अर्विन तहनाम्यानंतर भरलेली जामिनकीची रक्कम परत मिळाली ही गोष्ट वेगळी! या रोख जामीनकीसाठी लागणारी दोन हजारांची रक्कम गावातून गोळा करण्याचे सारे श्रेय थोर देशभक्त कै. सदाशिव लक्ष्मण उर्फ बाबासाहेब सोमण यांना आहे.

या धकाधकीच्या आंदोलनाचीं आणि कायदेभंगासाठी पाठविल्या जाणाऱ्या पथकांची सूत्रे तरुण

भारतातूनच हालविली जात असत, आणि हिंडलगा जेलमधून सुटणारा प्रत्येक सत्याग्रही प्रथम तरुण भारताला भेट देऊनच पुढे जात असे. ही सर्व संघटना बांधण्याच्या कामी श्री. अण्णू गुरुजी, श्री. जयदेवराव कुलकर्णी, डॉ. कोवाडकर, कै. वामनराव बिद्री देसाई, कै. दत्तोपंत अध्यापक, कै. शिवराव कोप्पळ, कै. काळे असे कार्यकर्ते तसेच कै. लक्ष्मीबाई सोहनी, कै. गंगुताई सोहनी, कै. शांताबाई कोप्पळ अशा अनेकांचे सहाय्य झाले होते. त्यातही श्री. जयदेव कुलकर्णी, श्री. अण्णु गुरुजी, कै. काळे ही मंडळी काकांना सर्व कामात सदैव साथ देत होती. ही मंडळी तुरुंगात नसली म्हणजे तरुण भारत कार्यालयात हमखास असावयाची असे ठरूनच गेले होते.

गांधी– अर्विन तडजोड फार दिवस टिकली नाही. गोलमेज परिषदेला गेलेले गांधीजी रिक्त हस्ताने परतल्यावर १९३२ च्या जानेवारीमध्ये सरकारने दहशपशाहीचे सत्र सुरु केले आणि म. गांधीसकट मोठमोठ्या पुढाऱ्यांना अटक करून तुरुंगात टाकले.

अशा प्रकारे कायदेभंगाची चळवळ साऱ्या देशभर चालूच होती. ठिकठिकाणी अनेक कार्यकर्त्यांची धरपकड होऊन त्यांच्यावर खटले भरले जात होते. १९३२ च्या जानेवारी महिन्यात काकांनाही हजेरीची नोटीस मोडल्याबद्दल एक वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा झाली व त्यांची रवानगी नाशिकच्या तुरुंगात करण्यात आली. यावेळी त्यांच्याबरोबर श्री जीवनराव याळगी, कै. केशवराव गोखले, कै. बळवंतराव दातार, कै. नारायणराव जोशी, कै. डॉ. रामभाऊ जोशी ही कर्नाटकातील मंडळी होती. शिवाय त्यांच्याबरोबर 'कोमागोतामारु' या सुप्रसिद्ध क्रांतिकारकांच्या कटातील स्वामी गोविंदानंद, डॉ. ताराचंद, श्री. सिधवा, श्री परशराम ही सिंधप्रांतीय मंडळी, शिवाय गुजरातचे पुढारी श्री. मोरारजी देसाई, कै. दिनकरराव देसाई, कै. दरबार गोपाळदास, कै. शेट अमृतलाल, कै. डॉ. कुमारअप्पा, मुंबईचे कै. बाळासाहेब खेर, सॉलिसीटर श्री. शांतिलाल शाह वगैरे बडी बडी मंडळी होती. शिवाय नगरचे श्री. अच्युतराव पटवर्धन वगैरे बरीच मंडळी होती. जेलमध्ये मिळालेल्या संधीचा फायदा काकांनी बंगाली व गुजराती या भाषा अवगत करण्यासाठी घेतला.

१९३२ च्या आंदोलनानंतर महात्माजींनी अस्पृश्यता निवारणासाठी हरिजनोद्धार आणि मंदिर– प्रवेशाची चळवळ हाती घेतली. ते कार्य देखील बेळगाव शहरामध्ये काका व त्यांच्या सहकाऱ्यांनी मोठ्या हिरीरिने चालविले. मारुतीच्या देवालयात हरिजनाना प्रवेश मिळवून देण्यासाठी लोक मिरवणुकीने गेले असताना पुजाऱ्याने देवळाचे दरवाजे बंद करून घेतले होते ते खुले करून हरिजनाना मंदिरप्रवेश मिळवून देण्याची कामगिरी काका व त्यांचे सहकारी यानी पार पाडली.

## काँग्रेसरोडची कूळकथा

आज बेळगाव आणि टिळकवाडी यांना जोडणारा आणि लोहमार्गाशी समांतर जाणारा जो काँग्रेस रोड आहे, त्याची निर्मिती १९३४ ला झाली. या रस्त्याला 'काँग्रेस रोड' हे जे नाव पडले आहे, त्याच्यामागे एक खळबळजनक घटना दडलेली आहे. तत्कालीन ब्रिटिशधार्जिण्या बेळगाव नगरपालिकेने हा नवा रस्ता तयार झाल्यानंतर त्याला 'ब्रेबॉर्न रोड' असे नाव देण्याचे ठरविले होते. लॉर्ड ब्रेबॉर्न हे त्यावेळी मुंबईचे गव्हर्नर होते. सर्वच ब्रिटिश राजवटीविरुद्ध जनतेच्या मनात असंतोष निर्माण झाला होता. त्यामुळे एका ब्रिटिश अधिकाऱ्याचे नाव आपल्या शहरातील एका प्रमुख रस्त्याला देण्यात येणार याची चीड सर्वांनाच होती.

नगरपालिकेच्या या गुलामी वृत्तीचा निषेध करण्याकरिता आणि सदर रस्त्याला 'काँग्रेस रोड'

हे नाव देण्याकरिता ता. ९ सप्टेंबर १९३४ रोजी सायंकाळी ५ वा. काकांच्या अध्यक्षतेखाली एक जाहीर सभा होऊन नगरपालिकेचा धिक्कार करण्यात आला. तत्कालीन म्यु. पालटीतील राजनिष्ठांचे कारस्थान हाणून पाडण्याकरिता काकांनी पुढाकार घेतला आणि गव्हर्नराच्या आगमनाच्या आदल्यादिवशी ठळकवाडी येथे रेल्वेगेट समोरील खासगी मोकळ्या जागेत (आज जेथे श्री. चंदा पै यांचे हॉटेल आहे त्या ठिकाणी) सभा घेण्यात आली. सभेच्या ठिकाणी काका व त्यांचे सहकारी शिवराव कोप्पळ, जुवेकर, कृष्णा हणमशेट असे जवळजवळ २७ सत्याग्रही तरुण व बरेच नागरिकही हजर होते. सभेला सुरुवात करण्यापूर्वी कै. शिवराव कोप्पळ हे प्रार्थना म्हणण्याकरिता उभे राहिले तेव्हा तेथे हजर असलेल्या ब्रिटिश पोलीस अधिकाऱ्यांनी त्याला तात्काळ हरकत घेतली आणि नियमाप्रमाणे येथे सभा भरविता येणार नाही. असे सांगितले पण 'आम्ही उभे आहोत ती जागा खासगी मालकीची आहे. आम्ही येथे सभा घेणारच' असे उदगार काकांनी काढले. त्याबरोबर सर्व पोलिसांनी सभेला गराडा घातला आणि काका भाषण करीत असताना त्यांच्यावर हल्ला केला. तो वर्मी लागल्याने काकांच्या नाकातून रक्त वाहू लागले. पुढे काकांवर पोलिसांनी खटला भरला. त्यात त्याना शिक्षा झाली. तथापि ही केस पुढे हायकोर्टापर्यंत गेली काकांच्या बाजूने सॉलिसिटर कै. बाळासाहेब खेर (पुढे मुंबईचे मुख्यमंत्री) व सुप्रसिद्ध कै. के. एम. मुन्शी (पुढे मुंबईचे गृहमंत्री) यानी ती लढविली. या केसचा उल्लेख 'काँग्रेस रोड केस' म्हणून मुंबईच्या लॉ रिपोर्टरमध्ये आहे.

१९३४ साली दिल्ली येथील मध्यवर्ती असेंब्लीची निवडणूक झाली. पुष्कळ वर्षेपर्यंत कौन्सिल असेंब्लीवर बहिष्कार टाकलेल्या काँग्रेसने, पहिल्या प्रथम याच निवडणुकीत भाग घेतला. काँग्रेसच्यावतीने या भागातून म्हणजे बेळगाव, धारवाड, विजापूर, रत्नागिरी व कुलाबा या जिल्ह्यांकरिता असलेल्या एका जागेसाठी हावेरीचे सुप्रसिद्ध वकील श्री. सिद्दाप्पा होसमनी यांना उभे करण्यात आले होते. आणि ब्राह्मणेत्तर पक्षातर्फे धारवाडचे रावबहादूर बी. एल. पाटील हे उभे होते. या निवडणुकीत रावबहादूर पाटील यांचा धुव्वा उडवून काँग्रेसचे श्री. होसमनी हे प्रचंड मतांनी निवडून आले. या निवडणुकीत काँग्रेसला भरघोस यश मिळवून देण्यासाठी बेळगाव भागात काकांनी आपल्या परीने खूप परिश्रम घेतले होते. त्यांच्या परिश्रमांचेच फळ म्हणजे त्यानंतर कर्नाटकातील प्रत्येक निवडणुकीत काँग्रेसला मिळत गेलेले यश हे होय.

## कै. अण्णासाहेब लट्ठे यांच्याशी परिचय

सार्वजनिक जीवनात प्रवेश केल्यानंतर काकांना अनेक मित्रमंडळींचे सहाय्य झाले. त्यामध्ये काकांच्या समकालीन दोन व्यक्तींचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. या दोन व्यक्ती म्हणजे कै. आण्णासाहेब लट्ठे व कै. डॉ. गोविंदराव हेरेकर. यापैकी कै. अण्णासाहेब लट्ठे व काका यांचा प्रारंभी परस्परांशी राजकीय क्षेत्रात विरोध होता. या विरोधांतून त्यांची मैत्री आकार घेत गेली. प्रथम काकांचे बंधू कै. यशवंतराव यांचा व श्री. अण्णासाहेबांचा एक वकील व व्यासंगी गृहस्थ या नात्याने स्नेह घडून आला होताच. आणि यशवंतरावांमुळे काकांचा अण्णासाहेबांशी प्रथम परिचय घडून आला.

कै. लट्ठे हे एकेकाळचे कोल्हापूरचे दिवाण व ब्राह्मणेत्तर पक्षातील आणि त्यातल्यात्यात जैन समाजाचे पुढारी म्हणून सुविख्यात होते. १९३१ साली भरलेल्या गोलमेज परिषदेला (Round table Conference) निमंत्रित पुढारी म्हणून ते उपस्थित होते. तत्कालीन ब्राह्मणेत्तर चळवळीतील एक प्रमुख पुढारी म्हणून त्यांचे व गंगाधरराव देशपांडे यांचे राजकीय क्षेत्रात परस्परांशी विरोधी नाते होते. त्यावेळी काकांनी काँग्रेसच्या बाजूने अण्णासाहेबांवर तरुण भारतातून

टीकास्त्र उगारले होते. अशीच एकदा खरमरीत टीका लठ्ठे यांच्यावर काकानी आपल्या पत्रातून केली होती. अण्णासाहेबांच्या वाचनात ही टीका आली होतीच. पण त्या टीकेमुळे त्यांच्या मनात कोणताच कडवटपणा निर्माण झाला नाही. उलट सर्वच गोष्टी ते खेळकरपणे घेत. पुढे काकांचे जसजसे त्यांच्याशी अधिकाधिक संबंध येत गेले, तसतशी काकांना त्यांची मोकळेपणाची वृत्ती अधिक आवडली आणि दोघांचा स्नेह हळूहळू वाढत गेला.

## कै. लठ्ठे यांचा काँग्रेस प्रवेश

अण्णासाहेबांचा प्रत्येक विषयाचा अभ्यास मोठा असे. इंग्रजी व मराठी ग्रंथांचा त्यांचा गाढ व्यसंग होता. त्यांनी स्वत:ही काही ग्रंथलेखन केले होते. मतभेदाच्या विषयावर कोणाशीही एकत्र बसून मोकळेपणाने चर्चा करण्यास ते सदैव तयार असत. मग तो लहान असो अगर मोठा असो. न्यायमूर्ती रानडे यांच्याविषयी त्यांच्या मनात नितांत आदर होता व ते त्यांना गुरुस्थानी मानीत. अर्थातच अण्णासाहेबांना टिळक गांधींचे जहाल राजकारण फारसे पसंत नव्हते. आणि म्हणून बराच काळपर्यंत अण्णासाहेब काँग्रेसपासून दूर राहिले होते. पुढे काका व अण्णासाहेब यांचा निकटचा संबंध येऊ लागला. तसतसे ते काँग्रेसकडे ओढले जाऊ लागले आणि ब्राह्मणेत्तर पक्षाशी त्यांचा संबंध तुटत गेला. पुढे त्याकाळचे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे नेते श्री. शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या एका बैठकीमध्ये अण्णासाहेबांनी काँग्रेसमध्ये सन्मानपूर्वक प्रवेश केला. अण्णासाहेबांनी काँग्रेसमध्ये यावे यासाठी काकांनी फार मोठी धडपड केली. अण्णासाहेबांच्या काँग्रेस प्रवेशामुळे बेळगाव भागातील काँग्रेस पक्षास एक दमदार व्यक्तिमत्त्वाचा पुढारी मिळेल, अशी काकांची श्रद्धा होती. शिवाय अण्णासाहेब हे जैनसमाजाचे पुढारी होते. महाराष्ट्र कर्नाटकाच्या या सीमेवर या समाजाचे बहुसंख्य लोक अण्णासाहेबांचे नेतृत्व मान्य करणारे होते. त्यामुळे अण्णासाहेबांनी जर काँग्रेस प्रवेश केला, तर त्यांच्याबरोबर अनेक लोक काँग्रेसमध्ये प्रवेश करतील आणि ब्राह्मण ब्राह्मणेतर यांच्यात निर्माण झालेला दुरावा कमी करण्यास अण्णासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचा फार मोठा उपयोग होईल, असेही काकांना वाटत होते. काकांच्या प्रयत्नांना यश येऊन वर म्हटल्याप्रमाणे अण्णासाहेबांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. सुदैवाने लवकरच १९३७ साली मुंबई विधिमंडळाची निवडणूक लढविण्याची संधी अण्णासाहेबांना मिळाली आणि काँग्रेसच्या तिकीटावर अण्णासाहेब प्रचंड बहुमताने निवडून आले. आणि विधिमंडळामध्ये लवकरच त्यांना अर्थमंत्रीपदाची मानाची जागा पण मिळाली. आपल्या भागातील एका विद्वान व्यक्तीची एका जबाबदारीच्या जागी नियुक्ती झाल्याचे ऐकून काकांना फार मोठी धन्यता वाटली.

पण यापूर्वी जेव्हा कै. अण्णासाहेब लठ्ठे हे ब्राह्मणेत्तर पक्षाचे पुढारी होते, अशावेळी काका व कै. लठ्ठे यांचा जसजसा स्नेह वाढत चालला , हे पाहून कै. दे. भ. गंगाधरराव देशपांडे काकांना म्हणाले होते, 'बाबुराव, अण्णासाहेब हे खोल स्वभावाचे गृहस्थ आहेत. त्यांच्यापासून जरा जपून रहा.'

त्यावेळी काकांनी त्यांना सांगितले होते की, 'अण्णासाहेबाविषयींचा तुमचा हा गैरसमज आहे आणि लवकरच तो दूर होईल.' पुढे गंगाधररावानीच प्रांजलपणे कबूल केले की, 'बाबुराव, तुमचेच बरोबर होते. हा गृहस्थ मनात काय असेल ते बोलून टाकणारा, मोकळ्या अंत:करणाचा आहे.' पुढे गंगाधररावांचा आणि अण्णासाहेबांचा निकटचा स्नेह घडून आला. आणि गंगाधररावांनी अण्णासाहेबांना अर्थमंत्रीपद दिले जावे म्हणून वल्लभभाईंकडे बरीचशी रदबदली केली.

१९३८ साली गुजरातमधील हरिपुरा येथे भरलेल्या काँग्रेस अधिवेशनाच्या प्रतिनिधीपदासाठी चुरशीची निवडणूक झाली. तीत काका व श्री. जीवनराव याळगी हे दोघे निवडून आले व काँग्रेसला उपस्थित राहिले.

## प्रतिगामी व स्वार्थलोलुप लोकांवर टीकास्त्र

लोकालबोर्डे आणि म्यु. पालटी या स्थानिक स्वराज्य संस्था हे राजनिष्ठांचे व प्रतिगाम्यांचे अड्डे आहेत. तेथे विशुद्ध चारित्र्याचे लोक पाठवून कारभाराला लोकहितकारी वळण मिळावे म्हणून काँग्रेसने त्या संस्था काबीज कराव्यात, अशी प्रेरणा काकांनी तरुण भारताद्वारे दिली आणि म्यु. पालटीत अगर लोकलबोर्डात ज्या ज्या ठिकाणी भ्रष्ट कारभाराचे दर्शन घडेल, त्यावर त्यानी प्रखर हल्ले चढवावयास सुरुवात केली. त्याचा परिणाम म्यु. पालटी व लोकलबोर्डे यांच्या कारभारावर झाल्याशिवाय राहिला नाही. तरुण भारतातील नि:स्पृह आणि निर्भीड टीकेमुळे या पत्राचा विशेष बोलबाला झाला व त्याची लोकप्रियता वाढू लागली.

या स्थानिक स्वराज्य संस्था बहुजन समाजाच्या नावाखाली तत्कालीन लिंगायत आणि मराठा यांच्या वर्चस्वाखाली होत्या. सरकारशी राजनिष्ठ राहून काँग्रेस– विरोधाचे दर्शन करणे आणि जेवढा जास्तीत जास्त स्वार्थ साधता येईल तेवढा साधणे हेच त्यांचे इतिकर्तव्य बनले होते. म्यु. पालटीसारख्या संस्थांमध्ये गटबाजीचे राजकारण चालून नसत्या प्रतिष्ठेला बळी पडून स्वत:चा उघडानागडा स्वार्थ साधण्यात कोणाला काहीच वाटत नसे. स्वातंत्र्य चळवळ ऐन भरात येत असताना ब्राह्मणेत्तर पक्षाच्या नावाखाली चाललेले हे चाळे कसे हाणून पाडता येतील, याच विचाराने तरुण भारत भारलेला होता आणि सतत कित्येक वर्षे त्याने प्रतिगाम्यांवर व स्वार्थलोलुप लोकांवर टीकेची झोड चालू ठेवली होती.

अधिकाऱ्यांची खुशामत करून आपली पोळी पिकवावयाची, हा म्यु. पालटीतील राजनिष्ठांचा एक धंदाच होऊन बसला होता. जो जो गव्हर्नर बेळगाव शहराला भेट देई, त्याला म्यु. पालटीचे मानपत्र हे ठरलेलेच! या मानपत्रामध्ये त्याच्यावर स्तुतिसुमनांचा वर्षाव करावयाचा, राजनिष्ठेचे प्रदर्शन करावयाचे व अशारीतीने स्वातंत्र्य चळवळीला गालबोट लावावयाचे, हा क्रम प्रत्येक मानपत्राच्यावेळी घडत असे. त्या त्या वेळी काकांनी जाहीर सभा घेऊन याला कडाडून विरोध केला आहे. सर फ्रेडरिक साइक्स, लॉर्ड ब्रेबोर्न आणि लम्ले हे तीन गव्हर्नर बेळगावला भेट देऊन गेले, आणि त्या प्रत्येकाला दिल्या जाणाऱ्या मानपत्रास काकांनी आपल्या तरुण सहकाऱ्यांसह कडाडून विरोध केला, हा इतिहास आहे. काकांनी म्यु. पल राष्ट्रीय पक्षाची स्थापना करून म्यु. पालटीच्या निवडणुका लढविल्या. त्या निवडणुकीत 'म्यु. पालटीचे चौदा जुने बुरुज ढासळले.' असे त्याचे वर्णन तरुण भारतात त्यावेळी आले आहे.

## ४२ चे 'चले जाव आंदोलन'

भारतीय स्वातंत्र्य–चळवळीच्या यज्ञकुंडातील बेचाळीसचे 'चले जाव' (Quit India) आंदोलन ही एक भडकती ज्वाला होती. असहकार, कायदेभंग, सत्याग्रह अशा निरनिराळया मार्गांनी ब्रिटिश विरोधी असंतोषाला देशात जिकडे तिकडे तोंड फुटत होते. ४२ साली या साऱ्याच गोष्टींना एकदम उधाण आले. या आंदोलनाच्या ज्वाला बेळगावातही अधिक प्रमाणात भडकल्या. येथेही काही प्रमुख नेत्याना अटक करण्यात आली.

८ ऑगस्ट १९४२ या दिवशी मुंबई येथे गवालिया टँकवर भरलेल्या इतिहासप्रसिद्ध अशा काँग्रेसच्या अधिवेशनास काका उपस्थित होते. 'चले जाव' चा आदेश मिळताच सर्वत्र धरपकडीला सुरुवात झाली. तेथून काका लपतछपत आडमार्गाने बेळगावला येऊन पोहोचले. काकांची प्रकृती यावेळी ठीक नव्हती. आणि आडमार्गाच्या प्रवासाने व त्यात झालेल्या दगदगीमुळे ते आजारी पडले. तथापि उघडपणे घरी येऊन राहण्यासारखे नव्हते. काही दिवस ते गावापासून दूर असलेल्या नानावाडी येथे आपल्या मामाच्या बंगल्यात जाऊन राहिले. त्या ठिकाणी त्यांना अनेक कार्यकर्ते गुप्तपणे येऊन भेटत व त्यांच्या सल्लामसलती चालत. पकड वॉरंट असलेल्या माणसाला त्यावेळी घरी ठेवून घेणे हा गुन्हा होता. पोलिसांना थोडास जरी सुगावा लागला असता, तर काकांच्यासह सर्वांनाच त्रास झाला असता. शिवाय काकांचा आजार तर दिवसेंदिवस वाढत होता. त्यावेळी कोणा चांगल्या डॉक्टरकडून उपचार चालू करणे आवश्यक होते. काकांचे त्यावेळचे जवळचे मित्र व सहकारी डॉ. हेरेकर यांना काकांची ही कुचंबणा कळली. त्यांनी धोका पत्करून मोठ्या धैर्याने आपल्या हॉस्पिटलमध्ये काकांना आणले. तेथे त्यांच्यावर आवश्यक ते उपचार करून एक छोटीशी शस्त्रक्रिया त्यांनी पार पाडली. हे सर्व गुप्तपणे चालू होते. पण तरीही लोकांना थोडीशी चाहूल लागली की बाबुराव ठाकुर हे डॉ. हेरेकरांच्या दवाखान्यात आहेत. डॉक्टरांच्या लक्षात ही गोष्ट येताच त्यानी काकांना आपल्या घरी हलवले व तेथे त्यांच्यावर उपचार चालू केले.

उपचार चालू असतानाच काकांना हजर होण्याविषयी डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनी नोटीस काढली. यावेळी त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांना सल्ला दिला की, आजारी अवस्थेत तुम्ही हालचाल, धावपळ करू शकत नाही. तेव्हा हजर होणेच बरे. हा सल्ला काकांनी मान्य केला आणि सरकारला तसे कळविले. नंतर आजारी अवस्थेतच काकांना पोलिसांनी अटक करून हिंडलगा जेलमध्ये स्थानबद्ध करून ठेवले. तेथून त्यांची नासिकच्या तुरुंगात रवानगी करण्यात आली. तेथे त्यावेळी पुण्या मुंबईचे बरेच प्रसिद्ध पुढारी होते. त्यामध्ये के. के. मेमन, अशोक मेहता, उमाशंकर दीक्षित, काकासाहेब गाडगीळ, अण्णासाहेब वर्तक, भाऊसाहेब हिरे, पुंडलिकजी वगैरेंचा समावेश होता. पुढे २७ मे १९४४ रोजी म्हणजे १ वर्षे १० महिन्यानंतर काकांची जेलमधून मुक्तता करण्यात आली.

मध्यंतरींच्या काळात बेळगाव शहरात धमाल उडाली होती. त्यावेळी इनामदार नावाचा पोलीस इन्स्पेक्टर होता. त्याने भारत संरक्षण कायद्याखाली अनेक व्यापाऱ्यांना अटक करण्याची धमकी देऊन हजारो रुपये उकळले आणि अनेक निरपराध लोकांना तुरुंगात टाकले.

४२ पूर्वीच दोन वर्षे काकांना भारत संरक्षण कायद्याखाली अटक झाली असती, पण सुदैवाने त्या प्रसंगातून ते निसटले. ती हकीकत थोडी उल्लेखनीय आहे.

## चंदगड तालुक्यातील शैक्षणिक व रचनात्मक कार्य

महायुद्धाकरिता रिक्रूटभरतीचे काम चालू होते. याचवेळी, गांधींच्या चळवळीच्या विरोधात, काही राजनिष्ठ आणि सरकारधार्जिण्या मनोवृत्तीच्या लोकांनी आपले उखळ पांढरे करून घेण्यासाठी या संधीचा पुरेपूर फायदा घेण्याची धडपड चालविली होती. यापूर्वी म्हणजे १९३८ पासूनच काकांनी चंदगड तालुक्यामध्ये शिक्षण प्रसाराकरिता अनेक शाळा उघडल्या होत्या. पण शिक्षणापुरतेच त्यांचे कार्य मर्यादित नव्हते. शाळा असलेल्या प्रत्येक गावातून त्यानी रचनात्मक कार्याचा पाया म्हणून लोकांना स्वावलंबनाचे धडे देण्याचे व स्वातंत्र्याची प्रेरणा देण्याचे काम चालू ठेवले होते. याचाच एक भाग म्हणून १९४० साली त्यांनी चंदगड तालुक्यातील जवळजवळ ७० खेड्यातून मोठ्या

रस्त्यांना जोडणारे रस्ते तयार करण्याची कामगिरी पार पाडली. गांवोगावी उत्साहाचे वातावरण निर्माण करून त्या त्या खेड्यातील समस्त लोकांना श्रमदानाने आपापल्या गांवचे रस्ते करण्याची स्फूर्ति दिली. आणि प्रत्यक्ष गावागावाला भेटी देऊन ते काम साकार झाल्याचे पाहिले. या कामी त्या त्या भागातील २५ कार्यकर्ते त्यांच्याबरोबर अहोरात्र झटत होते. पुढे एका प्रसंगाने त्यावेळचे बेळगाव विभागाचे प्रसिद्ध कमिशनर मि. ई. सी. पेरी हे चंदगड विभागात दौऱ्यावर होते. इंग्लिशमन असले तरी ते मोठ्या उदार मनाचे होते. त्यांनी रस्त्यांचे झालेले हे रचनात्मक कार्य प्रत्यक्ष पाहिले आणि या कार्याची त्यांनी पुढील शब्दात मुक्तपणे प्रशंसा केली.

``I am considering how best to recoginise the work and encourage similar work in a concrete way by helping those who have helped themselves."

ही काकांना त्यांच्या कार्याची जणू पावतीच मिळाली होती. हे कार्य, पुढे इतके गाजले की मद्रास येथील 'हिंदू' या इंग्रजी दैनिकाने यावर `Roads in Chandgad Mahal' या शीर्षकाखाली एक अग्रलेख लिहिला होता. पुढे या कार्यासंबंधी इंग्रजीत एक लहानशी पुस्तिका प्रसिद्ध झाली.

या रचनात्मक कार्याची चंदगड तालुक्यावर गांवोगावी पडलेली छाप आणि स्वातंत्र–चळवळीला पोषक अशा काकांच्या हालचाली, चंदगड भागातील राजनिष्ठांना सहन झाल्या नाहीत. त्यावेळी श्री फरूके नावाचे चंदगडचे मामलेदार होते. त्यांनी चंदगड भागात सरकारला सहाय्य करण्यासाठी राजनिष्ठांच्या दोन मोठया सभा पुंद्रे व कारवे या ठिकाणी बोलावल्या. आणि तेथे त्यांनी असे ठराव केले की, जोपर्यंत बाबुराव ठाकुर मोकळे आहेत, तोपर्यंत चंदगड तालुक्यातून रिक्रूटभरती अशक्य आहे. हे रिपोर्ट पुढे त्यावेळचे बेळगावचे कलेक्टर मि. मिलार्ड (हे मोठे भारतद्वेष्टे होते) यांच्याकडे गेले. त्या आधारे काकांना भारत संरक्षण कायद्याखाली अटक होणार हे जवळ जवळ निश्चित झाले होते. काकांचे जेष्ठ सहकारी व निकटचे स्नेही डॉ. हेरेकर यांनी वेळ न गमावता मि, मिलार्ड यांची गाठ घेतली. व बाबुराव ठाकुर हे याबाबतीत कसे निरपराध आहेत हे दर्शविण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी मि. मिलार्ड म्हणाले, `Here are the reports. How can I disbelive my people?' हे ऐकून डॉक्टर परतले. हे पाहताच काकांचे स्नेही कै. हणमंतराव सबनीस (कलेक्टर कचेरीतील डे. चिटणीस) यांनी एक तोडगा सुचविला. ते म्हणाले 'तुमची आणि कमिशनर पेरी यांची इतकी ओळख झाली आहे की, त्यांच्या कानावर तुम्ही ही गोष्ट का घालत नाही? काकाना हे पटले, ते ताडकन उठून पेरीकडे गेले व घडलेली हकीकत त्यांनी त्यांना सांगितली. मि पेरी यांनी थोडीशी विचारपूस केली आणि त्यानी वरिष्ठ अधिकारी या नात्याने मि. मिलार्ड यांना पत्र लिहिले, 'मी बाबुराव ठाकुर यांनी केलेले रचनात्मक कार्य प्रत्यक्ष पाहिले आहे. त्यांच्याविरूद्ध कोणतीही कारवाई नको.' यामुळे बेचाळीसच्या आधी दोन वर्षे काकांना होणारा कारावास केवळ मि. पेरी या थोर गृहस्थाच्या उदारतेनेच चुकला. पुढे हेच मि. पेरी कोल्हापूर संस्थानचे प्राइम मिनिस्टर व त्यानंतर मुंबई सरकारचे चीफ सेक्रेटरी झाले. पुढे एकदोन वेळां त्याना भेटण्याचा काकांना जेव्हा प्रसंग आला, त्यावेळी त्यांनी मोकळेपणाची जवळीक दाखवली.

पोलीसांच्या जुलमी व अन्याय्य वर्तनावर करडी नजर ठेवणाऱ्या तरुण भारतची ख्याती या वेळपर्यंत आजुबाजूच्या संस्थानासकट सर्वत्र पसरली होती. कोल्हापूर संस्थान आणि चिकोडी तालुक्याची हद्द यांच्या सीमेवर असणाऱ्या पांगिरे गांवच्या लोकांनी एके दिवशी तरुण भारतकडे धाव घेतली. काशीबाई व तिचे नातेवाईक हे तरुण भारतात येऊन त्यांनी अश्रुपूर्ण नेत्रांनी आपली

हकीकत निवेदन केली. काकांचा प्रथम त्यानी सांगितलेल्या अमानुष अत्याचाराच्या हकीकतीवर विश्वासच बसेना. म्हणुन या प्रकरणासंबंधात ज्यांच्या ज्यांच्यावर अन्याय झाला, त्यांचे जबाब त्यांनी लिहून घेतले, कायद्याच्या कक्षेत ते कितपत बसतात हे जाणून घेतले, आणि नंतर येथील एका मॅजिस्ट्रेटकडे नेऊन त्या सर्वांची शपथेवर ऑफिडेविट्स करून घेतली.

## कोल्हापूरच्या संस्थानी राजवटीला कलंक लावणारे पशुतुल्य पोलीसी अत्याचाराचे प्रकरण

काशीबाई हणबर या बाईचा मुलगा ४२ च्या ‘चले जाव’ चळवळीत भूमिगत झाला होता. संस्थानी पोलीसांना तो हवा होता. ‘ त्याला हजर कर. त्याचा पत्ता दे’ म्हणून या स्त्रीची त्यांनी अक्षम्य अशी विटंबना केली. हे प्रकरण काकांनी तरुण भारतातून क्रमशः प्रसिद्ध करण्यास सुरूवात केली. यामुळे कोल्हापूर संस्थानात आणि संबंध महाराष्ट्रात एकच खळबळ उडाली. मुंबईच्या विविधवृत व इतर अनेक वृतपत्रांनी या बातमीला मोठमोठे मथळे देऊन पोलीसी अत्याचाराची ही करूण कहाणी चौफेर पसरविली. ती इतकी की, सर्वत्र एक चर्चेचा विषय होऊन बसला. या पोलीसी अत्याचाराचे प्रतिध्वनी खुद्द कोल्हापुरांत तरुण मंडळीमध्ये उमटले. संस्थानी इभ्रतीला तो एक धक्काच होता. ‘चलेजाव’ च्या चळवळीपासून संस्थाने ही जवळजवळ अलिप्त होती, ही गोष्ट येथे ध्यानात घेतली पाहिजे. कोल्हापूर संस्थानातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ‘पोलीसांवर ही नसती तोहमत आहे’ अशाप्रकारचा बहाणा केला. पण पुढे तो टिकला नाही. काकांवर संस्थांनी हद्दितील अधिकारी दांत ओठ खाऊ लागले. आणि आपली अब्रू साफ करण्याच्या प्रयत्नास लागले. पण त्यात त्यांना फारसे यश आले नाही. पुढे संस्थांनी प्रजापरिषदेने या प्रकरणाची खास चौकशी करून आपला रिपोर्ट प्रसिद्ध केला. तो काकांनी प्रसिद्ध केलेल्या वृताला दुजोरा देणाराच ठरला. या चौकशी समितीमध्ये दे. भ. श्री. रत्नाप्पा कुंभार व श्री. श्रेष्ठी वकील अशी मंडळी होती. शासकीय पातळीवरून या प्रकरणाचा निकाल करणे सरकारला भाग पडले. पुढे हा खटला चालून या प्रकरणातील मुख्य गुन्हेगार फौजदार इंगवले यांना दोन महिन्याची सजा झाली. आणि अशारीतीने काकांनी केलेल्या कामगिरीत यशाचा तुरा रोवला गेला. या प्रकरणाची साद्यंत हकीकत देणारा तरुण भारतचा खास अंक प्रसिद्ध झाला व त्याच्या हजारो प्रती खपल्या. या प्रकरणाचा विशेष परामर्ष या ग्रंथात अन्यत्र घेतला आहे.

## १५ ऑगस्ट १९४७–तो सोनेरी दिवस

१९४७ साली देशाला स्वातंत्र मिळाले. १५ ऑगस्ट १९४७ हा तो ऐतिहासिक महत्वाचा दिवस. या दिवशी देशात सर्वत्र आनंदाचा नि उत्साहाचा महापूर लोटला. कविजनांच्या मुखातून ‘सांगा जाऊनि हिमालयाला । भारत माझा स्वातंत्र झाला।।’ अशा उत्स्फूर्त पंक्ति बाहेर पडल्या नि आसेतुहिमालचल त्यांचे प्रतिध्वनि निनादू लागले..... हा आनंदसोहळा साजरा करण्याकरिता सकाळी ६.३० लाच बेळगाव शहरात नागरिकांची प्रचंड मिरवणूक निघाली, आणि नंतर कमिशनर कचेरीसमोर ध्वजवंदन झाले.

स्वातंत्र – चळवळीतील हुतात्म्यांचे स्मरण जागते ठेवण्यासाठी बारा गडगड्याच्या विहिरीजवळ स्मारकस्तंभ उभारण्यात येणार होता. त्याचा कोनशिला– सभारंभ दे. भ. गंगाधराव देशपांडे यांच्या हस्ते त्या दिवशी सायंकाळी झाला. गंगाधररावांच्या भाषणाला अलोट गर्दी उसळली होती. अनेक बडी बडी मंडळी व्यासपीठावर हजर होती. स्वातंत्र्योत्सव समितीचे चिटणीस या नात्याने काकाही

तेथे उपस्थित होते. गंगाधररावांच्या भाषणांत भावनेचा पूर होता, तृप्ती होती, समाधान होते. सारे शहर त्या रात्री रोषणाईने झगमगून गेले होते.

## म. गांधींची हत्या!

स्वातंत्र्य–प्राप्तीच्या या आनंदास लवकरच कोणाची तरी दृष्ट लागली. अवघ्या सहा महिन्यातच म्हणजे ता. ३० जानेवारी १९४८ ला त्याच दिवशी एक धक्का देणारी घटना घडून आली. म. गांधींची हत्या झाल्याची ती वार्ता होती. दिल्ली येथे बिर्ला हाऊसच्या मैदानावर महात्माजी सायंप्राथनेस येत असताना त्यांच्यावर गोळया झाडण्यात आल्या, आणि त्यासरशी 'हरे राम' असे उद्‌गार काढून ते खाली कोसळले. अहिंसेचा पुरस्कार करणाऱ्या महामानवाचा देह रक्ताच्या थारोळयात पडला होता. राजकीय मतभेदातून निर्माण झालेल्या वैराला असे हे हत्येचे स्वरूप प्राप्त व्हावे, ही अत्यंत दुर्दवी व अत्यंत तिरस्करणीय घटना होती. केवळ म. गांधी या एका व्यक्तीची ही हत्या नव्हती, तर लोकशाहीवर विश्वास ठेवणाऱ्या एका महान प्रणालीवर केलेला तो हल्ला होता.

महात्माजींवर चालविण्यात आलेल्या या गोळया असंख्य नागरिकांच्या हृदयाला जणू स्पर्शून गेल्या होत्या. गांधींच्या हत्येची वार्ता वाऱ्यासारखी साऱ्या देशभर पसरली. सर्वत्र विस्मय, अविश्वास आणि तीव्र दुःख यांची दाट छाया पसरली. थोड्याच अवधीत मारेकऱ्यांचे नाव जाहीर झाले, आणि सर्वत्र क्षोभाचा वडवानळ उसळला. पुण्याच्या कोणा नथूराम गोडसे नावाच्या ब्राम्हणाने हे भीषण कृत्य केले, हे समजताच महाराष्ट्रात तर एकच हलकल्लोळ माजला. स्वातंत्र संग्रामात मोठ्या मानाने जगलेल्या महाराष्ट्राला हा मोठाच कलंक होता. लोकांचा प्रक्षोभ अधिकच वाढला. आणि बघता बघता त्याने विध्वंसाचे स्वरूप धारण केले. ज्या इसमाने म. गांधींची हत्या केली. त्यांच्या जातबांधवाना नष्ट करण्याच्या ईर्ष्येने उभ्या महाराष्ट्रभर जाळपोळ, लुटालूट याचे सत्र सुरू झाले. कोल्हापूर संस्थानात ब्राम्हण–ब्राम्हणोत्तर वादाची मुळे खोलवर रूजली होती. त्याला या प्रसंगाने चांगलेच खतपाणी मिळाले. आणि त्यातून सर्वत्र लोकक्षोभाने पेट घेतला.

बेळगांवात म. गांधींच्या हत्येची बातमी समजताच एकच हाहाकार उडाला, जिकडे तिकडे विषण्णता पसरली होती, क्षोभ उसळला होता आणि लोक बेभान झाले होते. शहरातील सर्व व्यवहार थंडावले होते. आणि लोक जमावाने या वधाची चिकित्सा करू लागले होते. उसळत्या रक्ताने विवेकाचे बांध फोडले होते. शोक प्रदर्शित करण्याकरिता म. गांधींच्या प्रतिमेची प्रचंड मिरवणूक निघाली. तींत नागरिक, विद्यार्थी, पोलीस, लष्कर अशा सर्वांचा समावेश होता. या मिरवणुकीचे किल्ल्याजवळच्या मैदानात सभेत रूपांतर झाले. सभेमध्ये दे. भ. गंगाधरराव देशपांडे आदि बेळगांवच्या पुढाऱ्यांची भाषणे झाली. त्यांत या हत्येचा कडाडून निषेध करण्यात आला.

## बेळगांव शहरातील प्रतिक्रिया

गांधींच्या हत्येसंबंधीची इतरत्र झालेली प्रतिक्रिया येथेही कमी अधिक प्रमाणात घडून आली. पण सुरवातीलाच तिला पायबंद घालण्याची उपाययोजना केली नसती तर तिने अतिशय उग्र स्वरूप धारण केले असते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि हिंदुमहासभा यांच्या पुरस्कर्त्यांवर हल्ले चढविण्यासाठी लोक जमावाने शहरात फिरू लागले. अशा लोकांची घरे टिपून तेथे दगडफेक, लुटमार, आगी लावणे वगैरे विध्वंसक प्रकार थोड्याफार प्रमाणात सुरू झाले. बेळगांव शहरात

डॉ. साठे, नरगुंदकर, के. सी. पाटणकर वगैरे लोकांची घरे उध्वस्त करण्याचे आणि रा. स्व, संघाच्या कार्यकर्त्यांना झोडपण्याचे प्रकार सुरू झाले. सुक्याबरोबर ओलेही जळते त्याप्रमाणे इतर ब्राम्हणानाही ही दहशत जाणवली. यावेळी काका, श्री. जीवनराव याळगी, श्री राघूअण्णा मंडगी वगैरे गांधीनिष्ठ मंडळी हे प्रकार थांबविण्यासाठी ठिकठिकाणी धावुन गेली. या कामी त्यांना पोलिसांचेही बरेच सहाय्य झाले. पोलीस येताच जमाव पळून जात असे. आणि ते दूर झाले की पून्हा एकत्र येई, असे लपवाछपवीचे प्रकार सुरू झाले. पोलीस तरी किती ठिकाणी पुरणार?

शहापूर ही संस्थानी हद्द असल्याने आणि त्या ठिकाणी रा. स्व. संघाचे मूळ असल्याने तेथे जमावाने उग्र स्वरूप धारण केले होते. त्या संघटनेचे प्रमुख श्री. जिगजिन्नी वकील होते. त्यांच्या कोरेगल्लीतील घरावर हजार दोन हजारांचा लाठीदारी समुदाय धावून गेला, आणि 'जिगजिन्नीना बाहेर काढा' अशा आरोळ्या सुरू झाल्या होत्या. त्या प्रक्षुब्ध जमावाला आवरणे हे मोठे कठीण कर्म होते. तथापि त्या ठिकाणी काका, जीवनराव याळगी, राघूअण्णा मंडगी वगैरे मंडळी धावून गेली व पोलीस पार्टीही येऊन दाखल झाली. पण जमाव आवरेल अशी काही चिन्हे दिसेनात. जिगजिन्नी यांच्यावर लाठीहल्ला होऊन त्यांचे डोके फुटले होते. यापुढे त्यांचा निभाव लागेल असे दिसेना. तेव्हा श्री. जीवनराव याळगी यांनी अधिकाऱ्यांशी सल्लामसलत केली आणि जिगजिन्नी यांना त्यांच्याच सुरक्षिततेसाठी घराच्या मागील दाराने हिंडलगा जेलमध्ये हलविले.

पुढे जसजशी दुपार होऊ लागली तसतसा जमाव वाढू लागला, किरकोळ विध्वंसाचे, लुटालुटीचे प्रकार घडू लागले. शहरातील परिस्थिती आटोक्यात राहील असे पोलीसांना वाटेना. तेव्हा मिलिटरीची मदत घेण्यात आली. अवध्या तासाच्या आत मिलिटरी शहरात आली. चौकाचौकात त्यानी नाकेबंदी केली. तेव्हा जमाव शहराच्या बाहेर निघून गेला. रात्रौच्या वेळी शहरात कर्फ्यू पुकारण्यात आली होती. अशाप्रकारे बेळगांव शहराला जो संभाव्य धोका होता तो टळला.

बेळगांव शहरापुरता हा बंदोबस्त झाला. पण जिल्ह्यातील काही भागात गुंडाना मोकळे रान मिळाले होते. विध्वंसाचे, लुटालुटीचे प्रकार अनेक ठिकाणी घडले. त्यांच्या वार्ता तरुण भारताकडे येऊ लागल्या. सुदैवाने त्यावेळी मालफाटक नावाचे कार्यक्षम असे पोलीस प्रमुख (सुपरिटेंडेंट ऑफ पोलीस) होते. त्यांनी गुंडांच्या म्होरक्यांना पकडून या लुटालुटीच्या व विध्वंसक प्रकारांना बराचसा आळा घातला.

## जाळपोळीचे आणि लुटालुटीचे सत्र

लुटालुटीचे व जाळपोळीचे हे लोण कोल्हापूरच्या संस्थानी हद्दीतून बेळगाव शेजारी असलेल्या निपाणी, चिकोडी, चंदगड या भागात येऊन पोहोचले होते. गावोगावी ब्राम्हणांची घरे लुटणे, घरांना आगी लावणे, लोकांना घरातून बाहेर काढणे असे प्रकार निपाणी, चिकोडी, चंदगड या भागात येऊ लागले. आणि तेथील लोक सहाय्यार्थ बेळगांवकडे धावू लागले.

चोहोकडे पसरलेल्या या लुटालुटीच्या व जाळपोळीच्या प्रकारामागे एखादे पूर्वनियोजित व संघटित असे कारस्थान असावे, याचा प्रत्यय येऊ लागला. रक्तपात न करता लुटालुट व जाळपोळ करून ब्राम्हणाना खेड्यापाड्यातून हाकलून लावण्याचे हे तंत्र या आक्रमकांनी अवलंबिले होते. चंदगड महालात घडलेल्या अत्याचाराच्या कांही प्रकारांचे थोडेसे दिग्दर्शन येथे करता येईल.

## चंदगड महालातील अत्याचाराचे प्रकार

अडकूर, विंझणे, मुगळी या मार्गाने दंगलखोरांची ही टोळधाड गावागावातून निघाली. त्यांच्याबरोबर रॉकेलचे डबे होते. तेथे त्यानी लुटालुट व जाळपोळ केली. अणि येथील ब्राम्हणाना अंगावरील वस्त्रनिशी घराबाहेर काढले. या दंगलखोरांबरोबर लूट नेण्याकरिता गाड्याही असत. टोळ्यांचे पुढारी जाहीररीतीने सांगत की, ''बामणानी गांधीना मारले. तेरा दिवसांत बामणांचा काटा साफ काढून टाका, असा सरकारचा हुकूमच आहे.'' ही आग ताबडतोब तांबुळवाडी, माणंगाव, डुक्करवाडी वगैरे भागात पसरली. चोहोकडे आगीचे डोंब उसळू लागले. जाळपोळीचे हे प्रकार घरे जाळण्यावरच थांबले नाहीत, तर उसाचे मळेही जाळण्यात आले.

गांवोगावी घडत असलेल्या या अत्याचाराच्या वार्ता काकानी आधीच पोलीसांच्या कानावर घातल्या होत्या. त्याप्रमाणे बेळगांवहून फौजदार श्री. कुलकर्णी तांबुळवाडीला येऊन दाखल झाले होते. त्यांच्याबरोबर चंदगडचे महालकरी श्री. हजारे हेही होते. याच पोलीसपार्टी बरोबर बेळगावची कॉंग्रेस स्वयंसेवकांची तुकडीही हजर झाली.

लोकांचा प्रचंड मोर्चा येत आहे असे पाहून फौजदार श्री. कुलकर्णी हे सोयीस्कर ठिकाणी दबा धरून सर्व प्रकार पहात होते. जमाव आस्ते आस्ते पुढे येऊ लागला. तेव्हां फौजदार पुढे आले व त्यांनी खुणेने लोकांना परत जाण्यास सांगितले. पण त्यांना न जुमानता जमाव पुढे पुढेच येऊ लागला. १०० यार्डीवर तो येऊन ठेपला. फौजदारांनी जमांवातील लोकांना कळकळीची विनंती केली. की, 'तुम्ही परत जा' तेव्हा फौजदारानाच त्यांनी सांगितले की, 'तुम्ही येथून निघून जा' तुम्ही तुमचा जीव धोक्यात घालू नका.' आम्ही आमचे पाहून घेतो. यावेळी तिन्ही बाजूंचे उसाचे फड पेटविले.

जमावाच्या हातात लाठ्या–काठ्या व कोयते–कुऱ्हाडी अशी हत्यारे होती. हा जमाव सुमारे पांच हजारांचा तरी असावा. तिन्ही बाजूच्या टेकडया लोकांनी फुलल्या होत्या. जमावांत सुमारे ३०० पेक्षा जास्त स्त्रिया होत्या. त्यांच्या डोक्यावर बुट्ट्या होत्या. शिवाय छकड्या गाड्या, बैल जुंपुन जय्यत तयार ठेवण्यात आल्या होत्या. प्रक्षुब्ध जमाव चाल करून पुढेच येऊ लागला, तेव्हा पोलिसांनी गोळीबारास सुरूवात केली. व काही लोक जखमी होऊन खाली पडले. तेव्हा मात्र जमाव घाबरला. याचवेळी डी. वाय. एस. पी. श्री. भोसले पोलीस पाटंलासह तेथे हजर झाले. आणि अर्ध्या तासास मिलिटरीही तेथे येऊन दाखल झाली. तेव्हा मात्र घबराट निर्माण होऊन लोक चोहोकडे पळू लागले. श्री. भोसले व मिलिटरीच्या लोकानी त्याचा माणगावपर्यंत पाठलाग केला. तो फक्त दहशत बसविण्यापुरताच होता. या गोळीबारात काही लोक जखमी व दोन ठार झाले.

हा प्रसंग अत्यंत गंभीर होता. आणि पोलीसांनी जर वेळीच कृती केली नसती व हा जमाव पांगला गेला नसता, तर त्या एका रात्रीत चंदगड तालुक्यात चंदगड, हेरे, पाटणे शिवाय खानापूर तालुक्यातून कारवारपर्यंत हे जाळपोळीचे लोण जाऊन पोहोचले असते.

## आजरा भागातील निर्वासितांच्या सहाय्यार्थ बेळगांवातील स्वयंसेवकांचे पथक

तांबुळवाडी येथील हा प्रकार संपतो न संपतो तोच आजकडील निर्वासित होऊन भीतीग्रस्त झालेले काही लोक आपली करूण कहाणी सांगण्याकरीता तरुण भारतकडे आले होते. त्यांच्या सहाय्यार्थ जाण्यासाठी काकांनी संघटना उभारली, आणि तरुणांना 'या संकटग्रस्त लोकांच्या विमोचनासाठी चला' असे आवाहन करून आजऱ्यास निघण्याची तयारी केली. या कामी श्री. टी.

पी. दावर हे पारशी गृहस्थ आपली जीप घेऊन जाण्यास तयार झाले. काकांच्या बरोबर राघूअण्णा मंडगी तसेच स्वयंसेवकांचे एक पथक व पोलीसांची तुकडी होती. या सर्वांना तेथे जाण्यासाठी तीन ट्रक्स, तीन मोटारी व एक जीप असा मोठा ताफाच सज्ज झाला. सुमारे फर्लांगभर पसरलेली वाहनांची व स्वयंसेवकांची ही तुकडी आपला जीव धोक्यात घालून आंबोलीमार्गे आजऱ्याच्या रोखाने निघाली. हे दृश्य मोठे आकर्षक होते.

रात्रौ ८ च्या सुमारास ही सर्व मंडळी आजरे गावी जाऊन पोहोचली. लागलीच तेथील कारभारी श्री. कर्णिक व तेथील मिलिटरी प्रमुख श्री. पारसनीस यांची त्यानी गाठ घेतली. ते बंदोबस्तासाठी कोल्हापूरहून येऊन तेथे दाखल झाले होते. बेळगावच्या मंडळींनी आपल्या येण्याचा हेतू त्यांना सांगितला. पुढच्या जीपमध्ये टी. पी. दावर हे होते. त्यांच्या डोक्यावर हॅट होती व ते एकाद्या मिलिटरी अधिकाऱ्यांप्रमाणे दिसत होते. आणि त्यांच्या पाठीमागे पोलीसपार्टी होती. त्यामुळे हे कोणी बडे मिलिटरी अधिकारी असावेत या समजुतीने पारसनीस यांनी त्यांना सलामी दिली. तेव्हा टी. पी. दावरनी सवाल केला की ‘ बंदोबस्त कसा काय आहे?’ पारसनीस उत्तरले–ठीक आहे !’

यावेळी आजरे गावत खुटाखुटावर धुम्या पेटवून लोक पहारा करीत बसले होते. बाहेरच्या जमावाचा हल्ला केव्हा होईल याचा नेम नव्हता. राजाराम रायफलची एक तुकडी मोटार व्हॅनमधून गावातून गस्त घालताना दिसली. इतका बंदोबस्त असताना देखील लोक भयभीत का असावेत याचे बेळगावच्या लोकाना कोडे पडले. चौकशीअंती कळले की, सायंकाळच्या सुमारास दोन हजार लोकांचा एक जमाव तेथून दोन मैलावर खेडे या गावाजवळ आजरे गावावर हल्ला करण्यासाठी जमा झालेला होता. तेव्हा तेथील मिलिटरी अधिकाऱ्यांना सांगून बेळगावच्या या पथकाने तिकडे जाण्याचे ठरविले. रात्रौ ९ च्या सुमारास हे पथक त्या ठिकाणी जाऊन पोहचले. पण तेथे कोणी भेटले नाही. तेव्हा रस्त्यापासून एक मैल आत असलेल्या खेडे या गावी काका व राघूअण्णा मंडगी हे दोघे, स्वयंसेवक पथकासह गेले. खेडयातील लोकांनी त्यांचे स्वागत केले. व तेथे लहानशी सभाही झाली. त्यावेळी काका व मंडगी यांनी ‘गांधीच्या नावावर चाललेले हे अत्याचार यापुढे तरी थांबविण्याच्या कामी आम्हाला सहकार्य द्या’ अशी गावकऱ्यांना विनंती केली. त्या गांवी सुमारे ४० बायकामुले एका अज्ञात स्थळी लपवून ठेवण्यात आली होती. त्यांना या तुकडीच्या स्वाधीन करण्याचे गांवकऱ्यांनी कबूल केले. भयभीत स्थितीत असलेल्या त्या स्त्रियांना व मुलीबाळींना काकानी बरोबर घेतले. आणि ट्रकमध्ये घालून ते त्यांना आजऱ्याला घेऊन आले. ही मंडळी सुमारे ४०–४५ होती.

हा वेळपर्यंत मध्यरात्र लोटली होती. झालेली हकीकत कारभारी श्री. कर्णिक यांच्या कानावर घातली. दरम्यान टी. पी. दावर हे मिलिटरी अधिकारी नाहीत हे श्री. पारसनीस यांना कळून चुकले होते. बेळगांवच्या लोकांनी येथे संस्थानी हद्दीत येऊन येथील स्त्रियांची सोडवणूक करावी याचे वैषभ्य कारभारी कर्णिक यांना वाटले असावे! कारण त्यावेळी त्यांचा नूर एकदम पालटलेला दिसला. ते रागाच्या स्वरात एकदम बोलले ‘कोण कोण आले आहेत! पोलीस स्टेशनवर जाऊन नांवे सांगा. स्त्रिया कोण कोण व कोठून आणल्या आहेत त्यांचीही नांवे लिहून द्या. आम्ही त्यांना सोडणार नाही.

त्यावर काका व दावर म्हणाले, ‘ स्त्रियांची येथे रहाण्याची इच्छा असेल तर त्या येथे रहातील. आमचा त्यांच्यावर जुलुम नाही. आम्हीही येथून आताच जाणार नाही. सकाळपर्यंत रहाणार आहोत. जाताना जे जे आमच्याबरोबर येतील त्यांना मात्र आम्ही घेऊन जाऊं.’

बेळगांवच्या सर्व मंडळीनी रात्रौ देवालयातच मुक्काम केला. तेव्हा अनेक ग्रामस्थ त्याना येऊन

भेटले व त्यांनी गांवोगावी झालेल्या अत्याचाराच्या करुण कहाण्या सांगितला.

## ब्राह्मणाचे एकही घर शिल्लक नाही

आजरे तालुक्यातील ४० खेड्यांपैकी एक आजरे गाव सोडून इतर कोणत्याही खेड्यातील एकाही ब्राह्मणाचे घर शिल्लक राहिले नव्हते. शंभर सव्वाशे तरी घरे जळली असावीत. घरे जाळण्यापूर्वी स्त्रियांनी धान्याची लुटालूट करावयाची व पुरुषानी दागदागिने, रोकड, भांडीकुंडी लांबवावयाची, दस्तऐवज व कागदपत्र मुद्दाम शोधून काढून टाकावयाचे नंतर घराला आग लावावयाची, असा कार्यक्रम असे. शिवाय गवताच्या गंज्या व उसाचे कितीतरी मळे जाळण्यात आले.

## तपास नाही, अटक नाही आणि केलेली लूट बेपत्ता!

या चाळीस खेड्यांतून इतक्या प्रचंड प्रमाणावर लुटालूट व जाळपोळ झाली तरी एकही पोलीस एकाही खेड्यात गेला नाही. आणि लुटीचा माल मिळण्याजोगा असतानाही तो कोठेही जप्त झाला नाही. कोणाला कोठेही अटक नाही व हजारो गुन्हे झाले असतांना त्यांची नोंद नाही. त्यामुळे या सर्व गावातील भयभीत झालेले निर्वासित वाट मिळेल तिकडे जाऊ लागले होते. आजऱ्याच्या लोकांनी सरदार वल्लभभाई, श्री. छत्रपती, लोकमंत्री, रिजनल कमिशनर यांच्यावर पत्रे व तारांचा पाऊस पाडला. तथापि, परिस्थितीत मुळीच बदल झाला नाही. नंतर बेळगावचे हे मुक्तिपथक या सर्व मंडळीना घेऊन नेसरीमार्गे बेळगावला येऊन दाखल झाले.

या विमोचनाच्या कार्याची सर्वत्र ख्याति पसरली आणि आपले कोणीतरी त्राते आहेत, असा चोहोंकडे धीर निर्माण झाला. संस्थानातील ब्राह्मण अल्पसंख्यांकावर झालेल्या अत्याचाराचे असे हे विदारक चित्र आहे.

यावेळी लिहिलेल्या तरुण भारतातील अग्रलेखात असे म्हटले आहे की ‘ही लुटालुटीची व जाळपोळीची अधम निती वापरताना आज जरी काही लोकांना ती बरी वाटत असली, तरी जर का ती एकदा समाजात रूढ झाली, तर ती मर्यादेत राहील असे समजणे चुकीचे आहे. आमच्या देशात ज्या अनेक अल्पसंख्य जातीजमाती आहेत, त्यांच्याविरूद्ध ती उपयोगात आणली जाणार नाही, अशी ग्वाही कोण देऊ शकेल? आपल्याच पुंजीवाल्या भाईबंदांविरूद्ध उद्या ती नीती अवलंबिली जाणार नाही याची तरी काय खात्री? एकदा का समाजाचा धरबंध सुटला की एकंदर समाजव्यवस्थेवरच महान् आपत्ति कोसळेल.’’

यानंतर या दंगलीत होरपळलेले गांवोगावचे लोक सहाय्यार्थ तरुण भारताकडे धाव घेऊ लागले. तरुण भारतात प्रसिद्ध झालेल्या जाळपोळीच्या वार्तानी व त्यावर लिहिलेल्या लेखांनी मुंबई सरकारचे व केंद्र सरकारचे लक्ष या प्रकरणाकडे वेधण्याच्या कामी सहाय्य झाले.

प्रकरण
तिसरे

# गोमंतकाचा मुक्तिसंग्राम

गुलामगिरीत ४०० वर्षे खितपत पडलेल्या गोमंतकीय जनतेच्या अंत:करणात स्वातंत्र्याची ज्योत डॉ. लोहिया यांनी पेटविली. १९४६ साली गोव्यात प्रवेश करण्यापूर्वी त्यांनी बेळगाव येथेच मुक्काम केला होता. (तरुण भारत कार्यालयाशेजारी श्री. शिरगांवकर यांच्या बंगल्यात.) त्यावेळी स्वातंत्र्याच्या आकांक्षेने प्रेरित झालेले गोव्यातील अनेक तरुण कार्यकर्ते त्यांना या ठिकाणी येऊन भेटले. आणि नंतर त्यांनी गोव्यात प्रवेश करून तेथे सत्याग्रह–आंदोलन उभारण्याची योजना आखली. त्याप्रमाणे त्यानी गोमंतकात प्रवेश केला. तेथे त्यांचे अपूर्व स्वागत झाले. त्यानी पोर्तुगीज सरकारला आव्हान दिले. त्यावेळी डॉ. लोहियांना अटक झाली. पण त्यावेळी त्यानी पेटविलेला स्वातंत्र्याचा स्फुलिंग तसाच धगधगत राहिला. आणि तेव्हापासून गोव्यामध्ये अशांतता भडकून अंतर्गत उठाव सुरू झाले.

गोमंतकातील या अंतर्गत उठावाच्या प्रयत्नाला सहाय्य करण्याकरिता बेळगावात आझाद गोमंतक दल आणि गोवा नॅशनल काँग्रेस अशा संघटना अनुक्रमे श्री. विश्वनाथ लवंदे व श्री. पीटर अल्वारिस यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झाल्या. पुढे गोवा नॅशनल काँग्रेसच्या वतीने सौ. सुधाताई जोशी यानी सत्याग्रह पथक घेऊन गोव्यात प्रवेश केला. तेथे त्यांना अटक झाली. आणि त्यांना पणजीच्या तुरुंगात डांबण्यात आले.

पुढे १९४७ साली भारत स्वतंत्र झाला. तरीही भारताचा अविभाज्य भाग असलेला गोमंतक पारतंत्र्यातच खितपत पडल्याचे शल्य भारतीयांच्या मनात सलत होते. पण पं. नेहरू हे त्यावेळच्या परराष्ट्रीय धोरणाला अनुसरून गोव्याच्या प्रश्नात हस्तक्षेप करण्यास तयार नव्हते. तेव्हा सर्व भारतीयांनी उठाव करून सत्याग्रहाच्या मार्गाने गोमंतकाचे विमोचन करावे अशा भावना प्रज्वलित झाल्या. आणि त्याचाच एक भाग म्हणून सेनापती बापट व श्री. ना. ग. गोरे यांच्या नेतृत्वाखाली

गोव्यात प्रवेश करण्यासाठी ६० सत्याग्रहाचे पथक बेळगावात येऊन दाखल झाले. त्या पथकात भारताच्या सर्व राज्यातील सत्याग्रही सामील झाले होते. त्यांचे स्वागत करून त्यांना निरोप देण्याची सभा येथील टिळक चौकात श्री. जीवनराव याळगी यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. (ता.१४ मे.१९५५) खुद्द कै. दे. भ. गंगाधरराव देशपांडे सत्याग्रहींना आर्शिवाद देण्याकरिता या सभेला उपस्थित होते. या सभेत श्री. गोरे म्हणाले, ''ज्या दिवशी गोमंतकाच्या भूमीवर हा सत्याग्रह्यांचा जथा पाऊल टाकील, त्या दिवशी जगाला आम्ही जाहीर करू की, गोमंतकीय आणि भारतीय यांच्या दरम्यान असलेली कृत्रिम सरहद्द आज नष्ट झाली आहे.'' या सभेत सेनापती बापट यांचेही भाषण झाले व कै. गंगाधररावानी त्यांना आशीर्वाद दिला.

## श्री. नानासाहेब गोरे व सेनापती बापट यांचा गोवा हद्दीत प्रवेश

श्री. नानासाहेब गोरे व सेनापती बापट यांच्या नेतृत्वाखाली ६० सत्याग्रहींच्या तुकडीने ता. १८ मे. १९५५ रोजी सकाळी ८ वाजता सावंतवाडी जवळ दोडामार्गाच्या बाजूने गोवा हद्दीत प्रवेश केला. श्री. ना. ग. गोरे हे अग्रस्थानी होते. 'छोडो गोवा' 'गोवा भारत एक है,' 'जयहिंद' अशा घोषणा करीत सत्याग्रही चालले होते. दोन फर्लांगावर पोर्तुगीज सी. आय. डी. पोलीसानी त्यांना गाठले. व हवेत गोळीबाराच्या तीन फैरी झाडून सत्याग्रहीनी गोव्यात प्रवेश केल्याचा इशारा दिला. त्यांच्या वायबारास न डगमगता सत्याग्रहीनी आगेकूच चालू ठेवली.

डिचोलीपासून अलीकडे सुमारे दीड फर्लांगावर ४ पोर्तुगीज अधिकारी व बारा सैनिक यांनी सत्याग्रहींना गाठून त्यांच्याभोवती कडे केले व विचारले की 'तुमच्यापैकी नानासाहेब गोरे कोण? तेव्हा नानासाहेब पुढे आले व म्हणाले, 'myself !'हे ऐकताच पोर्तुगीज अधिकारी त्यांच्या अंगावर धावले. श्री. नानासाहेब त्यांना म्हणाले, `We are unarmed. Why do you....' श्री. नानासाहेबांचे वाक्य पूर्ण होण्याच्या आतच अधिकाऱ्यांनी त्यांच्या पोटावर व छातीवर ठोसे मारण्यास सुरूवात केली. इतक्यात एकाने त्यांच्या मस्तकावर बंदुकीचा दस्ता मारला. या जबर मारामुळे नानासाहेब बेशुद्ध होऊन खाली कोसळले. सेनापती बापट यानाही अशीच मारहाण झाली.

याप्रसंगी पोर्तुगीज सैनिक सत्याग्रहींवर गोळीबाराच्या १२ फैरी झाडल्या त्यांत ४ सत्याग्रही जखमी झाले. नंतर सर्व सत्याग्रहींच्या टोप्या काढून घेऊन ११ वाजता त्यांना डिचोली येथे नेण्यात आले. तेथे पोर्तुगीज पोलीसप्रमुख मॉंतेरो हा आला. त्याच्या हातात वेताची छडी होती. त्याने Who is Gore? असा प्रश्न केला. त्यावर श्री नानासाहेब 'myself' म्हणून पुढे आले. मॉंतेरो खवळला व व त्याने नानासाहेबांना बेशुद्ध होईपर्यंत पुन्हा चोप दिला. यानंतर सर्व सत्याग्रहींचे जबाब घेऊन त्यांना सोडून देण्यात आले.

## सत्याग्रह संग्रामाचे उग्र स्वरूप

येथून पुढे गोवामुक्ति सत्याग्रह संग्रामाने उग्र स्वरूप धारण केले. भारताच्या कानाकोपऱ्यातून सत्याग्रहींचे जथे बेळगावास येऊन थडकू लागले. ता. २८ मे रोजी श्री. शिरूभाऊ लिमये यांच्या नेतृत्वाखाली ७१ सत्याग्रहींच्या पथकाने गोव्यात शिरून सत्याग्रह केला. किसान मजदूर पक्षाचे नेते श्री. आत्माराम पाटील यांच्या नेतृत्वाखाली ता. ४ जून रोजी जंगलमार्गाने तिसऱ्या तुकडीने गोव्यात प्रवेश केला. बेळगाव येथील मुक्कामात सत्याग्रहींच्या जेवणाखाणाची सोय पहाणे, गोव्याहून

येणाऱ्या जखमी सत्याग्रहींना वैद्यकीय सेवा देणे, बेळगाव व सभोवतालच्या भागांत सत्याग्रहींची पथके उभारणे, प्रचारकार्य चालविणे वगैरे विविध उद्देशांनी बेळगाव येथे 'गोवा विमोचन सहाय्य समिती' स्थापन करण्यात आली. या समितीचे अध्यक्ष श्री. चतुरदास शाह हे होते. आणि या समितीमध्ये बॅ. नाथ पै, श्री. बाबुराव ठाकुर, श्री आ. रा. आजगांवकर, श्री अण्णु गुरूजी, श्री. केशवराव कुलकर्णी, दड्डीकर वकील, श्री. भीमराव पोतदार, श्री. जीवनराव याळगी, श्री. ल. स. आजगांवकर, श्री. इराप्पाण्णा उप्पीन, श्री.जी. डी. सराफ, श्री. राम आपटे वकील, डॉ. याळगी, श्री. बाळकृष्ण शिरवईकर, महादेवप्पा कित्तूर, श्रीकांत देसाई वगैरे मंडळी होती.

कम्युनिस्ट नेते श्री. राजाराम पाटील यांच्या नेतृत्वाखाली १२५ सत्याग्रहींच्या चौथ्या तुकडीने ता. ९ रोजी गोव्यात प्रवेश केला त्यानंतर ता. १८ जून रोजी माजाळी मार्गे ४७ सत्याग्रहींच्या पथकाने हिंदूमहासभेचे नेते खासदार वि. घ. देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली गोव्यात प्रवेश केला. ही पाचवी तुकडी होती. त्याच दिवशी म्हणजे ता. १८ रोजी रत्नागिरी येथील वयोवृद्ध नेते श्री. मोडक गुरूजी व मध्यप्रदेशचे श्री. प्रेमनाथ वासनिक यांनी अनमोडमार्गे गोव्यात प्रवेश केला.

श्री जगन्नाथराव जोशी यांच्या नेतृत्वाखाली जनसंघाच्या १०० सत्याग्रहींच्या तुकडीने ता. २४ जून रोजी निरनिराळया तीन मार्गांनी गोव्यात प्रवेश केला. त्यापैकी एका सत्याग्रही पथकातील मथुरेचे श्री. अमीरचंद गुप्ता हे पोर्तुगीज पोलीसांच्या अमानुष मारहाणीमुळे मृत्यू पावले. त्यांचे शव सावंतवाडी मार्गे बेळगाव येथे आणण्यात आले. नंतर गावातील प्रमुख रस्त्यातून शवयात्रा काढण्यात आली. मोटार गाडीवर फळ्या रचून त्यावर अमीरचंद गुप्तांचा पार्थिव देह ठेवण्यात आला होता. शहापूरच्या स्मशानभूमीत शवावर अग्निसंस्कार करण्यात आला.

ता. २५ रोजी इटारसीचे पुरोगामी गटाचे नेते ठाकुर गुलाबसिंग यांनी ५७ सत्याग्रहींसह गोव्यात प्रवेश केला. ता. ९ रोजी उत्तरप्रदेशचे खासदार त्रिदिब चौधरी यांच्या नेतृत्वाखाली ५७ सत्याग्रहींच्या तुकडीने अनमोड मार्गे जंगलातील वाटेने गोव्यात प्रवेश केला.

ता. ३ ऑगस्ट रोजी गोव्यात प्रवेश केलेल्या सत्याग्रहांपैकी बाबू केशव थोरात व पूर्व बंगालमधील नित्यानंद सहाय्य यांना वर्मी गोळया लागून त्यांचे प्राणोत्क्रमण झाले. त्यांचे पार्थिव शरीर देह सावंतवाडीहून ट्रकने बेळगावला आणण्यात आले. त्या दिवशी बेळगाव शहरात स्वयंस्फूर्त कडकडीत हरताळ पडला. टिळकवाडी येथील गणेश चौकात उभय सत्याग्रहींचे पार्थिव देह अंत्यदर्शनार्थ ठेवण्यात आले होते. हजारो लोकानी अश्रुपूर्ण नेत्रानी त्याना श्रद्धांजली वाहिली. नंतर त्यांचा पार्थिव देह बेळगावहून पुण्याकडे रवाना करण्यात आला.

गोवा मुक्तीसाठी झालेल्या या सत्याग्रह आंदोलनांत भाग घेण्याकरीता पंजाब, पठाणकोट, नागपूर, कलकत्ता अशा भारताच्या निरनिराळया भागातून सत्याग्रही आले होते. 'या नि:शस्त्र लोकांवर गोळ्या झाडण्यात आल्या, तर अन्य उपाय योजण्यात येतील' असा इशारा पं. नेहरूनी यावेळी दिला होता. आशिया आफ्रिकेतील दलित जनतेला हा लढा मार्गदर्शक होईल, अशी अपेक्षा परदेशी पत्रप्रतिनिधींनी व्यक्त केली होती. या अत्याचारी सत्याग्रह आंदोलनांकडे जगाचे लक्ष लागून राहिले होते.

## १५ ऑगस्ट १९४७ चा व्यापक सत्याग्रह

१५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्यदिनी गोमंतकात फार मोठ्या प्रमाणांवर सत्याग्रह झाला.

अनेक सत्याग्रही पथकानी वेगवेगळ्या मार्गानी या दिवशी गोव्यात प्रवेश केला. पोर्तुगीज सैनिकांनी त्यांच्यावर ठिकठिकाणी गोळीबार केला. त्यात २८ सत्याग्रही ठार व २०० जखमी झाले. बांदा येथे सत्याग्रहींना निरोप देण्याकरीता श्री. र. के. खाडिलकर, भाई डांगे वगैरे पुढारी आले होते. या दिवशी बांदा सरहद्दीवर पत्रादेवी येथे पोर्तुगीज सैनिकानी गोळ्यांचा पाऊस पाडून अनेक निःशस्त्र सत्याग्रहींना ठार केले. त्यात लुधियानाचे श्री. करणसिंग, उमरखेडचे श्री. शिवप्रताप तसेच श्रीमती सुभद्रादेवी नावाची महिला यांचा समावेश होता. सुभद्रादेवी हिच्या छातीवर गोळी लागून ती खाली कोसळली. व तडफडू लागली. हे पाहताच एक शीख सत्याग्रही बेभान झाला. तो दहाजणानाही आवरेना. सारेच सत्याग्रही जिवावर उदार होऊन पुढे सरसावू लागले. 'गोळ्या खाऊ पण झेंडा रोवू' अशा घोषणा देऊ लागले. सत्याग्रहींचा तो जमाव इतका अनावर झाला होता की त्यांना आवरण्याकरिता भाई डांगे, डॉ. लंकासुंदरम यांना प्रयत्नाची पराकाष्टा करावी लागली.

ता. १४ ऑगस्ट रोजी दुपारी ३०८ सत्याग्रहींची तुकडी तेरेखेलमार्गे गोव्यात शिरली. पोर्तुगीज सैनिकांनी गोळ्यांच्या फैरी झाडल्या. त्यात पनवेलचे हिरवे गुरूजी ठार झाले. या तुकडीत कु. मंदा याळगी, कु. कमल उपासनी, कु. प्रभा साठे व सौ. राव अशा महिला – सत्याग्रही होत्या. त्यांच्यापैकी सौ. राव यांनी आपले तान्हे मूल भारतीय हद्दीतील लोकांकडे दिले व नको नको म्हणत असता त्यांनी सत्याग्रह आंदोलनात उडी घेतली.

दोडामार्गाच्या बाजूने १०१ सत्याग्रहींच्या तुकडीने सांसोली येथे गोव्यात प्रवेश केला. यावेळी पोर्तुगीजानी केलेल्या गोळीबारात ३ सत्याग्रही ठार झाले. ३०४ सत्याग्रहींच्या पथकाने रात्रीच्या वेळी आरोंदा मार्गे गोव्यात पदार्पण केले. यावेळी झालेल्या गोळीबारात गदगचे हणमंतय्या टेंगुर्डे, राजेंद्रगड कणबसय्या व राजस्थानचे पन्नालाल यादव हे वर्मी गोळी लागून ठार झाले.

ता. १५ रोजी सकाळी ८ वा. श्री. हिरालाल जोशी यांच्या नेतृत्वाखाली ३४० सत्याग्रहींच्या तुकडीवर पोर्तुगीज पोलीसांनी लाठीहल्ला करून त्यांना रेटले व हिरालाल जोशी याना अटक केली.

## कॅसलरॉक बोगद्यात अनेकजण ठार

कॅसलरॉकमार्गे गेलेली दुसरी ६० सत्याग्रहींची तुकडी रेल्वेमार्गे गोव्यात शिरली. हे सत्याग्रही १० नंबरच्या बोगद्याजवळ पोहचताच पोर्तुगीज सैनिकांनी बोगद्याच्या वरील बाजूने गोळीबार केला. बरेच सत्याग्रही पटापट खाली पडले. त्यापैकी काहीजणांची प्रेते खास गाडीने बेळगावला आणण्यात आली बाकीची प्रेते पोर्तुगीजनी आणू दिली नाहीत. या सत्याग्रहीपैकी पाचजणांची प्रेते पोर्तुगीज सैनिकांनी बोगद्यात पेट्रोल ओतून जाळून टाकली. करंजोल येथे झालेल्या गोळीबारात काही सत्याग्रही ठार झाले. त्यापैकी दोघांची प्रेते व २० जखमी सत्याग्रही यांना आगगाडीने बेळगावी आणण्यात आले. यावेळी मध्यरात्र असूनही स्टेशनसमोर बरेच लोक जमले होते.

## गोवा–विमोचनात बेळगाव शहराचा वाटा

गोव्यात झालेल्या या सत्याग्रह आंदोलनाच्या बाबतीत बेळगाव शहराने सहाय्याची शिकस्त केली. येणारी प्रत्येक गाडी सत्याग्रहींच्या जथ्यानी भरलेली असे. त्यांची बेळगावात रहाण्याची व्यवस्था मारुतीचे देऊळ, माणिकबाग, पार्वतीदेवी कॉलेज, मंगल इंडस्ट्रीज या ठिकाणी केलेली होती व चहापाण्याची व्यवस्था हॉटेल मालकांनी पाहिली होती.

सत्याग्रहींना गोव्याच्या हद्दीवर पोहचवण्यासाठी १२ ते १७ ऑगस्टपर्यंत ३० ट्रक्सची सोय केली होती. पण ऐनवेळी सत्याग्रहींची ट्रक्समधून वाहतूक करण्यास मुंबईच्या मोरारजी सरकारने बंदी घातली. त्यामुळे मोठाच पेचप्रसंग निर्माण झाला. त्याला निर्धाराने तोंड देण्याची सिद्धता गोवा विमोचन समितीच्या कार्यकर्त्यांनी केली. एक हजार सत्याग्रहींना ताबडतोब येथून हलविणे जरूरीचे होते. आणि एस. टी. ने सत्याग्रहींना पाठविण्याबरोबर दुसरी सोय नव्हती. त्यामुळे प्रवासाच्या खर्चाची तरतूद करण्याची नवीन कामगिरी अंगावर येऊन पडली. लगेच या कामास प्रारंभही झाला. श्री. चतुरदास शहा, श्री. जीवनराव याळगी व काका या तिघानी शहरात फिरून सायंकाळपर्यंत ३ हजार रुपयांचा निधी जमवला. शनिवारी ५०० व रविवारी १००० हजार असे एकूण १॥ हजार सत्याग्रही एस. टी. ने सरहद्दीकडे रवाना झाले. आणि रविवारी पहाटे ५०० सत्याग्रही श्री. फरुकी यांच्या नेतृत्वाखाली कणकुंबीमार्गे गोव्यात प्रवेश करण्यासाठी कूच करत होते. परंतु सत्याग्रहींना नेणाऱ्या एस. टी. गाड्यानाही पुढे बंदी घालण्यात आली. त्यामुळे बेळगावच्या नागरिकांत क्षोभाचे वातावरण निर्माण झाले. व सत्याग्रहींनी पायी जाण्याचा निर्धार  व्यक्त केला.

ता. १५ ऑगस्ट रोजी गोव्यात प्रवेश केलेल्या सत्याग्रहींपैकी बेझवाडा येथील श्री. रामनु, मध्यप्रदेशातील बिलिमोरिया येथील श्री बापुलाल व नागपूरचे श्री. नथू बाजीराव कांबळे हे ठार झाले. त्यांची प्रेते बेळगाव येथे आणण्यात आली. संयुक्त महाराष्ट्र चौकात ३० हजार लोकांनी त्यांचे अंत्यदर्शन घेतले. सुमारे २० हजारांचा समुदाय व्यथित अंतःकरणाने स्मशानभूमीवर उपस्थित होता.

इतके होऊनही सत्याग्रहींच्या तुकड्या बेळगावकडे येतच होत्या. वाहनांचा अभाव होता. ता. १९ रोजी प्रा. मधु दंडवते यांच्या नेतृत्वाखाली १२०० सत्याग्रहींची तुकडी पावसात भिजत, चिखल तुडवीत आंबोलीमार्गे गोव्याकडे रवाना झाली व नेतर्डे मार्गे गोव्यात प्रवेश केला. ८० मैलाचा पायी प्रवास त्यांनी केला. या सत्याग्रहीना पोर्तुगीज सैनिकानी लाठयानी झोडपून काढले. आणि भारतीय हद्दीत जंगलात लोटून दिले....तरीही सत्याग्रह चालूच होता.

## अखेर गोमंतक मुक्त झाला


गोमंतकाच्या विमोचनाकरिता भारतीय नागरिकांचे आपापल्या परीने प्रयत्न सुरूच होते. या प्रयत्नाची निकड भारत सरकारच्या लक्षात आली नव्हती, असे नाही. पण सरकारकडून प्रत्यक्ष क्रांती घडण्याला १९६१ साल उजाडावे लागले. काही ना काही निमित्त करून खुद्द गोव्यामधील आणि गोवा सरहद्दीवरील भारतीय जनतेचा छळ करण्याचे सत्र पोर्तुगीज सत्ताधाऱ्यांनी चालूच ठेवले होते. रोज नवनव्या छळाच्या अस्वस्थ करणाऱ्या बातम्या कानावर येत होत्या. अशाच एका विशेष गंभीर स्वरूपाच्या वार्तेचेनिमित्त करून भारत सरकारने लष्करी कारवाईने गोवा मुक्त करण्याचा निर्णय घेतला. तो घोषित होताच भारतीय जनतेच्या आनंदाला पारावर उरला नाही. गोव्याच्या दिशेने धावणाऱ्या भारतीय जवानांनी खच्चून भरलेल्या गाड्या पाहून बेळगावच्या जनतेला आनंदाचे भरते आले. सतत आठ दिवस बेळगावमार्गे गोव्याकडे जाणारे आमचे शूर भारतीय सैनिक त्यांचा तोफखाना व इतर युद्ध साहित्य याचे रोमहर्षक दृष्य बेळगावच्या जनतेला प्रत्यक्ष पहावयास मिळाले. तो संपूर्ण आठवडा बेळगाव एका वेगळयाच वातावरणाने भारून गेले होते. रणक्षेत्रावर जाणाऱ्या सैनिकांच्या हालचाली कशा असतात याचे दर्शन त्याना जवळून पहावयास मिळाले. भारतीय जवानानी गोवा हद्दीत शिरून हा हा म्हणता पणजी हे राजधानीचे ठिकाण हस्तगत केले.

आणि पोर्तुगीज लष्कराने निर्माण केलेल्या अनेक अडथळयांना ठोकरून संपूर्ण गोवा प्रांत आपल्या ताब्यात घेतला. पोर्तुगीजांच्या अत्याचारी आणि जुलमी राजवटीतून गोमंतक मुक्त झाला. गोमंतक–विमोचनाचे हे पर्व अशा रितीने समाप्त झाले.

गोवा विमोचनाच्या कार्यात लष्करी हालचालींचे मोक्याचे ठिकाण म्हणून बेळगाव शहराला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले होते. १९५५ मध्ये गोवा–विमोचनासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून सत्याग्रहीची जी पथके आली. त्याचा बेळगाव येथेच प्रथम तळ पडत असे. आणि येथूनच ती निरनिराळया मार्गानी गोवा हद्दीत प्रवेश करीत. या हजारो लोकांच्या स्वागताची, त्यांच्या रहाण्याची, जेवणाखाण्याची चहापाण्याची तसेच त्यांना गोवा सरहद्दीकडे रवाना करण्याची ही सर्व कामगिरी गोवा विमोचन समितीने बेळगाव नागरिकांच्या स्वयंस्फूर्त सहकार्याने पार पाडली. या सत्याग्रहीना खाण्याकरीता घराघरातून हजारो भाकऱ्यांचे ढीग गोवा विमोचन समितीकडे येत असत. या कामात महिनाभर काका व त्यांचे सहकारी अष्टौप्रहर व्यग्र होते.

पुढे पाच वर्षानी भारतीय लष्करी सेना याच बेळगाव मार्गे गोव्याकडे रवाना झाली. गोवा–विमोचनाचे हे संस्मरणीय पर्व आणि त्यात बेळगावकरांनी उचललेला वाटा या गोष्टी भावी इतिहासात नमूद कराव्या लागतील.

## राणी पार्वतीदेवी कॉलेज



## कॉलेजचे पहिले आधारस्तंभ



कै. डॉ. गोविंदराव हेरेकर



कै. अण्णासाहेब लठ्ठे
(कायदेमंत्री)

राणी पार्वतीदेवी कॉलेजची मॅनेजिंग कमिटी



## बाबुराव ठाकुरांचे निकटचे सहकारी



कै. शिवराव कोप्पळ



कै. बापूसाहेब देशपांडे




**श्री. चतुरदास शहा**
अध्यक्ष बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समिती

बे. जिल्हा प्रा. शि. समितीच्या कानडी शाळातील शिक्षकांतर्फे सत्कार (मुगुटखान हुबळी)



बेळगाव जिल्हा प्रा. शिक्षण समितीच्या चंदगड येथील मराठी शाळांतील शिक्षकांतर्फे सत्कार





मराठी ट्रेनिंग कॉलेज, बेळगाव (स्नेहसंमेलन १९६६)

## प्रकरण चौथे

# शैक्षणिक कार्य

१९३७ मध्ये त्यावेळच्या मुंबई सरकारचे पहिले मंत्रिमंडळ अधिकारावर आले. त्या मंत्रिमंडळात बेळगावचे कै. अण्णासाहेब लठ्ठे हे अर्थमंत्री होते. पुणे येथे काका अण्णासाहेबांना भेटावयास गेले असता बोलण्याच्या ओघात म्हणाले, 'तुम्ही आता अधिकारावर आला आहात, तेव्हा आंदोलनात भाग घेतलेल्या कार्यकर्त्यांनी आता काय करायचे?'

त्यावेळी अण्णासाहेब म्हणाले, 'आपल्या राष्ट्रांची आज खरी गरज काय असेल तर ती शिक्षणाची– साक्षरताप्रसाराची. खेड्यापाड्यातून अज्ञान– अंध:कार आहे. त्यांना प्रकाश देण्याची' त्यावर काका म्हणाले, 'या मार्गातील अडचण अशी की, कोणीही शाळा सुरु केली, तर जिल्हा स्कूल बोर्डाकडून अशा शाळांना मान्यता मिळून ग्रँट पदरी पडण्यास वर्षाहून अधिक काळ लागतो. अशा परिस्थितीत शिक्षकांनी काय करायचे?'

त्यावर कै. अण्णासाहेब म्हणाले, 'तुम्ही काही काळजी करू नका. खेड्यापाड्यातून कोणीही प्रा. शाळा सुरु केली आणि शाळेत पटावर मुलांची संख्या सरासरीने २० असली, तर त्या शाळेस शिक्षण खात्याने मान्यता देऊन ग्रँट मंजूर करावी, अशी कायद्यात तरतूद करीन. मग तर अडचण उरणार नाही ना?'

### बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समिती

कै. लठ्ठे यांच्या या प्रोत्साहनाने काकांनी ताबडतोब बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समितीची

स्थापना (१९३७) करून कार्यास प्रारंभ केला, आणि या संस्थेचे अध्यक्षपद कै. डॉ. गो. बा. हेरेकर यांना देण्यात आले. तसेच चंदगड तालुक्यातील नांदवडे येथे आणि खानापूर तालुक्यातील गवाळी येथे अशा दोन शाळा काढण्यात आल्या. हा प्रारंभ होतो. अशाप्रकारे वर्षभरात चंदगड, खानापूर, बेळगाव, चिकोडी या तालुक्यातील मराठी भागात सर्वत्र शाळांचे जाळे पसरले. त्यांच्या जोडीस पुढे काकांनी बैलहोंगल व सौंदत्ती या कानडी भागातही शाळा काढल्या.

दुसऱ्या वर्षाच्या अखेरीस मराठी शाळा १२५ व कन्नड शाळा ५२ अशी संख्या झाली. या शाळांवर देखरेख करण्याकरिता एकूण पाच सुपरवायझर्स नेमण्यात आले. सर्वश्री भागाण्णा शिरगांवकर (चंदगड) आर. बी. गुंजीकर व अंद्राज (खानापूर) व गद्दीहळ्ळीशेट्टी (कानडी विभाग) हे ते होत. या शाळांचे काम पहाण्याकरिता व त्यांच्या अडचणी दूर करण्याकरिता काका रात्रंदिवस सारखे दौऱ्यावर असत. जंगलांतून, डोंगरातून पायी फिरून त्यांनी या कार्याला जोराची चालना दिली.

शिक्षण प्रसार म्हटला म्हणजे पैशाचा प्रश्न आलाच. शिक्षण समिती स्थापन केल्यानंतर काकांनी धनिकांकडून व शिक्षणप्रेमी मंडळीकडून पैसे गोळा करण्याचे कार्य आरंभिले. या कामी कै. डॉ. हेरेकर यांनी ते रुग्णशय्येवर अत्यवस्थ असताना ३ हजार रुपये देऊन सिंहाचा वाटा उचलला. अन्य नागरिकांनीही मग लहानमोठ्या देणग्या दिल्या.

केवळ शिक्षण प्रसाराच्या कार्यासाठीच काका झटत असत असे नव्हे, तर त्या त्या गावातील रचनात्मक कार्यालाही ते उत्तेजन देत असत. त्यामुळे त्या ठिकाणी उत्साहाचे व चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते. या कामी त्यांना कै. सदाशिवराव तांबूळवाडकर, कै. रामभाऊ सबनीस, कै. अच्युतराव उर्फ बापूसाहेब देशपांडे, श्री. मंगेशराव नाडगौडा, मंगेशराव देशपांडे तांबूळवाडकर, रामकृष्ण बांदेकर यांचे चंदगड तालुक्यात आणि रावसाहेब वागळे, पित्रे, विश्वनाथराव यार्दी वगैरेंचे खानापूर तालुक्यात बरेच सहाय्य झाले.

खेड्यापाड्यातून अशाप्रकारे रचनात्मक कार्याला अनुकूल वातावरण निर्माण झाल्यामुळे त्यातूनच पुढे १९४०–४१ साली श्रमदानाने चंदगड तालुक्यात सत्तर गावचे रस्ते तयार करण्याचे कार्य यशस्वीरित्या काकांना पार पाडता आले.

खेड्यापाड्यातून शिक्षण प्रसार करण्याचे हे काम काही तसे सोपे नव्हते. 'मुलांना शाळेत पाठविले तर गुरे कोण राखणार? आमचे काम कोण करणार? असे प्रश्न त्यावेळी खेडूत विचारीत. काही ठिकाणी त्यांची समजूत काढणे व काही ठिकाणी सक्ती करणे हेही काकांना करावे लागले.

या शाळांची संख्या जसजशी वाढू लागली व काँग्रेसचा प्रभाव चोहोंकडून पडू लागला तशी येथील शे. का. पक्षाने उचल खाल्ली, आणि बामण–बामणेतर वादाची त्यानी येथेही चुणूक दाखविली. पुढे दोन वर्षांनी बेळगाव जि. शिक्षण समितीच्या धर्तीवर शेतकरी शिक्षण समिती नावाची संस्था त्यांनी स्थापन केली, आणि काकांनी काढलेल्या शिक्षण समितीशी त्यानी अनिष्ट स्पर्धा सुरू केली. स्वतंत्र नव्या शाळा काढण्याच्या उद्योगास लागण्याऐवजी 'या बामणांच्या शाळा कशाला?' असा प्रचार त्यांनी सुरु केला व बे. जि. प्रा. शि. समितीच्या काही शाळा त्यांनी आपल्याकडे काढूनही घेतल्या.

पुढे या प्रकारच्या 'व्हालंटरी' स्कूल्सचे जाळे संबंध मुंबई राज्यभर पसरले आणि ती मुंबई सरकारने केलेली एक गौरवास्पद शैक्षणिक कामगिरी असा तिचा प्रामुख्याने उल्लेख होऊ लागला. या कार्याचा उगम कै. अण्णासाहेब लट्ठे व काका यांच्या शिक्षण प्रसारविषयक विचारविनिमयांतूनच झाला, ही गोष्ट येथे लक्षात ठेवली पाहिजे. पुढे १९४७ साली स्वातंत्र्यप्राप्तीनंतर प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी सरकारने पत्करली. तरीही या शाळा ताब्यात घेण्यास सरकारला पुढे १८ वर्षे लागली. या दीर्घ काळामध्ये बेळगाव जि. प्रा. शि. समितीच्या शेकडो शिक्षकांनी अत्यंत अल्प वेतनावर शिक्षणप्रसाराचे काम खेडोपाडी चालू ठेवले.

१९६६ साली या शाळा सरकारच्या स्वाधीन करण्याचा योग आला. सरकारने ती जबाबदारी पत्करून या शाळा जि. स्कूल बोर्डाच्या स्वाधीन करण्याची योजना संमत केली. आपलेच सरकार असल्यामुळे काकांनी या योजनेला ताबडतोब मान्यता दिली. खासगी शाळा सरकारात जमा होऊ लागल्या व त्या शाळांचे शिक्षक उघडे पडू लागले. त्यावेळी काकांनी आग्रह धरला की, 'शिक्षकांसकट शाळा ताब्यात घ्या. ज्या शिक्षकांनी निष्ठेने व तळमळीने पंधरा पंधरा वर्षे काम केले आहे, त्यांना तुम्ही वाऱ्यावर सोडू शकत नाही.' आणि याबाबतीत काकांनी त्यावेळचे म्हैसूरचे शिक्षणमंत्री श्री. कंठी यांच्याशी बराच विचारविनिमय करून शिक्षकांसकटच तुम्हाला शाळा घ्याव्या लागतील हे पटवून दिले. त्यांनाही ती गोष्ट पटली. काकांनी दाखविलेल्या या निग्रहामुळे बेळगाव, कारवार, धारवाड आणि विजापूर या चार जिल्ह्यातील हजारो शिक्षकांचा फायदा झाला. काकांच्या या कामगिरीबद्दल कानडी व मराठी शिक्षकांनी जाहीरसभा घेऊन त्यांचे अभिनंदन केले.

शाळा सरकारच्या स्वाधीन होत आहेत व पगारात वाढ होत आहे, याचा आनंद तर शिक्षकांना झालाच. पण ज्यांच्यामुळे आपल्याला हे दिवस दिसले, याच्याविषयी कृतज्ञता म्हणून नानावाडी, इटगी, अवरोळी, चंदगड, नंदगड, निपाणी वगैरे ठिकाणी काकांचे सत्कार घडून आले.

## मराठी ट्रेनिंग कॉलेजची स्थापना

शिक्षण प्रसाराचे कार्य चालू झाले. गांवोगावी शिक्षकही नेमले गेले. पण त्यांच्या ट्रेनिंगची सोय पुण्याखेरीज जवळपास अन्यत्र कोठेही नव्हती. ही अडचण कशी दूर करावी असा प्रश्न उपस्थित झाला. तेव्हा त्यावेळचे एज्युकेशनल इन्स्पेक्टर श्री. एस. आर. तावडे व कै. शामराव बिडी (अे. ओ.) यांनी मराठी ट्रेनिंग कॉलेज काढण्याची कल्पना काकांसमोर मांडली. काकांनी ती कल्पना उचलली व त्या दिशेने ते कार्यास लागले. त्यावेळी कॉंग्रेसचे मंत्रिमंडळ अधिकारारुढ नव्हते. ॲडव्हायझर्स गव्हर्न्मेंट होते.काकांनी शिक्षण खात्याचे सल्लागार यांची भेट घेतली. आणि बऱ्याचशा विचारविनिमयानंतर ट्रेनिंग कॉलेज काढण्यास सरकारने परवानगी दिली आणि ती देखील सह शिक्षणाची. त्यावेळी मुंबई राज्यात ही सोय अन्यत्र कोठेही नव्हती.

पुढे ता. १७ जून १९४२ रोजी मराठी ट्रेनिंग कॉलेजच्या उद्‌घाटनाचा समारंभ त्यावेळचे मुंबई राज्याच्या शिक्षण खात्याचे डायरेक्टर एस. एम. मूस यांच्या हस्ते घडून आला. यावेळी कै. अण्णासाहेब लट्ठे, डिस्ट्रिक्ट सेशन्सन जज्ज के. पु. मं. लाड, कै. रँग्लर कट्टी व श्री. एस. आर. तावडे ही मंडळी उपस्थित होती. शिक्षक– शिक्षिका एकत्र शिक्षण घेत असलेले त्यावेळच्या मुंबई राज्यातील हे एकमेव कॉलेज होय. प्रारंभी सह शिक्षणाच्या या योजनेला सरकारचा विरोध होता. पण काकांच्या प्रयत्नाला यश येऊन या योजनेला सरकारने संमती दिली. त्यामुळे शेकडो विद्यार्थिनी–शिक्षकांची येथे सोय झाली.

गेल्या तीस वर्षात या कॉलेजमधून सुमारे ४००० विद्यार्थी –विद्यार्थिनी प्रशिक्षित होऊन बाहेर पडल्या. हे विद्यार्थी आज महाराष्ट्र, म्हैसूर व गोवा या राज्यात प्राथमिक शिक्षक म्हणून काम करीत आहेत. महाराष्ट्रातील सोलापूर, कोल्हापूर, सांगली, सातारा व रत्नागिरी या जिल्ह्यातील अनेक प्रा. शाळांत याच संस्थेने प्रशिक्षित केलेले शिक्षक आज शिक्षणदानाचे कार्य करीत आहेत.

१९४२ ते १९४६ पर्यंतच्या काळात कै. एम. ए. बिडीकर (बी.ए.) यांनी या कॉलेजचे प्राचार्य या नात्याने विनावेतन काम केले. याचवेळी कै. प्रो. काशिनाथपंत केळकर यांनीही संस्थेमध्ये विनावेतन काम केले. पुढे १९५३ पासून १९७२ पर्यंत मराठीतील प्रतिथयश कवयित्री व ख्यातनाम अध्यापिका श्रीमती इंदिराबाई संत (बी.ए. बी. टी., डी. बी. एड.) यांनी प्राचार्यपदाची जबाबदारी समर्थपणे पेलली.

या मराठी ट्रेनिंग कॉलेजने शिक्षणक्षेत्रात मोलाची कामगिरी केली आहे. या संस्थेला आतापर्यंत अनेक थोरामोठ्यानी भेटी देऊन संस्थेने चालविलेल्या शिक्षणकार्याची प्रशंसा केली आहे.

डॉ. हेरेकर यांच्या निधनानंतर श्री. चतुरदास शहा हे संस्थेचे अध्यक्ष झाले. त्यांनी जेव्हा जेव्हा जरुर पडेल तेव्हा संस्थेला हरप्रकारे सहाय्य केले आहे.

## राणी पार्वतीदेवी कॉलेज

बेळगाव हे मराठी भाषिकांचे प्रमुख केंद्र असूनही या ठिकाणी १९४८ पर्यंत लिंगायत एज्युकेशन सोसायटीने (अलीकडे लिबरल) चालविलेले लिंगराज कॉलेज हे एकच महाविद्यालय होते. आणखीही कॉलेजांची आवश्यकता येथे जाणवत होती. याच वेळेला सावंतवाडी येथे साऊथ कोकण एज्युकेशन सोसायटीच्या विद्यमाने १९४६ पासून चालू असलेले राणी पार्वतीदेवी कॉलेज हे हिवतापाने उडविलेल्या कहरामुळे बंद पडण्याच्या अवस्थेत होते. याच सुमारास कॉलेजचे प्रो. कै. आर. एस. रेगे बेळगाव येथे आले व त्यांनी 'सावंतवाडीचे कॉलेज बंद होणार आहे. आपल्याला कॉलेज पाहिजे आहे का?' असा डॉ. हेरेकर यांच्याकडे प्रश्न केला. लागलीच डॉक्टरांनी काकांना बोलावून घेतले आणि 'बेळगावला कॉलेज चालवायचे आहे का?' असा प्रश्न केला. त्यावर कां नको? त्याची अत्यंत जरुरी आहे' असे काका म्हणाले. आणि दोन दिवसांच्या आंत काकांनी शहरातील प्रमुख नागरिकांच्या भेटीगाठी घेऊन त्यांना एकत्र आणण्यासाठी योजना आखली कै. अण्णासाहेब लठ्ठे त्यावेळी बेळगावी होते. त्यांचाही काकांनी याबाबतीत सल्ला घेतला आणि त्यांच्याच निवासस्थानी बेळगावच्या नागरिकांची पहिली सभा झाली.

या सभेला कै. अण्णासाहेब लठ्ठे, कै. डॉ. हेरेकर, प्रिं. वि. द. घाटे (बी. टी. कॉलेज), कै. काशिनाथपंत देशपांडे, कै. शंकरराव कलघटगी, कै. रामकृष्णपंत जोशी, पै. आपासाहेब धारवाडकर, हाशमसाहेब जमादार, पै. हैदरसाहेब धारवाडकर, डॉ. के. वा. साठे, श्री. चतुरदास शहा, श्री. रामभाऊ मुरकुंबी, देवजी भिमजी, खिमजी भाई (मुसा), कै. ताराचंद्र पालामल, श्री. ल.स. आजगावकर, डॉ. वाय. के. प्रभू, श्री. वसंतराव हेरवाडकर, कै. बॅ. पी. डी. तिळवे, श्री. सुंदरलाल शेठजी, नारायण नागेश नाईक, कै. पु. आ. तेंडोलकर, श्री. जी. व्ही. सराफ, श्री. बाबुराव ठाकुर वगैरे नागरिक उपस्थित होते.

या सभेत सुमारे दीड दोन तास चर्चा होऊन बेळगाव येथे कॉलेज चालू करण्याचा संकल्प करण्यात आला. पण मुख्य काम होते ते निधी गोळा करावयाचे. या कामी कै. डॉ. हेरेकर व

काका यानी पुढाकार घेतला व शहरातून अवघ्या दोन तीन महिन्याच्या अवधीत अडीच लाख रुपयांवर निधी गोळा केला. पण पैशापेक्षाही जागेचा प्रश्न महत्त्वाचा होता. याचवेळी संस्थाने विलीन झाली होती. आणि कुरुंदवाडच्या संस्थानी हद्दीत अनगोळच्या माळावर त्यावेळी जमखंडीकरांचा प्रशस्त वाडा व विस्तीर्ण जागा असल्याचे नजरेस आले. लागलीच डॉ. हेरेकर, श्री. चतुरदास शहा, काका, श्री. ल. स. आजगावकर अशी मंडळी जमखंडीला गेली, तेथे त्यांनी राजेसाहेबांची गाठ घेतली आणि जागेचा सौदा केला. ९९९ वर्षाच्या दीर्घ मुदतीच्या कराराने जमखंडीकरांनी आपला वाडा व जागा दरमहा ११०० रु. भाड्याने देण्याचे मान्य केले. कर्नाटक लॉ सोसायटीनेही याच जागेकरता चुरस केली होती. म्हणून डॉ. हेरेकर आदी मंडळींनी पैशाची घासाघीस करण्यात वेळ घालवला नाही.

पुढे १९४८ साली सावंतवाडीहून कॉलेजचे स्थलांतर बेळगाव येथे झाले. त्यावेळचे मुंबई युनिव्हर्सिटीचे कमिशन कॉलेजच्या तपासणीकरिता यावयाचे होते. त्यापूर्वी इमारती तयार पाहिजे होत्या. म्हणून घाईघाईने अवघ्या तीन महिन्यांच्या आत सायन्स लॅबोरेटरी व वसतीगृहाच्या इमारती बांधून तयार करण्यात आल्या. हा कामाचा वेग इतका झपाट्याचा होता की, जवळजवळ वर्षभर डॉ. हेरेकर त्यासाठी अक्षरश: राबले. त्यांनी अविश्रांत परिश्रम घेतले. एवढेच नव्हे तर, त्यांनी प्रारंभी मान्य केलेली पंधरा हजारांचीच नव्हे तर चाळीस हजारांची स्वत:ची देणगी देऊन संस्थेला कायमचे उपकृत करून ठेवले.

## डॉ. हेरेकर यांचे निधन

डॉ. हेरेकर हे कॉलेज कमिटीचे पहिले चेअरमन होते. पण दुर्दैवाने कॉलेजचे शैक्षणिक वर्ष पुरे होण्यापूर्वीच, १९४९ च्या जानेवारीच्या २७ तारखेस हृदयविकाराचा झटका येऊन त्यांचे आकस्मिक निधन घडून आले. हा मोठाच आघात, केवळ कॉलेजलाच नव्हे तर बेळगाव शहराला जाणवला. डॉक्टरांनी आपल्या दातृत्वाने अनेक शैक्षणिक संस्थांना उपकृत करून ठेवले होते. त्यामुळे त्यांच्या निधनाने सारे बेळगाव शहर हळहळले. त्यांची प्रचंड शवयात्रा निघाली. हजारो लोक तींत सामील झाले. डॉक्टरांच्या शवाला कॉलेजच्या आवारात अग्नि देण्यात आला. त्याकरिता सरकारने खास परवानगी दिली होती.

त्यानंतर कै. अण्णासाहेब लट्ठे हे कॉलेज कमिटीचे चेअरमन झाले. ते मोठे धीराचे गृहस्थ होते. त्यांनी शैक्षणिक कार्यास बरेच लक्ष घातले होते. पण दुर्दैवाने तेही १९५० साली निर्वतले. त्यानंतर मात्र कॉलेजच्या स्थैर्याची व विकासाची सारी जबाबदारी प्रामुख्याने काका व त्यांचे सहकारी श्री. वसंतराव हेरवाडकर, डॉ. वाय. के. प्रभू, श्री. एन. व्ही. नाडकर्णी आदी मंडळींवर येऊन पडली.

वरील दोन जबरदस्त व्यक्तींच्या हानीमुळे कॉलेजला आर्थिक परिस्थितीला तोंड देणे मोठे कठीण झाले होते. विद्यार्थ्यांची संख्या तर अगदीच मर्यादित होती. पण अनेकांच्या आपुलकीच्या आधारावर आणि वेळोवेळी त्यांनी दिलेल्या सहाय्यावर आज हे कॉलेज दिमाखाने व प्रतिष्ठेने उभे आहे.

१९६६ साली विद्यार्थ्यांची संख्या हजारावर गेल्याने पार्वतीदेवी कॉलेज व सक्सेरिया सायन्स कॉलेज अशी दोन कॉलेज नियमाप्रमाणे करणे भाग पडले. आज या दोन्ही कॉलेजातील विद्यार्थ्यांची संख्या अडीच हजारांवर आहे. आज कॉलेजपाशी असलेली कॉलेजच्या मालकीची ५० एकर जागा व त्यावर उभ्या राहिलेल्या भव्य इमारती, विस्तृत क्रीडांगण वगैरे लक्षात घेता, स्थूलमानाने यात

२० लाखांचे भांडवल गुंतलेले आहे.

१९४८ साली कॉलेज येथे सुरु झाले. त्या कामी लोकांचे सहकार्य मिळाले हे खरे. परंतु अत्यंत खडतर प्रसंगाशी कॉलेजच्या चालकांना मुकबला करणे भाग पडले. मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेले हे कॉलेज तसेच रहावे, ही चालकांची भूमिका असूनही आणि त्यासंबंधात मुंबई प्रांतात प्रचंड आंदोलन होऊनही तसेच सर्व इंग्रजी मराठी वृत्तपत्रानी त्याचा पाठपुरावा करूनही कायद्याने हे कॉलेज कर्नाटक विद्यापीठालाच जोडण्यात आले. प्रस्तुत कॉलेज हे गेली २५ वर्षे सीमाभागातील जनतेचे शैक्षणिक व सांस्कृतिक विकासाचे एक महत्त्वाचे केंद्र बनून राहिले आहे.

शिवाय ठळकवाडी हायस्कूल आणि स्वाध्याय विद्यामंदिर या दोन शिक्षणसंस्था साऊथ कोकण एज्युकेशन सोसायटीकडे त्या त्या संस्थांच्या चालकांनी सुपूर्त केल्या आहेत.

प्रकरण पाचवे

# अन्यायाला फुटते वाचा....

## पांगिरे प्रकरण :काशीबाईची करुण किंकाळी

१९४४ च्या २३ ऑक्टोबरची रात्र. सारे बेळगाव शहर हळूहळू झोपेच्या आधीन होऊ लागले होते. मधूनच एखाद्या कुत्र्याचे केंकाटणे या शांततेला तडा पाडीत होते. उभ्या गल्लीत तरुण भारताचे कार्यालय तेवढेच जागे होते. दुसऱ्या दिवशीच्या तरुण भारताच्या अंकाचे काम जवळ जवळ पूर्ण होत आले होते. सारी आवराआवर करून काका प्रेसमधून बाहेर पडण्याच्या बेतात होते. इतक्यात दोघा अज्ञात इसमानी लगबगीने छापखान्यात प्रवेश केला. त्यांच्या भयभीत मुद्रांवरून त्यांना काहीतरी सांगण्याची आतुरता स्पष्ट दिसत होती. डोक्यावरची पांढरी टोपी आणि खादीचे वेष यावरून ते काँग्रेसचे कार्यकर्ते दिसत होते. क्षणभराची उसंत न घेता त्यांच्यापैकी एकाने चिकोडी तालुक्यातील आम्ही कार्यकर्ते आहोत. माझे नाव सिदगौडा पाटील असून हे माझे मित्र अण्णासाहेब बेडगे अशी ओळख करून दिली आणि लागलीच आपल्या भागात घडलेली एक भयंकर गोष्ट सांगण्यास सुरुवात केली. सत्य हे कधीकधी कल्पितापेक्षाही अदभुत, भीषण असू शकते याचा प्रत्यय त्यांच्या हकीकतीवरून काकांना आल्यावाचून राहिला नाही.

ब्रिटिश राजवटीत पोलिसी अत्याचाराच्या घटना थोड्याथोड्या घडल्या नाहीत. कोणत्या ना कोणत्या कारणाने गरीब आणि निरपराध लोकांचा अनेक वेळा छळ झालेला आहे. पण त्या सर्वांवर ताण करणाऱ्या एका अमानुष घटनेची हकीकत उपरोक्त तरुण कार्यकर्त्यांच्या मुखातून बाहेर पडू लागली.

कोल्हापूर संस्थानच्या गडहिंग्लज भागातील पांगिरे या गावी ऑक्टोबरच्या १९ तारखेला घडलेला हा प्रसंग! स्वातंत्र्य चळवळीत भाग घेऊन भूमिगत झालेल्या मल्लप्पा अप्पाजी हणबर

नावाच्या तरुणाचा शोध घेण्यासाठी गडहिंग्लजचे फौजदार इंगवले हे तेथे आले होते. पांगिरे जवळच चिखलव्हाळ या गावी त्यानी आपला तळ ठोकला आणि ताबडतोब पांगिऱ्याचे प्रतिष्ठित ग्रामस्थ नरसगौडा पाटील त्यांचे दोन चिरंजीव बापूसाहेब व अप्पासाहेब आणि ज्याच्या शोधार्थ ते आले होते त्या मल्लप्पाची आई काशीबाई हणबर यांना त्यांनी चिखलव्हाळच्या चावडीवर बोलावून घेतले. सभ्यता आणि शिष्टाचार याना बाजूला ठेवून श्री. इंगवले यांनी आपल्या फौजदारी थाटात नरसगौडा पाटील यांना दरडावण्यास सुरुवात केली की, ‘मल्लाप्पा नावाच्या फरारी इसमास तुम्ही आश्रय देता की नाही बोला!’ असा प्रश्न करून आणि उत्तरांची वाट न पहाताच फौजदारानी नरसगौडा पाटील व त्यांच्या दोन्ही मुलांना बेदम मारण्यास सुरुवात केली. त्यांच्या अंगावरील खादीचे कपडे पाहून तर फौजदाराचे पित्त अधिकच खवळले. ‘अंगात खादी शर्ट घालतोस काय!’ असे म्हणून त्याने पाटलांचा शर्ट टर्रकन फाडला नि त्यांचा हात जोराने पिरगाळला.

... त्या रात्री तरुण भारत कार्यालयात आलेले ते कार्यकर्ते ही हकीकत सांगत असताना घामाघूम झाले होते. बोलता बोलता मध्येच थांबून ते म्हणाले, ‘बाबूराव!  नरसगौडा पाटलांना आणि त्यांच्या मुलांना या फौजदाराने मारले याचे आम्हाला काही वाटत नाही. कारण प्रत्येक गावागावातील कार्यकर्त्यांवर हे पोलीस असेच टपून बसलेले असतात. पण त्या इंगवले फौजदाराने गरीब काशीबाईवर हात टाकला. एवढेच नव्हे तर, कानांनी ऐकवणार नाहीत, अशा गलिच्छ शिव्या देऊन त्या नराधमाने तिच्या अब्रूलाच हात घातला. आणि आपणाला हवी असलेली जबानी कबूल करून घेण्यासाठी तिला अक्षरश: विवस्त्र करून ओल्या चामड्याने फोडून काढले. तिने केलेल्या विनवण्यांची आणि फोडलेल्या किंकाळ्यांची पर्वा न करता हा नरपशू तिची चामडी लोंबवू लागला–’

ही भयंकर घटना ऐकत असताना काकांचा संताप अनावर होत होता. ब्रिटिश राजवटीत घमेंडखोर बनलेल्या पोलीस अधिकाऱ्यांची ही अत्याचारी कृत्ये पाहून त्यांच्या अंगाचा तिळपापड झाला. पण यावेळी केवळ संतापून काही होणारे नव्हते. घडलेल्या घटनेची खडा न् खडा बातमी काढून, वृत्तपत्राद्वारे ती चव्हाट्यावर मांडून अन्यायाला वाचा फोडणे आवश्यक होते. काकांनी त्या दोघा कार्यकर्त्यांना विचारले, ‘अद्याप कोणत्याच वर्तमानपत्राने ही बातमी दिलेली नाही? कोणाचेच या घटनेकडे लक्ष गेलेले नाही?’ यावर सिदगौडा पाटील म्हणाले, ‘नाही, अद्याप तरी कोणी याची दाद घेतली नाही. सारे सत्तेचे दास आहेत. आपला जीव धोक्यात घालून याची चौकशी करण्यास कोणी पुढे येईल असे वाटत नाही. म्हणून आम्ही तुमच्याकडे आलो.’

काकांचे मन विषण्ण झाले. कोल्हापूर संस्थानातील एकाही वृत्तपत्राने या घटनेची दखल घेऊ नये याचा त्यांना आश्चर्य वाटले. त्यांनी लागलीच कळलेला सारा वृत्तांत लिहावयास घेतला आणि दुसऱ्याच दिवशीच्या म्हणजे ता. २४ ऑक्टोबर १९४४ च्या अंकात पहिल्याच पानावर ‘राणीच्या राज्यात स्त्रीच्या अब्रूचे धिंडवडे! एका अबलेची करुण कहाणी!’ या मथळ्याखाली तो सारा वृत्तांत प्रसिद्ध केला. आणि साऱ्या वृत्तपत्रानी व अखिल भारतीय महिला परिषदेसारख्या संघटनानी हा अत्याचार वेशीवर टांगून त्याची दाद लावून घ्यावी, असे सुचविले. पण पुढे कित्येक दिवसपर्यंत महाराष्ट्रातील कोणत्याही वृत्तपत्राने या अमानुष अत्याचाराला प्रसिद्धी दिली नाही किंवा त्यासंबंधीची छोटीशी बातमीही छापली नाही. मग संपादकीय टीका तर लांबच!

## ए. एस. पी. राजे यांचे अरेरावीचे वर्तन

पण काकांनी याबाबतीत जातीने लक्ष घालण्याचे ठरविले. मुद्दाम आपल्या बातमीदारांना

घटनास्थळी पाठवून सर्व माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. तोपर्यंत त्या अबलेने कोल्हापूर येथील पोलीस प्रमुख मि. साद्री यांच्याकडे फिर्याद गुदरल्याचे समजले. तिथे या अधिकाऱ्यानी या बाईला 'अल्बर्ट एवडवर्ड' या हॉस्पिटलमध्ये पोहोचविले. पण तिथे तीन दिवस राहूनही कोणत्याही प्रकारची वैद्यकीय मदत तिला मिळाली नाही. उलट 'तुला काहीही होत नाही. तू निघून जा' असे सांगून अंगावरून रक्तस्राव होत असलेल्या अवस्थेत तिला जणू हाकलूनच देण्यात आले. पुढे दोन तीन दिवस, तिने गुदरलेल्या फिर्यादी संबंधात तिला कोल्हापूर येथील पोलीस कचेरीत खेपा घालाव्या लागल्या. बेदम मारहाणीने जखमी झालेले शरीर घेऊन तिला तेथे तब्बल तीन दिवस रखडावे लागले. पुढे ऑक्टोबरच्या ३१ तारखेला तिला निपाणी येथे आणण्यात आले. योगायोगाने त्याच दिवशी काका काही कामानिमित्त निपाणीस गेले होते. काशीबाई हणबर हिला पोलीस कचेरीला आणले असल्याचे समजताच, तिला भेटण्यासाठी काका पोलीस स्टेशनकडे गेले. तेथे प्रस्तुत प्रकरणाची चौकशी करण्यासाठी कोल्हापूरचे ए. एस. पी. श्री राजे हे आले आहेत असे समजले. निपाणीतील काही प्रतिष्ठित नागरिकांच्याबरोबर श्री. राजे यांची भेट घेण्यासाठी काका डाकबंगल्यावर गेले, आणि शिष्टाचाराप्रमाणे व्हिजिटिंग कार्ड पाठवून त्यानी भेट मागितली. पण भेट घेण्यास सवड नाही, असे श्री. राजे यांच्याकडून उत्तर आले. यावेळी डाकबंगल्याच्या मागील बाजूस नरसगौडा पाटील, त्यांचे मुलगे व काशीबाई ही सर्व मंडळी बसलेली दिसली. म्हणून काका त्यांची विचारपूस करण्यासाठी व आणखी काही माहिती मिळाल्यास पहावी म्हणून त्यांच्याकडे गेले. पण तेथील पोलिसांनी काकांना त्यांच्याशी बोलण्याची मनाई केली. पोलिसांच्या करड्या भाषेवरून व तेथील एकंदर रागरंगावरून काशीबाई व पाटील मंडळींना अगदी धाकात ठेवल्याचे स्पष्ट दिसत होते.

थोड्या वेळात ए. एस. पी. श्री. राजे यांची काकांनी गाठ घेतली. पण त्यांच्या उद्धटपणाच्या उत्तरावरून आणि एकूण अरेरावी वर्तनावरून कोणतीही माहिती न मिळतां ही भेट दोन मिनिटातच संपली. एका अबलेवर झालेल्या अत्याचाराची चौकशी करण्यासाठी नेमलेला हा अधिकारी चौकशी ती काय करणार आणि ती कितपत खरी होणार हे काकांना तत्क्षणीच कळून चुकले.

श्री. राजे यांनी चालविलेल्या चौकशीतून आपणाला न्याय मिळत नाही असे पहाताच काशीबाई हिने ता. ९–११–४४ रोजी कोल्हापूर संस्थानचे पंतप्रधान मि. मिचेल यांच्याकडे तक्रार अर्ज केला आणि आपल्यावर झालेल्या अत्याचाराची स्वतंत्र चौकशी व्हावी व चौकशी पुरी होईपर्यंत इंगवले वगैरे पोलीस अंमलदारांना सस्पेंड ठेवावे, अशी मागणी केली. पण ना. मिचेलसाहेबांनी अशा प्रकारचा अर्ज आपल्याला पोहोचलाच नाही, असे कोल्हापूर पत्रकारांच्या सभेत दडपून सांगितले. एवढेच नव्हे तर, 'प्रत्यक्ष घडलेली घटना साधी असताना बेळगावच्या तरुण भारतासारखी पत्रे बेजबाबदारपणे भरमसाट व अतिशयोक्तीपूर्ण वार्ता प्रसिद्ध करीत आहेत' अशी आग पाखडण्यासही कमी केले नाही.

पण काकांनी मिचेलसाहेबांच्या आरोपाची पर्वा न करता आपले काम तसेच पुढे चालू ठेवले. काशीबाई प्रकरणाची इत्यंभूत हकीकत साऱ्या जनतेला कळल्याशिवाय तिच्या मदतीला कोणीच धावून येणार नाही. केवळ सरकार दरबारी कागदपत्रातून जनतेपुढे खरे सत्य बाहेर येणार नाही, हे जाणून प्रस्तुत पांगिरे प्रकरणाचा समग्र वृत्तांत कथन करणारा तरुण भारताचा 'पांगिरे प्रकरण विशेषांक' काकांनी ता. १०–४–४५ रोजी प्रसिद्ध केला. त्यामधून त्यांनी या प्रकरणाची तपशीलवार माहिती, निरनिराळ्या व्यक्तींच्या जबान्या, विविध छायाचित्रे आणि हे प्रकरण उघडकीस आणण्यासाठी केलेले प्रयत्न ही सारी माहिती संगतवार दिली.

## काशीबाईने सांगितलेली हृदयद्रावक कहाणी

प्रस्तुत प्रकरणाच्या न्यायालयीन चौकशीची मागणी केल्यानंतर या संबंधात जरुर ते कागदपत्र गोळा करणे आवश्यक होते. त्यासाठी काकांनी सौ. काशीबाई हणबर व तिचा नवरा अप्पाजीराव हणबर यांनी बेळगाव येथील फर्स्टक्लास रेसिडेंट मॅजिस्ट्रेट श्री. नाडगौडा यांच्यासमोर नेऊन शपथेवर त्यांच्या जबान्या घेतल्या व आवश्यक ते प्रतिज्ञापत्रक (ॲफिडेविट्) तयार केले. त्यावेळी स्वत: काशीबाईने सांगितलेली ती विलक्षण हृदयद्रावक कहाणी ऐकून साऱ्यांच्याच डोळ्यांतून पाणी आले आणि प्रत्येकाचे अंत:करण संतापाने भरून गेले. स्वत: काशीबाईला सांगता सांगता क्रोध आवरत नव्हता. दु:खावेगाने कंठ फुटत नव्हता. तरीही घडलेली सारी हकीकत तिने मॅजिस्ट्रेटच्या समोर जशीच्या तशी सांगितली.

... त्या दिवशी सकाळी इंगवले फौजदाराकडून तिला बोलावणे कसे आले व त्याने तिला कोणते प्रश्न विचारले ते ती सांगू लागली–

फौजदाराने पहिलाच प्रश्न तिला केला, 'तू मल्लूची बायको की आई?'

'मी बायको कशी होईन? आई आहे त्याची!' काशीबाई म्हणाली.

'मल्लू कुठे आहे सांग' फौजदार

'मला माहीत नाही'काशीबाई

पण या शांत आणि प्रामाणिक उत्तराने फौजदाराचे पित्त खवळले. तोंडाने अचकट विचकट शिव्या देत तो तिच्या अंगावर चवताळून धावला. तिची मानगूट धरून त्याने तिला वाकविले आणि तिच्या पाठीत लाथा बुक्क्या मारण्यास सुरुवात केली. पण एवढ्याने त्याचे समाधान झाले नाही. त्याने पोलिसांना फर्मावले. 'पहाता काय! ओढा रांडेला वरती आणि फेडा तिचे लुगडे!' त्या हुकुमासरशी दोघां पोलिसांनी तिला जोत्यावर ओढून नेले व तिची व तिच्या नवऱ्याची विनवणी न ऐकता चार चौघांच्या देखत त्या सैतानाचे दूत तिचे वस्त्र फेडू लागले. त्या असहाय्य स्त्रीने आपली अब्रू झांकण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण तिची सारी धडपड व्यर्थ गेली! 'मी तुमच्या पाया पडते, माझी अब्रू घेऊ नका! माझ्याकडून काय जबाब पाहिजे तो मी देते.' असे तिने काकुळतीला येऊन सांगितले. पण फौजदाराने तिच्या विनवणीकडे दुर्लक्ष करून शिव्या हासडत तिला विवस्त्र स्थितीतच जोत्यावरून खाली ओढले. आणि तिच्या उघड्या देहावर चामडी पट्टीने मारण्यास सुरुवात केली. थोडा वेळ थांबून थांबून एकाच दिवसात तीन तीनदां हा प्रकार घडला. अधूनमधून फौजदाराचा मोर्चा काशीबाईच्या नवऱ्याकडे आणि नरसगौडा पाटील यांच्याकडे वळत होता. ओंगळ शिव्या, अंगाशी लाट्टालट्टी, कपड्यांची फाडाफाड या प्रकारापासून तो चवताळून अंगावर धावून जाऊन बुटांच्या लाथा घालणे व उघडे शरीर चामडी पट्ट्याने फोडून काढणे असे प्रकार सर्रास सुरु होते. एकट्याला मारून मारून तो किंचाळत, विव्हळत खाली पडला, की ते दुसऱ्याकडे वळत व त्याचीही तीच गत झाली की पुन्हा पहिल्याचा समाचार घेत. अशा प्रकारे काशीबाई, तिचा नवरा आणि नरसगौडा पाटील या तिघांना मरेतोपर्यंत मारून त्या उलट्या काळजाच्या फौजदाराने रात्रभर अन्नपाण्याविना त्यांना कोठडीत डांबून ठेवले.

## अत्याचाराचा कळस: स्त्रीदेहाची घोर विटंबना

दुसऱ्यादिवशी तर अत्याचाराचा कळस झाला. काशीबाईला विवस्त्र करून चामडी पट्ट्याने तिला फोडून काढले. पण तेवढ्याने फौजदाराचे समाधान झाले नाही. त्याने तिखट आणण्यास फर्मावले. तिखटाचे नाव ऐकताच काशीबाईला भीतीने कापरे भरले. तिच्या तोंडाला कोरड पडली. ती त्यांच्या हातापाया पडू लागली. 'मला फार मारु नका. मी गरोदर आहे. कालच्या मारानेच माझ्या अंगावर रक्त जात आहे. त्या वेदना मला सहन होत नाहीत. मला मारु नका!'

'काय गरोदर आहेस! रांडे, अंगणास एक दार व महिन्यास एक पोर असे करून त्यांच्या

पोटाला कोठून आणून घालतेस? दहा खेडी फिरून दहा यजमान करून त्यांच्या पोटाला घालतेस! थांब, तुझ्या शरीरात तिखटच घालतो' एवढे बोलूनच तो नरपशू थांबला नाही. तर त्याने ते अघोरी कृत्य पार पाडले. ती पुष्कळ धडपडली, तडफडली पण दोघातिघा पोलिसांनी तिला घट्ट धरून ठेवले आणि फौजदारांने तिच्या जननेंद्रियात तिखट भरले.

स्त्रीदेहाची एवढी घोर विटंबना आजपर्यंत कोठे झाली असेल का? काशीबाईने सांगितलेली ही हकीकत ऐकून प्रत्येकाचे अंत:करण दु:ख, संताप, चीड यानी क्षुब्ध झाले आणि यातूनच 'काशीबाई सहाय्यक निधी'ची स्थापना झाली. यानिधी समितीच्या अध्यक्षस्थानी कै.डॉ. हेरेकर हे होते. याचवेळी मुंबईच्या 'विविध वृत्त' या साप्ताहिकाने या काशीबाई प्रकरणात कोल्हापूर दरबारवर टीकेची झोड उठविली, आणि त्या साप्ताहिकाचे संपादक कै. तटणीस यांनी स्वत: पुढाकार घेऊन सहाय्य निधीच्या कार्यास मुंबई येथे जोराची चालना दिली. सौ. अन्नपूर्णाबाई देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली ता. १४–२–१९४५ रोजी मुंबईच्या अनेक महिला संघटनांच्यावतीने ब्लॅव्हटस्की लॉजमध्ये महिलांची जाहीर सभा भरून तीत काशीबाईवर झालेल्या अमानुष अत्याचाराचा कडक शब्दात निषेध करण्यात आला. आणि या प्रकरणाच्या न्यायालयीन चौकशीची मागणी करणारा ठराव संमत करण्यात आला. या सभेला काका खास निमंत्रणावरून उपस्थित राहिले होते.

यापूर्वीच म्हणजे ता. ९ डिसेंबर १९४४ रोजी कोल्हापूर येथे श्री. बाळासाहेब खेर यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या एका सभेत या अत्याचाराबद्दल तीव्र संताप व्यक्त करण्यात येऊन या प्रकरणाची चौकशी करून दाद लावून घेण्यासाठी श्री. श्रेष्ठी वकील यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली होती. या सभेच्या पाठोपाठ कोल्हापुरातील विद्यार्थीवर्गाने या अत्याचाराच्या निषेधार्थ कोल्हापूर शहरात हरताळ घडवून आणला व प्रचंड मिरवणूक काढून जाहीर सभेत स्वतंत्र चौकशीची मागणी केली.

## श्रेष्ठी समितीचा अहवाल

मुंबई येथे झालेल्या महिलांच्या सभेनंतर दुसऱ्याच दिवशी म्हणजे १५ फेब्रुवारी १९४५ रोजी, कोल्हापूर येथे स्थापन झालेल्या श्रेष्ठी समितीने या प्रकरणा बाबतचा आपला अहवाल जाहीर केला हा अहवाल प्रकट होऊ नये म्हणून ना. मिचेल यांनी खूप खटपट केली, पण ती व्यर्थ गेली. या अहवालाने काशीबाईवरील अत्याचाराचे भीषण स्वरुप जगजाहीर केले.

न्यायदेवता आंधळी असली तरी अविचारी नाही. याचा प्रत्यय या पांगिरे प्रकरणाच्या निमित्ताने आल्याशिवाय राहिला नाही. सतत तीन साडे तीन वर्षे प्रयत्नाची पराकाष्ठा केल्यानंतर अखेर काशीबाईला न्याय मिळाला. या पांगिरे प्रकरणाचा निकाल ता. २३ मार्च १९४८ रोजी जाहीर करण्यात आला. आणि या प्रकरणातील प्रमुख आरोपी इंगवले फौजदार याला ५ महिन्यांची कैद आणि ७०० रु. दंड अशी शिक्षा ठोठावण्यात आली.

या प्रकरणी काकांनी घेतलेल्या परिश्रमांचा पुन्हा आढावा घेण्याचे कारण नाही. एक वृत्तपत्रकार या नात्याने त्यानी केलेल्या कामगिरीचे एका वृत्तपत्रकारानेच केलेले हे मूल्यमापन खूपच बोलके ठरेल. सोलापूर येथे भरलेल्या २४ व्या मराठी पत्रकार परिषदेच्या अध्यक्षपदावरून बोलताना श्री. दा. वि. गोखले यांनी आपल्या भाषणात काकांनी केलेल्या कामगिरीचा आवर्जुन उल्लेख केला. ते म्हणाले, 'अन्याय व जुलूम यांना चव्हाट्यावर आणून लोकमत जागृत करावयाचे आणि त्या लोकमताच्या संघटित सामर्थ्याच्या जोरावर त्या अन्यायाचा, जुलमाचा प्रतिकार करावयाचा, हे तंत्र मराठी पत्रे व पत्रकार यशस्वीपणे हाताळीत असल्याची तेजस्वी उदाहरणे आहेत. बेळगावच्या 'तरुण

भारत’ पत्राने कोल्हापूर संस्थानांत श्रीमती काशीबाई हणबर हिच्यावर झालेल्या अमानुष जुलुमाच्या कहाणीला प्रथम तोंड फोडले. त्या पत्राच्या संपादकानी या एका प्रकरणाबाबत किती कष्ट घेतले व किती त्याग केला हे पाहिले म्हणजे अभिमान वाटतो, व त्यांना धन्यवाद द्यावेसे वाटतात.’

भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे त्यावेळचे सरचिटणीस श्री. पी. सी. जोशी यांनी काकांना पाठविलेल्या पत्रात पुढील गौरवोदगार काढले आहेत–

`Your paper perhaps the first to uncover the troubles and sufferings undergone by our country- woman Kashibai Hanbar. It required a great courage on your part to expose this tale of inhuman persecution. By doing it, you have discharged the responsibility of the democratic press whose privilege it is to fight for the rights of the common men against the tyranny of injustice."

याशिवाय बॉम्बे क्रॉनिकल, बॉम्बे सेंटिनल, फ्री प्रेस जर्नल, हिंदुस्थान टाइम्स, ब्लिटझ आदी मातबर इंग्रजी वृत्तपत्रांनी या प्रकरणावर स्वतंत्र लेख लिहून न्यायालयीन चौकशीची मागणी केली. तसेच प्रबोधनकार के. सी. ठाकरे, आचार्य अत्रे, के. एम. मुन्शी (मुंबई राज्याचे माजी गृहमंत्री) आदि विचारवंतांनी खास लेख लिहून या भीषण अत्याचाराकडे साऱ्या जनतेचे लक्ष वेधले.

---

## काशीबाईवरील अत्याचारामुळे म. गांधींना झालेले दु:ख!

सेवाग्राम
वर्धा होकर (मध्यप्रांत)
ता. २०–२–४५

प्रिय महाशय,

आपका खत और इसकी साथ भेजे हुए कागजात मिले।
पू. बापूको सब हाल पढ सुनाया। सुनकर वे बहुत दुखी है।
इस केस के बारे मे आगे क्या होता है वह लिखते रहेगा।

आपका,
**नरहर पारीख**

---

प्रकरण
सहावे

# ज्योति रामा राजगिरे प्रकरण

समाजात शांतता आणि सुव्यवस्था राखणे, कोणाकडून कायद्याचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेणे, नागरिकांच्या जीवितास आणि मालमत्तेस हानि पोहोचणार नाही याची खबरदारी घेणे, आणि गुंड, चोर आदि अनिष्ट प्रवृत्तीच्या लोकांकडून समाजाला होणाऱ्या उपद्रवाला प्रतिबंध करणे ही सामान्यपणे पोलिसाची कर्तव्ये होत. ही कामे त्यांना सुलभतेने पार पाडता यावीत म्हणून समाजात वावरतांना त्यांना पुरेशी सत्ता व विशेष अधिकार असणे आवश्यक असते. पण ज्यावेळी खुद्द पोलीसच आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करताना आढळतात. त्यावेळी समाजातील सुरक्षिततेच्या भावनेला तडा जातो. नागरिकांना योग्य ते संरक्षण देण्याचे ज्यांचे काम,तेच पोलीस जनतेचे कर्दनकाळ बनू लागले म्हणजे समाजावर मोठा अनवस्था प्रसंग कोसळतो. याचे एक उदाहरण म्हणून ज्योति रामा राजगिरे प्रकरणाचा उल्लेख करता येईल.

निपाणी जवळील पट्टणकुडी या गावी ता. २६ ऑगस्ट १९५३ रोजी घडलेली ही घटना आहे. रात्रीचा बाराचा सुमार असावा. सर्वत्र सामसूम झाले होते. ज्योति  रामा राजगिरे या इसमाच्या घरी सर्वजण झोपी गेले होते. इतक्यात खाड खाड बुटांचा आवाज ऐकू आला. पाठोपाठ गावच्या सनद्याची हाक कानावर आली. ज्योती दार  उघडून पहातो तो गावचे दोन सनदी व एक पोलीस अंमलदार दरवाजात उभे! अधिकाऱ्याने त्याला दरडावून विचारले, ‘तुझ्या घरात तांदूळ किती आहे?’ ज्योतीने ताबडतोब चार पायली भाताचे पोते त्यांना दाखविले व एवढेच भात आपल्याकडे असल्याचे सांगितले. यावर ‘हे भाात तू कोठून आणलेस?’ असा प्रश्न त्या अधिकाऱ्याने केला. ‘साहेब, हे आमच्याच शेतातले आहे’ असे ज्योती शांतपणे म्हणाला. पण एवढ्याने त्या अंमलदाराचे समाधान झालेले दिसले नाही. म्हणून ‘आम्हाला याची चौकशी करावयाची आहे. तू आमच्या बरोबर पोलीस चौकीत चल’ असे तो ज्योतीला म्हणाला. तोच ज्योतीची म्हातारी आई पुढे आली आणि पोलीस अधिकाऱ्याला म्हणाली, ‘इतक्या रात्री आणि अशा भलत्या वेळी तुम्ही ज्योतीला कोठे घेऊन चालला?’ यावर जणू काही आपल्या मनाशीच ठरवून दिलेले उत्तर त्याने दिले. ‘आज

त्याला पोळीचे जेवण आहे. त्याकरता आम्ही त्याला घेऊन जात आहोत.' असे मोठ्या गुर्मीने सांगून पोलीस अंमलदाराने ज्योतीला जबरदस्तीने ओढून नेले व निपाणीच्या पोलीस लॉकअपमध्ये नेऊन डांबले.

## ज्योती बेपत्ता!

उजाडता उजाडताच ज्योती घरी परत येईल म्हणून त्याच्या घरातील सारे लोक वाट पाहू लागले. पण सकाळ उलटून गेली, वाट पहाता पहाता तिसरा प्रहरही झाला, तरी ज्योतीचा पत्ता नाही. दुसऱ्या दिवशीही तो आला नाही. एवढेच नव्हे तर, पुढे चांगले आठ दिवस गेले तरी त्याच्या घरच्या लोकांना त्याचा काही पत्ताच लागेना. त्यांना भलभलत्या शंका येऊ लागल्या. म्हणून त्यानी सगळीकडे चौकशी केली. निपाणी, चिकोडी, खडकलाट वगैरे, पोलिसांनी सांगितलेल्या सर्व ठिकाणी त्यांनी ज्योतीचा शोध केला. पण व्यर्थ! म्हणून सारे राजगिरे कुटुंब निपाणीला आले. निपाणीतील ओळखीच्या लोकांना भेटले व घडलेली हकीकत त्यांना सांगितली. त्या लोकांनी या संदर्भात (मुख्यमंत्री) मोरारजी देसाई, कलेक्टर वगैरेंना तारा केल्या. पण पुढे या गोष्टीला महिना, दोन महिने लोटले तरी कोणी दाद घेईना. ज्योतीचे पुढे काय झाले ते कोणालाच कळेना.

याच सुमारास एके दिवशी काकांना निपाणीच्या पटवर्धन मास्तरांकडून एक पत्र आले. त्यानी पत्रात लिहिले होते. 'निपाणी लॉकअपमध्ये चौकशीस आणलेला एक इसम बेपत्ता झाल्याचे समजते. मारहाणीनेच त्याला मृत्यू आला असावा अशी आम्हा लोकांना जबरदस्त शंका –नव्हे खात्रीच आहे. आपण पत्र पहाताच निपाणीस यावे आणि 'पांगिरे' प्रकरणाप्रमाणेच, पोलिसांकडून दडपले जाणारे हे प्रकरण हाती घेऊन राजगिरे कुटुंबाला न्याय मिळवून द्यावा.'

पत्रातील हकीकत वाचताच काका काही लोकांना बरोबर घेऊन ताबडतोब निपाणीस गेले. लॉकअपमधून बेपत्ता झालेल्या ज्योती राजगिरेच्या पट्टणकुडी येथील घरी जाऊन त्यांनी त्यांच्या बायकोची व आईची भेट घेतली, एका चंद्रमौळी झोपडीमध्ये पणतीच्या अंधुक प्रकाशात त्या दोघी स्त्रिया लहान मुलांना जवळ घेऊन बसल्या होत्या. त्या घाबरुन गेल्या होत्या. आपली विचारपूस करण्यासाठी बेळगावहून कोणीतरी आले आहे, असे समजताच त्यांच्या डोळ्यात अश्रू आले. व्यथित अंत:करणाने त्या बाहेर आल्या आणि त्यांच्यापैकी एकीने तर काकांच्या पायावर डोके ठेवून 'आम्हाला कोणाचाही आधार नाही हो! आम्हाला तुम्हीच यातून सोडवा!' असे म्हणून ती रडू लागली. पुढे काकांना तिच्याकडून वरील सारी हकीकत ऐकावयास मिळाली.

नंतर काका निपाणीस गेले. तेथे ट्रॅव्हलर्स बंगल्यात डी. वाय. एस. पी. श्री. खोत यांचा मुक्काम असल्याचे त्यांना कळले. रात्री साडे दहा ते अकरा च्या सुमारास काकांनी त्यांची भेट घेतली. ज्योतीस मारहाण झाल्याबद्दलची व त्याला मोटारीत घालून नेल्यासंबंधीची माहिती काकांनी त्यांना सांगितली व ते म्हणाले, 'माझ्या सारख्याला एवढी माहिती मिळते आणि एक महिना झाला तरी पोलिसांना ही माहिती मिळत नाही, याचे आश्चर्य वाटते.'

नंतर रात्री १२ वा. काका आपल्या मोटारीतून बेळगावला येण्यास निघाले. वाटेत दीड मैलावर रस्त्याच्या बाजूस खैर महंमद पठाण यांचा बंगला होता. काकांनी पठाण यांना झोपेतून उठविले व म्हणाले, 'तुम्ही ज्योतीच्या बायकोला व सासूला बोलावून घेतले होते व त्यांना पोलिसांकडून पैसे देववून आपसात हे प्रकरण मिटविण्यात भाग घेतला असे समजते हे खरे का?'

श्री. पठाण म्हणाले, 'मी त्यांना बोलावून घेतले नाही. तेच मजकडे आले होते.'

त्यावर श्री. पठाण यांनी पुढील हकीकत सांगण्यास नकार दिला. त्यानंतर काका तेथून बेळगावास निघून आले. दुसऱ्या दिवशी त्यानी डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट व डी. एस. पी. यांना

टेलिफोनवरून निपाणी येथील हकीकत सांगितली.

चोरी, दरोडेखोरी अथवा खून– मारामारी यासारखा कोणताही भयंकर गुन्हा ना केलेल्या अथवा कोणत्याही राजकीय घटनांशी संबंधित नसलेल्या व्यक्तीला विनाचौकशी लॉकअपमध्ये अडकवून ठेवले जाते. इतकेच नव्हे तर, दीड –दीड, दोन– दोन महिने झाले तरी त्या व्यक्तीच्या कुटुंबियांना काहीही माहिती दिली जात नाही, हे पाहून काकांना भयंकर चीड आली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तेही लोकशाही राजवटीत अशा घटना घडाव्यात याचे त्यांना फार वैषम्य वाटले. म्हणूनच तरुण भारताच्या पुढील अंकात एक जळजळीत अग्रलेख लिहून 'गरिब आणि श्रीमंत लोकांना छळायचे, त्यांना एखाद्या मुंगीप्रमाणे य:कश्चित् समजावयाचे व त्यांचे हवे तसे हाल करावयाचे, हे काय लोकशाही राज्य आहे?' असा सवाल त्यांनी राज्यकर्त्यांना केला! आणि पोलिसांकडून दडपल्या गेलेल्या या प्रकरणाला वर्तमानपत्रात प्रसिद्धी मिळाल्यामुळे एक वेगळेच वळण लागले. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सी. आय. डी. इन्स्पेक्टर श्री. एल. जी. मुजुमदार यांची खास नेमणूक करण्यात आली. या प्रकरणाशी संबंधित असलेले पोलीस अंमलदार कमते यांना सस्पेंड करण्यात आले. शिवाय सरकारच्या खास हुकुमानुसार श्री. वाली यांची ऑडिशनल मॅजिस्ट्रेट म्हणून नेमणूक करण्यात आली. या प्रकरणी कोर्टात अनेक साक्षीदार तपासण्यात आले. त्यातील महत्त्वाच्या साक्षींचा निवडक भाग पुढे दिला आहे.

## लक्ष्मण निंबाजी सावंत

'जोती, बाळू कमते आणि मी अशा चौघाजणांस चावडीजवळ उभ्या असलेल्या मोटारीतून निपाणी कचेरीत नेण्यात आले. तेथे आणखी तीन अधिकारी आले. हवालदाराने फाडकन माझ्या थोबाडीत मारली आणि खरी हकीकत सांगण्याविषयी मला फर्मावले. पण त्या जबरदस्त प्रहारामुळे मी मूर्च्छित पडलो. त्यानंतर खोलीच्या बाहेर असलेल्या कट्ट्यावर मला बसविण्यात आले. हवालदाराने मला मारले तेव्हा बाबू व दुसरा एकजण खोलीतच होते. जोतीला मात्र एका गजाच्या खोलीत ठेवण्यात आले होते आणि हवालदार त्याला काठीने मारमारीत होता. दुसरे दोघे चामड्याच्या पट्ट्याने त्याच्या कुल्ल्यावर बेदम मारु लागले. त्यामुळे जोती 'मेलो मेलो' असे ओरडत होता. थांबून थांबून मारहाण करण्याचा हा प्रकार उजाडेपर्यंत चालू होता. जोतीचे अंग रक्ताने थबथबले होते व पायावरून रक्ताचे ओघळ वहात होते. त्याचे सगळे कपडेही रक्ताने भरलेले होते. नंतर त्याला उचलून आंत नेले तेव्हा तो सारखा कण्हत होता व तोंडाने 'पाणी पाणी' असे ओरडत होता.'

## यशवंत गोपाळ गायकवाड

'मी पावाची भट्टी चालू करण्यासाठी नेहमीप्रमाणे पहाटे तीन वाजता उठलो. तेव्हा कचेरीत कोणालातरी मारीत असल्याचा आवाज ऐकू येत होता, आणि त्या माराच्या मागोमाग भयंकर किंकाळ्या ऐकू येत होत्या. उजाडल्यावर कचेरीच्या कंपाउंडजवळ जाऊन मी पाहिले तेव्हा गौडा पाटील, पाटील जमादार आणि इतर दोघे एका जखमी इसमास मागच्या बाजूने फाटकाबाहेर ढकलताना दिसले. त्या इसमाच्या अंगात साधे उभे राहण्याची देखील शक्ती नव्हती. त्यामुळे तो धाडकन जमिनीवर कोसळला.'

## अबदुल रामपुरे

'मी शौचाला जात असताना जोतीला पाहिले. त्याला कोठडीतून दोघा इसमानी त्याच्या काखेत हात घालून उचलून आणले व रस्त्याच्या बाजूला एका कुंपणाआड टाकले. पुढे थोड्या

वेळाने तेथे मोटार आली आणि मोटारीकडे त्याला उचलून नेण्यात येऊ लागले. त्यावेळी तो 'माझी सर्व हाडे मोडली आहेत, मला उठवू नका. मी येथेच प्राण सोडतो' असे म्हणत होता. तेव्हा 'तुला तुझ्या घराकडे नेतो चल' असे म्हणून त्या अधिकाऱ्याने त्याला उचलून मोटारीत घातले व त्याला घेऊन गेले.'

## मोटार ड्रायव्हर म्हादू

'मी खडकलाटहून भाडे घेऊन निपाणीला आलो होतो. पेट्रोल पंपाजवळ मोटारीत पेट्रोल घालीत असतानाच कमते हवालदार यानी मला वेठीला धरले व कचेरीकडे नेले. कचेरीच्या समोरील सडकेवर चिंचेच्या झाडाखाली मी गाडी उभी केली होती. थोड्या वेळाने कुंपणाजवळ पडलेल्या एका इसमास काखेत हात घालून मोटारीत घातले. त्यावेळी त्याच्या पायाची हाडे माराने मोडलेली होती व त्याचे डोकेही फुटलेले मला दिसले. नंतर मी मोटार चालू केली. या मोटारीत हवालदार पुढच्या सीटवर बसले होते व मागच्या बाजूला दोन सनदी, जोती व रामा असे तिघेजण होते. या सर्वांना घेऊन हवालदाराच्या सांगण्याप्रमाणे मी खडकलाटेला गाडी नेली आणि तिथे डॉ. दीक्षितांच्या दवाखान्यासमोर उभी केली. त्यानंतर जोतीस ते आंत घेऊन गेले. आणि त्याला त्यानी औषध वगैरे लावून बाहेर आणून मोटारीत घातले. तेथून मी त्याला मोटारीतून कमते यांच्या घरी आणून सोडले.'

## डॉ. दीक्षित

'माझ्याकडे आणण्यात आलेल्या जखमी इसमाला काय झाले आहे असे मी विचारले. त्यावर 'मला खूप जखमा झाल्या असून माझे सर्व अंग ठणकत आहे.' असे तो म्हणाला, त्याची जनरल कंडिशन चांगली नव्हती. तो अगदी कोलॅप्सिंग कंडिशनमध्ये होता. नाडी हाताला लागत नव्हती व हृदयक्रिया मंद मंद होत चालली होती. त्यावेळी त्याला एक्स्ट्रॉ मेडिकल हेल्पची जरुरी होती. तेवढ्याच साठी त्याला तेथून घेऊन जाण्यास मी कमतेना सांगितले. कठीण पदार्थाच्या मारामुळेच त्याला जखमा झाल्या असाव्यात असे मला दिसले. 'आपण त्याला घरी नेऊन कॉफी पाजतो व मग निपाणीस घेऊन जातो' असे कमते मला म्हणाले. स्पेशल मेडिकल हेल्पशिवाय एका तासाहून अधिक जगण्याच्या अवस्थेत तो नव्हता. नंतर त्याला घेऊन मोटार कमते यांच्या घराच्या दिशेने गेली. कमते यानी मला सांगितले की, 'हा इसम रस्त्यावर ॲक्सिडेंटने जखमी झाला आहे. त्याला आम्ही आणले आहे.' अपघाताबद्दल मी जखमीस काहीही विचारले नाही. कारण तो काही विचारण्यासारख्या व त्याची उत्तरे देण्याच्या अवस्थेत नव्हता. तसेच त्याच्या डोळ्यावरची जी जखम होती, ती ॲक्सिडेंटमुळे होण्यासारखी नव्हती.'

## श्री. बाबुराव ठाकुर

'पट्टणकुडीच्या एका माणसास निपाणी पोलीस स्टेशनवर नेण्यात आल्याबद्दलचे व तो बेपत्ता असल्याबद्दलचे श्री. पटवर्धन मास्तर यांचे ता. ७–९–५२ रोजी मला  एक पत्र आले.त्यावेळी मी बेळगावी नव्हतो. मुंबईला गेलो होतो. ता. १३ रोजी मी मुंबईहून परतलो, तेव्हा मी पत्र वाचले, लागलीच मी श्री. पटवर्धन यांना उत्तर पाठविले की 'माझी प्रकृती बरी नाही. नाहीतर मीच तेथे आलो असतो. या प्रकरणासंबंधी मिळेल ती माहिती गोळा कर.' नंतर ता. १६ सप्टेंबरच्या तरुण भारतच्या अंकात 'निपाणीच्या पोलीस लॉकअपमधील एक इसम बेपत्ता झाला असून तो मृत्यू पावला असे बोलले जात आहे... त्यामुळे खळबळ उडाली आहे. लोकांमध्ये भीतीस जागा राहू नये म्हणून सरकारने ताबडतोब चौकशी करून खरा प्रकार जाहीर करावा,' असा मजकूर मी प्रसिद्ध केला.

यानंतर श्री. पटवर्धन यांच्याकडून ताबडतोब निघून येण्याविषयी अधिक निकडीचे निरोप आल्यावरून मी ता. २७–९–५२ रोजी दुपारी निपाणीस गेलो. तेथे श्री. रामभाऊ कागवाडे, श्री. आवटे, श्री. कटकोळ वगैरे माझ्या जुन्या स्नेह्यांना भेटून मी या प्रकरणासंबंधी चौकशी केली व नंतर मी पंचनदीकर वैद्य यांच्याकडे मुक्कामास गेलो. त्या ठिकाणी बरीच मंडळी जमली होती. या ठिकाण अब्दुल रामपुरे नावाच्या इसमाने 'ज्योती हा मारहाणीमुळे जखमी झालेला व त्यास मोटारीत घालून घेऊन गेलेले मी पाहिले' वगैरे हकीकत मला सांगितली.

संध्याकाळी मी पट्टाणकुडीस जनार्दन पोवार व कागवाडे यांच्यासह ज्योतीच्या झोपडीत गेलो. तेथे ज्योतीची बायको जनाबाई व सासू आकूबाई यांची भेट घेतली. तेव्हा त्या बाया रडू लागल्या. त्यानी माझ्या पायावर डोके ठेवले व घडलेली सर्व हकीकत सांगितली. त्या म्हणाल्या, 'आम्ही निपाणी, चिकोडी, खडकलाट या ठिकाणी ज्योतीसाठी सारखे हेलपाटे घातले पण ज्योतीचा कोठेही पत्ता लागला नाही,' नंतर त्यांनी खैर महंमद पठाण याच्याकडे आपणास कसे नेले व 'आता जास्त भानगडीत न पडता पैसे घेऊन हे प्रकरण आपसात मिटवून टाका.' वगैरे तेथे घडलेली हकीकत त्यानी मला सांगितली.

'तुम्ही बेळगावास या. तुमचे मॅजिस्ट्रेटपुढे ॲफिडेविट करून पुढे काय करावयाचे ते ठरवू' असे मी त्यांना सांगितले.

नंतर मी निपाणीस आलो. तेथे ट्रॅव्हलर्स बंगल्यात डी. वाय. एस. पी. श्री. खोत यांचा मुक्काम असल्याचे कळले. रात्री साडे दहा ते अकराच्या सुमारास मी त्यांची भेट घेतली. ज्योतीस मारहाण झाल्याबद्दलची व त्याला मोटारीत घालून नेल्यासंबंधीची मला मिळालेली माहिती मी त्यांना सांगितली. व त्या मोटारीचा नंबरही मी त्यांना दिला. नंतर मी त्यांना म्हणालो, 'माझ्यासारख्याला एवढी माहिती मिळते आणि एक महिना झाला तरी पोलिसांना ही माहिती मिळत नाही याचे आश्चर्य वाटते.'

यावर श्री. खोत म्हणाले, 'हे प्रकरण आम्ही सी. आय. डी. खात्याकडे सोपविण्याचे ठरविले आहे.'

यानंतर श्री. पंचनदीकर यांच्याकडे जेवण आटोपून मी माझ्या मोटारीतून बेळगावास निघून आलो. दुसऱ्यादिवशी मी डी. एस. व डी. एस. पी. यांना टेलिफोनवरून निपाणी येथील हकीकत कळविली.

पट्टणकुडीहून मी परत आल्यानंतर तेथे मिळालेल्या माहितीच्या आधारे ता. ३०–९–५२ च्या तरुण भारतामध्ये ज्योती राजगिरे संबंधींचा मजकूर प्रसिद्ध केला आणि तेथील पोलीस ऑफिसरांची आधी बदली करा, अशी मागणी केली.'

## हवालदार कमते

हवालदार कमते यानी आपली बाजू कोर्टापुढे मांडली. ते म्हणाले, '२६ तारखेला रात्री दोन अडीचच्या सुमारास मी, नवाझ आणि विठू असे तिघे मिळून आम्ही विठूच्या घरी गेलो. चोरीच्या तपासासाठी त्याची आवश्यकता असल्याने त्याला घेऊन आम्ही रात्री चालत निपाणीस आलो. सकाळी ६–७ च्या सुमारास आम्ही त्याला घेऊन जत्राट वेशीत येऊन पोहोचलो. विठू व नवाझ यांना मी परत पाठवून दिले. मी आणि जोती मिळून दोघानी तेथील चहाच्या दुकानात चहा घेतला. बाहेर आल्यावर जोती शौचाला जातो म्हणून सांगून जो गेला तो परतलाच नाही.म्हणून मी त्याला निपाणी येथील पोलीस स्टेशनवर नेऊन मारहाण केली. नंतर डॉ. दीक्षितांच्याकडे उपचारासाठी त्याला घेऊन गेलो. पुढे जोतीच्या कुटुंबियांना मी ५०० रु. देऊन स्वस्थ बसण्यास सांगितले. आणि या बाबतीत आम्ही फौजदार दुंदूर यांची मदत घेतली, इत्यादी सर्व आरोप खोटे आहेत.

डॉ. दीक्षित, म्हादू ड्रायव्हर आणि मल्लप्पा धनगर यांच्यावर मोटार कायद्याखाली मी खटले घातले होते. म्हणून त्यांनी माझ्याविरुद्ध खोटी साक्ष दिली आहे. जोती वाटेत पळून गेला याबद्दलचा मी रिपोर्ट केला नाही. कारण त्याला मी मुळी अटकच केलेली नव्हती.'

हवालदार कमते यानी दिलेली ही साक्ष धादांत खोटी आणि बनवाबनवीची होती हे उघडच आहे.

पुढे या प्रकरणाच्या निर्णयाबाबत सेशन्स जज्ज व ज्यूरी यांच्यात मतभेद झाल्यामुळे हे प्रकरण अखेर हायकोर्टाकडे सोपविण्यात आले. मुंबई हायकोर्टचे न्यायमूर्ती श्री. गजेंद्रगडकर व न्यायमूर्ती श्री. व्यास यांच्यासमोर हा खटला चालला.

सदर खटला अत्यंत महत्त्वाचा असल्यामुळे तो चालविण्यासाठी मुंबई हायकोर्टाचे असि. गव्हर्न्मेंट प्लीडर श्री. अनंतराव मंडगी यांची खास नेमणूक करण्यात आली. एकूण २१ दिवस हा खटला चालला. आणि या अवधीत फिर्यादी पक्षातर्फे ४२ जणांच्या साक्षी झाल्या. खटला ऐकण्यात कोर्टात अतोनात गर्दी होत होती. शेवटी ता. २३ फेब्रुवारी १९५४ रोजी या प्रकरणाचा निकाल लागला. आणि हवालदार कमते यास पाच वर्षे सक्तमजुरी, पोलीस हेडकॉन्स्टेबल हुगार यास चार वर्षे सक्तमजुरी आणि सनदी विठू व बाळू यांना तीन वर्षे सक्तमजुरी अशा शिक्षा ठोठावण्यात आल्या. एक वृत्तपत्रकार या नात्याने प्रस्तुत प्रकरण उघडकीस आणून काकांनी एका गरीब कुटुंबाला न्याय मिळवून दिला आणि हाती असलेल्या अधिकाराचा दुरुपयोग करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांना त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून दिली.

पांगिरे प्रकरणाप्रमाणेच पट्टणकुडी प्रकरणही चांगलेच गाजले. आणि त्यामुळे तरुण भारतचे नाव सर्वतोमुखी झाले. परिणामी जिल्ह्यातील लोक आपापली गाऱ्हाणी आणि तक्रारी घेऊन तरुण भारताकडे धाव घेऊ लागले.

प्रकरण सातवे

# शामराव देशमुख प्रकरण

## पोलीस कोठडीत मारहाणीमुळे आलेला मृत्यू

सकाळचा नऊ दहाचा सुमार असावा. निपाणी पोलीस ठाण्यावर कसली तरी विलक्षण धावपळ चालली होती. मोटारींची सारखी ये जा सुरू होती. आणि एकेक करता हळूहळू लोकांची तेथे गर्दी जमू लागली. सर्वांचेच लक्ष तेथील पोलीस कोठडीकडे जात होते. त्या कोठडीच्या गजांवर एक पडदेवजा कापड सोडण्यात आले होते आणि त्यातूनच कोणा इसमाचे प्रेत लटकत असताना दिसत होते. जमिनीपासून एक दोन फुटांच्या अंतरावर अधांतरी प्रेताचे पाय लटकत होते. तेथे जमलेल्या प्रत्येकाला हे काय चालले आहे, हे कसे झाले हे जाणून घेण्याची उत्सुकता होती. हा इसम कोण? तो इथे कसा आला? त्याने आत्महत्या केली की हा त्याचा खून आहे? हीच चर्चा जमलेल्या लोकात चालू होती. पण तेथील पोलीस आणि पोलीस अधिकारी यांच्या मुद्रेवर मात्र फारशी खळबळ दिसून येत नव्हती. जणू काही घडलेच नाही. अशा थाटात ते वावरताना दिसत होते. त्यामुळे लोकांना अधिकच शंका येत होती.

सदर घटनेची वार्ता हां हां म्हणता गावात पसरली. प्रत्येकाच्या तोंडी हीच चर्चा चालू होती. पण नेमके घडले काय? आणि हे प्रेत कोणाचे? याबद्दल कोणालाच काही कळेना. पोलिसांकडून तर याबाबतीत काहींच कळत नव्हते. निपाणीतील काही प्रतिष्ठित नागरिकांना ही वार्ता समजताच ते सारे मिळून तडक पोलीस ठाण्यावर गेले. जाण्यापूर्वी त्यानी बेळगाव येथे काकांना ‘ एक भीषण घटना घडली आहे. ताबडतोब निघून यावे’ अशा आशयाची तार केली. तार पोहोचताच काका तातडीने निपाणीस रवाना झाले. ते निपाणीस पोहोचले त्यावेळी संध्याकाळचे साडेसात वाजले होते. प्रथम ते पोलीस ठाण्यावर गेले. तेथे त्यांना काही प्रतिष्ठित मंडळी भेटली व त्यांच्याकडून त्याना या प्रकरणाबाबत थोडीबहुत माहिती मिळाली, ती अशी :

## शामराव देशमुखाची दुर्दैवी कहाणी

पोलीस कोठडीत ज्याचे प्रेत लटकत होते, त्याचे नाव शामराव देशमुख. तो निपाणी येथील भांड्याचे व्यापारी श्री. रावजी जयचंद मेहता यांच्याकडे कामास होता. शेठजींच्या अनेक व्यवहारात तो मदतनीस म्हणून काम पहात होता. एकेदिवशी शेठजींकडून ५ हजारांची रक्कम घेऊन शामराव देशमुख मुंबईस जातो असे सांगून जो गेला, तो परत आलाच नाही. काही दिवस वाट पाहून शेठजींनी इं. पि. कोडच्या ४२० कलमाखाली फसवणुकीच्या आरोपाखाली त्याच्याविरुद्ध पोलिसांकडे फिर्याद नोंदवली. त्यावेळी देशमुख यांचे कुटुंब निपाणीत होते. बरेच दिवस झाले तरी देशमुख परत न आल्याने रावजी शेठजींनी देशमुखाच्या बायकोला पैशासाठी तगादा लावला. फिर्याद केलेल्या दुसऱ्याच दिवशी फौजदार पोलिसांना घेऊन देशमुखाच्या घरी गेले आणि त्याची बायको सौ. शांताबाई हिच्याकडील सुमारे पाच तोळे वजनाच्या दोन सोन्याच्या पाटल्या त्यानी जबरदस्तीने जप्त केल्या. शिवाय सदर देशमुखाचा मेहुणा सखाराम पालेकर याला रावजी शेठजीनी बोलावून घेऊन 'देशमुखाने तुमच्याकडे दागिने, पैसे ठेवले आहेत ते परत करा.' अशी त्याच्याकडे मागणी केली. पण पालेकरांनी आपला त्याच्या व्यवहाराशी काहीही संबंध नाही, असे सांगितले. त्यानंतर काकांना, असे कळले की, देशमुखाची पत्नी आणि त्याचा मेहुणा यांच्या अपरोक्ष देशमुखाला पोलिसांनी पुण्याहून पकडून आणून पोलीस कस्टडीत ठेवले आहे. त्याची पत्नी व मेहुणा यानी देशमुखाला भेटण्याची इच्छा प्रदर्शित करताच 'त्याला चिकोडीला नेण्यात आले आहे.' असे मोघम उत्तर पोलिसांकडून मिळाले.

.... अशी ही अर्धवट माहिती घेऊन काका पोलीस अधिकाऱ्यास भेटावयास गेले. पण त्यापूर्वीच पंधरा मिनिटे अगोदर देशमुखाचे प्रेत उत्तरीय तपासणीसाठी चिकोडीस नेण्यात आल्याचे समजले. यावेळी पोलीस ठाण्यावर डी. वाय. एस. पी. पीरजादे, फौजदार नांदोडकर, फौजदार नीलगार वगैरे अधिकारी होते. शिवाय निपाणीचे नगराध्यक्ष श्री. बळवंतराव चव्हाण हेही त्या ठिकाणी हजर होते. पलीकडच्या खोलीमध्ये चिकोडीचे मॅजिस्ट्रेट श्री. पाटील हे मयत आरोपी देशमुख यांची पत्नी शांताबाई हिचा जबाब घेण्यात गुंतले होते.

काकांनी या पोलीस अधिकाऱ्यांची भेट घेतली आणि 'पोलीस कस्टडीत आरोपीचा मृत्यू झाल्याने, आरोपीने आत्महत्या केली आहे किंवा कसे याबद्दल लोकांना शंका आहे. त्यामुळे या प्रकरणाची कसून चौकशी झाली पाहिजे' असे सांगितले. याच पोलीस स्टेशनमध्ये काही वर्षापूर्वी घडलेल्या ज्योती राजगिरे प्रकरणाची त्यांना त्यानी आठवण करून दिली. आणि त्यावेळी पोलिसानीच मारहाण करून जोती राजगिरेला बेपत्ता केले होते, हेही स्पष्ट केले. त्यानंतर काकांनी मॅजिस्ट्रेट श्री. पाटील यांची वेगळी भेट घेतली. आणि 'सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आपण या प्रकरणी अधिक लक्ष घालावे व या निराश्रित बाईला न्याय मिळवून द्यावा. काही झाले तरी यातून सत्य बाहेर पडले पाहिजे', असे आग्रहपूर्वक सांगितले.

प्रस्तुत प्रकरणी आरोपीने कच्च्या कैदेत असताना आत्महत्या केली की इतर कोणत्या मार्गाने त्याला मृत्यू आला, असा लोकांना संशय का यावा? या प्रकरणामागे आणखी काही रहस्य होते का? आरोपी देशमुख आणि फिर्यादी शेठजी यांचे संबंध नोकर आणि मालक एवढेच होते का? तसे असते तर आत्महत्या करून स्वत:चा नाश करण्यापर्यंत या नोकराने मालकाचा असा कोणता गुन्हा केला होता? पाच हजार रुपयांसारख्या रकमेसाठी माणूस आत्मनाशाला तयार होईल का? असे अनेकविध प्रश्न या संदर्भात उभे राहू लागले, आणि त्यांची उत्तरे शोधता शोधता काही

वेगळाच उजेड या प्रकरणावर पडू लागला.

## प्रकरणावर वेगळाच प्रकाश

मयत शामराव देशमुख हा रावजी शेठकडे निपाणीला नोकरीस येण्यापूर्वी मुंबईस राजकमल स्टुडिओमध्ये काम करीत होता. तीन वर्षापूर्वी तो निपाणीस आला व शेठजींच्या चाळीतच बिऱ्हाड करून राहिला. शेठजींशी त्याचा संबंध केवळ हिशोबनीस एवढ्या पुरताच मर्यादित नसावा. कारण शेठजींच्या पैशाचा बराचसा व्यवहार तो पहात होता. याबाबतच्या महत्त्वाच्या उलाढालीही त्याच्या सल्ल्यानेच होत असत. त्यामुळे केवळ पांच एक हजारांची रक्कम घेऊन तो परत आला नाही. एवढ्यावरूनच शेठजींनी त्याच्याविरुद्ध पोलिसांत फिर्याद करावी याचेच लोकांना प्रथम आश्चर्य वाटले.

ही फिर्याद दाखल केल्यानंतर फौजदार आणि पोलीस यांना घेऊन शेठजी देशमुखांच्या घरी गेले आणि तेथे त्यांनी सौ. शांताबाईकडे असलेल्या सोन्याची मागणी केली. तिने 'माझ्याकडे काहीही नाही. मी कशीबशी पांच पोरांचा सांभाळ करून राहते, आणि माझ्या भावाचाही या प्रकरणाशी काही संबंध नाही' असे स्पष्ट सांगितले. यानंतर शांताबाईने निपाणीचे नगराध्यक्ष श्री. बळवंतराव चव्हाण यांना शेजारी म्हणून बोलावून घेतले व त्यांना ही हकीकत सांगितली. या गोष्टीची चौकशी करण्यासाठी म्हणून बळवंतराव हे रावजी शेठजींच्या दुकानात गेले. तेथे शेठजींनी त्यांना सांगितले की, देशमुखाचे मेहुणे पालेकर यांनी या गोष्टीची सर्व जबाबदारी घेतली आहे. तेव्हा त्यांना आमचे जिन्नस देऊन टाकण्यास सांगा,' पण पालेकरानी आपला याच्याशी काहीही संबंध नाही असे निक्षून सांगितले. त्यानंतर 'आम्ही देशमुखांना पुण्याहून पकडून आणले आहे.' असे शेठजींनी सांगितले. त्यावर 'देशमुखाची आम्हास भेट करून द्या. म्हणजे आम्ही काय ती चौकशी करतो' असे बळवंतरावांनी सांगताच देशमुखाला चिकोडीला नेण्यात आले आहे, असे मोघम उत्तर शेठजींनी दिले.

## शांताबाईला फौजदार नीलगारची दमदाटी

पुढे थोड्या दिवसानी निपाणी पोलीस स्टेशनमध्ये देशमुखाची चौकशी करण्यासाठी मॅजिस्ट्रेटची परवानगी घेऊन पोलिसांनी त्याला रिमांडवर आणले व अटकेत ठेवले. त्या दिवशी संध्याकाळी जीप गाडी घेऊन पोलीस प्रथम पालेकरांकडे गेले आणि तिथून ते शांताबाईकडे गेले.' आम्ही तुमच्या नवऱ्यास धरून आणले आहे. तेव्हा फौजदार साहेबांनी तुम्हाला कचेरीवर बोलावले आहे.' असे सांगून पोलिसांनी पालेकर व शांताबाई या दोघांना पोलीस कचेरीत नेले. तेथे सिटी फौजदार श्री.नांदोडकर व त्या शेजारी रावजी शेठ बसले होते. पुढे शांताबाईला एकटीलाच आत बोलावून घेण्यात आले. फौजदार तिला म्हणाले, 'तुमच्याकडे शेठजींच्या काही जिनसा आहेत त्या देऊन टाका.' शांताबाईंने 'आपल्याकडे त्यांचे काही जिन्नस नाहीत' असे सांगताच तिला बाहेर जाण्यास सांगितले व पालेकरांना आत बोलावले. तेव्हा आपल्या भावाचा या प्रकरणाशी काही संबंध नसताना पोलीस त्याला आता विनाकारण त्रास देणार या भीतीने शांताबाई रडू लागली. त्यावेळी पोलिसांनी तिला दुसऱ्या एका खोलीत नेऊन बसविले. तिथे तिचा नवरा देशमुख बसलेला होता. तिने आपल्या नवऱ्याला या जिनसांबद्दल काय करावयाचे असे विचारले. यावेळी देशमुख म्हणाला, 'आमचे ते घरातील फार दिवसांचे जिन्नस आहेत. ते शेठजींना द्यावयाचे नाहीत.' थोड्या वेळाने देशमुखाला दुसऱ्या खोलीत हलविण्यात आले. आणि नीलगार फौजदार शांताबाईंकडे आले. तिला त्यानी दटावणीच्या स्वरात सांगितले. 'शेठजीचे काय जिन्नस तुमच्याकडे असतील ते मुकाट्याने देऊन टाका.' त्यावर शांताबाईंने आपल्याकडे काहीही जिन्नस नाहीत असे सांगितले. 'तुम्ही नाही म्हणता ना? ठीक आहे. तुम्हा दोघांनाही चांगला चोप देतो' असे म्हणून नीलगार फौजदार तेथून

निघून गेले.

थोड्या वेळाने मध्यस्थी करण्याकरिता श्री. बळवंतराव चव्हाण पुढे आले आणि 'मार खाण्यापेक्षा काय देणे घेणे आपल्याला ते देऊन मिटवून टाका' असे त्यांनी शांताबाईला सांगितले. तेव्हा शेठजींनी शांताबाईकडे सोन्याचे बिलवर असल्याचे सुचविले. ते पुढे असेही म्हणाले की, 'देशमुखाचा एक मावसभाऊ राजकमलमध्ये आहे. देशमुखाला अटक केल्याबद्दलची त्याला तार करा म्हणजे तो ताबडतोब निघून येईल.' पोलिसांनी ताबडतोब शांताबाईंच्या नावे तशी तार करविली. अर्थातच हा सारा प्रकार पाहून शांताबाई घाबरली आणि भावास व नवऱ्यास मारहाण नको म्हणून तिने आपल्याजवळचे जिन्नस देण्याचे कबूल केले. ताबडतोब फौजदार नीलगार शांताबाईला घेऊन जीपमधून तिच्या घरी गेले. तेथे शांताबाईने त्यांना ४ तोळ्यांचे बिलवर दिले. पण त्याची पावती न देता अगर पंचनामा न करता नीलगार फौजदार बिलवर घेऊन निघून गेले.

या वेळपर्यंत श्री. बळवंतराव चव्हाण, फौजदार श्री. नांदोडकर आणि रावजी शेठ हे पोलीस कचेरीत बसूनच होते. नंतर श्री. चव्हाण व श्री.नांदोडकर घरी जाण्यासाठी निघाले. रावजी शेठ व नीलगार फौजदार हेच काय ते मागे राहिले, परत जातेवेळी श्री. चव्हाण यांनी पालेकरांना सोडून देण्याची विनंती केली, 'तारेचे उत्तर येईपर्यंत त्याला इथेच राहू द्या' असे उत्तर त्यांना मिळाले.

## ती भीषण घटना

यानंतर वर सांगितलेली भयंकर घटना दुसरे दिवशी पहाटे घडली. पोलीस कस्टडीत लोखंडी गजामागे देशमुखाचे प्रेत लटकत होते. त्याचा चेहरा दिसू नये म्हणून दरवाजावर पडद्यासारखा एक कपडा टाकला होता. आणि तो प्रकार पहाण्यासाठी येणाऱ्या जाणाऱ्यांना देशमुखाने आत्महत्या केली आहे, असे पोलीस लोक वारंवार पटवून देत होते. दुसऱ्या बाजूस डी. वाय. एस. पी. पिरजादे, डी. एस. पी. लुईस आणि इतर पोलीस अधिकारी यानी पंचनाम्याची तयारी चालू केली होती. ही सारी तयारी चालली होती, ती ही आत्महत्या आहे हे पटवून देण्यासाठीच. पण एवढे झाले तरी शेजारच्याच खोलीत असलेले देशमुखाचे मेहुणे श्री. पालेकर यांना मात्र देशमुखाच्या या आत्महत्येबद्दल काहीच कळविण्यात आले नव्हते. अगर त्याची पत्नी शांताबाई हिलाही ही बातमी कळविण्याची तसदी पोलिसांनी घेतली नव्हती. तेथे चाललेल्या एकूण धावपळीवरून व पोलिसांच्या बोलण्यावरून पालेकरांना ही बातमी कळून आली.

## शांताबाईने हंबरडा फोडला

पुढे डी.एस. पी. लुईस यांनी निपाणीचे त्यावेळचे आमदार श्री. बी. डी. नाईक यांना बोलावून घेतले. आणि देशमुखाने आत्महत्याच केली आहे, हे पटवून देण्यासाठी मयताच्या शरीरातून पडलेली धातू, रक्ताचे डाग वगैरे खुणा त्यांना दाखविल्या. यावर श्री. नाईक म्हणाले, 'मला यातले काहीही समजत नाही. मात्र लोकांना पोलिसांचाच संशय आहे. पोलिसांनीच देशमुखाला मारले असावे असं लोक बोलतात. तेव्हा या प्रकरणाची कसून चौकशी करावी,' अटकेतील आरोपीच्या मृत्युची ही वार्ता संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळवून योग्य तो पंचनामा करण्याची खबरदारी पोलिसांनी घेतली होतीच. चिकोडीच्या सरकारी डॉक्टरानाही प्रेत पहाण्यासाठी बोलावून घेण्यात आले. पण मयताची बायको शांताबाई हिला मात्र ही बातमी दुपारी १२ वा. समजली. बातमी कळतांच ती हंबरडा फोडतच पोलीस स्टेशनकडे धावली. तिचा तो आक्रोश पाहून तिची मुलेही रडू लागली. जिथे तिच्या नवऱ्याचे प्रेत लाटकत होते. त्या कोठडीकडे ती गेली, आणि 'माझा तुम्ही सर्वांनी घात केला' असे म्हणून तिने हंबरडा फोडला. ती अक्षरश: जमिनीवर गडबडा लोळू लागली. 'आदल्या दिवशी मी बघून गेले होते. माझा नवरा चांगला होता. आज त्याचा मुडदा की

हो निजवलात! माझा घात केलात तुम्ही! आता पडदा बाजूला करून मला त्याचे तोंड तरी पाहू द्या' असे ती पोलिसांना विनवू लागली. पण त्यांनी तिचे काहीच ऐकले नाही. एवढेच नव्हे तर तिला तिथे रडण्याचे समाधानही लाभू दिले नाही. कारण तिच्या त्या आरड्याओरड्याने तिथे जवळच बसलेल्या लुईस साहेबांचे डोके उठत होते! 'सारे प्रेताचा पंचनामा लिहू लागले आहेत. मोठ्याने रडू नको' असे म्हणून त्यांनी तिच्या रट्ट्याला धरून तिला बाजूच्या खोलीत नेऊन बसविले. पुढे प्रेताचा पंचनामा झाल्यानंतर 'प्रेत ताब्यात घेणार का?' असे पोलिसांनी शांताबाईला विचारले. पण तिने नाही म्हणून सांगितले.

ही सारी पोलिसांच्या बाजूने जय्यत तयारी झाली. देशमुखाची ही आत्महत्याच आहे असे ठरवून ते मोकळे झाले. पण या गोष्टीवर लोकांचा विश्वास कसा बसणार? त्यासाठी शेवटचा प्रयत्न म्हणूनच की काय त्यानी कोल्हापूर येथील चार प्रतिष्ठित वर्तमानपत्रकारांना बोलावून घेतले आणि तो आत्महत्येचाच प्रकार आहे, असे पटवून देण्याचा प्रयत्न केला. हा आत्महत्येचा विचार देशमुखाच्या मनात आधींपासूनच होता असे सांगून आपल्या बोलण्याला आधार म्हणून त्यांनी काही पत्रे पत्रकारांना दाखविली. ही पत्रे देशमुखानेच लिहिली आहेत, असे पोलिसांनी त्यांना सांगितले. पण पत्रांखाली मात्र कोणाचीच सही नव्हती.

यानंतर काकांनी शांताबाई व पालेकर यांची भेट घेतली. घडलेल्या सर्व गोष्टींची त्यानी खात्री करून घेतली. आदल्या दिवशी सकाळी ६ वा. पोलिसांनी पालेकरांना पोलीस स्टेशनवर धरून आणले होते. आणि २४ तास होऊन गेले तरी अन्नपाण्याविना त्यांना पोलीस कस्टडीत ठेवण्यात आले होते. ही गोष्ट काकांनी लगेच मॅजिस्ट्रेटच्या नजरेस आणून दिली. इतका वेळ त्याला का ठेवून घेतले आहे, याची चौकशी करून त्याची मुक्तता करावी अशी विनंती केली.

## जाहीर सभेत न्यायालयीन चौकशीची मागणी

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी ५ वा. निपाणी येथील तानाजी चौकात डॉ. जाधव यांच्या अध्यक्षतेखाली एक जाहीर सभा घेण्यात आली. या सभेमध्ये श्री. उमराणीकर, मारुती देसाई, काका तसेच इतर काही वक्त्यांची भाषणे झाली. 'शामराव देशमुख याचा मृत्यू पोलिसांच्या कच्च्या कैदेत झाला असून तो संशयास्पद आहे. याकरिता संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना ताबडतोब सस्पेंड करण्यात यावे आणि या प्रकरणाची संपूर्ण न्यायालयीन चौकशी व्हावी' अशी मागणी करणारा ठराव सभेत संमत करण्यात आला.

या सभेत मृत इसम शामराव देशमुख यांच्याविरुद्ध फिर्याद करणाऱ्या व्यापाऱ्याला उद्देशून काका आपल्या भाषणात म्हणाले, 'राऊ शेठजी यांच्या देण्याघेण्याच्या व्यवहारात पोलिसांनी कां हस्तक्षेप करावा? ते त्यांचे वसुली कारकून आहेत का? पोलिसांना देशमुखाच्या कुटुंबियांकडून घरी जाऊन जिन्नस हस्तगत करण्याचा काय अधिकार होता? ही पोलीस चौकी की सैतान चौकी? भारत सरकार सगळ्या योजना करते. पण या राज्यात माणसाला माणूस म्हणून जगता येत नसेल तर त्या योजना काय कामाच्या?'

## लोकशाही राजवटीला कलंक

निपाणी येथे घडलेल्या देशमुख प्रकरणाची हकीकत ही अशी आहे, यापूर्वी काकांनी उजेडात आणलेले पांगिरे प्रकरण, राजगिरे प्रकरण यासारखेच प्रस्तुत देशमुख प्रकरणींही सत्य उजेडात आणण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. बेंगलोरला तारा व टेलिफोन करून 'हा मृत्यू आत्मघात

नसून हा खून असला पाहिजे. तेव्हा या प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे’ अशी मागणी त्यानी केली. तसेच जाहीर सभा घेऊन, वर्तमानपत्रातून याला चांगली प्रसिद्धी देऊन व लेख लिहून आणि महाराष्ट्रातील सर्व वर्तमानपत्रांतून याला चांगली प्रसिद्धी देऊन हे प्रकरण चव्हाट्यावर आणले.एवढ्यावरच काका थांबले नाहीत तर, त्यावेळचे मुंबईचे राज्यपाल श्री. श्रीप्रकाश यांची त्यांनी श्री.एस. एम. जोशी यांच्यासह भेट घेतली व या प्रकरणाच्या सर्व हकीकतीची कागदपत्र त्यांच्या स्वाधीन केले. त्यावेळचे म्हैसूरचे गृहमंत्री श्री. चन्नबसप्पा यांनाही काका भेटले व या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करावी, अशी त्याना त्यांनी विनंती केली. कै. बॅ. नाथ पै यांनी या प्रकरणाकडे कै. ना. शास्त्री यांचेही लक्ष वेधले व त्याप्रमाणे ना.शास्त्री यानी या प्रकरणाबाबत म्हैसूर सरकारकडे चौकशी केली.पण दुर्दैवाची गोष्ट अशी की, एवढे विश्वप्रयत्न होऊनही याप्रकरणी काहीही झाले नाही. पांगिरे प्रकरणाच्या वेळी ब्रिटीश राजवट असूनही तेथे न्याय मिळाला होता. पुढे राजगिरे प्रकरणांतही आरोपींची चौकशी होऊन त्यांना योग्य ते शासन झाले होते. पण म्हैसूरच्या लोकशाही सरकारकडून मात्र प्रस्तुत देशमुख प्रकरणी कोणताच न्याय मिळाला नाही. संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर खटले भरण्याचे तर दूरच राहिले. पण अन्य संबंधित लोकांना सस्पेंड करून त्यांची चौकशी करण्याचा साधा प्रयत्नही केला गेला नाही. एखाद्या कुत्र्या–मांजराचा मृत्यू घडावा तशीच देशमुखाच्या मृत्यूच्या घटनेची घोर उपेक्षा झाली. आपल्या लोकशाही राजवटीला हा मोठाच कलंक होय!

प्रकरण आठवे

# महाराष्ट्र– म्हैसूर सीमेचे आंदोलन

गेली सोळा–सतरा वर्षे महाराष्ट्र– म्हैसूर सीमेचा प्रश्न गाजत आहे. या प्रश्नावर जिद्दीने आंदोलन चालविणाऱ्या महाराष्ट्र एकीकरण समितीची स्थापना १९४६ साली झाली. या कामी डॉ. गो. शां. कोवाडकर, वि. ना. मिसाळ, वसंतराव हेरवाडकर, बाबुराव देसाई या मंडळींनी पुढाकार घेतला होता. काका त्यावेळी म. ए. समितीचे सदस्य नव्हते. आणि या संस्थेचा पुरस्कारही त्यानी त्यावेळी केला नाही. कारण असे की काका हे भाषावार प्रांतरचना करण्याच्या मुळातच विरुद्ध होते. त्यामुळे देशात फुटीरतेच्या प्रवृत्ती निर्माण होतील व पर्यायाने देशाचे नुकसान होईल, अशी त्यांची मनोमन भावना होती. म्हणून तरुण भारतात काही लेख लिहून त्यानी भाषावार राज्यरचनेला विरोधही केला होता. पण पुढे श्रीरामलूच्या बलिदानामुळे भाषावार राज्यरचना ही मान्यता पावली आणि त्या दिशेने वारे वाहू लागले. पुढे हळुहळू देशाची विभागणी भाषावार तत्वाधारे करावी म्हणून प्रथम दार कमिशन व नंतर फाजलअल्ली कमिशन यांची नेमणूक झाली.


भाषावार राज्यरचना एकदा अपरिहार्य ठरल्यानंतर ती पायाशुद्ध व तात्विक भूमिकेवर आधारलेली असावी, असा अग्रह काकांनी धरला आणि तेव्हापासून ते महाराष्ट्र एकीकरण समितीचे कट्टे पुरस्कर्ते बनले.

## महाराष्ट्र–म्हैसूर सीमाप्रश्नाचा उगम

तसे पाहिल्यास महाराष्ट्र– म्हैसूर सीमाप्रश्नाचा उगम झाला, त्याला पाव शतक लोटले. १९४६ साली बेळगाव येथे श्री. ग.त्र्यं. माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अधिवेशनात प्रथम संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीची कल्पना पुढे आली. बेळगाव व आजूबाजूचा मराठी भाग हा सांस्कृतिक, भौगोलिक, सामाजिक, आर्थिक वगैरे सर्व दृष्टीनी महाराष्ट्राशी निकटचा आहे. अनेक धाग्यानी तो महाराष्ट्राशी बांधला गेला आहे. या भागातील जनतेची मने महाराष्ट्राशी एकरुप झालेली आहेत. म्हणून बेळगावचे महाराष्ट्राशी घनिष्ठ संबंध



युनियन जिमाखान्यावरील विराट जाहीर सभा
(सीमापरिषद २२ एप्रिल १९७३)



डावीकडून–श्री. बाबुराव ठाकुर, कै. बापूसाहेब वेलिंग (फोटोग्राफर) कै. मामासाहेब वरेरकर, श्री. वसंतकुमार सराफ वगैरे.

श्री. बाबुराव ठाकुर यांचा कुटुंब परिवार



## रिपब्लिकन पक्षाचे नेते श्री. रा. सु. गवई यांचे अध्यक्षीय भाषण (बेळगाव सीमापरिषद १९७३)




छायाचित्रात सर्वश्री आमदार बळवंतराव सायनाक, खा. नानासाहेब गोरे, समाजवादी पक्षाचे अध्यक्ष किशोर पवार, स्वा. मधु दंडवते, स्वागताध्यक्ष बाबुराव ठाकुर व म. ए. समितीचे अध्यक्ष बा. रं. सुंठणकर वगैरे दिसत आहेत.

## सीमाप्रश्नासाठी प्राणपणाने झगडणारे
## कै. बॅ. नाथ पै



१७ जानेवारी १९७१ रोजी हुतात्मादिनी
बेळगाव येथे देह ठेविला.

सरकारी पातळीवरून देखील जोडलेले रहावेत, अशी मागणी एका ठरावाद्वारे या अधिवेशनात करण्यात आली होती. त्यानंतर दार कमिशन व नंतर फाजलअल्ली कमिशनची झालेली नेमणूक, त्या कमिशनने दिलेल्या प्रतिकूल निर्णयामुळे महाराष्ट्रात निर्माण झालेले संयुक्त महाराष्ट्राचे उग्र आंदोलन, संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना व तिचे कार्य, स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची झालेली निर्मिती, पुढे सीमाप्रश्नासाठी नियुक्त झालेली चौसदस्य समिती, महाराष्ट्र व म्हैसूर राज्यांच्या उभय मुख्यमंत्र्यांच्या या प्रश्नावर झालेल्या अनेक बैठका, मान्यवर नेत्यांची उपोषणे, उगदी अलीकडे नियुक्त झालेले महाजन कमिशन, या कमिशनने दिलेल्या विपरीत अहवालामुळे सीमाभागात उसळलेली लोकक्षोभाची लाट या सर्व घटनांपासून तो परवा परवा शिवसेना आंदोलनापर्यंतच्या प्रत्येक गोष्टीचा या चरित्र ग्रंथांत आढावा घेणे हे अस्थानी व अशक्यही होईल. परंतु काकांचे व या सीमाप्रश्नाचे एवढे जिव्हाळ्याचे नाते आहे की, या प्रकरणाचा एक दोन परिच्छेदांत विचार करून ते हातावेगळे नाते आहे की, या प्रकरणाचा एकदोन परिच्छेदांत विचार करून ते हातावेगळे करणे म्हणजे काकांच्या अलिकडील जीवनाचे अपुरे दर्शन केल्यासारखे होईल व चरित्रभूत व्यक्तीला तो एकप्रकारे अन्याय ठरेल. सर्वच इतिहासाची तपशीलवार मांडणी करावयाचे हे स्थान नसले, तरी ज्या ज्या संदर्भात काकांचा संबंध आला, तेथे तिथे तितक्यापुरता त्या घटनांचा परामर्ष घेऊन त्या विशिष्ट प्रसंगी काकांच्या हातून घडलेले कार्य वाचकांसमोर मांडणे आवश्यक आहे.

## फाजलअल्ली कमिशनची नेमणूक

एकाच भाषेचे आणि संस्कृतीचे लोक एकत्र आल्याने ते समरस होतील आणि त्यायोगे संबंध देशात राष्ट्रीय एकात्मतेचे एकसंघ रुप निर्माण होईल, या भावनेने प्रेरित होऊन भारत सरकारने देशात भाषावार प्रांतरचना करण्याचा निर्णय घेतला आणि १९५३ च्या नोव्हेंबरमध्ये राज्यपुनर्रचना समितीची म्हणजेच फाजलअल्ली कमिशनची नेमणूक केली. या कमिशनसमोर महाराष्ट्र एकीकरण समितीने परिश्रमपूर्वक तयार केलेली सीमाभागाची कैफियत सादर केली. या कैफियतीत बेळगाव, निपाणी, कारवार व आसपासच्या मराठी भागाची विस्तृत माहिती देऊन हा संपूर्ण भाग महाराष्ट्राशी सलग आणि अविभाज्य असून सांस्कृतिक, ऐतिहासिक, आर्थिक, राजकीय वगैरे सर्व दृष्टीने महाराष्ट्राशी एकरुप आहे, असे साधार प्रतिपादिले आहे.

आपली कैफियत आपण समर्थपणे मांडलेली आहे. त्या आर्थी राज्यपुनर्रचना समिती आपल्याला न्याय देईल, असे या भागातील प्रत्येक मराठी भाषिकाला वाटत होते पण त्यांची ही अपेक्षा फोल ठरली. ता. १० ऑक्टोबर १९५५ रोजी रा. पु. समितीचा अधिकृत अहवाल प्रसिद्ध झाला आणि बेळगाव– कारवार– निपाणीच्या सर्व मराठी भागाचा समावेश कर्नाटकात झाला असल्याचे जाहीर करण्यात आले, आणि अशा रीतीने मराठी भाषिक जनतेच्या साऱ्या आशा आकांक्षा धुळीला मिळाल्या. परिणामी बेळगाव शहरातील वातावरण कमालीचे प्रक्षुब्ध झाले. पूर्वी कधीही नव्हता असा स्वयंस्फूर्त कडकडीत हरताळ त्या दिवशी पडला. सायंकाळी सुप्रसिद्ध नागरिक कै. भुजंगराव दळवी यांच्या अध्यक्षतेखाली युनियन जिमखान्यावर निषेधाची प्रचंड सभा झाली. मराठी जनतेने १००० तारा व १,२७,००० नागरिकांच्या सह्यांचा अर्ज पंतप्रधानांकडे पाठवून आपला निषेध नोंदवला.

पुढे अकराच दिवसानी म्हणजे २१ ऑक्टोबर रोजी पुणे येथे महाराष्ट्र प्रवेश कॉंग्रेस कमिटीची बैठक भरली होती. या बैठकीस बेळगावहून काका, निपाणीहून श्री देवचंद शहा व श्री अनंतराव कटकोळ आदि पंधरा कार्यकर्ते उपस्थित राहिले व त्यानी बेळगाव– कारवारची कैफियत सभेपुढे मांडली. याच समयास महाराष्ट्र एकीकरण समितीच्या एका शिष्टमंडळाने दिल्ली येथे कॉंग्रेसश्रेष्ठींची वेगळी मुलाखत घेऊन त्यांच्यापुढे सीमाभागाची बाजू मांडली. या शिष्टमंडळात

काका, पुंडलिकजी, डॉ. कोवाडकर, कारवारचे आनंदराव मुजुमदार, निपाणीचे श्री देवचंद शहा, हल्याळचे श्री. श्रीपादराव देशपांडे, अशी मंडळी होती. त्यानंतर श्री. शंकरराव देव, श्री. काकासाहेब गाडगीळ, एस. एम. जोशी, आचार्य अत्रे आदि महाराष्ट्रातील नामांकित पुढाऱ्यांनी सीमाभागात दौरे काढले. विराट सभा गाजल्या. त्यामुळे सीमाभागातील मराठी जनतेच्या, महाराष्ट्रात सामील होण्याच्या आकांक्षा अधिक प्रज्वलित झाल्या.

## १७ जानेवारीचा रक्तलांच्छित दिवस

महाराष्ट्र एकीकरण समिती आणि संयुक्त महाराष्ट्र समिती यांनी केलेली शिष्टाई, घेतलेल्या सभा, भरविलेली संमेलने, अर्ज विनंत्या, निदर्शने इत्यादींच्या द्वारे केलेले सर्व प्रयत्न आणि बेळगाव तालुका ग्रामीण मतदारसंघातून विधानसभेच्या जागांसाठी मराठी उमेदवार निवडून देऊन जनतेने दिलेला कौल, हे सारे धुडकावून ता. १६ जानेवारी १९५६ रोजी पंतप्रधान पं. नेहरु यांनी अनपेक्षितपणे राज्यपुनर्रचना समितीच्या अन्याय शिफारशी कायम केल्याचे आकाशवाणीवरून जाहीर केले.त्यामुळे मराठी भाषिकांच्या भावना अक्षरश: लाथाडल्या गेल्या. आपल्याच सरकारने आपल्याच प्रजेच्या आकांक्षांचा अशा रीतीने चक्काचूर केला. मराठी भाषिकांपुढे अंधार पसरला. नैराश्य आले. त्या नैराश्यातूनच प्रक्षोभ उफाळून वर आला. आणि परिणामी ता. १७ जानेवारी १९५६ हा दिवस सीमाभागाच्या इतिहासात 'रक्तलांच्छित दिवस' ठरला!

सकाळपासूनच लोक गटागटाने रस्त्यावरून फिरु लागले होते. 'नाही नाही कधीही नाही कर्नाटकात जाणार नाही' अशा घोषणा देत लोक आपली तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करीत होते. शहरातील व उपनगरातील सर्व शाळाकॉलेज ओस पडली. सारे उद्योग व्यापार थंडावले. घोषणा, निषेध, निदर्शने यांना ऊत आला. वातावरण तंग झाले. लोकक्षोभ भडकून शांतताभंग होऊ नये म्हणून स्थानिक नेते जिवापाड प्रयत्न करीत होते. पण प्रक्षुब्ध झालेल्या जमावाला आता विवेक राहिला नव्हता. शहरात ठिकठिकाणी निदर्शने करून लोक आपली चीड व असंतोष व्यक्त करीत होते.

दोन प्रहरानंतर परिस्थितीने उग्र स्वरुप धारण केले. ठिकठिकाणी रस्ते अडवून वाहतुकीला अडथळे निर्माण करण्यात आले. लोकांमधील वाढता प्रक्षोभ पाहून पोलिसांचे माथे भडकले व त्यांनी नि:शस्त्र जमावावर धडाधड गोळ्या चालविल्या. त्या गोळीबारात पैलवान मारुती बेन्नाळकर, मधू बापू बांदेकर, महादेव बारीगडी आणि लक्ष्मण गावडे असे चौघे ठार झाले आणि अनेक जखमी झाले. तिकडे निपाणी शहरातही अशीच उग्र निदर्शने झाली. त्यावेळी झालेल्या पोलीसी गोळीबारात श्रीमती कमलाबाई मोहिते ही विवाहित महिला बळी पडली. नंतर पुढे आठ दिवसपर्यंत बेळगाव शहरात संचारबंदी जारी करण्यात आली होती.

## ९ मार्च: सत्याग्रहाचे पहिले आंदोलन

रा. पु. समितीने केलेल्या अन्यायाचे स्वरुप केवळ बेळगाव, निपाणी, कारवारच्या मराठी भागापुरतेच मर्यादित नव्हते. उभ्या महाराष्ट्रावरच त्या समितीने अन्यायाचा आसूड उगारला होता व परिणामी मुंबईचे द्वैभाषिक राज्य निर्माण केले होते. त्यामुळे महाराष्ट्राच्या अस्मितेला तडा गेला होता. यावेळी साऱ्या महाराष्ट्राने एकजूट दाखविली. काँग्रेस पक्ष वगळता, सर्व राजकीय पक्षांनी एकत्र येऊन संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना केली. मुंबई, विदर्भ, मराठवाडा आणि बेळगाव, निपाणी, कारवारसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाला पाहिजे, या मागणीसाठी या समितीने आंदोलन उभे केले. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या बरोबरीने बेळगावच्या महाराष्ट्र एकीकरण समितीने

आंदोलनात भाग घेऊन ही एकजूट प्रभावी केली.

१७ जानेवारी या दिवशी पोलिसी गोळीबारात झालेले चौघांचे बलिदान, त्यानंतर पोलिसांनी चालविलेली बेसुमार दडपशाही यामुळे जनतेच्या मनातील प्रक्षोभ आंतल्याआंत धुमसत होता. म. ए. समितीने जनतेच्या या क्षोभाला शांततापूर्ण

सत्याग्रहाचे स्वरूप दिले. मराठी लोकांची बाजू सत्याची व न्यायाची आहे, हे पटवून देण्याकरीता ता. ९ मार्च १९५६ रोजी समितीने सत्याग्रहाचे रणशिंग फुंकले. या सत्याग्रह आंदोलनात पांच हजाराहून अधिक लोकांनी भाग घेतला. त्यात शेकडो स्त्रियांही होत्या. त्यांना तीन ते नऊ महिन्यापर्यंत शिक्षा झाल्या पुढे केंद्र सरकारने हा सीमेचा प्रश्न झोनल कौन्सिलमार्फत सोडविला जाईल, असे आश्वासन दिल्यामूळे ता. २७–८–५६ रोजी सत्याग्रह मागे घेण्यात आला.

## ‘तुमची बाजू बळकट आहे!’ पंतप्रधानांचे आश्वासन

१९५६ च्या जुलै मध्ये राज्यपुनर्रचनेचे बिल लोकसभेसमोर चर्चेला आले. त्यावेळी केंद्रीय गृहमंत्री कै. प. गोविंदवल्लभपंत यांनी ‘सीमेचा प्रश्न सोडविलाच पाहिजे तो तसाच ठेवता येणार नाही’ असे घोषित केले. त्यानंतर ता. ११–८–५६ रोजी म. ए. समितीचे एक शिष्टमंडळ दिल्लीस काँग्रेसश्रेष्ठींच्या भेटीस गेले. या मंडळाने पंतप्रधान पं. नेहरू व पं. गोविंदवल्लभपंत यांच्या भेटी घेऊन बेळगाव कारवारची बाजू सविस्तरपणे त्यांच्यासमोर मांडली. पं. नेहरूनी शिष्ट मंडळाचे म्हणणे शांतपणे ऐकुन घेतले आणि ‘तुमची बाजू बळकट आहे. देशासमोरील मोठया प्रश्नांचा एकदा निकाल होऊ द्या. मग आपल्या सीमेच्या प्रश्नाचा शांततेच्या वातावरणात जरूर विचार करू’ असे आश्वासन दिले. पं. गोविंदवल्लभ यांनीही संसदेत या आश्वासनाचा पुनरूच्चार केला. या दोन ज्येष्ठ नेत्यांची आश्वासने आणि सीमाप्रश्न सोडविण्यासाठी विभागीय मंडळाना आवश्यक ते अधिकार देण्याचा केंद्र करकारने घोषित केलेला निर्णय, या गोष्टी लक्षात घेऊन म. ए. समितीने सत्याग्रहाचे आंदोलन स्थगीत केले.

## १ नोव्हेंबरचा ‘काळा दिन’

त्यानंतर १ नोव्हेंबरचा दिवस उजाडला. या दिवशी राज्यपुनर्रचना अंमलात येऊन सीमेचा भाग म्हैसूरमध्ये समाविष्ट करण्यात आला. म्हणून हा दिवस बेळगाव–निपाणी–कारवारच्या समग्र सीमाभागात ‘सुतक दिन’ म्हणून पाळण्यात आला. बेळगाव शहरात या दिवशी तीस हजार लोकांची प्रचंड मूक मिरवणूक उघड्या डोळयांनी निघाली. मिरवणुकीत सामील झालेल्या स्त्री पुरूषांनी हातात काळे झेंडे आणि छातीवर काळया फिती धारण केल्या होत्या. या मिरवणुकीचे हे दृष्य स्मरणातून कधीही जाणार नाही, इतके गांभीर्यपूर्ण होते. ही मिरवणूक प्रत्यक्ष पहिलेल्या सेंट्रल इंटेलिजन्स डिपार्टमेटच्या एका अधिकाऱ्याने असे उद्‌गार काढले की, ‘‘बांदे येथे पत्रादेवी नाक्यावर पोर्तुगीज पोलीसांच्या गोळीबाराला बळी पडलेले निश:स्त्र भारतीय सत्याग्रही आणि आपल्यावर आलेल्या अन्यायाबद्दल निषेध व्यक्त करण्याकरीता निघालेली ही तीस हजारांची प्रचंड मिरवणुक ही दोन दृष्ये मी जन्मात विसरणार नाही.’’

## १९५७ ची सार्वत्रिक निवडणुक

१९५७ साल उजाडले. देशात सार्वत्रिक निवडणुकांची धामधुम सुरू झाली. सीमाभागात, सीमाप्रश्नावरच ही निवडणूक म. ए. समितीने लढविली व जिंकली. याच निवडणुकीत चंदगड भाग मतदारसंघातून काका उभे होते. चंदगड भागात काकानी भरीव स्वरूपाचे रचनात्मक कार्य

केले होते व तेथील जनतेशी त्यांच्या घनिष्ठ संबंध आला होता. काकांच्या उमेदवारीला म. ए. समितीने आपला अधिकृत पाठिंबा जाहीर केला होता. असे असता म. ए. समितीतच असलेल्या शे. का. पक्षाने आापला उमेदवार काकांना प्रतिस्पर्धी म्हणून उभा केला. आणि अखेर बकरी, दारू, ब्राम्हण–ब्राम्हणेत्तर वाद यांचा वापर करून शे.का.प पक्षाचा उमेदवार निवडून आला व काकांचा पराभव झाला. ही उघड उघड दगलबाजीच होती. म. ए. समितीशी हा द्रोह होता ! त्यावेळी काकांनी तरुण भारतातून लिहिलेल्या दगलबाजी, तुझे नाव शे.का.पक्ष' या अग्रलेखात या पक्षाच्या निंद्य कारवायांवर विदारक प्रकाश टाकला आहे.

## सत्याग्रह आंदोलनाचे दुसरे पर्व

केंद्र सरकारने अभिवचन दिल्याप्रमाणे विभागीय मंडळापुढे सीमेचा प्रश्न अधिकृतरित्या विचारासाठी कधीच आला नाही. दरम्यान मुंबई व म्हैसूर उभय राज्यांचे मुख्यमंत्री भेटले, बोलले, पण केणत्याही मुद्यावर त्यांचे एकमत झाले नाही. परिणामी आपल्या न्याय्य हक्काकरीता म.ए. समितीला मुंबईच्या संयुक्त महाराष्ट्र समितीच्या जोडीने सत्याग्रहाच्या दुसऱ्या लढ्याला ता. १ नोव्हेंबर ५८ रोजी प्रारंभ करणे भाग पाडले. या दिवशी बेळगाव येथे कलेक्टर कचेरीच्या आवारात भाई माधवराव बागल यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रहींच्या पहिल्या तुकडीने सत्याग्रह केला. या तुकडीत मालवणचे ८० वर्षाचे वयोवृद्ध सत्याग्रही व काँग्रेस आमदार कै. शंकरराव गव्हाणकर (माझे आजोबा– आईचे वडील) हे होते. सत्याग्रह केल्याबद्दल त्यांना अटक करून कोर्टात हजर करण्यात आल्यानंतर न्यायाधीशांनी त्यांच्या वृद्धावस्थेकडे पाहून 'आपणास काही सौम्य शिक्षा हवी आहे काय?' असा प्रश्न केला. पण पूर्वी ब्रिटिश आमदानींत ब्रिटिश सरकारविरूद्ध झालेल्या राजकीय आंदोलनात चार वेळा कारावासाची शिक्षा भोगलेले माझे आजोबा उत्तरले, ''मी एक वकील आहे. जाणूनबुजून मी कायद्याचे उल्लंघन केले आहे. तेव्हा जास्तीत जास्त जेवढ्या शिक्षेस मी पात्र आहे ती सर्व शिक्षा मला द्या. त्याची खंत मला नाही.'' या संयुक्त सत्याग्रह आंदोलनात १६००० लोकांनी भाग घेतला होता.

## २६ नोव्हेंबरची कन्नड परिषद

या श ांततामय मार्गाने चाललेल्या सीमासत्याग्रहाच्या आंदोलनाला गालबोट लावण्याचे बरेच प्रयत्न कन्नड पुढाऱ्यांनी केले. याचाच एक भाग म्हणून ता. २३ नोव्हेंबर रोजी लिंगराज कॉलेजच्या आवारात बेळगाव कारवार जिल्ह्यातील कन्नडिगांची परिषद भरविण्यात आली. याच दिवशी सकाळी ९.३० वाजता संभाजी चौकात सत्याग्रह होणार असल्याने अफाट जनसमूदाय तेथे जमला होता. दुसऱ्या तुकडीचा सत्याग्रह साडेदहा वाजता जनावरांच्या दवाखान्याजवळ होणार असल्याने संभाजी चौकात जमलेला जनसमुदाय तिकडे वळला, यंदे खुटाजवळ पोलीसांनी या लोकांना रोखून कॉलेज रोडवरून पुढे जाण्यास बंदी केली. तेव्हा काका प्रभृति म. ए. समितीच्या नेत्यानी लोकांना शांतपणे गोंधळीगल्लीतून जाण्याचा आदेश दिला. त्यामुळे जनसमुदायाची दिशा गोधळीगल्लीकडे वळली व तेथून तो जनावरांच्या दवाखान्याकडे गेला.

यानंतर तिसऱ्या तुकडीचा सत्याग्रह लिंगराज कॉलेजच्या प्रवेशद्वारापाशी होणार असल्याने हा जमाव तिकडे वळला. याहीवेळी पोलीसांनी जमावाला कॉलेज रोडवरून जाण्यास बंदी केली. तेव्हां हे लोक गोंधळीगल्ली, समादेवीगल्ली येथून परत लिंगराज कॉलेजच्या प्रवेशद्वाराकडे कॉलेज रोडवर आले. इकडे लिंगराज कॉलेजच्या आवारात कन्नडीगांची परिषद चालू होती. परिषदेत अत्यंत प्रक्षोभक व मराठी जनतेची बदनामी करणारी भाषणे सुरू होती. इकडे बाहेर रस्त्यावर सत्याग्रह पहाण्यासाठी गोळा झालेला मराठी भाषिकांचा जमाव संयुक्त महाराष्ट्राच्या घोषणा देत उभा होता.

असा काही वेळ गेला आणि एकाएकी अरताळ हायस्कूलच्या बाजूने जमावाच्या दिशेने दगड येऊ लागले.

परिषदेस जाण्यायेणाऱ्या लोकांना अडचण होऊ नये यासाठी लिंगराज कॉलेजच्या प्रवेशद्वाराकडे होणारा सत्याग्रह रहित करून तो दूर संभाजी चौकात न्यावा, असा समितीच्या नेत्यांनी विचार केला व लोकांना संभाजी चोकात जाण्याचा त्यांनी आदेश दिला. त्याप्रमाणे लोक संभाजी चौकाकडे वळू लागले, तोंच कोठून तरी जमावावर पुन्हा दगड आले व त्यामुळे गोंधळ निर्माण झाला. जमावाला हटविण्याकरिता पोलीस लाठया सरसावून धावले. तेव्हा साहजिकच पळापळ सुरू झाली. मग पोलीसांनी दिसेल त्याला लाठ्यांनी झोडपायचे सत्र सुरू केले. रस्त्यात दिसतील त्या निरपराध लोकांना मारहाण करण्याचा हा प्रकार दुपारी १ वाजेपर्यंत चालू होता.

## काका व श्री. सुठणकर यांना अटक

दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास तरुण भारत कचेरीसमोर काका व श्री. बा. रं. सुंठणकर हे उभे होते. त्या ठिकाणी यंदे खुटाजवळून एस. पी. लुईस हे दोन सब् इन्स्पेक्टर्स व पोलीस घेऊन आले. तेव्हा काका श्री लुईस यांना म्हणाले, 'सत्याग्रह चालू असता कन्नडिगांच्या मिरवणुकीस पोलीसांनी परवानगी दिली नसती तर आजचा प्रकार टळला असता.'' पण काकांचे बोलणे ऐकूनही न घेता लुईस यांनी काकांना उद्देशून 'रबिश' असा अपशब्द वापरला. त्यावर काकांनी हे शब्द उच्चारणे तुम्हाला शोभते काय? असा सवाल केला व लुईस यांच्याशी त्यांचा चांगलाच खटका उडाला. नंतर लुईस व पो. इन्स्पेक्टर यांनी काका आणि श्री. सुंठणकर यांना जवळ बोलावून त्यांना अटक केली.

## दिल्लीच्या वेशीवर सीमाभागाचे गाऱ्हाणे

इकडे सत्याग्रहाचे हे आंदोलन चालू असतानाच ता.१८ डिसेंबर १९५८ रोजी सुमारे ३ हजार मराठी भाषिकांचा एक विराट मोर्चा दिल्ली येथे लोकसभेवर नेण्यात आला. या मोर्च्यात सीमाभागातील १२०० लोक सामील झाले होते. हा मोर्चा लोकसभेच्या भव्य प्रवेशद्वाराजवळ अडविण्यात आला. मोर्चातील लोकांनी तेथेच ठाण मांडले. दिल्लीच्या कडाक्याच्या थंडीतही लोक रात्रभर तेथेच बसून राहिले. त्यांची एवढीच अपेक्षा होती. की, १३०० मैल लांबीवरून आलेल्या या मोर्चाला काही मिनिटे का होईना, पं. नेहरू सामोर येतील किंवा पाच मिनिटांची सवड काढून पं. गोविदवल्लभपंत सत्याग्रहींचे म्हणणे ऐकून घेतील. पण सर्वांची निराशा झाली. कोणीही नेत्यांने मोर्चातील लोकांची भेट घेतली नाही. केंद्र सरकारच्या या उपेक्षेच्या मनोवृतीमुळे सीमेच्या जनतेचा प्रक्षोभ अधिकच वाढला, आणि सत्याग्रहाचे आंदोलन तीव्रतर बनले.

## बार्डोलीची आठवण करून देणारा करबंदीचा लढा

१९५९ सालच्या एप्रिल मे मध्ये सत्याग्रह आंदोलनाचे रूपातंर साराबंदी लढ्यात झाले. हा लढा निवडक १०० खेड्यातून सुरू झाला. महाराष्ट्रात सामील होण्याचा आपला न्याय हक्क प्रस्थापित करण्याकरिता हजारो शेतकऱ्यांनी प्राणाहूनही प्रिय अशा आपल्या जमिनी पणास लावल्या. ही चळवळ हाणून पाडण्याकरीता म्हैसुरी पोलीसांनी, सुसंस्कृत समाजाला शरमेने मान खाली घालायला लावतील अशा प्रकारचे अमानुष अत्याचार लोकांवर केले. त्यातून स्त्रिया व मुलेही सुटली नाहीत. घरांचे दरवाजे फोडून पोलिसांनी जबरदस्तीने धान्याची व इतर मालमत्तेची लुटालूट केली. याच साराबंदी आंदोलनात पोलीसांनी यळ्ळूर येथे गोळीबार केला. त्यात २९ माणसे जखमी झाली.

## मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्याची निर्मिती

१९५६ ते १९६० या चार वर्षाच्या काळात महाराष्ट्र एकिकरण समिती आणि संयुक्त महाराष्ट्र समिती यांनी चालविलेल्या प्रभावी आंदोलनामुळे दिल्लीला खडबडून जाग आली. दरम्यान १९५७ साली भारताची सार्वत्रिक निवडणूक पार पडली. निवडणूकीत सं. म. समितीने महाराष्ट्र काँग्रेसचा पार धुव्वा उडविला. इतका की काँग्रेस नेत्यांना महाराष्ट्रात राज्य करणे अशक्य होऊन बसले. बेळगाव  निपाणी कारवारच्या सीमाभागातही सर्व जागा म. ए. समितीच्या उमेदवारांनी जिंकल्या. महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाचा असा दारूण पराभव झाल्यामुळे आता महाराष्ट्राला मुंबई देण्यावाचून केंद्रीय सत्तेला गत्यंतर उरले नाही, असे उद्‌गार काढणारे काँग्रेसचे अतिरथी महारथी लोकप्रियतेच्या शिखरावरून केव्हाच ढळले होते. अखेर काँग्रेस नेत्यांनी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या जनतेच्या मागणीला मान्यता दिली. ता. १ मे १९६० या दिवशी 'मुंबईसह महाराष्ट्र' राज्याची स्थापना घडून आली. या मंगल सोहळ्याचे उद्‌घाटन पंतप्रधान प. नेहरूंच्या हस्ते झाले.

मुंबईसह महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. पण बेळगावच्या सीमेचा प्रश्न तसाच लोंबकळत राहिला. मुंबईच्या मागणीसाठीच प्रायः संयुक्त महाराष्ट्र समिती निर्माण झाली. होती. ती मागणी पदरात पडतांच स. म. समिती विर्सजित झाली. सीमाभागाच्या आंदोलनाची जबाबदारी पूर्णपणे एकट्या म. ए. समितीवर येऊन पडली. तिने ती निर्धाराने पेलली व आपले आंदोलन पुढे चालू ठेवले. नव्या महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्रीपदाची सूत्रे श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या हाती आली होती. त्यानी काका आदि सीमाभागातील नेत्यांना मुंबईला बोलवून घेतले. आणि 'कायदेभंग व साराबंदीची चळवळ तुम्ही मागे घ्या. म्हणजे सीमेचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने ते उपकारक ठरेल. मी या बाबतीत जातीने लक्ष घालतो.' असे आश्वासन दिले. या आश्वासनावर विसंबून समितीच्या नेत्यांनी करबंदीचे आंदोलन मागे घेतले. १९६० च्या जुनमध्ये पुणे येथे भरलेल्या अ. भा. काँग्रेस कमिटीच्या अधिवेशनाच्या प्रसगी कै. प. पंतांच्या सल्यानूसार, सीमाप्रश्नाचा विचार करून अहवाल सादर करण्याकरिता उभय राज्यांच्या प्रत्येकी दोन प्रतिनिधींची चौसदस्य समिती नेमण्यात आली. या समितीच्या सदस्यांचे कधीही एकमत होऊ शकले नाही. अखेर दोन वर्षानंतर या चौसदस्य समितीने आपले दोन वेगवेगळे अहवाल सादर केले. पण सीमाप्रश्न मात्र रेंगाळतच राहिला. मध्यंतरीच्या काळात सीमाभागामध्ये अनेक केंद्रीय नेते विविध प्रसंगाच्या निमित्ताने येऊन गेले. आजच्या भारताच्या पंतप्रधान व त्यावेळच्या कॉग्रेसच्या अध्यक्षा श्रीमती इंदिरा गांधी यांचेही या काळात बेळगाव येथे आगमन झाले. त्यावेळी त्यांनीही हा सीमेचा प्रश्न त्वरीत सोडविला जाईल असे आश्वासन दिले.

## संरक्षण कार्यात म. ए. समितीने उचललेला वाटा

ऑक्टोबर १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले, आणि देशात आणीबाणीची परिस्थिती जाहीर केली. तेव्हा समितीने आपली चळवळ थांबविली, आणि लागलीच राष्ट्रीय संरक्षण कार्यास सहाय्य करण्यासाठी कंबर बांधली. त्यावेळी काकांनी पुढाकार घेऊन अवघ्या तीन दिवसात ४० हजार रुपयांचा निधी गोळा करून कै. ना. लालबहादूर शास्त्री यांच्याकडे पाठविला, आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेत सीमाभागातील जनता कोणत्याही प्रकारे कमी नाही हे दाखवून दिले.

## पं. नेहरूंचे निधन

चीनच्या आक्रमणाचे संकट दूर होते न होते तोच भारताचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांचे आकस्मिक निधन घडून आले. आणि सीमाप्रश्न पुन्हा एकदा बाजूला पडला. (ता. २७ मे १९६४) पं.नेहरूनंतर ना. लालबहादूर शास्त्री हे भारताचे पंतप्रधान झाले. त्यानी हा सीमेचा प्रश्न

## शिवाजी पार्कवरील जाहीर सभा



शिवसेनेच्या शिवाजी पार्कवरील लाख लोकांच्या मेळाव्यासमोर सीमा भागातील जनतेच्या व्यथा मांडताना श्री. बाबुराव ठाकुर

## मराठी पत्रकार परिषद –जळगाव अधिवेशन (१३ मार्च १९६५)



(डावीकडून) शिवसेनेचे आमदार मनोहर जोशी, शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे, श्री. बाबुराव ठाकुर व श्री. दत्ताजी साळवी, व मागे ॲड. राजाभाऊ माने.



पणजी येथील अ. भा. कॉंग्रेस अधिवेशन प्रसंगी– म. ए. समितीचे नेते श्रीमती इंदिराजींची मुलाखत घेत असताना श्री. बा. रं. सुंठणकर, आ. सायनाक व श्री बाबुराव ठाकूर.

## मराठी पत्रकार परिषद –जळगाव अधिवेशन (१३ मार्च १९६५)



व्यासपीठावर (डावीकडून) – श्रीमती इंदिरा गांधी (भाषण करीत आहेत)बसलेले श्री. बाळासाहेब भारदे(सभापती) श्री. बाबुराव ठाकुर (अध्यक्ष) आदी मंडळी.

## मराठी पत्रकार परिषद जळगाव अधिवेशन (१३ मार्च १९६५)




श्री. बाबुराव ठाकुर (भाषण करीत आहेत) व्यासपीठावर (डावीकडून)– बसलेले श्री. ब्रिजलाल बियाणी, (स्वा. अध्यक्ष), श्री. बाळासाहेब भारदे (सभापती म. विधिमंडळ), श्रीमती इंदिरा गांधी, ना. मधुकरराव चौधरी.

नजीकच्या भविष्यकाळात सोडविण्याचे आश्वासन दिले. त्याने सीमाभागातील जनतेच्या आशा थोड्या पालवतात न पालवतात तोच भारतावर पाकिस्तानच्या आक्रमणाचे दुसरे संकट कोसळले. स्वाभाविकच देशांतर्गत सर्व प्रश्न बाजूला ठेवून राष्ट्रीय संरक्षणाच्या कमी जनतेला आपल्या साऱ्या शक्ती एकवटाव्या लागल्या. यावेळीही काकानी पुढाकार घेऊन जवान फंडाकरिता सुमारे रु. ६०००० चा निधी गोळा करून तो कमांडंट मराठा इन्फंट्री यांच्या स्वाधीन केला. त्याबद्दल कर्नल बेलिअप्पा यानी खास प्रशस्तीपत्र देऊन काकांच्या या कामगिरीचा गौरव केला आहे.

## ना. शास्त्री यांचा आकस्मिक अंत

ना.लालबहाद्दूर शास्त्री यानी पाकिस्तानचे आक्रमण मोठ्या शौर्याने परतवून लावले आणि भारताच्या इतिहासात पराक्रमाचा एक नवा अध्याय लिहिला. ना. शास्त्री हे आपल्याला निश्चित न्याय देतील, अशी प्रबल आशा सीमाभागातील जनतेच्या मनात उत्पन्न झाली. तोच ना. शास्त्री यांचा रशियात ताश्कंद येथे आकस्मिक अंत घडून आला. पुढे श्रीमती इंदिराजी पंतप्रधान झाल्या. याच समयास सेनापती बापट यांनी मुंबई येथे सीमाप्रश्नाची सोडवणूक त्वरित झाली पाहिजे, या मागणीसाठी उपोषण आरंभिले. यातूनच एकसदस्य महाजन कमिशनची नियुक्ती झाली. या कमिशनने वादग्रस्त प्रदेशातील जनतेच्या भेटी घेऊन त्यांचे म्हणणे ऐकले, आणि यथाकाल आपला अहवाल लोकसभेला सादर केला. पण हा अहवाल अत्यंत विसंगत, तत्त्वशून्य, तर्कदुष्ट विधानानी भरलेला असा विपरीत व विकृत अहवाल होता. या अहवालाने सीमाभागातील मराठी भाषिकात प्रक्षोभाची लाट उसळली आणि सर्वत्र निषेधाच्या सभा गाजल्या.

## शिवसेनेची आंदोलने

सीमाप्रश्न सोडविण्याच्या बाबतीत केंद्राकडून चाललेली दिरंगाई पाहून सीमाभागातील मराठी जनता हळूहळू संतप्त होऊ लागली होती. सीमाप्रश्न सोडवून घेण्यास जो कोणी पुढे येईल– मग तो देवदूत असो किंवा दैत्य असो त्याच्या पाठिशी एकजुटीने उभे राहण्याचा निर्धार सीमेच्या जनतेने केला यामुळेच जेव्हा शिवसेनेने हा प्रश्न सोडविण्यासाठी हाती घेतला, त्यावेळी सीमाभागातील लोकांनी शिवसेनेच्या या निर्णयाचे हार्दिक स्वागत केले. या प्रश्नावर पुढे मुंबईत शिवसेनेने न भूतो न भविष्यती असे उग्र आंदोलन उभे केले. (ता. ८ फेब्रुवारी १९६९) त्यात ६४ तरुण शिवसैनिकांचे बलिदान घडून आले. एवढ्यानेही भागले नाही. तर पुढे १९७० च्या फेब्रुवारी महिन्यात शिवसेनेने 'मुंबई बंद' चा अभूतपूर्व विक्रम करून दाखविला. एक संपूर्ण दिवस साऱ्या मुंबईच्या नाड्या आखडून गेल्या होत्या. त्या अफाट नगरातले दळणवळणाचे सारे सारे व्यवहार पूर्णपणे बंद पडले होते. दिवसाचे चोवीस तास जे शहर अखंड उद्योगरत असावयाचे, त्या शहरात एक संपूर्ण दिवस सारे व्यवहार बंद पडून जणू स्मशानशांतता निर्माण व्हावी, हा प्रकार अपूर्व, अद्‌भूत म्हटला पाहिजे. ही किमया शिवसेनेने करून दाखविली.

## आचार्य अत्र्यांचे देहावसान

दिवसामागून दिवस, महिन्यामागून महिने उलटत होते. सीमाप्रश्न रेंगाळतच होता. सीमाभागातील जनतेचा लोकशाहीवरचा विश्वास हळूहळू डळमळू लागला होता. एकप्रकारची वैफल्याची भावना तिच्या मनात रूजू लागली होती. अशातच एके दिवशी आचार्य अत्रे यांचे निधन घडून आले. 'बेळगाव–निपाणी, कारवार सह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' या मराठी जनतेच्या मागणीसाठी ज्यांनी आपली वाणी व लेखणी एखाद्या तळपत्या तलवारी सारखी वापरली, त्या 'मराठाकार' अत्र्यांचे निधन ही सीमाभागाच्या चळवळीचीही मोठीच हानी होती. त्यांच्या मृत्यूचे व्यक्तिशः काकाना फार दुःख झाले. आचार्य अत्र्यांचे व काकांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. काका

मुंबईला गेले की शिवशक्तींत जाऊन आचार्यांची भेट घेतल्याशिवाय राहात नसत. आणि आचार्य अत्रेसुद्धा बेळगावला आल्यानंतर तरुण भारत कार्यालयात जाऊन काकांशी चार दिलखुलास गप्पा मारल्याशिवाय पुढे जात नसत. आचार्यांच्या निधनाने संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाचा जणू बुरूज ढासळला.

## सीमाभाग पोरका झाला : बॅ. नाथ पै यांचे निधन

आचार्य अत्र्यांच्या निधनानंतर पुढच्या वर्षी सीमाभागातील जनतेवर दुसरा जबरदस्त आघात झाला, तो बॅ. नाथ पै यांच्या मृत्यूचा! सीमाआंदोलनात अनेक चढ–उतार झाले. यशापयशाचे अनेक प्रसंग सीमेच्या जनतेने अनुभवले. पण नाथ पैच्या मृत्यूची घटना हा सीमा–आंदोलनावरच नव्हे, तर सीमाभागातील जनतेच्या अंतःकरणावर जणू वज्राघात होता. नाथांच्या निधनाने सीमाभागाचा तारणहार हरपला, सीमाभाग पोरका झाला!

१७ जानेवारी १९७१ चा तो दिवस. हुतात्मा दिन. त्या दिवसाच्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे या नात्याने नाथ पै यांचे युनियन जिमखान्यावरच्या जाहीर सभेत सायंकाळी भाषण झाले. काका हे अध्यक्षस्थानी होते. त्या भाषणात त्यानी आपल्या मनाची व्यथा मोकळेपणाने व्यक्त केली. सीमाप्रश्न सोडविण्यासाठी केलेल्या परिश्रमांचा जणू आढावाच त्यांनी आपल्या भाषणात घेतला. त्यांचे ते भाषण मोठे भावनोत्कट व श्रोत्यांच्या काळजाला हात घालणारे असे झाले. पण त्यांचे ते अखेरचेच भाषण ठरले. कारण त्याच रात्री डॉ. याळगी यांच्या निवासस्थानी बॅ. नाथ पै यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. दुसऱ्या दिवशी सायंकाळी निघालेली त्यांची विराट अंत्ययात्रा पाहून या माणसाविषयी जनमानसात केवढा आदर व प्रेम वसत होते याची पुरेपूर प्रचिती आली.

सीमेचा प्रश्न सोडविण्यासाठी व्यक्तिशः बॅ. नाथ पै यांनी जेवढे प्रयत्न केले, तेवढे अन्य कोणीही केले नाहीत, असे म्हटल्यास ते अतिशयोक्तीचे होणार नाही. लोकसभेमध्ये दहा वर्षांहून अधिक काळ सीमेचा प्रश्न ज्वलंत आणि जिवंत ठेवण्यासाठी आपल्या बुद्धिमत्तेचा व वक्तृत्वाचा त्यांनी प्रभावीपणे उपयोग केला. दिल्लीत या तरुण नेत्याने केवढेतरी आदराचे स्थान मिळविले होते. लोकसभेतील विरोधी पक्षीयांतच नव्हे, तर सत्ताधारी पक्षातही त्यांच्या शब्दाला चांगलेच वजन होते. याचा प्रत्यय सीमाभागातून जी जी शिष्टमंडळे दिल्लीस गेली, त्यांना पुरेपूर आला आहे. एरवी दिल्लीत पंतप्रधानांच्या भेटीगाठी घेणे सहजसाध्य काम नव्हे, पण नाथ पै यांनी ते चुटकीसरशी घडवून आणले, याचा चांगलाच प्रत्यय त्यावेळी अनेकांना आला. पंतप्रधान श्रीमती इंदिराजी, फक्रुदिन अली अहमद, जगजीवनराम यांच्यापासून तो तहत विरोधी पक्षातील जे जे म्हणून प्रमुख होते, त्या सर्वांनाच त्यानी हा सीमेचाप्रश्न तत्त्वाच्या आधारे सुटावा म्हणून गळ घातली होती आणि तो त्यांचा प्रयत्न अखेरपर्यंत चालू होता. सीमाप्रश्नाच्या सोडवणुकीचा जणू त्याना ध्यासच लागला होता आणि अंती याच प्रश्नासाठी त्यांचे बलिदान घडून आले.

दोनच महिन्यावर भारताची सार्वत्रिक निवडणूक आली होती. आणि इकडे बॅ. नाथ पै यांचे असे आकस्मिक निधन घडून आले. नाथ पै दक्षिण रत्नागिरी मतदारसंघातून उभे राहणार होते. त्यांची उणीव भरून काढील असा नेता त्या जागी उभा करणे आवश्यक होते. ही निवडणूक सीमाभागाच्या दृष्टीनेही महत्त्वाची होती. सुदैवाने बॅ. नाथ पै यांची उणीव बहुतांशाने भरून काढील असा नेता प्रा. मधु दंडवते याना या जागी उभे करण्यात आले. नंतर काका, डॉ. याळगी, आ. सायनाक हे दक्षिण रत्नागिरी मतदारसंघात प्रा. दंडवते यांच्या प्रचारार्थ जाऊन आले. या

निवडणुकीत महाराष्ट्रातील दक्षिण रत्नागिरीची ही जागा वगळता एकूण एक जागा नव काँग्रेसने जिंकल्या.

बेळगाव शहर मतदारसंघातील म्हैसूर विधानसभेच्या जागेकरिता झालेली निवडणूक तर कधी नाही इतकी चुरशीची झाली. पण तीही महाराष्ट्र एकीकरण समितीचे उमेदवार सायनाक यानी प्रचंड बहुमताने जिंकली आणि पुन्हा एकदा हा सीमाभाग महाराष्ट्राचाच आहे असे सिद्ध केले. तरुण भारताने यावेळी मोठीच प्रभावी कामगिरी बजावली.

## ता. २२ एप्रिल १९७३ ची सीमा–परिषद

२२ एप्रिल १९७३ या दिवसाला सीमा–आंदोलनाच्या इतिहासात एक आगळे महत्त्व आहे. या दिवशी बेळगाव शहरात ऐतिहासिक महत्त्वाची गणली जाईल अशी सीमापरिषद भरली. दुपारी ३ वा. युनियन जिमखान्यावर उभारलेल्या भव्य अशा बॅ. नाथ पै सभागृहात परिषदेच्या कामास मोठ्या उत्साहाने प्रारंभ झाला. महाराष्ट्र विधानपरिषदेचे उपसभापती व रिपब्लिकन पक्षाचे नेते रा.सु. गवई यांनी परिषदेचे अध्यक्षस्थान विभूषित केले होते. समाजवादी खासदार ना. ग. गोरे यांच्या हस्ते परिषदेचे उद्‌घाटन झाले. परिषदेचे स्वागताध्यक्ष म्हणून काकांची योजना झाली होती. या सीमा परिषदेला खासदार मधू दंडवते, आ. सी.आर. खानोलकर, आ. दत्ता ताम्हणे, महाराष्ट्र समाजवादी पक्षाचे अध्यक्ष किशोर पवार, आदी महाराष्ट्रातील नेतेमंडळी उपस्थित होती. शिवाय स्थानिक तसेच कारवार, सुपा, हल्याळ, दांडेली, लोंढा, खानापूर, नंदगड त्याचप्रमाणे निपाणी, बीदर, भालकी, मंगसुळी आणि चंदगड या सर्व भागातून मिळून ३५०० प्रतिनिधी परिषदेला हजर होते.

प्रारंभी काकांचे स्वागतपर भाषण झाले. त्यानी गेल्या सतरा वर्षातील सीमाआंदोलनाचा आढावा घेतला, आणि ते म्हणाले, ‘‘सीमाभागातील १० लाख मराठी जनता आज कोंडीत सापडली आहे. म्हैसूर सरकारच्या विरोधात आणि त्यांच्या आक्रमक पावलाना तोंड देत ती उभी ठाकली आहे. ज्यांच्या आधारावर आम्ही महाराष्ट्रात जाण्याची स्वप्ने रंगवावीत, ते महाराष्ट्र शासन सीमाप्रश्नाच्या बाबतीत उदासीन आहे, आणि केंद्राला तर या प्रश्नाची पर्वा नाही. अशा परिस्थितीत सीमाभागातील जनतेला हा लढा एकाकी द्यावा लागत आहे.’’

सीमापरिषदेचे काम आटोपल्यानंतर सायंकाळी त्याच मैदानावर विराट जाहीर सभा गाजली. या सभेला सुमारे ३०००० चा प्रचंड जनसमुदाय हजर होता. या सभेमध्ये रा. सु. गवई, किशोर पवार, आ. दत्ता ताम्हणे, खा. मधु दंडवते, खा. नानासाहेब गोरे, आ.सी. आर. खानोलकर प्रभूतींची भाषणे झाली.

प्रस्तुत सीमापरिषदेने संमत केलेल्या ठरावात केंद्र सरकारला असा गंभीर इशारा दिला की, ‘‘१ नोव्हेंबर १९७३ च्या काळ्या दिनापूर्वी हा सीमेचा प्रश्न भौगोलिक सलगता, खेडे हा घटक, भाषिक बहुसंख्या आणि लोकेच्छा या निश्चित तत्त्वांच्या आधारे सोडविण्यात आला नाही, तर पुन्हा एकदा तीव्र आंदोलन उभे करणे. सीमाभागातील जनतेला भाग पडेल आणि त्याच्या परिणामांची सर्व जबाबदारी सरकारवर राहील. सीमाभागातील जनतेचा हा प्रश्न मानवी मूल्ये व लोकशाही सिद्धांत यावर अधिष्ठित असल्याने देशातील सर्व राजकीय पक्षांनी या प्रश्नावर सीमाभागातील जनतेच्या पाठिशी उभे रहावे’’ असे कळकळीचे आवाहनही या परिषदेने केले.

महाराष्ट्र–म्हैसूर सीमा आंदोलनाची ही धावती रूपरेखा आहे. गेली १६–१७ वर्षे चालू

असलेल्या या सीमाभागाच्या लढ्यात अशी एकही घटना दाखविता येणार नाही की जिच्याशी काकांचा संबंध आलेला नाही. या भागातील एक झुंझार नेता या नात्याने या चळवळीच्या प्रत्येक टप्प्यात त्यानी भाग घेतलेला आहे– नव्हे नेतृत्व केले आहे. या आंदोलनाच्या संदर्भात तरुण भारताच्या द्वारे काकानी केलेली  कामगिरी तर केवळ अविस्मरणीय आहे हा सीमाप्रश्न सतत जिवंत ठेवण्याचे काम केवळ तरुण भारतानेच केले आहे, असे म्हटल्यास ते अतिशयोक्तीचे होणार नाही. सीमाप्रश्नाकरिता आजवर ज्या ज्या सभा–परिषदा झाल्या, जे सत्याग्रह आले, जे मोर्चे निघाले, जी शिष्टमंडळे दिल्लीला गेली त्या सर्वांमध्ये काका नेहमीच अग्रभागी राहिले आहेत.

सीमेचा प्रश्न हा लोकशाहीच्या कसोटीचा प्रश्न आहे. या प्रश्नामागे काही निश्चित अशी तत्त्वप्रणाली आहे. ज्या संस्कृतीत आपण जन्मलो, लहानाचे मोठे झालो, जिच्या संस्कारांनी आपले व्यक्तित्व घडले, त्या मराठी संस्कृतीचा रोमरोमी अभिमान बाळगणाऱ्या जनतेचा हा लढा आहे. म्हणूनच तो दडपशाहीने दबला गेलेला नाही व जाणार नाही. स्वतःच्या मराठी मायबोलीच्या शेजारच्या राज्यात महाराष्ट्रात आम्हाला जाऊ द्या, ही जनतेची साधी सरळ मागणी सतरा वर्षे उलटली तरी मान्य होत नाही, ही भारतीय लोकशाहीची शोकांतिका आहे!

प्रकरण नववे

# वृत्तपत्र क्षेत्रातील कर्तृत्वाबद्दल गौरव

## मराठी पत्रकार परिषद

तरुण भारत अर्ध– साप्ताहिक असतानाच्या काळात एक वृत्तपत्रकार या नात्याने काकाना एकापेक्षा एक बहुमान मिळत गेले. एक वृत्तपत्र म्हणून तरुण भारताचा आणि निष्ठावंत पत्रकार म्हणून काकांचा गौरव या १०–१२ वर्षांच्या काळात अनेकवेळा झाला. त्यातील पहिला प्रसंग म्हणून १९५० साली बेळगाव येथे भरलेल्या मराठी पत्रकार परिषदेचा उल्लेख करावा लागेल. या परिषदेचे स्वागताध्यक्ष म्हणून काकांची निवड झाली होती. या परिषदेचे दहावे अधिवेशन ता. ११ फेब्रुवारी १९५० रोजी बेळगाव येथे राणी पार्वतीदेवी कॉलेजच्या परिसरात भरले होते. आधुनिक पत्रकारांचे महर्षि म्हणून ज्यांचा गौरव केला जातो, त्या कै. आचार्य अत्रे यांची या परिषदेच्या अध्यक्षपदी निवड झाली होती. या अधिवेशनाच्या निमित्ताने आचार्य अत्रे यांच्याबरोबर महाराष्ट्रातील अनेक ख्यातनाम पत्रकारांचे बेळगावास आगमन झाले होते. त्यामध्ये प्रामुख्याने प्रभाकर पाध्ये, श्री. शं. नवरे, कै. ह. रा. महाजनी, य. कृ. खाडिलकर, कै. दा. वि. ऊर्फ बाबुराव गोखले, ना. ग. गोरे, पु. रा. बेहरे आदी पत्रकार व पत्रप्रतिनिधी यांचा समावेश होता.

अधिवेशनाला ता. १० फेब्रुवारी या दिवशी प्रारंभ झाला. स्वागताध्यक्ष या नात्याने काकानी केलेल्या आपल्या आटोपशीर भाषणात प्रारंभी बेळगावच्या प्राचीन इतिहासाचे समालोचन केले, आणि नंतर बेळगावातील गेल्या पाऊण शतकातील वृत्तपत्रीय व साहित्यिक परंपरेचा आढावा घेतला. बेळगाव व बेळगावचा मराठी परिसर हा महाराष्ट्राचाच भाग असल्याचे विविध पुराव्यानी श्रोत्यांना पटवून देऊन वृत्तपत्र व्यवसायाबद्दलची आपली स्वत:ची भूमिकाही त्यानी स्पष्ट केली. ही भूमिका विशद करताना ‘पत्रकार हे जनतेचे मार्गदर्शक आहेत आणि वृत्तपत्रे ही लोकमत बनविण्याची प्रभावी साधने आहेत’’ असे सांगून वृत्तपत्राला कराव्या लागणाऱ्या कार्याबद्दल बोलताना ते म्हणाले,

"लोकांची न्याय्य गाऱ्हाणी वेशीवर टांगून ती दूर करण्याचे काम वृत्तपत्राना करावे लागते. जेथे जेथे सामाजिक, आर्थिक, धार्मिक अन्याय होत असेल तेथे तेथे त्या अन्यायाविरुद्ध निर्भयपणे झगडा देण्यासाठी वृत्तपत्रांना कंबर कसावी लागते. राज्यकर्ते आपल्या कर्तव्यापासून च्युत होत असतील, तर त्यांना मार्गावर आणण्याचे काम वृत्तपत्रांना करावे लागते. त्याचप्रमाणे सामान्य नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर जेव्हा गदा येते, तेव्हा त्यांचे रक्षण करण्यासाठी पत्रकारालाच पुढे सरसावे लागते."

त्यानंतर एकूण भारतीय वृत्तपत्रव्यवसायाला जे अनिष्ट वळण लागले आहे त्याबद्दल चिंता व्यक्त करून काका म्हणाले, "वृत्तपत्र– व्यवसाय पाश्चात्य देशाप्रमाणे येथेही भांडवलदारांच्या हातातील एक मोठा धंदा होऊ लागला आहे. त्यामुळे पत्रकारांना दिवसेंदिवस आपली स्वत:ची ध्येये बाजूला ठेवून भांडवलदारांच्या हातातील कळसूत्री बाहुली बनणे भाग पडू लागले आहे. परिणामी या व्यवसायाला दिवसेंदिवस धंदेवाईक कंपनीचे स्वरूप येऊ लागले आहे. अशा अवघड परिस्थितीतही पत्रकाराने आपल्या व्यवसायाचे पावित्र्य अबाधित राखणे जरुर आहे..."

परिषदेचे उद्‌घाटक या नात्याने कै. दे. भ. गंगाधररावजी देशपांडे यांचे भाषण झाले. शरीराने अत्यंत थकलेले असतानाही सिंहाच्या आवाजाने आणि आवेशाने चाळीस मिनिटेपर्यंत एखाद्या धबधब्याप्रमाणे ओघवान आणि अस्खलित असे भाषण करून श्रोत्यांची अंत:करणे त्यानी भारावून सोडली, व त्यांच्या डोळ्यात अश्रू उभे केले. इतक्या त्यागाने आणि पराक्रमाने मिळविलेले स्वातंत्र्य कसे टिकेल ही एकच तळमळ त्यांच्या हृदयाला रात्रंदिवस जाळीत होती, हे त्यांच्या शब्दाशब्दातून प्रकट होत होते. सर्वच वृत्तपत्र–व्यावसायिकांना गंगाधररावांचे भाषण म्हणजे एका अनुपम वक्तृत्वाची मेजवानीच वाटली.

त्यानंतर परिषदेचे अध्यक्ष आचार्य अत्रे यांनी आपले अध्यक्षीय भाषण वाचून दाखविले, सुमारे पावशेदोन तास चाललेल्या त्यांच्या भाषणात एकप्रकारचा ओघ व नाट्य तर होतेच, शिवाय वाक्यावाक्यातील आरोहावरोहाप्रमाणे एकप्रकारचा ताल निर्माण होत होता. त्यांच्या भाषणामध्ये अभिमान, कौतुक, आवेश, चीड, त्वेष, लढाऊपणा आणि विनोद यांची वारंवार प्रचिती येत होती, आपल्या महत्त्वपूर्ण भाषणात त्यानी मराठी वृत्तपत्रव्यवसायाचा प्रारंभापासूनचा इतिहास व त्या व्यवसायाशी निगडित असलेल्या अंगभूत समस्यांचा ऊहापोह सांगोपांग केला.

"वृत्तपत्र हे जनजागृतीचे आणि क्रांतीचे एक बलाढ्य साधन आहे. हीच गोष्ट आजपर्यंतच्या मराठी वृत्तपत्रानी दाखवून दिलेली आहे. त्यागाची नि पराक्रमाची तेजस्वी परंपरा पुढे चालविण्यासाठी कडव्या ध्येयवादी पत्रकाराची आज महाराष्ट्राला अतिशय जरुरी आहे. पत्रव्यवसाय हा जरी धंदा असला तरी पत्रकारांची वृत्ती हा मात्र एक महान धर्म आहे. धंद्याला धर्माचे स्वरूप यावे पण धर्माचा मात्र धंदा करू नये. जनता–जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात क्रांती व्हावी म्हणून पत्रकारांच्या लेखणीमधून क्रांतिरसाच्या चिळकांड्या उडाल्या आणि वृत्तपत्रे ही क्रांतिरसाची कारंजी व्हावीत. जनता–क्रांतीचा जयजयकार करणे हाच पत्रकाराचा खरा धर्म आहे." वृत्तपत्राच्या क्रांतीचे महत्त्व सांगणारे हे आचार्य अत्र्यांचे भाषण अत्यंत प्रभावी ठरले.

हे अधिवेशन यशस्वी करण्यामध्ये काकांच्या बरोबरीने डॉ. गो. शां. कोवाडकर, शंकरराव जोगळेकर, बा. रं. सुंठणकर, बाबुराव देसाई, पु. ल. ओगले इत्यादी अनेक कार्यकर्त्यांच्या परिश्रमाचा वाटा फार मोठा आहे. या परिषदेचे स्वागताध्यक्ष एक पत्रकार आणि एक निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून काकांविषयी आचार्य अत्रे यानी काढलेले उद्‌गार याठिकाणी दिल्यास ते अस्थानी

होणार नाही.

"स्वागताध्यक्ष बाबुराव ठाकुर हे बेळगावचे एक निष्ठावंत कार्यकर्ते असून स्वतःचा गाजावाजा न करता सतत काही ना काही तरी समाजाचे कार्य करीत रहावयाचे हा त्यांचा बाणा आहे. गेली तीस वर्षे इमानेइतबारे काँग्रेसची आणि जनतेची सेवा ते करीत आहेत. काशीबाई हणबर या बाईंवर झालेल्या अत्याचाराचे प्रकण्रा त्यानीच धसास लावले. त्याचवेळी त्यांची व माजी प्रथम ओळख झाली. बेळगाव जिल्ह्यात त्यांनी कन्नड आणि मराठी मिळून १४० प्राथमिक शाळा काढल्या आहेत हे कितीजणांना माहीत आहे? बेळगावात मराठी ट्रेनिंग कॉलेज ही संस्थाही गेली कित्येक वर्षे त्यानी चालविली आहे. या ट्रेनिंग कॉलेजच्या वार्षिक संमेलनाचा मी अध्यक्ष होतो म्हणून मला या गोष्टी कळल्या. असे आहेत आमचे बाबुराव ठाकुर!"


## तरुण भारत रौप्यमहोत्सव

'तरुण भारत'च्या आणि पर्यायाने काकांच्या आयुष्यातील आणखी एक महत्त्वाचा दिवस म्हणजे ता. ८ जानेवारी १९५४ रोजी झालेला तरुण भारताचा रौप्यमहोत्सव होय. एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यातील पहिल्या २५ वर्षाचा कालखंड हा महत्त्वाचा वाटत नाही. कारण स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव त्याला होण्यापूर्वीच ऐन तारुण्याचा हा कालखंड मोठ्या झपाट्याने निघून जातोच, पण संस्थेच्या बाबतीत मात्र गोष्ट वेगळीच असते. कारण पंचवीस वर्षापर्यंत एखादी संस्था टिकू शकते, हीच मोठी अभिमानाची गोष्ट! संस्था म्हटली म्हणजे तिचा समाजाशी व समाजातील घडामोडींशी संबंध येणारच. परिस्थितीचे अनेक टक्केटोणपे खातच तिला प्रगतीची वाटचाल करावयाची असते. त्यामुळे एखाद्या संस्थेच्या सुरुवातीसच तिच्या भावी यशापयशाची कुंडली मांडणे सहसा शक्य नसते. एखादे वृत्तपत्र चालविणाऱ्या संस्थेच्याबाबतीत ही गोष्ट अधिकच प्रामुख्याने व प्रखरपणे जाणवते. कारण वृत्तपत्र हे सर्वस्वी जनतेच्या आधारावर चालणारे असते. त्यानेआपल्या कर्तृत्वाचे उन्मेष दाखवून जनतेची मने काबीज केली असतील, इतकेच नव्हे तर वेळप्रसंगी त्यात जनतेला चार शब्द ठणकावून सांगण्याइतका अधिकार प्राप्त करून घेतला असेल, तर अशा वृत्तपत्रांचा भावी काळ हा रम्यच असणार यात शंका नाही. अशा वृत्तपत्राला आपला रौप्यमहोत्सव साजरा करण्याचे भाग्य लाभले तर त्याचा कोणालाही अभिमानच वाटेल. 'तरुण भारता'ला हे भाग्य लाभले.

पंचवीस वर्षांपूर्वीच्या आपल्या ध्येय–धोरणाना आणि विचाराना उजाळा मिळावा तसेच त्यावेळच्या विचारांचे सिंहावलोकन व्हावे, आणि या निमित्ताने तरुण भारताच्या लाग्याबांध्याची सारी माणसे पुन्हा एकदा एकत्र यावीत, म्हणूनच 'रौप्यमहोत्सव'च्या कार्यक्रमाचे संयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचा सोहळाही फारसा भव्य नव्हता. तथापि या कार्यक्रमासाठी जमलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या मनामध्ये 'तरुण भारता'बद्दलचा कौटुंबिक जिव्हाळा असल्यामुळे तो सारा समारंभ भावनेने ओथंबून गेला होता. आपुलकीने भिजून गेला होता. तरुण भारतावरील उदंड माया सर्वत्र ओसंडून वाहात होती.

अशा यासमारंभाला प्रमुख पाहुणे व अध्यक्ष कै. काकासाहेब गाडगीळ यांच्यासारखे हक्काचे माणूस लाभले होते. काँग्रेसचा निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून गाडगीळांचा व काकांचा पूर्वीपासूनचाच स्नेह होता. स्वातंत्र्य–चळवळींच्या काळात वेळोवेळी भेटीगाठी होऊन या स्नेहाला एकप्रकारचा कौटुंबिक जिव्हाळा प्राप्त झाल्यामुळे रौप्यमहोत्सवाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याची संमती काकासाहेबांनी मोठ्या आनंदाने दिली. ता. ८ जानेवारी १९५४ या दिवशी सायंकाळी वनिता

# कै. आचार्य अत्रे यांच्या अध्यक्षतेखाली बेळगाव येथील मराठी पत्रकार परिषद (१९५०)




डावीकडून– (बसलेले) श्री. केशवराव गोखले, सर्वश्री पु. ल. ओगले, बाबुराव ठाकुर( स्वागताध्यक्ष), कै. आचार्य अत्रे, वामनराव सावंत, शंकरराव जोगळेकर, बा. र. सुंठणकर.

# पुणे येथे सकाळकारांनी रौप्यमहोत्सवी तीन जेष्ठ पत्रकारांचा केलेला गौरव (१९५७)



डावीकडून– श्री बाबुराव ठाकुर, केसरीचे संपादक कै. तात्यासाहेब करंदीकर, सकाळकार कै. नानासाहेब परुळेकर, स्त्री किर्लोस्कर मनोहरचे संपादक कै. शंकरराव किर्लोस्कर

## मुंबई मराठी पत्रकार संघाच्या वर्धापन दिनाचे महनीय प्रवक्ते (१९६३)



मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री. चं. वी. बावडेकर (आलमगीर) यांनी श्री. बाबुराव ठाकुर यांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

## मुंबई मराठी पत्रकार संघाच्या वर्धापन दिनी पत्रकारांसमवेत श्री. बाबुराव ठाकुर



डावीकडून– कै. ह. रा. महाजनी, सर्वश्री व्यं. शि. भारदे, माधवाश्रमाचे मालक, बाबुराव ठाकुर, गो. म. लाड, अप्पा पेंडसे.

विद्यालयाच्या प्रशस्त हॉलमध्ये रौप्यमहोत्सवाच्या सभेचा कार्यक्रम कै. काकासाहेबांच्या अध्यक्षतेखाली चालू झाला. याप्रसंगी तरुण भारताचे संपादक या नात्याने अनेक व्यक्ती व संस्था यांच्यातर्फे काकाना पुष्पहार अर्पण करून त्यांचा गौरव करण्यात आला. तसेच तरुण भारताशी संबंधित असलेल्या अनेकांची यावेळी भाषणेही झाली.

जयदेवराव कुलकर्णी म्हणाले, ''१९२८ ते १९५४ या काळात तरुण भारताचा उत्कर्ष कसकसा होत गेला हे मी स्वतः पाहिले आहे. या उत्कर्षाला इतर अनेक गोष्टी बरोबरच बाबुरावांचा क्रियाशील स्वभाव कारणीभूत आहे. पत्रलेखनाचे पहिले धडे मी तरुण भारतातच गिरविले आहेत.''

बा. कृ. गलगली यानी आपल्या भाषणात १९३० ते १९४० ही दहा वर्षे तरुण भारतात आपण सहसंपादक या नात्याने कसे काम केले व पत्रव्यवसायाचा श्रीगणेशा आपण तरुण भारतातच कसा गिरविला ते सांगितले.

पुंडलीकजी म्हणाले, ''१९२८ पासूनच्या तरुण भारताच्या सर्व फाईल्स चाळल्या तर ज्यामध्ये तरुण भारत हिरीरीने पडला नाही, अशी एकही चळवळ तुम्हाला त्यात आढळणार नाही. पूर्वी घोरपडीच्या साहाय्याने किल्ले सर करीत. त्याचप्रमाणे स्वातंत्र्याच्या बहुतेक सर्व अलीकडील आंदोलनात तरुण भारताचा घोरपडी सारखा उपयोग झाला आहे. रेट्या स्वभाव हे बाबुरावांचे आणखी वैशिष्ट्य आहे. या स्वभावामुळेच त्यानी अनेक अफाट व अचाट कामे अंगावर घेतली व गो. म. वाटवे यांनीही याप्रसंगी भाषणे करून तरुण भारताविषयींच्या आपल्या भावना व्यक्त केल्या. काकासाहेब गाडगीळ यानी आपल्या अध्यक्षीय भाषणात ''श्री. ठाकुर हे एक धडाडीचे नि लढाऊ वृत्तीचे पत्रकार आहेत, आणि आपल्या गुणांच्या जोरावर त्यानी अनेक राष्ट्रीय महत्त्वाची कामे पार पाडली आहेत.'' असे गौरवोद्‌गार काढले.

शेवटी काकांचे कृतज्ञता व्यक्त करणारे व आभारप्रदर्शनाचे जे छोटेसे भाषण झाले ते भावनेने भारावलेले होते. आपल्यावरील आपल्या सुहृदांची ही उदंड माया पाहून काकांचा कंठ सद्‌गदित झाला. ते म्हणाले, ''या प्रेमाच्या ओझ्याखाली मी इतका दबून गेलो आहे की मला अधिक काही बोलवतच नाही. हा गौरव व्यक्तिशः माझा नसून 'तरुण भारत' या संस्थेचा आहे. तसेच ज्या अनेक ज्ञात व अज्ञात कार्यकर्त्यांचे श्रम या कामी मला सहाय्यभूत झाले, त्यांचाही या गौरवात भाग आहे.''

## 'दक्षिण महाराष्ट्रा'च्या रौप्यमहोत्सवाचे अध्यक्ष

ता. २६ ऑक्टोबर १९५५ रोजी विजयादशमीच्या दिवशी सांगली येथे 'दक्षिण महाराष्ट्र' या साप्ताहिकाचा रौप्यमहोत्सव साजरा करण्यात आला. या साप्ताहिकाचे संपादक ह. गो. टिळक यांनी प्रस्तुत रौप्यमहोत्सव समारंभाचे अध्यक्ष म्हणून काकांची योजना केली होती. या समारंभाच्या अध्यक्षीय भाषणात काकानी आपले वृत्तपत्र–व्यवसायासंबंधिचे मौलिक विचार मांडले. विशेषतः जिल्हापत्रांचे कार्य, व्याप्ती आणि अडचणी यांचा त्यानी परामर्ष घेतला.

''जिल्हापत्रे हा जिल्ह्यातील घडामोडींचा आरसा आहे. दैनिक वृत्तपत्रे जगाच्या बातम्या, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय घडामोडीना प्राधान्य देताना दिसतात. याच गोष्टींचा जिल्हापत्रानी पुनरुच्चार करावा, अशी अपेक्षा त्यांच्याकडून करणे चुकीचे आहे'' असे सांगून वृत्तपत्र–व्यवसायाबद्दल बोलताना काका म्हणाले, ''माझ्या मते वृत्तपत्राचे संपादकत्व हा एक उदात्त व्यवसाय आहे, एक पवित्र पेशा आहे. ते एक मिशन आहे आणि ती एक जीवननिष्ठा आहे. अलीकडे मोठ्या शहरातून नफेबाजीचा धंदा यादृष्टीने वृत्तपत्र–व्यवसायाकडे पहाण्याची प्रवृत्ती वाढत चालली आहे.

या व्यवसायास बाजारी स्वरूप प्राप्त होऊ लागले आहे. माझ्या मते हा एक मोठा धोका आहे.''

## 'सकाळ'कारानी केलेला त्रिमूर्तींचा गौरव

'सकाळ' हे पुण्यातील एक मातब्बर दैनिक. मराठी दैनिक वृत्तपत्रांमध्ये 'सकाळ'चे वेगळे असे एक स्थान आहे. या 'दैनिक सकाळ'चा रौप्यमहोत्सव समारंभ ता. १ जानेवारी १९५७ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. दै. 'सकाळ'च्या संपादकांच्या आणि पर्यायाने 'सकाळ' ने वृत्तपत्रसृष्टीत केलेल्या कार्याचा गौरव करणे, हा त्या समारंभाचा एक प्रमुख भाग होताच. शिवाय समारंभाच्या संयोजकानी आपली दृष्टी अधिक व्यापक ठेवली होती. ती अशी की, 'सकाळ'च्या बरोबरीनेच महाराष्ट्रातील ज्या आणखी काही वृत्तपत्रकारांनी व नियतकालिकाच्या संपादकानी आपली पंचवीस वर्षाची यशस्वी कारकीर्द पूर्ण केली आहे, अशा संपादकांचा सत्कार यावेळी योजण्यात आला होता. हे संपादक म्हणजे 'केसरी'चे वयोवृद्ध संपादक ज. स. ऊर्फ तात्यासाहेब करंदीकर, किर्लोस्कर–स्त्री–मनोहरचे संपादक शंकरराव किर्लोस्कर आणि 'तरुण भारता'चे संपादक बाबुराव ठाकुर हे होत.

याप्रसंगी 'सकाळ'कार डॉ. परुळेकर यानी या तिघा संपादकांच्या कार्याचे वैशिष्ट्य मार्मिक शब्दात सांगितले. 'केसरी कचेरीत पस्तीस वर्षापूर्वी कामात मग्न झालेली तात्यासाहेबांची मूर्ती याप्रसंगी माझ्या डोळ्यापुढे उभी आहे. परवा सत्काराचे आमंत्रण देण्यास गेलो त्यावेळी तात्यासाहेब या उतारवयातही तितक्याच तन्मयतेने कामात गढून गेलेले दिसले.''

शंकरराव किर्लोस्करांच्या कार्याचा उल्लेख करून डॉ. परुळेकर म्हणाले, ''चांगले कसे व्हावे, नीटनेटकेपणा अंगी कसा बाणवावा, सामाजिक सुधारणा कशा राबवाव्यात, ते शंकररावांनी महाराष्ट्राला शिकविले.''

''बाबुराव ठाकुर हे एक लढवय्ये संपादक आहेत'' असे सांगून डॉ. परुळेकर म्हणाले, ''त्यांच्या कचेरीत गेलो की ती एखाद्या लष्करी हायकमांडची मुख्य कचेरी असावी असे वाटते. अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी बाबुरावानी आपल्या वृत्तपत्राचा प्रभावीपणे उपयोग केला. बेळगाव व आसपासचे तीनही जिल्हे त्यांच्या दराऱ्याखाली असतात. अनेक निरपराध लोकांना त्यानी तुरुंगातून सोडविले आहे. जिल्हापत्र त्यांनी उत्कृष्टपणे चालवून दाखविले आहे व त्याला सामाजिक कार्याची मोठीच जोड दिली आहे.''

सत्काराला उत्तर देताना केलेल्या भाषणात काकानी आपण फार मोठे पत्रकार नसल्याची आपणाला जाणीव आहे, व त्यामुळे असा सत्कार करून घेण्यास आपण योग्य नाही, असे विनयपूर्वक सांगितले. यावेळी ते म्हणाले, ''येथे आल्यापासून एक गोष्ट माझ्या मनाला सारखी खटकते आहे. ती ही की, माझ्यासारख्या जिल्हा पत्रकाराचा सत्कार येथे कशासाठी? वास्तविक आजच्या प्रसंगी ज्यांनी गेल्या पाव शतकात व्यापक व प्रचंड कामगिरी करून यशस्वी संपादक म्हणून लौकिक मिळविला, त्या सकाळकारांचाच सत्कार होणे आवश्यक आहे. परंतु केव्हा केव्हा मोठ्या मंडपात लहान लहान कामेही उरकली जातात, तसा हा प्रकार आहे, असे मी विनोदाने म्हटले तर ते वावगे होणार नाही. प्रांजलपणेच बोलायचे झाले तर मी असे म्हणेन की, या गौरवास मी कितपत पात्र आहे याची माझी मलाच शंका वाटते. जाहीररीतीने माझा सत्कार होण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. माझ्या बाजूला बसलेले एक खंदे संपादक तात्यासाहेब करंदीकर यांची तपश्चर्या फार मोठी आहे. ते ऋषितुल्य आहेत. आणि दुसरे शंकरराव किर्लोस्कर हे अनेकविध उद्योगांमध्ये मुरलेले व कसलेले संपादक आहेत. या दोघांशी तुलना करता मी एक साधा पत्रकार असून ज्याला दक्षिण महाराष्ट्राची तटबंदी म्हणतात, त्या बेळगाव–निपाणीसारख्या एका सरहद्दीच्या

ठिकाणी मी एक लहानसे पत्र चालवीत आहे. वृत्तपत्रीय शिरस्त्यास अनुसरून या पत्रात संपादकीय स्फुटे, अग्रलेख अशी मांडणी आपल्याला कदाचित नेहमी दिसणार नाही. पण जनतेशी एकरूप होऊन त्या भागातील लोकांच्या अडीअडचणी निवारण करण्याचे व अन्यायाशी– मग तो अन्याय सरकारी असो अगर सामाजिक असो–झगडा देण्याचे काम माझ्या पत्राने सतत चालविले आहे. आजदेखील संयुक्त महाराष्ट्राचा लढा हे पत्र मोठ्या हिरीरीने चालवीत आहे.''

## मुंबई मराठी पत्रकार संघाचे महनीय प्रवक्ते

'मुंबई मराठी पत्रकार संघ' ही एक मातब्बर पत्रकार संघटना आहे. २२ जून १९४१ रोजी जन्माला आलेली अखिल महाराष्ट्रातील सर्वात मोठी अशी ही संघटना आहे. १९४८ सालापासून या संघाने आपला स्वतःचा वर्धापनदिन साजरा करण्याची प्रथा चालू केली. त्या समारंभाच्या निमित्ताने प्रतिवर्षी एका ख्यातनाम पत्रकाराला पाचारण करून त्याचा 'महनीय प्रवक्ते' म्हणून सन्मान करण्यात येतो.

मुंबई मराठी पत्रकार संघाच्या १९६३ सालच्या वर्धापनदिनाचे महनीय प्रवक्ते हा बहुमान काकाना मिळाला. महाराष्ट्राच्या राजधानीतील पत्रकार संघाने केलेला काकांचा हा सत्कार त्यांच्या वृत्तपत्रीय व्यवसायात विशेष स्मरणात रहाण्यासारखा आहे. कारण महाराष्ट्रापासून अलग पडलेल्या बेळगावसारख्या सीमाभागातील एका शहरामधील पत्रकाराला मुंबई शहरातील पत्रकारानी मोठ्या सन्मानाने आमंत्रण द्यावे यातच त्या पत्रकार संघाच्या व्यापक दृष्टिकोनाची प्रचिती येते. काकांचे कार्यक्षेत्र बेळगावपुरते मर्यादित असलेतरी त्यांच्या कार्याचे मूल्यमापन साऱ्या महाराष्ट्राकडून होत आले आहे. याचे गमक म्हणून या समारंभाकडे बोट दाखविता येईल.

हा वर्धापनदिन समारंभ मुंबईच्या तांबे हॉलमध्ये ता. ८ सप्टेंबर १९६३ रोजी साजरा झाला. प्रारंभी संघाचे नवे अध्यक्ष श्री. चं. वि. बावडेकर यांनी काकांचे स्वागत केले आणि पुष्पहार घालून त्यांचा सत्कार केला. त्यावेळी ते म्हणाले, ''बेळगाव–निपाणी–कारवारच्या सीमाप्रदेशाचा लढा जिवंत ठेवण्याचे फार मोठे श्रेय श्री. बाबुराव ठाकुर याना दिले पाहिजे.'' नंतर श्री. श्रीपाद शंकर नवरे यांनी एक झुंझार पत्रकार या नात्याने काकांचा परिचय करून दिला. श्री. गो. मं. लाड यांचेही याप्रसंगी भाषण झाले.

सत्काराला उत्तर देताना केलेल्या आपल्या भाषणात काका म्हणाले, ''मोठ्या शहरातील वृत्तपत्रांचा व्यवसाय आणि जिल्ह्याच्या ठिकाणी चालणारा पत्रव्यवसाय यामध्ये जमीन–अस्मानाचा फरक आहे. मोठ्या शहराच्या ठिकाणी चालणारा पत्रव्यवसाय यामध्ये जमीन–अस्मानाचा फरक आहे. मोठ्या शहराच्या ठिकाणी या व्यवसायाला लागणारी सर्व साधने उपलब्ध असतात. तशी ती जिल्ह्याच्या ठिकाणी असत नाहीत. शिवाय मुंबईसारख्या शहरामध्ये जागृत लोकमताचा फायदा जसा वृत्तपत्रांना मिळतो, तसा जिल्ह्यातील वृत्तपत्राना मिळू शकत नाही. कारण पुण्या–मुंबईसारख्या शहरात लोकांवर कोणताही अन्याय झाला तर त्याची दखल तेथील प्रमुख अधिकाऱ्यांना घ्यावीच लागते. तशी संधी जिल्ह्याच्या ठिकाणी असणाऱ्या पत्रांना क्वचितच मिळते.''

यानंतर काकानी भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत तरुण भारतने केलेल्या कार्याचा आढावा घेऊन निःपक्षपाती आणि निर्भीड बाण्याच्या पत्रकारांचा पुरस्कार केला. पत्रकारांना आपले कर्तव्य निःस्पृहपणे बजावता यावे यासाठी सरकारनेही वृत्तपत्र–स्वातंत्र्यावर अकारण मर्यादा घालू नयेत असे त्यानी आवर्जून प्रतिपादिले. या संदर्भात तरुणभारताने आतापर्यंत केलेल्या अन्याय–

निवारणाच्या कार्याचा इतिहास त्यांनी सांगितला. शेवटी पत्रकार संघाचे मावळते अध्यक्ष श्री. अ. सी. केळूसकर यानी आभार मानल्यानंतर हा समारंभ समाप्त झाला.

## जळगावच्या पत्रकार परिषदेच्या अध्यक्षपदाचा मान

१९५० साली भरलेल्या बेळगाव पत्रकार परिषदेचे स्वागताध्यक्षपद, त्यानंतर तरुणभारताचा साजरा झालेला रौप्यमहोत्सव, पुढे 'दैनिक सकाळ' आणि साप्ताहिक 'दक्षिण महाराष्ट्र' या पत्रानी केलेला गौरव आणि मुंबई मराठी पत्रकार संघाने 'महनीय प्रवक्ते' या नात्याने केलेला सन्मान– या सर्व घटना काकांच्या वृत्तपत्र क्षेत्रातील कर्तृत्वाच्या निदर्शक आहेतच. पण या सर्वांपेक्षा काकांच्या पत्रव्यवसायातील कामगिरीचा सार्थ गौरव करणारी घटना म्हणून १९६५ सालच्या जळगावच्या मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष म्हणून कामांची जी निवड झाली तिचा उल्लेख करावा लागेल. या निवडीमागे काकानी सीमाभागात केलेल्या बहुविध स्वरूपाच्या कार्याचा गौरव करणे, सीमाभागातील मराठी जनतेविषयी सहानुभूती दर्शविणे आणि महाराष्ट्रातील पत्रकारांमुळे या जनतेची व्यथा सविस्तरपणे मांडणे हे प्रमुख उद्देश होते.

मराठी पत्रकार परिषदेच्या अध्यक्षपदी काकांची निवड झाल्यामुळे बेळगावातील पत्रकारांना विशेष आनंद झाला. कारण हा बहुमान जसा काकांचा होता, तसाच बेळगावातील वृत्तपत्रव्यवसायाचाही तो सन्मान होता. आपला हा आनंद व्यक्त करण्यासाठी बेळगावातील पत्रकारांनी व काकांच्या हितचितकांनी ता. २१ फेब्रुवारी १९६५ या दिवशी काकांचा सत्कार केला. वाङ्मय चर्चा मंडळाच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या समारंभाचे अध्यक्ष होते. 'लोकमत'चे संपादक श्री. वामनराव सावंत, याप्रसंगी श्री. शंकरराव जोगळेकर, श्री. कृष्णा मेणसे, श्री. हणमंतराव सावंत, श्री. केशवराव दड्डीकर वकील आदी अनेक वक्त्यांची काकांच्या गौरवपर भाषणे झाली.

सत्काराला काकांनी भारावलेल्या अंत:करणाने उत्तर दिले. ते म्हणाले, ''ज्या ज्यावेळी माझा सत्कार करण्याची कल्पना पुढे आली, त्या त्यावेळी मी नकार दिलेला आहे. सत्कार करून घेण्यास फक्त असामान्य मोठी माणसेच पात्र असतात. मी स्वत:ला तसा मोठा समजत नाही. सामान्यात मिसळावे व सामान्यातच रहावे यातच मला आनंद आहे.

''आज या ठिकाणी झालेल्या अनेक भाषणात माझी केवळ स्तुतीच मी ऐकली माझ्या दोषांचेही दिग्दर्शन झाले असते तर बरे झाले असते. माझ्यातील दोषांची जशी मला जाणीव आहे, तशाच माझ्या मर्यादाही मला माहीत आहेत. जिल्ह्यात कार्य करीत असताना जेथे जेथे मला अन्याय दिसला, जुलूम दिसला– मग तो स्वकीयांनी केलेला असो– तेथे तेथे तो चव्हाट्यावर मांडण्याचे काम मी निर्भीडपणे व नि:स्पृहपणे करीत आलो आहे.सामाजिक, शैक्षणिक व राजकीय अशा विविध क्षेत्रात कार्य करीत असताना माझ्या या पत्राचा मी साधन म्हणून उपयोग केला आहे.''

बेळगावात झालेल्या काकांच्या या सत्कारानंतर पंधरा दिवसांच्या अवधीतच मराठी पत्रकार परिषदेचे अधिवेशन जळगाव येथे साजरे झाले. या पत्रकार परिषदेची परंपरा मोठी वैभवशाली आहे. कारण केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर अखिल भारतामध्ये मराठी वृत्तपत्राना एक वेगळेच मानाचे स्थान आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात या महाराष्ट्रीय वृत्तपत्रानी केलेली बहुमोल कामगिरी भारताच्या इतिहासाला विसरता येणार नाही. चिपळूणकर, आगरकर, टिळक या वृत्तपत्रकारांची नावे तर स्वातंत्र्य–चळवळीच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदवून ठेवावी लागतील. अनेक संपन्न

व्यक्तिमत्त्वाचे पत्रकार आणि त्यांच्या नेत्रदीपक तेजस्वी कामगिरीची वैभवशाली परंपरा पाठिशी घेऊन मराठी पत्रकार परिषद आज मोठ्या दिमाखाने उभी आहे. या परिषदेचे अध्यक्षपद अनेक ख्यातनाम पत्रकारांनी भूषविले आहे. अठराव्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदाचा मान काकांना मिळाला, यापेक्षा काकांच्या कार्याचा वेगळा गौरव तो आणखी कोणता असणार?

## पत्रकार परिषदेचे जळगाव अधिवेशन

मराठी पत्रकार परिषदेचे हे अधिवेशन जळगाव येथे ता. १३ व १४ मार्च १९६५ असे दोन दिवस चालले होते. या अधिवेशनाच्या उद्घाटनासाठी सध्याच्या पंतप्रधान व त्यावेळच्या केंद्रीय नभोवाणी व माहितीखात्याच्या मंत्री श्रीमती इंदिरा गांधी या उपस्थित होत्या. स्वागताध्यक्षपदी जळगावचे एक धडाडीचे पत्रकार श्री. ब्रिजलाल पाटील यांची निवड झाली होती. परिषदेचे अध्यक्ष म्हणून काका आणि उद्घाटक म्हणून श्रीमती इंदिरा गांधी उपस्थित राहिल्यामुळे संपूर्ण अधिवेशनला बेळगावच्या सीमाप्रश्नाच्या राजकारणाची पार्श्वभूमी निर्माण झाली होती. परिणामत: परिषदेच्या व्यासपीठावरून बोलणाऱ्या प्रत्येक वक्त्याच्या भाषणात महाराष्ट्र–म्हैसूर सीमाप्रश्नाचा उल्लेख येणे स्वाभाविक होऊन बसले होते. 'मराठवाडा'चे संपादक श्री. अनंतराव भालेराव, श्री. श्रीपाद शंकर नवरे, श्री. बाळासाहेब भारदे आणि श्री. ब्रिजलाल पाटील या सर्वांच्या भाषणात कमी अधिक प्रमाणात सीमाप्रश्नाचा उल्लेख झालाच. त्यामुळे सीमाप्रश्न हेच या अधिवेशनाचे मुख्य सूत्र आहे असा भास होत होता.

स्वागताध्यक्ष श्री.ब्रिजलाल पाटील यानी आपल्या भाषणात जळगावच्या वृत्तपत्रीय सृष्टीचा इतिहास कथन केला, आणि प्रचलित शासनाने वृत्तपत्रव्यवसायाच्या स्वातंत्र्यावर घातलेले निर्बंध व पत्रकारांमधील अगतिका याचा तळमळीने उल्लेख केला. त्यावेळी व्यासपीठावर उद्घाटक श्रीमती इंदिरा गांधी, अध्यक्ष श्री. बाबुराव ठाकुर तसेच शिक्षणमंत्री श्री. मधुकरराव चौधरी, सभापती श्री. बाळासाहेब भारदे शिवाय परिषदेचे माजी अध्यक्ष व इतर शासकीय अधिकारी उपस्थित होते. संदेशवाचनाच्या कार्यक्रमानंतर श्री. अनंतराव भालेराव यांनी आपल्या चुरचुरीत आणि खुमासदार हिंदी भाषेतून श्रीमती इंदिरा गांधींचा परिचय करून दिला. त्यानंतर श्रीमती इंदिरा गांधींचे भाषण झाले. त्या भाषण करण्यास उभ्या राहताच "बेळगाव–कारवार गोमंतकाचे महाराष्ट्रात विलिनीकरण झालेच पाहिजे." अशा घोषणानी वातावरण दुमदुमून गेले. श्रीमती गांधी अत्यंत शांत व प्रसन्न दिसत होत्या. आपल्या भाषणात त्यांनी 'जळगाव' ऐवजी 'बेळगाव' असा चुकून उल्लेख करताच सभागृहात हास्याचा कल्लोळ उडाला. त्याही हसल्या आणि म्हणाल्या, "महाराष्ट्राने मागितलेल्या सर्व गोष्टी त्याला मिळत गेल्या असा इतिहास आहे. तुमच्या भावना मला समजल्या." या नेटक्या शब्दात त्यानी गोवा व सीमाप्रश्नाची दखल घेतली. आपल्या संथ आणि धीरगंभीर वक्तृत्व–शैलीत त्यानी पत्रव्यवसायाच्या अनेक प्रश्नांचा ऊहापोह केला, आणि वृत्तपत्राच्या संपूर्ण स्वातंत्र्याचा पुरस्कार केला.

त्यानंतर काकांचे अध्यक्षीय भाषण झाले. त्यांच्या भाषणात मुख्यत्वेकरून सीमाभागावर झालेल्या अन्यायाचा कडाडून निषेध होता. सीमाप्रदेशातील मराठी जनतेच्या तीव्र भावना त्यांनी श्रीमती इंदिरा गांधी आणि उपस्थित पत्रकार यांच्या समोर मोठ्या आवेशपूर्ण शैलीत मांडल्या. १९५६ च्या ऑगस्टमध्ये पंतप्रधान कै. पं. जवाहरलाल नेहरू यांनी सीमाभागातील शिष्टमंडळाला दिलेल्या आश्वासनाचा उल्लेख करून ते आश्वासन पुरे करण्याची जबाबदारी त्यांची कन्या श्रीमती इंदिरा गांधी यांच्यावर आहे, असा निर्देश काकांनी केला. काकांच्या भाषणास प्रारंभ होण्यापूर्वी त्यांच्या मराठी भाषणातील सीमाप्रदेशासंबंधिच्या भागाचे भाषांतर केलेली इंग्रजी प्रत श्रीमती

इंदिराजींच्या हाती देण्यात आली होती. काकांचे भाषण चालू असताना त्यानी ती प्रत वाचून काढली. सभापती श्री. भारदे मधूनमधून इंदिराजींना काकांच्या भाषणाचा आशय समजावून देत होते.

काकांच्या भाषणामध्ये सीमाभागाप्रमाणेच गोमंतकाचाही उल्लेख झाला. या दोन्ही प्रदेशांच्या बाबतीत सरकार लोकशाहीचे रूढ संकेत डावलीत आहे, लोकशाहीप्रणीत सनदशीर मार्गानी केलेल्या आंदोलनाची केंद्र सरकार दाद घेत नाही. मात्र मद्राससारख्या ठिकाणी झालेल्या हिंसक भाषिक आंदोलनापुढे सरकार नमते, अशी प्रखर टीका काकानी केली. पत्रकारांसंबंधी बोलताना 'स्वतंत्र बाण्याचे नैष्ठिक पत्रकार' ही महाराष्ट्राची परंपरा असून ती पत्रकारानी कटाक्षाने जपली पाहिजे असे त्यांनी सांगितले. मुंबईसारख्या शहरातील मोठ्या वृत्तपत्रांप्रमाणेच जिल्ह्याच्या व तालुक्याच्या ठिकाणी असलेली छोटी वृत्तपत्रेही समाजाच्या सुदृढ प्रगतीस आवश्यक असून दीपगृहाप्रमाणे जनतेला मार्गदर्शन करण्याचे काम त्यानी केले पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले.

पत्रकारांपुढच्या अडचणी निवेदन करताना भांडवलवाल्या मालकांकडून संपादकाचे स्पष्ट मत–प्रतिपादन करण्याच्या बाबतीत होणारा अडथळा आणि अनेक वेळा प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या सरकारकडून येणारे दडपण यांचा उल्लेख काकांनी प्रामुख्याने केला होता. अलीकडे सरकारी अधिकाऱ्यांमध्ये दिसून येणाऱ्या बेगुमान वृत्तीचा उल्लेख करून, अधिकारीच नव्हेत तर राज्यकर्तेही बेगुमान झाले आहेत, अशी टीका त्यानी केली. तसेच जिल्हापत्रांच्या कार्याची व्याप्ती, त्यांच्या बाबतचे शासनाचे उपेक्षेचे धोरण व त्यांच्यावरील वाढती बंधने यांचाही परामर्ष काकानी आपल्या भाषणात घेतला.

## तरुण भारताचे दैनिकात रूपांतर

एखाद्या वृत्तपत्राचे दैनिकात रूपांतर होणे हा त्याच्या आयुष्यातील विकासाचा महत्त्वाचा टप्पा असतो. तरुण भारत अर्ध–सप्ताहिकाचे ता. ५ जुलै १९६६ रोजी दैनिकात रूपांतर झाले. एका अर्थी तरुण भारताने घेतलेली ही फार मोठी झेप म्हणावी लागेल. तरुण भारताच्या या अवस्थांतरामुळे मराठी वृत्तपत्रसृष्टीत एका नव्या दैनिकाची भर पडली, पण अर्ध–साप्ताहिक तरुण भारताचे दैनिकात रूपांतर करण्याचा हा निर्णय केवळ वृत्तपत्राच्या वैयक्तिक विकासाचा व भरभराटीचा भाग म्हणून घेण्यात आलेला नव्हता किंवा त्यामागे केवळ व्यापारी बुद्धीही नव्हती. तर या भागात दैनिक काढणे ही काळाची गरज होती. एक जुने, लोकप्रिय आणि दर्जेदार वृत्तपत्र म्हणून अर्ध–साप्ताहिक तरुणभारताकडून जनतेने ही अपेक्षा बाळगली होती. यात नवल नाही. काकांच्याही मनात तरुण भारताचे दैनिकात रूपांतर करण्याची कल्पना बऱ्याच दिवसांपासून घोळत होती. तिला १९६६ साली मूर्तस्वरूप मिळाले. याचसुमारास 'लोकशिक्षण ट्रस्ट' संस्थेच्यावतीने 'विशाल महाराष्ट्र' नावाचे आणखी एक मराठी दैनिक येथे चालू झाले, पण दुर्दैवाने ते अल्पायुषी ठरले.

काकांनी चालविलेल्या वृत्तपत्र–व्यवसायाचा हा धावता आढावा आहे. वृत्तपत्र व्यवसायात त्यानी केलेली ही वाटचाल वळणे घेत गेली हे यावरून दिसून येईल. पूर्वसुरींचा मागोवा न घेता अनेक कष्ट व यातना सोशीत, वेळोवेळी उठलेल्या छोट्यामोठ्या वावटळीतून निर्भयपणे बाहेर पडत काकानी मोठ्या परिश्रमपूर्वक वृत्तपत्रसृष्टीत आजचे हे स्थान संपादन केले आहे. आपले राष्ट्र व आपला समाज याच्याबद्दल काही उपजत अंत:प्रेरणा काकांच्या ठिकाणी आहेत. त्यांचे यथायोग्य संगोपन व्हावे आणि आपल्या हातून काही भरीव कार्य व्हावे या हेतूनेच ते या व्यवसायाकडे वळले.

पत्रकार या नात्याने काकानी केलेल्या कार्याच्या मूल्यमापनाचा समारोप करताना अलीकडेच एका साप्ताहिकाच्या अंकात या संदर्भात केल्या गेलेल्या काही विधानांची आठवण झाल्याशिवाय रहात नाही. पत्रकार या शब्दाची फोड करताना त्यात असे म्हटले होते की 'पतनात् त्रायते इति पत्रं.' हा पत्र या शब्दाचा निरुक्तार्थ आहे. तृणपत्रावर पावसाचे थेंब किंवा दव्‌बिंदू पडले, तरी ते एकदम जमिनीवर जात नाहीत. काही वेळ तरी ते तेथेच सांभाळले जातात. हे दृश्य पाहूनच एका प्राचीन द्रष्ट्याने पत्र या शब्दाची व्याख्या केली की, 'पतनापासून संरक्षण करते ते पत्र!' पतनापासून संरक्षण करणे याचाच अर्थ विकासान्मुख ठेवणे असा होतो. त्यादृष्टीने पहाता पत्रकार हा सहजच नेता असतो. पत्राची ही व्याख्या व पत्रकाराचे 'सहज नेतेपण' काकानी अगदी तंतोतंत पाळलेले दिसते. त्यांच्या सहज नेतेपणाची आणि त्यांच्या राजकीय व सामाजिक कार्याची ओळख मागे एका वेगळ्या प्रकरणातून झालीच आहे. या ठिकाणी वृत्तपत्रामध्ये काकांच्या या कार्याचे जेवढे प्रतिबिंब उमटले तेवढ्याचेच हे दर्शन आहे. ते सुस्पष्ट झाले आहे किंवा नाही आणि ते पुरे आहे किंवा कसे हे वाचकानीच ठरवावयाचे आहे. मला जसे दिसले तसे आणि जेवढे आकलन झाले तेवढे काकांच्या वृत्तपत्राचे व वृत्तपत्र–व्यवसायाचे कार्य मी येथे मांडले आहे एवढेच!

## प्रकरण दहावे

# ओघळलेले मोती

माणसाच्या जीवनात मृत्यू ही एक अटळ घटना आहे. आयुष्यात स्वत: पलीकडे जग न पाहिलेला एखादा क्षुद्र जीव असो किंवा आपल्या महान कर्तृत्वाने जनमानसात श्रेष्ठ स्थान मिळविलेला एखादा लोकोत्तर नेता असो, मृत्यूच्या तावडीतून तो सुटू शकत नाही. कोणाच्या कर्तृत्वाचे रोप जमिनीतून वर येण्यापूर्वी तो खुडून नेतो, तर कोणा व्यक्तीच्या कर्तृत्वाचा रथ भरवेगाने धावत असतानाच तो त्याला मध्येच खीळ घालतो. याउलट एखाद्याच्या कर्तृत्वाला पुरेपूर वाव देऊन त्याच्या आयुष्याचे सार्थक झाल्यानंतरच अगदी शांतपणाने त्याला घेऊन जाण्याचा शहाणपणाही तोच दाखवितो. असा हा मनमानेल तेव्हा येणारा मृत्यू आपल्याबरोबर घेऊन जाणाऱ्या व्यक्तीला कोणते दु:ख देतो? तिला कोणत्या यातना सोसायला लावतो? हे तुम्हा आम्हाला कळणे अशक्य आहे. पण एक मात्र निश्चित की, या दुनियेला घटका, दोन घटकांची माया लावून गेलेल्या व्यक्तीला मृत्यू ज्यावेळी घेऊन जातो, त्यावेळी त्या व्यक्तीच्या सग्यासोबत्याना मात्र दु:खाच्या दरीत लोटून जातो. मृत्यूच्या प्रत्यक्ष आगमनापेक्षा, आपला कार्यभाग आटोपून तो परत जाताना त्याने निर्माण केलेला हा दु:खाचा हलकल्लोळ अधिक भीषण असतो. कोणाच्या घरातला एकुलता एक आधार तो घेऊन जातो, तर मोठ्या नवसाने जन्माला आलेले नवजात बालक हिरावून नेऊन त्या मातेला हंबरडा फोडावयास लावतो.

पण प्रत्येकाच्या आयुष्यात दु:खाची लहानमोठी वादळे आणून सोडणारा हा मृत्यू त्याच व्यक्तीला शोक करता करता अंतर्मुख बनवितो. घटका–दोन घटकानी शोक ओसरल्यानंतर गेलेल्या व्यक्तीबद्दलच्या आठवणी दाटून येऊ लागतात. दिवंगत व्यक्तीचा जीवनपट डोळ्यांसमोर तरळू लागतो. तिच्या दोषापेक्षा गुणच प्रामुखाने नजरेत भरू लागतात. त्या व्यक्तीशी आपण वागत असताना आपल्याकडून घडलेल्या प्रमादाबद्दल खेद वाटू लागतो. सद्सद्विवेकबुद्धी जागृत असलेला माणूस अशावेळी पश्चातापाने दग्ध होऊन जातो. मृत व्यक्तीचे तिच्या हयातीत यथायोग्य मूल्यमापन आपल्याकडून न झाल्याने त्याचे मन विषण्ण होते. साहजिकच तिच्या मृत्यूनंतर

श्रद्धांजलीच्या रूपाने पुनर्मूल्यमापन करण्याचा तो प्रयत्न करतो.

पण समाजातील प्रत्येक व्यक्तीलाच असे पुनर्मूल्यमापन करण्याची संधी मिळतेच असे नाही आणि ती मिळालीच तर ती शब्दरूपाने व्यक्त करण्यास वाव मिळणे कठीण. वृत्तपत्रकाराला मात्र मृत्यूच्या आघाताने निर्माण झालेले हे भावतरंग आपल्या वृत्तपत्रातून मांडता येतात. वृत्तपत्रकार हा समाजहित–दक्ष असला तरी माणूसच असल्यामुळे, माणूस म्हणून त्याला स्वत:चे मन असे असतेच. वैयक्तिक–दु:खाच्या आघाताने त्याच्या जिवंत मनात अनेक आंदोलन निर्माण होणे स्वाभाविक आहे.ही आंदोलने त्यावेळेपुरती वैयक्तिक वाटली, तरी ती जेव्हा विचारांच्या साहाय्याने शब्दबद्ध होतात, तेव्हा कळत नकळत ते सामूहिक चिंतन बनून जाते. त्यामुळे त्या वृत्तपत्रकाराच्या नातेवाईकाचा किंवा जिवलग मित्राचा मृत्यू केवळ वैयक्तिक रहात नाही. त्या व्यक्तीच्या आठवणीचे रेखाटन करता करताच सभोवतालच्या समाजाचा आणि त्यातील घडणाऱ्या घडामोडींचा आलेख काढला जातो.

अशाप्रकारच्या तत्कालीन घडामोडींचा आलेख काकांनी वेळोवेळी लिहिलेल्या दिवंगतांच्या आठवणीतून स्पष्टपणे दिसून येतो. अशा रेखाटनातून त्या त्या व्यक्तिमत्त्वाच्या एका विशेष पैलूवरच अधिक प्रकाश पडतो. सामाजिक अन्याय घडल्यावेळी कठोरपणाने हल्ले चढविणारे काका अशावेळी अगदी हळवे होताना दिसतात. लोण्याहूनही मऊ झालेली त्यांची लेखणी आठवणीचे पापुद्रे हलकेच उलगडू लागते, आणि भावनेने ओल्या चिंब झालेल्या या आठवणीतून काकांची लेखणी भूतकाळाचे चित्र रेखाटू लागते.

आईचा मोठा आधार गेल्यानंतर काकाना एकमेव आशास्थान होते ते म्हणजे त्यांचे वडील 'तात्या' खरे म्हणजे काकांचे व त्यांच्या वडिलांचे सुरुवाती–सुरुवातीस फारसे जमत होते असेनाही. आपल्या मुलाने राजकारणाच्या धकाधकीत न पडता आपले शिक्षण पूर्ण करावे आणि एखादी सुखाची नोकरी अथवा एखादा प्रतिष्ठित व्यवसाय चालू करावा, अशी चारचौघांसारखी काकांच्याही वडिलांची इच्छा होती. स्वत: पोलीस अधिकारी असल्यामुळे आपल्या मुलाचा राजकारणाशी संबंध यावा हे त्यांच्या व्यवहारी मनाला पटत नव्हते. म्हणून ब्रिटिशांच्या अन्यायी आणि जुलमी राजवटीने संतापून जाणारे काका, आणि त्याच ब्रिटिशांच्या नोकरीत वावरणारे त्यांचे वडील यांच्यामध्ये वेळोवेळी खटके उडत. पण ही परिस्थिती फार काळ राहिली नाही. स्वातंत्र–चळवळीकडे धाव घेणारा आपला मुलगा काही गुन्हे करीत नव्हता, हे तात्यांनी ओळखले. हळूहळू त्यांचा विरोध सौम्य होत चालला. इतकेच नव्हे तर सरकारी नोकरीशी असलेला संबंध तुटताच तात्या हळूहळू काकाना प्रेसच्या कामात मदतही करू लागले. पुढे पुढे काका तुरुंगात गेल्यानंतर त्याना ना प्रेसची चिंता राहिली, ना संसाराची. कारण त्यांच्या अनुपस्थितीत सारे काही तात्याच पाहून घेत. पण काकांचे हे दुसरे मायाछत्र लवकरच हिरावून घेतले गेले. मायेचा आणि वात्सल्याचा आणखी एक बंध तुटला.

आई–वडिलांच्या निधनाने पोरके झालेले काका खूप दु:खी झाले होते. पण खचले मात्र नव्हते, वडिलकीचा आणि मायेचा हात पाठीवरून फिरवणारी माणसे जरी गेलेली असली तरी जिव्हाळ्याच्या इतर माणसांचा आधार त्यांना होताच. त्यामुळे वडिलांच्या निधनाने दु:ख पचवून ते मोठ्या उमेदीने आपल्या कामाला लागले. पुढे अवघ्या वर्षाच्या आतच काकाना आणखी एक दु:खाचा तडाखा बसला. त्यांचा लाडका भाऊ यशवंत त्याना फडकाफडकी सोडून गेला. अगदी घ्यानी मनी नसता या इहलोकातून नाहीसा झाला. शांत आणि गंभीर प्रकृतीचा पण तीव्र बुद्धिमत्तेचा, अद्यावत आणि

शिस्तबद्ध राहणीचा भोक्ता असलेला पण ऐषआरामात लोळत न पडणारा उघडउघड एखाद्या सार्वजनिक कार्यात भाग न घेतलेला पण गरजू नि गरीब जनतेबद्दल सदैव परोपकारबुद्धी ठेवणारा, काकांचा हा लाडका यशवंत त्यांना असा अचानक सोडून गेला. यशवंताच्या या आकस्मिक निधनाने काकाना खूपच धक्का बसला! वास्तविक दोघांची कार्यक्षेत्रे अगदीच भिन्न. पण स्वातंत्र्य चळवळीवर आणि पर्यायाने राष्ट्रावर त्यांच्या बंधूची म्हणजे यशवंताची श्रद्धा काकांच्या पेक्षा काकणभरही कमी नव्हती. महात्माजींच्याबद्दल यशवंताच्या मनात फार आदर होता. म्हणूनच गांधींच्याबद्दल अनुदार उद्‌गार काढलेले त्याला खपत नसे. अशा या अबोल मनाच्या, प्रगल्भ व्यक्तित्वाच्या व वयाने लहान असूनही साऱ्या कुटुंबाचा आधार असलेल्या यशवंताला काळाने अचानक हिरावून नेले. काका आता अगदीच एकाकी बनले.

माता, पिता आणि बंधु यांच्याबद्दल लिहिताना काका भावनेने अगदी ओथंबून गेलेले दिसतात. या प्रियजनांच्या निधनाने निर्माण झालेल्या असह्य दु:खाला थोडीतरी वाट करून देण्यासाठी त्यानी आठवणींचा आश्रय केला. म्हणूनच येथे येणारे उल्लेख हे आठवणीच्या पोटी येतात, घटनांचा तपशील म्हणून नव्हे. पण काकांच्या बरोबरीने कार्य केलेल्या, त्यांच्याशी समरस होऊन एकदिलाने त्याना हरेक कार्यात साथ देणाऱ्या पण दुर्दैवाने आज त्यांच्यापासून दूर गेलेल्या व्यक्तीबद्दल जेव्हा काका लिहितात, तेव्हा त्यांच्या कर्तृत्वाची ओझरती ओळख करून देणे अपरिहार्य ठरते. डॉ. हेरेकर, श्री. अण्णासाहेब लट्ठे, श्री. शिवराव कोप्पळ, श्री. अच्युत सदाशिव ऊर्फ बापूसाहेब देशपांडे हे काकांच्या बरोबर ऐन तारुण्यात त्यांच्याजवळ असलेले पण आज हयात नसलेले त्यांचे मित्र व सहकारी. खरे पहाता, हे सर्वजण काकांच्या मानाने वडीलच. त्यामुळे शैक्षणिक, राजकीय, सामाजिक आणि वृत्तपत्रीय क्षेत्रात या सर्वांपासून काकाना खूपच मार्गदर्शन मिळाले. आपल्या पाठिशी असलेली अनुभवाची शिधोरी या सर्वांनी काकाना अगदी मुक्तहस्ताने दिली. त्यांच्याबद्दलची आदराची आणि कृतज्ञतेची भावना काकानी त्याना वाहिलेल्या श्रद्धांजलीमध्ये व्यक्त झाली आहे.

## आई, तुझी आठवण होते!

पवित्र प्रेमाची सोज्वळ मूर्ती माझी मातोश्री अक्का इजला गेल्या मंगळवारी रात्री ८।। वाजता रक्तदाबाच्या विकाराने देवाज्ञा झाली, हे कळविण्यास मला परमावधीचे दु:ख होत आहे. तिच्या प्रेमळ हाकेला आता आम्ही कायमचे मुकलो आहोत. कोणत्याही बऱ्यावाईट परिस्थितीत तिच्या प्रेमळ अंत:करणाचा आधार आम्हाला सर्वश्रेष्ठ असा वाटावयाचा. कारागृहात, कारागृहाबाहेर, खासगी व्यवहारात अगर सार्वजनिक कार्यात, आजारीपणात अगर हिंडता फिरताना तसेच आनंदात अगर दु:खाच्या परिस्थितीत तिच्या कोमल हृदयाचा पाझर जीवनास किती टवटवी आणून देई, याची आठवण आजच्या घटकेस मला क्षणोक्षणी होत आहे.

वृद्धापकाळामुळे आणि आजाराने क्षीण झालेली तिची मूर्ती सावकाश अशी पावले टाकीत जेव्हा जवळ येऊन बसत असे, तेव्हा सर्व श्रमांचा परिहार होण्यास क्षणाचाही विलंब लागू नये, हा अनुभव कैकवेळा येऊन गेला आहे. तिच्या प्रेमळ पांघरूणास आम्ही अंतरलो असल्यामुळे आमचे जीवन सध्या अत्यंत कष्टी झाले आहे. सर्वत्र उदास वाटत आहे. मातेच्या प्रेमाची थोरवी याप्रसंगी विशेष जाणवू लागली आहे. या भूतलावर मातेच्या प्रेमाची बरोबरी करणारे दुसरे प्रेम नाही. माते! तुझ्या स्मृतीस या समयी प्रेमाश्रूंचे सिंचन करण्याखेरीज मजपाशी दुसरे काय आहे?

गेल्या रविवारी कार्तिक एकादशीच्या दिवशी सकाळी ११ वाजता मी माझ्या इतर सहकाऱ्यांबरोबर कॉंग्रेसच्या प्रचारकार्यार्थ किणीकडच्या भागात निघून गेलो होतो. त्याच दिवशी सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास तिच्या मानेस एकाएकी अर्धांगवायूचा झटका आला ती बेशुद्ध

झाली. लागलीच डॉक्टरी उपाय योजण्यात आले आणि ती शुद्धीवर आली.सोमवारी सायंकाळपर्यंत तिची प्रकृती बेताबाताचीच होती. पण सायंकाळी एकाएकी आजाराने उचल खाल्ली. चळवलेला दमा, त्यातच पोटातील तीव्र वेदनांची भर, आणि अलीकडेच जडलेला रक्तदाबाचा विकार यामुळे तिचे हाल पहाणे नको असे झाले होते.

सोमवारी रात्रौ एकच्या सुमारास मी गावाहून परत येऊन पहातो तो घरात एकच गोंधळ उडून गेलेला दिसला. 'काय? काय?' म्हणत मी आत धावतच गेलो. 'आलास रे बाबा, बरे झाले! ››› हे तिचे शेवटचे उद्‌गार व शेवटचे शब्द माझ्या कानी पडले. यानंतर डॉक्टर आणून इंजेक्शन वगैरे उपचार करण्यात आले. यावेळी तिला जी एकदा बेशुद्धावस्था आली होती, ती अखेरपर्यंत तशीच राहिली. निधनसमयी तिचे वय एकसष्टच्या जवळपास होते.

माझ्या मातेचा स्वभाव अत्यंत साधा, निरहंकारी असल्याने व्रतेवैकल्ये करण्यात तिला समाधान वाटत असे. काबाडकष्ट व दीर्घोद्योग यांचा तिला कसा तो कंटाळाच नव्हता. गरिबांच्या दु:खाशी समरस होण्यात तिला आनंद वाटत असे. आपल्या साध्या वृत्तीमुळे व मनमोकळेपणामुळे तिने अनेक कुटुंबांना आपलेसे केले होते. तिच्या निधनाने जुन्या पिढीतील प्रेमळ व अत्यंत श्रद्धाळू अंत:करणास आम्ही अंतरलो आहोत. स्वत:च्या मनाचे सांत्वन व्हावे म्हणून दु:खित अंत:करणाने मी हे चार शब्द लिहिले आहेत.

## माझे परमपूज्य वडील ती. तात्या यांच्याचरणीं स्मृतिसुमनांजली

गेल्या गुरुवारी म्हणजे ता. २–१–४७ रोजी रात्रौ ९ वाजता केवळ आठच दिवसांच्या आजाराने माझे वडील निधन पावले.

प्रत्येकाच्या आयुष्यात माता व पिता यांचा वियोग होणे ही एक मोठी दैवी आपत्ती असते. ही हानि कशानेही भरून न येण्यासारखी असते. आई गेली की ममता जाते व पिता गेला की आधार जातो.

माझे वडील, ज्याना मी 'तात्या' म्हणून संबोधत असे ते आता मला कायमचे अंतरले आहेत. यापुढे त्यांचा अभाव मला जाणवल्याशिवाय राहणार नाही. आजपर्यंत जे काही थोडेबहुत सार्वजनिक कार्य माझ्या हातून घडले ते त्यांच्या धीरावर! ते असेतोपर्यंत घरच्या प्रपंचाची अगर छापखान्याच्या कारभाराची मला बिलकुल काळजी वाटली नाही. १९३० मध्ये, १९३२ मध्ये अगर १९४२ मध्ये माझ्या कारावासाच्या प्रसंगी त्यानी मोठ्या धैर्याने तोंड देऊन सर्व काही व्यवस्थितपणे सांभाळून नेले. संकट आले की त्यांचे अवसान वाढत असे. १९३० मध्ये छापखान्याच्या झडतीचे व जामीनकीचे काही प्रसंग आले, त्यावेळी त्यानी अवर्णनीय धैर्य दाखविले. स्वभावाने ते जितके तापट होते तितकेच ममताळूही होते. आतबाहेर असे त्यांच्या स्वभावात काही नव्हते. उघड्या मनाचे स्पष्टवक्ते असल्यामुळे त्यांच्याविषयी प्रथमत: परक्याच्या मनात गैरसमज उत्पन्न होत असे. त्यांचा दरारा मोठा होता. त्यांचे मन मोडून एखादी गोष्ट करावयाची झाली तर मला त्यांची अद्यापही भीती वाटत असे. त्यांच्याशी वाद करण्याची सोयच नव्हती. त्याना ताबडतोब संताप येत असे. पण थोड्या वेळानंतर त्याचा मागमूसही नसे. कित्येक प्रसंगी मला त्यांच्याविरुद्ध बोलावे लागे. तेव्हा त्याचा परिणाम 'अबोला' धरण्यात होई. पण हा अबोला फार काळ टिकत नसे. पुन्हा मोकळेपणाने बोलणे–चालणे सुरू होई. त्यांची वृत्ती फारच स्वाभिमानी होती.

त्यानी पोलीसखात्यात २४ वर्षे कामगिरी केली. या अवधीत त्यानी बरीच धाडसाची कामे

केली.मोठमोठे दरोडे व फौजदारी गुन्हे पकडले. त्यावेळी सत्या बेरड यास पकडल्याबद्दल त्यांचा गौरवही झाला होता. घोड्यावर बसण्यात व बंदुकीच्या नेमबाजीत ते पटाईत होते. पण कडक स्वभावामुळे व स्वाभिमानी वृत्तीमुळे १९१९ साली त्याना फौजदारी नोकरीस वरिष्ठांच्या गैरमर्जीमुळे मुकावे लागले.

१९१९ नंतर कुटुंब पोषणाकरिता त्यांनी काही उद्योगधंदे केले, पण त्यात त्यांना यश आले नाही. आर्थिक परिस्थिती फारच खालावली. तरीही त्यानी धैर्य न सोडता आम्हा दोघा बंधूंचे शिक्षण पुरे करण्यात कसूर केली नाही.

पुढे मी १९२१ साली असहकाराच्या चळवळीत सामील झालो. तेव्हापासून मी थोडेबहुत सार्वजनिक काम करू लागलो. प्रथम प्रथम माझ्या वडिलांकडून मला विरोध सहन करावा लागला. पण उत्तरोत्तर हा विरोध कमी होत जाऊन त्याचे रूपांतर सहानुभूतीत झाले. त्याना म. गांधीविषयी नितांत आदर वाटत असे. ते त्याना 'दैवी पुरुष' म्हणत असत.

माझ्या वडिलांच्या सहानुभूमीमुळे– त्यांच्या आधारामुळेच मला सार्वजनिक कामात इतक्या निश्चितपणे भाग घेता आला. माझा तो आधार आता नाहींसा झाला आहे. त्यांचा संताप, त्यांचे प्रेम, त्यांची वत्सलता, त्यांची कर्तव्यतत्परता या सर्व गुणांची आठवण क्षणोक्षणी आल्यावाचून रहात नाही. मरणसमयी त्यांचे वय ७७ वर्षांचे असावे. तथापि त्यांची काम करण्याची उमेद अखेरपर्यंत कायम होती.

तात्या! तुम्हाला कोठे शोधू? तुम्ही आता मला कायमचेच अंतरलात ना? माझे मन मी आज मोकळे करू पहात आहे. तुमच्या स्वभावातील दोष म्हणून जे काही मला वाटत असत, ते आता माझ्या दृष्टीतून लोपले आहेत. तुमची थोरवी, तुमचे सद्‌गुण तेवढेच मला दिसत आहेत. काही प्रसंगी मी तुमच्याशी कठोरतेने वागलो त्याची आज आठवण होऊन पश्चातापयुक्त दु:ख होत आहे.तुम्ही मला क्षमा कराल ना? तुमच्या संतापी स्वभावाचा मला वेळोवेळी राग येत असे. पण आज मला तुमचे ते आपुलकीचे रागाचे शब्द पुन्हा ऐकावयास मिळतील काय? परमेश्वरा, तात्यांच्या आत्म्यास चिरशांती दे हीच प्रार्थना!

## यशवंताच्या स्मृतीस अश्रूंची अंजली

माझा प्रिय बंधू यशवंत याचे सोमवार ता. १९ रोजी मिरज येथे देहावसान झाले. त्यामुळे माझ्या मनाला जबरदस्त धक्का बसला आहे. माझ्या परमपूज्य पित्याच्या निधनाला एक वर्ष होते न होते, तोच दुसरा अस्मानी आघात माझ्या अंत:करणावर झाला आहे.

गेली २८ वर्षे मी सार्वजनिक कार्य करीत आलो आहे. या अवधीत अनेक संकटांशी तोंड देण्याचा प्रसंग माझ्यावर आला व या सर्व प्रसंगी माझा यशवंत माझा खरा पाठीराखा होता. त्याचा अदृश्य हात प्रत्येक संकटकाळी मला धीर देत असे. जेव्हा जेव्हा तुरुंगात जाण्याचा मजवर प्रसंग आला, तेव्हा तेव्हा एकांतात बसून त्याने अश्रू ढाळले आहेत. आमची कार्यक्षेत्रे जरी भिन्न भिन्न होती, तरी आमची अंत:करणे एकच होती. माझा बंधू राजकीय चळवळींपासून अलिप्त रहात असे, परंतु त्याचे अंत:करण राष्ट्रीय आकांक्षांशी पूर्णपणे समरस झालेले होते. म. गांधीबद्दल जर कोणी अनुदार उद्‌गार काढले तर त्याला अतिशय संताप येई.

यशवंत अंत:करणाचा अत्यंत कोमल होता. अन्यायाची त्याला चीड होती. कंट्रोलच्या कायद्याखाली तांत्रिक गुन्हे पकडून गोरगरिबांवर खटले घालण्याच्या पोलिसी वृत्तीबद्दल त्याला अतोनात संताप येत असे. याविषयी तरुणभारतात जे लेख प्रसिद्ध झाले आहेत, ते त्याच्याच

प्रेरणेने लिहिले होते.

आपल्या वकिलीच्या धंद्यात लोकांकडून पैसे उकळण्याकडे त्याची कधीच प्रवृत्ती नव्हती. पक्षकारांना योग्य तो सल्ला द्यावयाचा व त्यांच्या हिताचा मार्ग त्यांना दाखवावयाचा, असा त्याचा शिरस्ता होता. खोटेपणा त्याला बिलकुल खपत नसे. गोरगरिबांवरील खटले चालविताना त्याने केव्हाही फीची अपेक्षा केली नाही. त्याचा स्वभाव सरळ, साधा, निष्कपटी व परोपकारी असल्यामुळे त्याने शेकडो मित्र जमविले होते. ज्यांचा ज्यांचा म्हणून त्यांच्याशी संबंध आला, त्या आपल्या अंगच्या गुणामुळे त्याने जवळ केले नाही, असे क्वचितच घडत असे. त्याच्या स्नेहीवर्गात बडे बडे सरकारी अधिकारी, मोठमोठे व्यापारी व काही वृद्ध पेन्शनरही होते.मुसलमान, पारशी, ख्रिश्चन धर्मातील अनेक सद्‌गृहस्थ त्याचे जिव्हाळ्याचे स्नेही होते. त्याच्या अकाली आणि आकस्मिक मृत्यूमुळे ही सर्व मंडळी हळहळत आहेत. स्वभावाने तो अत्यंत निगर्वी, निस्पृह, स्वाभिमानी व मनमिळावू होता कोणाचीही अजीजी करणे त्याला कधीही माहीत नव्हते. निरनिराळ्या विषयांवरील पुस्तके वाचण्याचाच काय तो त्याला नाद होता. आपण पुस्तके वाचावीत व दुसऱ्याना ती वाचावयास द्यावीत यातच त्याला आनंद वाटत असे. फुरसतीच्यावेळी नेहमीच त्याच्या हाती पुस्तक असावयाचे. त्याचा आजार विकोपाला गेल्यामुळे मृत्यूपूर्वी एकच महिना काय ते त्याच्या हातातून पुस्तक सुटले होते. इंग्रजी भाषेवर त्याचे चांगलेच प्रभुत्व होते.

इतके सारे सद्‌गुण असूनदेखील आपल्याला प्रसिद्ध मिळावी, आपला गावावाजा व्हावा अशी अपेक्षा कधी चुकूनही त्याने केली नाही, त्याला मोठेपणाची बिलकुल हाव नव्हती. मागे राहून काम करण्यातच त्याला आनंद वाटत असे.

पू. पित्याच्या निधनानंतर आम्ही उभयता बंधू एकमेकांकडे अधिक ओढले गेलो. कोर्टातून परत घरी जाताना दररोज मुद्दाम छापखान्यात येऊन त्याने माझी विचारपूस करावी आणि मी पण त्याचे क्षेमकुशल पुसावे. असा आमचा क्रम चालला होता. अखेर दुर्दैवाने मात केली. माझ्या यशवंताला असाध्य अशा रोगाने पछाडले व त्यातच त्याचा अखेर अंत झाला.

यशवंत, तू मला कायमचा सोडून गेलास. तुझ्या प्रेमळ सहवासाला मी कायमचा अंतरलो. आता मी कशात समाधान मानू? तू मला पुन्हा कधीतरी दृष्टीस पडशील का? तुझ्या नेत्रातील ते अखेरचे अश्रूबिंदू माझ्या अंत:करणात अद्याप कालवाकालव करीत आहेत. 'तात्या, तात्या! बाबूऽ!' म्हणून तू मारलेली ती शेवटची हाक माझ्या हृदयाला घरे पाडीत आहे. अखेर 'राम राम' असे उद्‌गार काढून तू नि:शब्द झालास! ईश्वर तुझ्या आत्म्यास सदगति देवो.''

## डॉक्टरांच्या प्रेमळ स्मृतीस माझे अश्रुसिंचन!

''डॉ. हेरेकर यांच्या निधनामुळे बेळगाव–शहापूरची जनता किती शोकाकुल झाली होती, याची साक्ष त्यांच्या प्रेतयात्रेस जमलेल्या प्रचंड जनसमुदायाने सर्वांच्या नजरेला आणून दिली आहे. बेळगावच्या इतिहासात एवढी मोठी स्मशानयात्रा केवळ अपूर्व होय. त्यांची लोकप्रियता किती होती व त्यांनी गोरगरिबांच्या अंत:करणात केवढे अढळ स्थान मिळविले होते, याची कल्पना यापूर्वी फारच थोड्याना आली असेल.

माझा व त्यांचा गेल्या पंचवीस वर्षांचा दाट स्नेह होता. या अवधीत मी त्यांना आणि ते मला भेटले नाहीत असे क्वचितच झाले असेल. नाही म्हणायला १९३७ साली ते जेव्हा व्हिएन्नास गेले होते, अगर मी जेव्हा वेगवेगळ्या सत्याग्रहाच्या प्रसंगी कारागृहात गेलो होतो, त्यावेळीच

काय ते आम्ही एकमेकापासून दूर झालो होतो. सार्वजनिक कार्याविषयीची आस्था हीच आम्हाला उभयताना एकत्र आणण्यास कारणीभूत झाली.

डॉक्टरांचा आणि माझा व्यक्तिशः विशेष परिचय पूर्वी नव्हता. एक नामांकित डॉक्टर म्हणून मी त्याना ओळखत होतो, तर राजकीय चळवळी व स्वयंसेवक संघटना यांचा प्रमुख म्हणून ते मला ओळखत होते. माझा त्यांचा परिचय झाला तो तरुणपिढीला शारीरिक शिक्षण देण्याच्या कार्याच्या निमित्ताने. बेळगाव येथे अमरावतीच्या हनुमान व्यायाम शाळेसारखी एक केंद्रीय व्यायामशाळा काढावी अशी डॉक्टरांची इच्छा होती. मलाही या कार्याची हौस असल्याने आम्ही एकत्र आलो व हळूहळू आमच्या परिचयाचे दाट स्नेहात रूपांतर झाले. माझ्यावर त्यांचे अत्यंत गाढ प्रेम होते. मला ते आपल्या कुटुंबातील एक असे मानीत.

रोज पहाटे साडेपाचला ते उठत. चहा घेऊन, स्नान आटोपून ते तासभर वाचन करीत. हा त्यांचा क्रम कधीही चुकला नाही. मेडिकल मॅगेझिन्स वाचून शिवाय इतर काही उपयुक्त ग्रंथही ते वाचीत असत. मोटारीतून जाता जाता ते बरीच वर्तमानपत्रे वाचून टाकीत. रात्री पुन्हा वाचनात ते एक तास घालवीत.

त्यांच्या अनेक उद्योगात ते स्वतःच्या डॉक्टरी व्यवसायाला अग्रस्थान देत असत. पेशटांची वेळच्यावेळी सेवा करणे ते महत्त्वाचे समजत. त्यांचा रोजचा कार्यक्रम घड्याळाच्या कांट्याप्रमाणे नियमितपणे चालत असे. आपला उद्योग सोडून कामाच्यावेळी ते कधीही गप्पागोष्टी करीत बसत नसत. रात्री–अपरात्री येणाऱ्या रोग्यांना त्यानी कधी विन्मुख पाठविले नाही. आपल्या गोड भाषणाने ते आपल्या रोग्यांचा अर्धा अधिक विश्वास संपादन करीत. पुष्कळ गोरगरिबांना त्यानी फुकट औषधोपचार केलेला आहे. सार्वजनिक सेवेस वाहून घेतलेल्या लोकांकडून व स्नेह्यांकडून त्यानी कधीही बिलाचे पैसे घेतले नाहीत. इतके असूनही ते अत्यंत हिशेबी असत. त्याना खोटेपणाची अत्यंत चीड असे. खरोखरच रोगी गरीब असेल तर त्याला मदत करण्यास ते तत्पर असत. माझ्या संबंधाने बोलताना ते म्हणत, ‘‘बाबुराव, तुम्ही आपल्या व्यवसायाकडे अधिक लक्ष द्या. कठीण प्रसंग आला की कोणीही मदतीस येत नाही. मी माझ्या दवाखान्याचा हिशोब रोज जातीने पहात असतो. या कामासाठी दररोज मी अर्धा तास राखून ठेवतो. जो मनुष्य बिनहिशोबी वागतो, तो आपल्या धंद्यात कधीही पुढे येणार नाही. हिशोबीपणाचा गुण तुम्ही माझ्याकडून शिका. आमच्यासारख्या सामान्य माणसानी आपल्या शक्तीप्रमाणे जेवढे चांगले करता येईल, तेवढे करीत रहावे इतकेच माझे म्हणणे.’’

राजकारणाच्या क्षेत्रात जरी त्यानी कधी पाऊल टाकले नसले, तरी त्यांची राजकीय मते जहाल होती. त्यांचा देशाभिमान सदैव जागृत होता. मला ते कधी कधी म्हणत, ‘‘सगळ्या राजकारणाचा मक्ता आम्ही तुमच्याकडे देऊन टाकला आहे.’’ पण दुसऱ्या एखाद्या प्रसंगी ते मला सल्ला देत, ‘‘बाबुराव, नुसते राजकारणच करू नका. आमच्याबरोबर थोडे येत जा! जगातील इतर गोष्टींकडे दुर्लक्ष करू नका! तुम्हाला सौंदर्याची दृष्टी मुळीच नाही. फुलाचे सौंदर्य, शिल्पकलेचे सौंदर्य वगैरेनी तुम्हाला आनंद होत नाही?’’ ‘‘खरे आहे डॉक्टर!’’ मी म्हणत असे, ‘‘या सर्व गोष्टी ज्याच्यापाशी भरपूर पैसा आहे, त्यालाच सुचतात.’’

इतका जरी त्यांचा व माझा स्नेह असला, तरी पुष्कळवेळा त्यांच्याशी मतभेद होऊन ‘चहाच्या पेल्यांतील वादळ’ निर्माण होत असे. काही काही वेळा त्यांचा व माझा रुसवा वा अबोला होत असे. ही गोष्ट लोकांना कधीही खरी वाटणार नाही. तथापि ही वादळे लवकरच शांत होत असत

व आम्ही सारे विसरून जात असू. डॉक्टरांना क्वचितच राग येत असे आणि आला तरी तो चेहऱ्यावर न दाखविण्याची कला त्यांना चांगलीच साधली होती. तथापि एक गोष्ट खरी की मला डॉक्टरशिवाय व डॉक्टरांना माझ्याशिवाय मुळीच करमत नसे.

डॉक्टर, तुमच्या या आपुलकीच्या आणि प्रेमळपणाच्या भावनेला मी आज कायमच मुकलो आहे. तुमची आठवण होताच तुमची ती भव्य मूर्ती माझ्या डोळ्यासमोर उभी रहाते व तुम्ही आता मला कधीच भेटणार नाही, या कल्पनेने अंतःकरणात कालवाकालव होते. माझ्या अंतःकरणातील सुखदुःख इतपर मी कोणापुढे उघडे करू?

गेल्या दोन वर्षात माझ्यावर ज्या कौटुंबिक आपत्ती आल्या त्यांची परिसीमा डॉक्टरांच्या मृत्यूने माझ्याबाबतीत गाठली आहे. मी पत्करलेल्या वाढत्या जबाबदाऱ्या लक्षात घेता, अशा गंभीर प्रसंगी धीर खचू लागतो. आणि वाटू लागते की, या जगात आपल्याला एकट्याला प्रवास करावयाचा आहे! 'एकला चलो रे, एकला चलो रे!'

## अण्णासाहेब यांच्या प्रेमळ स्मृतीस

''श्री. अण्णासाहेब लठ्ठे यांच्या निधनाने मुंबई राज्यातील एक मोठा विद्वान व कर्तबगार पुढारी नाहीसा झाला आहे. डॉ. हेरेकर यांच्या निधनानंतर अवघ्या सोळा महिन्यांच्या आत अण्णासाहेबांचा परलोकवास व्हावा हा बेळगावच्या सार्वजनिक जीवनास बसलेला जबरदस्त धक्का आहे.

श्री. अण्णासाहेबांचा व माझा अत्यंत निकटचा संबंध होता. सन १९३३ साली माझी व त्यांची प्रथम ओळख झाली. काँग्रेसचे कट्टे विरोधक म्हणून मी त्यांच्यापासून दूर रहात असे. माझे बंधू कै. यशवंतराव ठाकुर व अण्णासाहेब यांचा स्नेहसंबंध होता. त्यामुळे अण्णासाहेब आमच्या घरी अनेकवेळा येत जात असत. मी त्यांच्यावर काही बाबतीत तरुण भारतातून त्यावेळी सडेतोड टीका केली होती. त्यामुळे मी त्यांना भेटण्याचे टाळीत होतो. माझ्या बंधूस ते एकदा म्हणाले, ''काय हो, तुमचे बंधू नासिक जेलमधून परत आले आहेत ना?'' मी घरातच होतो. त्यांच्या तोंडचे हे शब्द ऐकून मी बाहेर आलो. एवढा मोठा गृहस्थ आपल्यावर केलेली टीका विसरून मोकळेपणाने मनात कोणतीही अढी न बाळगता माझ्याशी बोलू इच्छितो याचा मला मोठा अचंबा वाटला. हाच माझा व त्यांचा पहिला परिचय. ''बाबुरावानी तरुण भारतातून मजवर केलेली टीका आपण वाचलीत का? ती योग्य आहे का?'' हसत हसत ते जवळच्या मंडळीस म्हणाले, ही त्यांची खेळकर वृत्ती पाहून माझ्या मनावर विलक्षण परिणाम झाला. सार्वजनिक कार्यात केलेल्या टीकेचा कडवटपणा मनात न बाळगता अहंकाररहित वृत्तीने वागण्याचा त्यांचा स्वभाव पाहून मला मनात वाटले की, सर्वच पुढारी अशारीतीने वागतील तर किती बरे होईल!

या परिचयाचेच पुढे निकटच्या स्नेहात रूपांतर झाले. अनेक गोष्टींवर आमची चर्चा होऊ लागली.काँग्रेसमधील बऱ्यावाईट गोष्टी, पक्षोप–पक्ष, ब्राह्मणेतर चळवळ, देशाचे भवितव्य, ते सुधारण्याची दिशा वगैरे अनेक विषयांवर आमचे वादविवाद नित्य चालू असत. परस्परांचे भिन्न दृष्टिकोन समजून घेण्यास याचा फार उपयोग होत असे. आम्हा दोघांचे प्रकृतीधर्म भिन्न होते, कार्यपद्धतीबद्दलही कधी एकमत होत नसे.

अण्णासाहेबाना न्या. मू. रानडे यांच्याविषयी नितांत आदर त्यांच्या सनदशीर मार्गावर आणि ध्येयधोरणावर अण्णासाहेबांचा विश्वास होता. टिळक–गांधींचे राजकारण त्यांना पसंत नव्हते.

आणि मी तर त्यांचा अभिमानी. असे असूनही अण्णासाहेबांचे –माझे संबंध जिव्हाळ्याचे होते. त्यांचे शुद्ध अंतःकरण, मनाचा प्रांजळपणा व प्रामाणिकपणाचे वर्तन यामुळे माझी त्यांच्यावर श्रद्धा बसली. मतभिन्नता असली, तरी आपण एकत्र नांदू शकतो, हे त्यांनी आपल्या आचरणाने मला पटवून दिले.

श्री. गंगाधरराव देशपांडे व श्री. अण्णासाहेब लठ्ठे हे राजकारणातील एके काळचे कट्टे विरोधक. श्री. अण्णासाहेबांविषयी गंगाधररावांच्या इतक्या कडव्या भावना होत्या की ते म्हणाले, ''बाबुराव, अण्णासाहेबांशी थोडे जपून वागा. ते मोठे खोल, कारस्थानी व आतल्या गाठीचे गृहस्थ आहेत.'' त्यावर ''मला तर तसे काही वाटत नाही.'' असे मी म्हणालो, तेव्हा ते म्हणाले, ''तुम्हाला अनुभव येईलच.''

पुढे काही काळ गेल्यानंतर मध्यवर्ती असेंब्लीची निवडणूक आली. कर्नाटकातून श्री. होसमनी हे काँग्रेसतर्फे निवडणुकीला उभे होते. याप्रसंगी श्री. अण्णासाहेब यांनी स्वतःच्या मोटारीने सर्वत्र दौरा काढून ब्राह्मणेतर पक्षातील आपल्या अनुयायांस काँग्रेसच्या उमेदवाराला सहाय्य करण्याची विनंती केली. त्यांच्या या सहाय्यामुळे काँग्रेस आमदाराची ही निवडणूक विशेष सुलभ झाली. या निवडणुकीच्या प्रचाराच्या निमित्ताने श्री. गंगाधरराव व अण्णासाहेब एकमेकांच्याजवळ आले, परस्परातील गैरसमज व पूर्वग्रह आस्ते आस्ते दूर झाले व दोघे निकटचे स्नेही बनले.

पुढे गंगाधरराव मला म्हणाले, ''बाबुराव, तुम्ही म्हणता तेच खरे–अण्णासाहेबांचे आत–बाहेर असे काही नाही. ते उघड्या मनाचे आहेत.'' पुढे थोड्याच अवधीत 'म्हणजे १९३६ च्या ऑगस्टच्या पहिल्या तारखेस लोकमान्यांच्या पुण्यतिथीच्या दिवशी श्री. शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या बेळगाव येथील जाहीर सभेत श्री. अण्णासाहेब लठ्ठे यांनी काँग्रेसच्या ध्येयधोरणास मान्यता देऊन काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यामुळे मला मोठा आनंद झाला. कारण माझी इच्छा अण्णासाहेबांनी काँग्रेसमध्ये येऊन आपल्या कर्तृत्वाचा फायदा जनतेस द्यावा, हीच होती.

या नंतर १९३७ साली मुंबई विधिमंडळाच्या झालेल्या निवडणुकीत अण्णासाहेब प्रचंड बहुमताने निवडून आले आणि मुंबई विधिमंडळात त्यांच्याकडे फडणविशी सोपविण्यात आली. राज्यकारभारातील त्यांच्या पूर्वानुभवामुळे त्यांची ही कारकीर्द यशस्वी झाली. त्याना कामाची हौस. आळस त्याना माहीत नव्हता. त्यांची लेखणी जबरदस्त. एकदा लिहावयास बसले की विचार करण्याकरिता ते केव्हाही थांबत नसत, आणि एकदा लिहिलेले ते क्वचितच खोडत असत. मुंबई मंत्रिमंडळातील अंदाजपत्रकावरील आपले भाषण त्यानी पहाटे उठून अवघ्या चार तासात लिहून काढले. तोंडात विडी धरलेली व लिहिण्याचे काम झपाट्याने चालू–असे चालायचे. त्यानी लिहिलेले 'शाहू चरित्र', 'संस्थानी राजकारणातील ग्रंथ' व 'माझ्या विलायतच्या प्रवासाच्या आठवणी' ही पुस्तके लोकांच्या परिचयाची आहेत.

इकडच्या भागात संस्थानी राजकारणाचा अभ्यास त्यांच्या इतका कोणाचाच नव्हता. लहानमोठे अनेक संस्थानिक त्यांचा सल्ला घेण्यासाठी वारंवार येत. राज्यकारभाराची धुरा वाहताना जी दक्षता व जी तत्परता ते दाखवीत तितकीच तत्परता व दक्षता एखाद्या लहानशा सहकारी सोसायटीचे कामकाज पहाताना ते दाखवीत असत. अशाप्रकारची लहानसहान कामे करण्यात ते कमीपणा मानीत नसत. त्याना आढ्यत ठाऊक नव्हती. त्यांची राहणी अत्यंत साधी होती. जेवणखाण, फिरायला जाणे, पहाटेस उठणे वगैरे बाबतीत ते नियमित असत.

ते बुद्धिवादी होते. भावनावश होऊन कोणतीही गोष्ट करणे त्यांना पसंत नसते. लोकमताचा कल ओळखून वागण्याची मुत्सद्देगिरी त्यांच्यात नव्हती. त्यामुळे त्यांचे बरेचसे नुकसान झाले. ही कला त्यांनी अंगिकारिली असती तर मध्यवर्ती सरकारच्या मंत्रिमंडळात त्याना निश्चित स्थान लाभले असते. 'आत एक  व बाहेर एक' अशी त्यांची वृत्ती नव्हती. हा त्यांचा निःस्पृहपणा त्यांना अनेकदा भोवला.

कोल्हापूरचा संबंध सुटल्यानंतर ते बेळगावास आले. त्यांच्या वृत्तीत त्यावेळी थोडे औदासिन्य आढळून येऊ लागले. डॉ. हेरेकरांचे नुकतेच निधन झाले होते. त्यामुळे राणी पार्वतीदेवी कॉलेजची जबाबदारी साहजिकच अण्णासाहेबांवर पडली.केव्हा केव्हा ते म्हणत, "हे काम माझ्या आवडीचे आहे. प्रिन्सिपॉल व प्रोफेसर म्हणून काम करण्याची मला अद्याप हौस आहे." हे कॉलेज आदर्श बनावे अशी त्यांची फार इच्छा होती. ते जगले वाचले असते, तर त्यानी त्या दिशेने प्रयत्न केले असते. त्यांच्या मृत्यूमुळे कॉलेजला पोरकेपणा आला आहे.

त्यांच्या आकस्मिक निधनाने मला पराकाष्ठेचे दुःख झाले आहे. जीवलग व जिव्हाळ्याच्या मार्गदर्शकाला मी आज कायमचा मुकलो आहे. त्यांची एखादी गोष्ट मला पटली नाही तर मी त्याना अगदी स्पष्टपणे तसे सांगत असे व त्यांच्यावर रूष्टही होत असे. तथापि थोड्या वेळानंतर त्यांच्यातील प्रेमळपणामुळे मला सर्व विसरून जावे लागे. दररोज आम्हा दोघांच्या गाठीभेटी होत. त्यावेळी अगदी घरगुती गोष्टीपासून तो सामाजिक व राजकीय विषयापर्यंतची चर्चा होई. त्यांच्या मृत्यूमुळे माझा एक मोठा आधार नाहीसा झाला आहे.

श्री. अण्णासाहेबांच्या अलीकडील जीवनामधील अनेक चढउतार पहाण्याचे प्रसंग मजवर आले. त्यामुळे त्यांच्या अंतर्बाह्य जीवनाचा मला चांगलाच परिचय घडला. अण्णासाहेब, तुमच्या अनेक वर्षांच्या प्रेमळ शेजाराला, सुखदुःखाच्या संवादाला, मित्रत्वाच्या सल्ल्याला आता मी आचवलो. तुमच्यातील तो साधेपणा, ती निगर्वी वृत्ती आणि मजविषयी तुमच्या अंतःकरणात बसत असलेली स्निग्धता आता मला कोठे दिसणार? मातापितरांच्या वियोगाचे दुःख मजवर कोसळले, त्यावेळी तुमच्या प्रेमळ सहानुभूतीचा मला कितीतरी आधार वाटला. डॉ. हेरेकरांच्या निधनानंतर आपला परलोकवास इतक्या लवकर व्हावा ही घटना किती दुःखद आहे! अण्णासाहेब, तुमच्या पवित्र स्मृतीस माझे वंदन असो!"

## मित्रश्रेष्ठ श्री. शिवराव कोप्पळ

"हल्ल्याळ येथे श्री. शिवराव कोप्पळ यांना आकस्मिकपणे देवाज्ञा झाली. त्यांच्या मृत्यूने बेळगावात जिल्ह्यातील काँग्रेसचा एक एकनिष्ठ सेवक व तरुण भारताचा जिवलग स्नेही नाहीसा झाला आहे. १९०८ पासून तो कालपरवापर्यंत अनेक आपत्तीशी तोंड देऊन अखेरपर्यंत धीरोदात्तपणे लढणारा हा शिपाईगडी आपल्या वयाच्या अवघ्या ५२ व्या वर्षी निवर्तला. लोकमान्यांच्या होमरूल लीगच्या चळवळीत आणि म. गांधींच्या असहकाराच्या आंदोलनात पुढाकार घेऊन त्यानी बरेच नाव मिळविले होते. आतापर्यंत त्यानी चार वेळा तुरुंगवास पत्करला.

१९२१ पासून कालपर्यंत प्रत्येक कामात ते माझे मदतनीस व प्रेमळ सहकारी होते. १९२१, १९३० व १९३२ या तीन वेळा त्यानी माझ्याबरोबर कारागृहवास पत्करला. एवढेच नव्हे तर, काँग्रेसरोड खटल्यातही ते माझ्याबरोबर होते. त्यांच्या मृत्यूने माझ्या मनास जबरदस्त धक्का बसला असून पावलोपावली मला त्यांची आठवण झाल्याशिवाय रहात नाही. कोठेही त्यांना किंचित

अन्याय व अपमान दिसला की त्याचा प्रतिकार करण्यास ते ताडकन उठत असत. ते निधड्या छातीचे होते. त्याना भीती अशी मुळी माहीतच नव्हती. एकदा मनाचा हिय्या त्यानी केला की ते एखाद्या मेरूप्रमाणे स्थिर रहात असत. त्यांच्यात जाज्वल्य देशाभिमान वसत होता. त्यांची प्रापंचिक परिस्थिती बिकट असतानाही त्यानी आपला भार इतरांवर कधीही घातला नाही. मिळेल त्या मीठभाकरीत आणि प्राप्त परिस्थितीत कराव्या लागणाऱ्या काबाडकष्टात ते आनंद मानीत असत. त्यांना त्यांच्या मित्राने 'अहो शिवराव, तुमची दाढी वाढलेली आणि हे तुमचे कपडे!' असे विचारले तर ते हसत हसत म्हणत, "मी हा असा आहे! हिंदुस्थानची प्रजा सारी दरिद्री आणि त्यांच्यापैकीच मी एक. मला यात कमीपणा वाटत नाही." त्यांच्यामृत्यूने किती नुकसान झाले आहे, याची खरी जाणीव त्यांच्याच बरोबर खांद्यास खांदा भिडवून काम करणाऱ्यासच आहे. बेळगावच्या साऱ्या नागरिकांनी त्यांच्याविषयी दोन अश्रू ढाळावेत, इतकी त्यांची योग्यता होती हे आम्ही जाणतो."

## तरुण भारताचा प्रेमळ सहकारी हरपला

"गेल्या रविवार ता. २० रोजी सायंकाळी सहा वाजता श्री. अच्युत सदाशिव ऊर्फ बापूसाहेब देशपांडे हे ठळकवाडी येथे निधन पावले. गेली पांच वर्षे हृदयविकाराने ते आजारी होते. मरणसमयी त्यांचे वय ६५ वर्षांचे होते.

श्री. बापूसाहेब यांच्या जीवनात अनेक स्थित्यंतरे झाली आहेत. एल.एल.बी.ची परीक्षा पास झाल्यानंतर त्यानी वकिलीचा व्यवसाय फारच अल्पकाळ केला. त्यानंतर त्यांचा आणि श्रीमंत बापूसाहेब पटवर्धन कुरुंदवाड (ज्युनिअर) यांचा संबंध आला आणि ते कुरुंदवाड संस्थानचे कारभारी म्हणून काम पाहू लागले. तेथील त्यांची कारकीर्द लोकांना बरीच सुखावह गेली. लहानापासून थोरापर्यंत व श्रीमंतापासून गरीबापर्यंत सर्वांशी त्यांची वागणूक प्रेमळपणाची असे. सध्या माधवपूर–वडगाव या गावाची रेखीव रचना, रूंद रस्ते, तेथील सुंदर इमारती वगैरे ज्या काही प्रेक्षणीय वास्तू दिसतात त्यांचे बरेच श्रेय श्री. बापूसाहेबाना आहे. पण संस्थानी हवा त्यांना फार दिवस मानवली नाही. आणि ते कारभारीपदास मुकले.

त्यानंतर त्यानी काही नवीन व्यवसाय हाती घेतले. पण प्रत्येक व्यवसायामध्ये त्यांना खोटच बसत गेली, आणि अखेर आपल्या माडोळे (तुर्केवाडी) या खेडेगावी त्यानी शेतकी व्यवसायास सुरुवात केली. तेथील ग्रामीण जीवनात ते इतके समरस झाले की, एकेकाळी ते एका संस्थानचे दिवाण होते याची कोणासही शंकाच वाटावी.

त्यांची बुद्धी सर्वगामी होती. कोणताही विषय त्यांना कठीण वाटत नसे. शाळा–कॉलेजात एक हुषार विद्यार्थी म्हणून ते ओळखले जात. ते एक फार चांगल्यापैकी लेखक होते याची माहिती फारच थोड्यांना असेल. सुप्रसिद्ध फ्रेंच राज्यक्रांतिकारक रूसोच्या 'सोशल कॉन्टॅक्ट' या अवघड ग्रंथाचे त्यानी सरस मराठी भाषांतर केले आहे. 'तरुण भारता'चा आणि त्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध होता. १९४२ ते १९४४ पर्यंत श्री. बाबुराव ठाकुर हे नासिकच्या तुरुंगात स्थानबद्ध होतl त्या काळात तरुणभारताच्या संपादकत्वाची जोखमीची जबाबदारी श्री. बापूसाहेब यानी पत्करली होती. त्यानी ती अत्यंत निष्ठेने व समर्थपणे पार पाडली. त्यानंतरही वारंवार त्यांच्याकडून तरुण भारताला लेखन–सहाय्य होत असे.

काही लोक लौकिकार्थाने थोर असतात तर काही अंत:करणाने थोर असतात. श्री. बापूसाहेब हे दुसऱ्या मालिकेतील होते. लहानात लहान व मोठ्यात मोठा या समभावनेने ते वागत. एकेकाळी

दिवाण म्हणून मिरवलेले बापूसाहेब बदललेल्या कठीण परिस्थितीत देखील मनाचा समतोलपणा कसा ठेवीत असत हे पाहिले म्हणजे मोठे आश्चर्य वाटे. त्यांची सांपत्तिक स्थिती चांगली असताना त्यानी पुष्कळांना मदत केली आहेच, पण विपन्नावस्था आली असताही त्यानी कोणाला 'नाही' म्हटले नाही.

तरुण भारताच्या अशा या प्रेमळ सहकाऱ्याला सद्गति लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना!''

## प्रकरण अकरावे

# निवडक संपादकीय

लोकशाही राज्यात वृत्तपत्रकाराला महत्त्वाची भूमिका पार पाडावयाची असते. अखिल जनतेचे उज्ज्वल भवितव्य ठरविणारा थोर शिल्पकार म्हणून त्याला वावरावे लागते. त्यादृष्टीने महाराष्ट्राच्या इतिहासाचे अवलोकन करता, अगदी अभिमान बाळगावा असे महनीय कार्य एकापेक्षा एक थोर शिल्पकारांनी करून ठेवले आहे. विष्णूशास्त्री चिपळूणकरांची 'निबंधमाला', टिळकांचा 'केसरी', आगरकरांचा 'सुधारक' आणि शिवरामपंत परांजपे यांचा 'काळ' या वृत्तपत्रांचे कार्य पाहून कोणत्याही मराठी माणसाचे मन अभिमानाने फुलून जावे! पण या अभिमानामागे त्या त्या व्यक्तीची केवळ विभूतिपूजा नसून त्यानी आपल्या वृत्तपत्रातून केलेली विचारक्रांती आणि प्रत्येक स्वाभिमानी मनामध्ये निर्माण केलेली देशप्रीती यांचीच प्रचिती या अभिमानामागे पार्श्वभूमीसारखी उभी आहे.

केवळ इकडच्या तिकडच्या चार बातम्या छापून आणि वृत्तपत्रांचे एक अपरिहार्य अंग म्हणून चार जाहिराती देऊन रंगरंगोटी केलेला एखादा अंक वाचकांच्या स्वाधीन करून संपादकाला कृतार्थ होता येणार नाही. तत्कालीन प्रश्नासंबंधी काही इतिहास असल्यास तो साभिप्राय सांगण्याचे कार्य संपादकाला करावे लागते. असे करताना प्रचलित लोकमत सदोष आढळल्यास शिष्यहिततत्पर गुरुच्या प्रेमळपणे व प्रसंगी निष्ठुरपणे ते निर्दोष करावे लागते. त्याचप्रमाणे अभिनंदनीय जनप्रवृत्तीचे कोडकौतुकही आईच्या वात्सल्याने करावे लागते. कोठे निराशा आणि निरुत्साह आढळला तर तो दूर सारून आशा आणि उत्साहाचे वातावरण निर्माण करण्यासाठी प्रेमळ मित्राच्या जिव्हाळ्याने जनमानसात त्याला संचार करावा लागतो. थोडक्यात, वृत्तपत्रकाराचे कार्य असे वैविध्यपूर्ण आहे. ते पार पाडीत असताना जातिवंत संपादकाला अनेक समस्या भेडसावीत असतात. त्याची खरी कसोटी लागते ती त्याच्या अग्रलेखाच्या वेळीच. राजकीय, सामाजिक आणि आर्थिक जीवनावर परिणाम करणाऱ्या नानाविध गोष्टींचा परामर्ष अग्रलेखामधून घेणे संपादकाचे आद्य कर्तव्य ठरते.

त्यादृष्टीने अग्रलेख हा जनमानसाचा आरसाच म्हणावयास हरकत नाही.

यासंदर्भात तरुण भारताचा विचार केल्यास केवळ बेळगावातीलच नव्हे तर समग्र सीमाभागातील लोकमानसाची सुखदु:खे आणि भाव–भावना यांचे दर्शन घडविणारे एकमेव पत्र म्हणून तरुण भारताचा उल्लेख करावा लागेल. स्वाभाविकत: तरुण भारतातील अग्रलेखातून सीमाभागातील जनतेच्या सुखदु:खांचे प्रतिबिंब दिसल्यास नवल नाही. शिवाय वेळोवेळी देशांतर्गत घटनावरील भाष्यही तरुण भारताने अग्रलेखांतून प्रकट केले आहे.

''सीमाभागातील चळवळीची ही एक विद्युतज्योत होय'' अशा शब्दात काकांच्या कार्याचा गौरव अनेक व्यवसायबंधूनी व विचारवंतांनी केलेला आहे. जेव्हा अन्याय आणि अत्याचार बेतालपणे थैमान घालू लागतात, तेव्हा काकांच्या सात्विक संतापाला पेटत्या शोध–ज्योतीची धगधग प्राप्त होते, आणि एकेक शब्द जणू ठिणगी होऊनच बाहेर पडतो. या ठिणगीच्या प्रकाशात अन्याय, जुलूम, दडपशाही यांचे उघडेनागडे स्वरूप जनतेपुढे उभे केले जाते. अशावेळी काकांच्या लेखणीला विलक्षण धार चढते. अनेक विषयांची ती चांगलीच हजेरी घेते. परंपराप्रिय सनातनी जुनाट खोडांना, आपला जमाना आता संपला याचे निर्भेळ सत्य पटवून देते. सामाजिक अन्याय आणि दंभाचार यावर कडाडून तुटून पडणारी काकांची लेखणी, समाजातील चांगुलपणाचे बीजांकुर जोपासताना आणि आप्त–मित्रांविषयींची मायाममता व आत्मीयता व्यक्त करताना फुलासारखी हळुवार बनते. एका जबाबदार वृत्तपत्राचा संपादक या नात्याने काकांच्या हातून विपुल लेखन झाले असले, तर त्यात नवल असे काहीच नाही. त्यानी वेळोवेळी लिहिलेल्या लेखांची केवळ जंत्री द्यावयाची म्हटली तर या छोट्याशा ग्रंथात ते शक्य होणार नाही. तथापि पुढे ओघानेच दिलेल्या त्यांच्या निवडक अग्रलेखांतून त्यांच्या लेखणीच्या प्रमुख वैशिष्ट्यांचे पुरेसे दर्शन घडेल.

सन १९३१ सालची गोष्ट. पारतंत्र्याच्या जोखडाखाली जखडलेला भारत आणखी एका बाजूने पोखरला जात होता. समाजाला धर्मांतराची कीड लागली होती व ती मोठ्या वेगाने फैलावली जात होती. रोजच्या रोज एकेक नवीन बातमी कानावर येऊन मन विषण्ण करून जाई. मनुष्य धर्मातराला प्रवृत्त का होतो, हे तपासून पहाताना त्याला जबाबदार कोण हे शोधून काढणे महत्त्वाचे असते. काही झाले तरी माणूस हा एक जीवच आहे. या जीवासाठी अन्न, वस्त्र, निवारा यांची सोय होणे अत्यावश्यक आहे. या सोयी उपलब्ध झाल्या तरच ती व्यक्ती मनुष्य म्हणून जगू शकेल, आणि आपल्या समाजाचा, धर्मांचा आणि संस्कृतीचा विचार करू शकेल. पण अशा जीवनावश्यक वस्तूसुद्धा ज्यांना दुर्मीळ होतात, त्यानी धर्मांतरासारखे एकादे दुष्कृत्य केले तर त्यात दोष कोणाचा? माणूस भीक मागतो ते भीक मागण्याची हौस म्हणून नव्हे, तर त्याला काळजी असते ती आपल्या टीचभर पोटाची आणि चार कच्चाबच्च्यांची! त्यांना जिवंत ठेवण्यासाठी निरुपायाने त्याच्या हातून काही हीन भासणाऱ्या गोष्टी घडल्या, तर त्याबद्दल त्याला अपराधी धरणे चुकीचे ठरेल. कारण ज्या समाजात तो राहात असतो त्या समाजानेच त्याची हेळसांड केलेली असते.

१९३१ साली प्रस्तुत अग्रलेखात मांडण्यात आलेली घटना जेव्हा घडली त्यावेळी धर्माच्या, रूढीच्या ग्लानीत निष्कीय व सुस्त बनलेल्या आपल्या समाजाला कोणीतरी हे विचार ठणकावून सांगण्याची गरज होती. आणि एक जबाबदार संपादक या नात्याने काकांनी तरुण भारताच्या पुढील अग्रलेखातून ही कामगिरी पार पाडली आहे.

## हिंदूनो! जागे आहात काय?

''चिकोडी तालुक्यापैकी कारदगे या गावी सुमारे १५० अस्पृश्यांनी धर्मांतर करून मुसलमान धर्म स्वीकारला, ही खेदजनक वार्ता बेळगाव जिल्ह्यातील हिंदूसमाजाला अद्यापि पुरती कळली

नाही, आणि कदाचित कळली असलीतरीतीवर अनेकांचा विश्वास अद्यापि बसत नाही. पण हिंदू धर्मीय लोक हो! ही वार्ता सत्य आहे, त्रिवार सत्य आहे! आपल्याच हाडामांसाच्या व रक्तच्या हिंदू बांधवांस अस्पृश्य म्हणून दूर ठेवण्याचे, त्याना अन्यायाने वागविण्याचे, सार्वजनिक विहिरींवर पाणी भरू न देण्याचे, देवालयात देवदर्शनास प्रतिबंध करण्याचे फळ आज त्यांच्या धर्मांतराच्या रूपाने दृष्टीस पडत आहे. जे लोक कालपर्यंत गोपाळकृष्णाची पूजा करीत होते, तेच आज मूर्तिभंजक म्हणून त्यात आनंद मानणारे झाले. जे काल गोपूजक होते ते आज गोमांसभक्षक झाले. आमच्या समाजात रूढ झालेली स्पृश्यास्पृश्यतेची कल्पना, उच्चनीच भावना, त्यानावेळी अवेळी तुच्छतेने वागविण्याची तऱ्हा यामुळे आमचा सारा समाज दिवसेदिवस घसरत चालला आहे.

एकेकाळी हा सारा देश एकाच प्राचीन संस्कृतीच्या ३० कोटी हिंदू लोकांनी गजबजलेला आणि सुखसमृद्धीने नटलेला होता. पण याचसमाजाची शकले पडून लाखो ख्रिश्चन व ७ कोटीहून अधिक लोक मुसलमान झाले आहेत. परदेशातून येथे आलेल्या मूठभर ख्रिश्चन आणि मुसलमानांच्या जबरदस्तीने शेकडो लोक बाटले असतील, नाही असे नाही, पण त्याहून कित्येक हजारोपटीने अधिक लोक अस्पृश्यतेच्या दुष्ट चालीस कंटाळून व धर्मांतरित लोकास पुनः पावन करून आपल्यात मिसळू न देण्याच्या हट्टामुळे आपणास पारखे झाले आहेत. नव्हे, आपल्या हिंदू समाजाचे कट्टे शत्रू झाले आहेत. प्रत्यक्ष शत्रूपेक्षा फितुर इसम जसा अत्यंत अपायकारक व धोका देणारा असतो, त्याचप्रमाणे जातिवंत परधर्मीयापेक्षा हे बाटलेले लोक अत्यंत खुनशी, कपटी व घातक ठरतात. अलीकडेच बाटलेले लोक वरील विवेचनाची साक्ष देत आहेत. जाणूनबुजून अगर परधर्माची तत्त्वे पटून धर्मांतर करणाऱ्या व्यक्तीस प्रबुद्ध भारत रोखून धरू इच्छित नाही. ज्याच्या त्याच्या सदूसदूविवेक बुद्धीप्रमाणे प्रत्येकास हवा तो धर्म स्वीकारण्याची पूर्ण मुभा आहे, पण अस्पृश्यतेच्या जाचास कंटाळून जे कोणी अस्पृश्य आज दुसऱ्या धर्मास जाऊन मिळाले असतील, त्याना समजुतीच्या गोष्टी सांगून व त्यांच्यावरील अन्याय दूर करण्याचे आश्वासन देऊन, त्याना आपल्यात परत घेणे आपले सध्याचे अत्यंत निकडीचे कर्तव्य नाही काय?

हिंदू लोक हो! रुढीप्रिय हिंदू लोक हो! अद्याप आपल्यावर कोणती भयंकर आपत्ती कोसळावी म्हणून तिची वाट पहात आहात? की आपण अद्यापि अस्पृश्यता झुगारून देण्यास तयार नाही? 'आम्हाला देवालयात प्रवेश करू द्या. सार्वजनिक स्थळी आम्हास समतेने वागवा. विहिरीवर पाणी भरू द्या.' या नम्रतेच्या मागणीचा धिक्कार करून, आपण त्याच्याकडून प्रतिक्रियेत रूपांतर होणाऱ्या निष्ठुरतेच्या हक्काची अंमलबजावणी आपल्यावर करू देणार काय? धिक्कार असो या आपल्या रूढीप्रियतेचा!

'पेरावे तसे उगवते' किंवा 'करावे तसे भरावे' या म्हणीप्रमाणे अर्स्पृश्याना गुलामगिरीतच ठेवण्याचे पाप आपण केले म्हणूनच आम्हाला गुलामगिरीच्या नरकात खितपत पडावे लागत आहे! अस्पृश्याना स्वतंत्रता द्या, समान हक्क द्या, त्यांच्या सुखदुःखाकडे, अडीअडचणीकडे सहानुभूतिपूर्ण दृष्टीने पहा म्हणजे स्वतंत्रता तुम्हावर प्रसन्न होईल, राजकीय समाज दर्जा तुम्हाला मिळेल, तुमच्या सुखदुःखाकडे, अडीअडचणीकडे उभे जग सहानुभूतीने पाहू लागेल. जगाने आम्हास मदत करावी अशी अपेक्षा करण्याचा अधिकार तरी आम्हास कसा पोहोचतो? गेल्या बुधवारी नाशिक जिल्ह्यातील 'मुखेडा' नावाच्या गावी अस्पृश्य बंधूनी 'पांडवप्रताप' पोथीची पालखीतून मिरवणूक काढली होती. मिरवणूक गावात येताच स्पृश्य व धर्मनिष्ठ म्हणविणाऱ्या गुंडांनी त्या मिरवणुकीवर हल्ला केला, लाठीमार केला, पालखी जाळली, इतकेच नव्हे तर 'पांडवप्रताप' ची पोथीसुद्धा जाळली. काय ही धर्मनिष्ठा! कोण ही अधोगती ! स्पृश्यांच्या रूढीप्रियतेचे आणि हटवादीपणाचे किती भेसूर

प्रदर्शन आहे हे!''

**ता. २९ सप्टेंबर १९३१**

देशाच्या स्वातंत्र्य–प्राप्तीसाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या अलौकिक देशभक्तांबरोबर तत्कालीन सत्तारूढ जुलमी राजवटीची स्तुती गाणारे भाट देखील होतेच! याची प्रचिती १९३७ साली बेळगाव येथेच आली. तो समारंभ होता लॉर्ड ब्रेबोर्न याना मानपत्र देण्याचा. त्यांच्या स्वागताची व मानपानाची जय्यत तयारी करण्यात आली होती. सर्वत्र दिव्यांचा लखलखाट चालला होता. पण बेळगावातील बऱ्याच स्वाभिमानी नागरिकांना मात्र हा समारंभ मान्य नव्हता. कारण काही दिवसांपूर्वीच काँग्रेस रोड प्रकरणाबाबत याच ब्रेबोर्न साहेबानी घडवून आणलेला लाठीहल्ला आणि अत्याचार याबद्दलच्या वेदना लोक अद्यापि विसरले नव्हते. त्यामुळे या स्वागतसमारंभाला विरोध व्यक्त करण्यासाठी शेकडो नागरिकांच्या सह्यांची पत्रे पाठविण्यात आली होती. पण त्यांचा विचार करतो कोण! हजारो भारतीय कुटुंबे दारिद्र्यात आयुष्य कंठीत असताना इकडे मात्र गव्हर्नर साहेबांच्या सत्कार समारंभाची कोण तयारी चालली होती!

या गोष्टीबद्दल कडाडून निषेध व्यक्त करण्यासाठी आणि वारा येईल तशी पाठ फिरविणाऱ्या व संधी येईल तसे धोरण ठरविणाऱ्या ढोंगी लोकांबद्दलची चीड प्रकट करण्याकरिता काकांनी पुढील अग्रलेख लिहिला होता.

## आता रोषणाई ती कसली<br>आणि मानपत्र ते कशासाठी?

''उगवत्या व मावळत्या गव्हर्नरास मानपत्र देण्याची प्रथा कैक वर्षांपासून आपल्यात चालत आलेली आहे. आपल्यामध्ये मुरत आलेल्या गुलामी वृत्तीचे हे चांगलेच द्योतक आहे. सन १९२० सालच्या असहकाराच्या प्रचंड आंदोलनानंतर आमच्यात अशा गुलामी वृत्तीचे लोक आहेत म्हणूनच त्याना साम्राज्यशाहीत आपला बडेजाव मिरविता येत नाही. लॉर्ड ब्रेबोर्न साहेब हे काही वर्षांपूर्वी येथे येऊन गेले. त्यावेळीही त्यांच्या मनापत्राचा निषेध नागरिकांतर्फे करण्यात आला होता. त्यावेळी 'काँग्रेसरोड' प्रकरणामुळे उडालेली खळबळ, त्याप्रसंगी झालेली बेकायदेशीर अटक, अत्याचार, पोलिसांची दंडेली इत्यादी गोष्टी. अद्याप लोकांच्या स्मरणातून गेलेल्या नाहीत. तोच पुन्हा त्याच गव्हर्नर साहेबाना आरती ओवाळण्यासाठी हांजीहांजीखोर लोकांचा तांडा पुढे यावा याहून देशाचे दुर्दैव ते कोणते! गव्हर्नरला आरती ओवाळता ओवाळता स्वत:भोवती आरती ओवाळून घेण्याची संधी मिळते म्हणून या स्थानिक संस्थात असे मानपत्राचे प्रसंग शोधण्यात किंवा घडवून आणण्यात काही सभासद व्यग्र झालेले दिसतात. स्वार्थ, बडेजाव, सरकारदरबारी मानमरातब या गोष्टींपलीकडे त्यांची दृष्टीच जात नाही.

आज काही थोडे लोक आपल्या लांगूलचालनाचे प्रदर्शन नागरिकांच्या नावावर करीत असले, तरी बहुजनसमाज अशा या स्वागतसमारंभाच्या सोहाळ्या पासून फार दूर आहे. म्युनिसिपालटीतील लोकप्रतिनिधींनी जो मानपत्राचा खेळखंडोबा चालविला आहे, त्याविरुद्ध निषेध–प्रदर्शक पत्रे शेकडो नागरिकांच्या सह्यांनी पाठविण्यात आली आहेत. मन:पूत वर्तन करण्याची सवय स्थानिक संस्थातील प्रतिनिधींच्या अंगी बाणलेली आहे. त्याचाही सक्रिय निषेध करण्याची वेळ लवकरच येईल. त्यावेळी त्याच्या बेमुर्वतखोर वर्तनाचा त्यांना पश्चाताप झाल्याशिवाय राहणार नाही.

हिंदी जनतेपुढे आजकाल पोटापाण्याचा प्रश्न आ वासून उभा आहे. क्षुधेमुळे पोटात भडकलेला

अग्नि कोणत्याप्रकारे शमवावा याची चिंता तिला अहर्निश वहावी लागत आहे. भुकेने तळमळणारी त्यांची पोरे, थंडीवाऱ्यापासून निवारण व्हावे म्हणून फाटकी लक्तरे गुंडाळून जीवन कंठणारा त्यांचा परिवार, अंगभर जाडेभरडे कापडसुद्धा मिळत नाही म्हणून वीतभर लंगोटी व फाटके कांबळे यावरच त्यांची सारी गुजराण! अशी हजारो कुटुंबातीलबे आपल्या देशात कसेबसे आयुष्य कंठीत आहेत. गव्हर्नरसाहेब ज्या तुर्कवाडीला भेट देणार आहेत, तेथील आजुबाजूच्या खेड्यातील प्रत्यक्ष परिस्थिती याहून वेगळी नाही, हे त्यानी डोळे उघडून पाहिल्यास वस्तुस्थितीची त्याना पूर्ण प्रचिती येईल. डोळे खोल गेलेले, गालांची हाडे वर आलेली, पोट पाठीस जाऊन चिकटलेले, शरीर म्हणजे केवळ एक हाडांचा सापळा– अशा विपन्नावस्थेत दिवस कंठीत असणाऱ्या प्रजेस राज्यारोहणाच्या दिवशी केलेल्या विजेच्या रोषणाईने व स्वागत–समारंभाच्या डामडौलाने आनंद तो कसला होणार! अन्नासाठी तडफडणाऱ्या त्यांच्या बायकापोरांची भूक त्या लखलखाटाने कशी शमणार?

सध्या आहे ही परिस्थिती सुधारण्याकरिता सरकारने खरोखर काही प्रयत्न केले आहेत का? बादशहाच्या राज्यारोहणप्रसंगी प्रजेस आनंदीआनंद वाटावा अशातला काही प्रकार घडला आहे का? मग रोषणाई कसली करता! स्वागतसमारंभाचा थाटमाट तो कसला करता! बंगाल प्रांतातील शेकडो राजबंद्यांचा आर्वस्वर हृदय विदारून सोडीत असता आपणास स्वागताचे व मानपत्राचे सोहाळे सुचतात तरी कसे? स्थानबद्ध परिस्थितीत खितपत पडलेले बॅ. सावरकर, हिंडलग्याच्या तुरूंगात खडतर कारावास भोगत असलेले सेनापती बापट आणि त्यांच्याच सारखे इतरही काही देशभक्त, यांच्या मुक्ततेची आशा फोल ठरली असता रोषणाई तरी कसली करणार! तिकडे पुण्यात सोन्यामारूती सत्याग्रह प्रसंगी शेकडो नागरिक व म्यु. पालटीचे प्रतिष्ठित सभासद लाठीमाराखाली झोडपून काढले जात असता, इकडे स्वागत–समारंभात कोणी स्वाभिमानी नागरिक भाग घेईल हे संभवते तरी कसे? असे असले तरी आपली नोकरशाही आपल्या हस्तकांच्या सहाय्याने पोलीसांच्या कडेकोट बंदोबस्तात हे समारंभ पार पाडण्यास कमी करणार नाही. तथापि 'मोले घातले रडाया' या तुकारामाच्या उक्तीतून या सभारंभाला अधिक किंमत कोणीही देणार नाही.'

**–ता. ११ मे. १९३७**

म. गांधींचा खून ही मानवतेला कलंक लावणारी घटना होती. ज्या अहिंसेच्या पालनासाठी या महात्म्याने आपले आयुष्य वेचले, खुद्द त्याचाच शेवट अशा हिंसक प्रवृतीतून व्हावा ही केवढी लाजिरवाणी घटना! राष्ट्रपुरूषाची हत्या झाल्यामुळे जनतेत प्रक्षोभाची लाट उसळली आणि हत्या करणाऱ्या व्यक्तीचे नाव गांव समजताच त्या व्यक्तीशी संबंधित असलेल्या संस्थेवर, पक्षावर इतकेच नव्हे तर त्या जमातीवर प्रक्षुब्ध लोकांचे हल्ले होऊ लागले. राष्ट्रपित्याच्या हत्येमुळे उफाळलेला जनतेचा हा संताप अस्वाभाविक नव्हता. पण यासंतापाला जेव्हा हिंसक वळण लागू लागले. आणि ठिकठिकाणच्या स्थानिक गुंडांनी आपले व्यक्तिगत हेवेदावे साधण्यासाठी या संधीचा फायदा घेतला, तेव्हा या घटनेला मोठे भयावह स्वरूप प्राप्त झाले. सातारा, कोल्हापूर, सांगली, बेळगाव या जिल्ह्यातून या जाळपोळीच्या कृत्याना विशेष ऊत आला. अनेक निरपराध कुटुंबे बेचिराख झाली. ही लाट वेळीच थोपविली गेली नसती तर साऱ्या भारतभर जातीयवादाच्या आगीचा डोंब उसळला असता. यातून होणाऱ्या भयंकर परिणामाची जाणीव झाल्यामुळेच काकांच्या लेखणीतून प्रस्तुत अग्रलेख उतरला असावा.

## या लूट–जाळपोळीमागे पद्धतशीर कट आहे. नीतीचा धरबंध सुटला तर अनर्थ होईल!

"आमच्या हाती आलेल्या विश्वसनीय माहितीप्रमाणे या प्रचंड उत्पातामागे एक मोठीच जातीय संघटना आहे. ब्राम्हणांचा नि:पात करण्याचा एक पद्धतशीर कट झाला असला पाहिजे. कोणत्याही गावात जाळपोळ करण्यासाठी त्या गावाला अगोदर इशारा पाठवून आम्ही जमावाने अमुक दिवशी येणार आहोत, अशी पूर्वसूचना द्यावयाची. त्या गावच्या लोकांनी असे प्रकार करण्याला संमती दिली तर ठीकच, नाहीतर 'विरोधक लोकांची घरे जाळू' अशी धमकी द्यावयाची, घरातील माणसे केवळ अंगावरील वस्त्रनिशी घराबाहेर काढावयाची, पुढारी–गुंडानी लुटीतील दागदागीने व रोकड आपल्या खिशात घालावयाची, कागद व दस्तऐवज असतील ते व्यवस्थितरीतीने नाश करावयाचे आणि इतके झाल्यावर धान्य, भांडीकुंडी व इतर सामान लुटण्यास लोकांना परवानगी द्यावयाची व अखेरीस त्या घराला आग लावायची! आणि या सर्व गोष्टी म. गांधींच्या नांवावर करावयाच्या! गुंडांच्या कार्यपद्धतीचे हे ठराविक साच्याचे तंत्र सर्वत्र दिसून येते. हे लोक दारू पिऊन तर्र असावयाचे, उभ्या आयुष्यात ज्यांचा म, गांधींच्या तत्वाशी अगर चळवळीशी यत्किंचितही संपर्क आला नाही, अशा लोकांचे 'गांधी प्रेम' अगदी उफाळून आलेले दिसत होते.

कोल्हापूर हद्दीतून मोटार टॅक्समधून रॉकेल तेलाचे डबे घेऊन गुंड हुपरीमार्गे कारदग्यास आले व तेथून त्यानी जाळपोळीस सुरूवात केली. नेसरी नुल वगैरे भागातून चंदगड महालात व दड्डीकडे हे गुंड आले. कागलहून सौदलग्यास पोहोचले. पुढे शिप्पूरहून निपाणी भागात गेले. मिरज नागावकडून इकडील गुंडांच्या सहाय्याने लूट व जाळपोळ करण्यास त्यानी सुरूवात केली. "बामणाची लूट व जाळपोळ करा, असा सरकारचाच हुकूम आहे." असा प्रचार अडाणी जनतेत त्यांनी केला. ठराविक दोन दिवसात सर्वच बाजूनी गुंडाचा एकदम उठाव झाला. यावरून या घटनेमागे ब्राम्हणांचा नि:पात करण्याचा एक मोठा कट असला पाहिजे असे दिसून येते.

लुटालुटीची व जाळपोळीची ही अधम नीती ब्राम्हणाविरूद्ध आज जरी काही लोकांना बरी वाटत असली तरी, जर का ती एकदा समाजात रूढ झाली तर ती विशिष्ठ मर्यादेत राहील असे समजणे चुकीचे आहे. आपल्या देशात ज्या अनेक अल्पसंख्य जाती–जमाती आहेत, त्यांच्याविरूद्ध ती उपाययोजना अंमलात आणली जाणार नाही अशी ग्वाही कोण देऊं शकेल? एकदा का समाजाचा धरबंध सुटला की एकूण समाजव्यवस्थेवरच महान आपत्ति कोसळेल. उगाच 'साप–साप' म्हणून भुई बडविण्यात काय अर्थ आहे?

आपच्या देशात जातीय विष केवळ हिंदूमुसलमानातच आहे असे नसून हिंदूसमाजतील निरनिराळ्या जातीमधूनही ते विष किती तीव्रतेने भिनलेले आहे याचा भरभक्कम पुरावा म्हणजेच अलीकडील या घटना होत! आमचे स्वातंत्र्य टिकवायचे असेल, आमच्या देशाला ऊर्जितावस्था यावयाची असेल, तर या जातीय विषाला पूर्णता मूठमाती देणे आवश्यक आहे. अशा देशविघातक कारवायांच्या पाठीमागे जे स्वार्थी, आपमतलबी पुढारी असतील त्यांच्या सरकारने चांगला बंदोबस्त केला पाहिजे. नाहीतर जनतेचा सरकारवरील विश्वासच उडून जाईल. प्रजेचे जीवित आणि वित्त यांचे रक्षण करण्याला सरकार समर्थ नाही असेच लोकांना वाटेल, आणि गुंडाना व त्यांच्या पाठीराख्या पुढाऱ्यांना बेकायदा कृत्ये करण्याला दिवसेंदिवस अधिकाधिक उत्तेजन मिळेल, आज ब्राह्मणाविरूद्ध मोहीम झाली, उद्या दुसऱ्या कोणाविरूद्ध ती सुरू होईल. एवंच, बेबंदशाही माजण्यास बिलकुल वेळ लागणार नाही. यासाठी सरकारने जागरूक राहिले पाहिजे. व लोकांनी असल्या प्रत्येक बाबतींत पूर्ण सहकार्य केले पाहिजे."

**ता. १७ फेब्रुवारी १९४८**

भारताच्या वैभवसंपन्न संस्कृतीमध्ये धार्मिक सणांचा वाटा फार मोठा आहे. निसर्गानुरूप येणारे ऋतु आणि त्यांच्या अनुषंगाने येणारे विविध सण यांची योग्य सांगड पाहिली म्हणजे वसंत ऋतूच्या गोड चाहूलीची जाणीव करून देणाऱ्या रंगपंचमी सारख्या सणाचे आगळेच महत्व वाटते. केवळ मानवच नव्हे तर स्वतः निसर्गही रंगपंचमीच्या या क्रीडेत भाग घेऊन आपली उल्हसित आणि प्रसन्न मनोवृती प्रकट करताना आढळतो.

पण इतक्या थोर, उदात्त आणि पवित्र विचारांनी निर्माण झालेला हा सण आणि त्यांची ही पार्श्वभूमी याची खरीखरी जाणीव आज किती जणांना आहे! उलट त्याचे पूर्ण विस्मरणच पडलेले दिसते. म्हणूनच या पवित्र आणि सुंदर सणाला आज विद्रुप, बीभत्स आणि असंस्कृत स्वरूप प्राप्त झालेले दिसते. लाल गुलालांची जागा राखेने घेतलेली दिसते, तर मनाला शीतलता प्राप्त करून देणाऱ्या गुलाबपाण्याची जागा आज शाईने, डांबराने आणि रूप विद्रुप करणाऱ्या तेलरंगानी घेतलेली दिसते. या सणाचे आजचे हे स्वरूप पाहून 'ही उकिरडा होण्याची संस्कृती आली कोठून?' असे संतापाचे उद्‌गार निघाल्यास त्यात नवल नाही.

## ही उकिरडा होण्याची संस्कृती आली कोठून?

''शिमगा गेला आणि कवित्व उरले'' त्याप्रमाणे शिमग्याचा सण होऊन गेला पण या सणात जे हिडिस व किळसवाणे प्रकार घडले, त्यांची दुर्गंधी मात्र अद्यापि वातावरणात आहे. हिंदू धर्माच्या पवित्र व सोज्वळ लौकिकावर शेणसडा पडावा, तसे प्रकार त्या दिवशी घडत असतात. त्यातून समाजाची सुटका कधी होणार आहे, तेच कळत नाही. उतर हिंदूस्थान व अन्यत्र या सणाला रंगपंचमी दूरच राहिली, प्रत्यक्षात ती धुळवडच होते. या दिवशी रंगाऐवजी गटारगंगेच्या पाण्याने स्नान घडते. या रंगापेक्षा घाणीपेक्षा देखील अधिक घाण या दिवशी माणसाच्या तोंडावाटे बाहेर पडते. अक्षरशः डांबर फासून घेतलेल्या मुखावाटे शौचकूपाचे दर्शन घडावे तसे प्रकार त्या दिवशी घडून येतात. आपण काय बोलतो, काय नाही, आपल्या तोंडावाटे किती अचकट विचकट शब्द बाहेर पडतात, आणि स्वतःला आई–बहिणी आहेत की नाहीत, स्वतःचे कुटुंब आहे की नाही, याचा जणू विसर पडलेला आढळतो. या दिवशी एखाद्या दारूड्याप्रमाणे सारे काही चाललेले असते. जो दुर्बळ असेल, जो एकटा असेल, त्याच्यावर हल्ला करून, त्याला डांबर फासून जेवढे काळेकुट्ट बनविता येईल तेवढे बनवायचे. यातून लहान पोरेदेखील सुटत नाहीत. एका पोराच्या डोक्यावर वॉर्निश ओतण्यात आले. हा सत्य प्रकार आहे!

हा प्रकार आत्ता अडाणी लोकांपुरता राहिलेला नाही. सुशिक्षित, कॉलेजात जाणारे युवक यांच्याहीवर ताण करतात, याचे मोठे दुःख होते. कोणीही सभ्य नागरिकाची प्रतिष्ठा म्हणून ठेवावयाची नाही आणि कोणत्याही जातीजमातीचा उद्धार केल्याशिवाय रहावयाचे नाही, हेहि प्रकार या दिवशी घडत असतात. ऐवढेच नव्हे तर, उणीदुणी, हेवेदावे हे सर्व याच दिवशी भागवून घेण्याची मोठीच संधी त्यांना मिळते.

''तरुण मुलानी काहीतरी चांगली स्वप्ने उराशी बाळगावीत, चांगला विनोद करावा, चांगले छंद जडवून घ्यावेत, आकाशाशी स्पर्धा करणारी महत्वाकांक्षा धरावी. रोरवातील किडे बनून रहाण्यापेक्षा काहीतरी तेजस्वी ध्येय आपल्या नजरेसमोर ठेवावे. समाजाच्या धुरिणानी या सणाचे हे ओंगळ स्वरूप बदलण्याचा मन.पूर्वक प्रयत्न तरी केला पाहिजे किंवा कायद्याने तरी या अचकट विचकट प्रकारांना बंदी घातली पाहिजे.''

**ता. २८ मार्च १९६७**

## नगाधिराजा, आता जागा हो!

"भारतीयांच्या मनांत हिमालय हे फार मोठे श्रद्धास्थान आहे. गंगा अणि यमुना यांसारख्या जीवन समृद्ध करणाऱ्या नद्यांचे ते उगमस्थान आहे. कैलासनाथ शंकराचे ते वसतिस्थान आहे. म्हणूनच जणू काय हिमालय हा भारताचा मानदंड बनलेला आहे. प्राचिन ऋषिमुनींच्या वसतिस्थानाने पवित्र झालेल्या नगाधिराजाबद्धल कुणी अवाक्षर काढलेलेही भारतीय मन सहन करणार नाही. या श्रद्धास्थानाला तडा जाईल असे कोणतेही कृत्य भारतीयांना खपणार नाही.

दुर्दैवाने १९६२ साली भारतीयांच्या या श्रद्धास्थानाला तडा जाईल अशीच एक घटना घडली. परस्पर बंधुत्वाच्या नात्याने ज्या चीनकडे आपण पहात होतो, त्याच चीनने अचानकपणे पाठीत खंजीर खुपसला आणि शुभ्र हिमालयाच्या कुशीतून रक्ताचे पाट वाहू लागले. हळूहळू युद्धाला तोंड फुटले. तन–मन–धन सर्वस्व ओतून भारतीय जवान या आक्रमणाचा जिद्दीने प्रतिकार करीत होते. पण हा प्रश्न केवळ सामर्थ्याचा नव्हता. एखाद्या दुसऱ्या जवानाचे कर्तुत्व येथे पुरे पडणारे नव्हते. त्यासाठी अखिल देशाच्या पाठिंब्याची आवश्यकता होती. भिन्न संस्कृती अणि भिन्न भाषा असूनही वेळप्रसंगी आम्ही सर्व एक आहोत, हे दाखविण्याची फार जरूरी होती. हा केवळ हिमालयावर केलेला हल्ला नसून प्रत्येक भारतीयाच्या हृदयावर केलेली ती जखम होती.

हिमालय हा भारताचा मानदंड आहे. भारतामध्ये धर्माचे जे पावित्र्य आहे, अंतःकरणाचे जे विशालत्व आहे व मानवजातीबद्दल जे अपार प्रेम आहे, ती सर्व देणगी हिमालयाची आहे. भारताच्या जीवनात हिमालय ही एक महान शक्ति आहे.

भारतीयांच्या अंतःकरणात हिमालयाविषयी कितीतरी पवित्र व धार्मिक भावना आहेत. जगन्माता पार्वती जन्म दिला हिमालयानेच! कैलासपती श्री शंकराचे निवासस्थान याच ठिकाणी आहे. हिमालयातील कांचनगंगा, गौरीशंकर यासारखी उत्तुंग शिखरे ही भारताची अभिमानस्थाने आहेत. हिंदुस्थानाला समृद्ध करणाऱ्या नद्यांचा उगम याच पर्वतात झाला आहे. भारताच्या प्राचीन ऋषीमुनीनी याच ठिकाणी परमेश्वर प्राप्तीसाठी तपश्चर्या केली. भारतीय तत्वज्ञानाचा येथेच उगम झाला. याच पर्वतातून वाहणाऱ्या नद्यातील शुभ्र जलप्रवाहाच्या काठी बसून अनेक विचारवंतानी आपली विश्वाविषयीची जिज्ञासा तृप्त करून घेतली. आणि याच ठिकाणच्या शांत तपोवनातून नव्या विचारांच्या लाटा आज जगभर पसरलेल्या आहेत. आपल्या आयुष्याचा शेवट परमेश्वराच्या चिंतनात याच गिरिकंदरात व्हावा अशी उत्कट इच्छा बाळगणारे अनेक पुण्यात्मे भारतात आहेत. आजही गाढ विद्वत्तेचे असे कैक महान् पुरुष त्या ठिकाणी तत्वचिंतनात मग्न झालेले आपल्याला दिसतील. जगातील अनेक उलाढाली. तंटेबखेडे, ईर्ष्या, संग्राम यांच्यापासून स्वतःची मुक्तता करून घेण्याची इच्छा बाळगणाऱ्यां पुण्यात्म्यांना आयुष्याच्या अखेरच्या दिवसात हिमालय हेच एक आश्रयस्थान आहे.

तो नगाधिराज आज चिन्यांच्या वेढ्यात सापडला आहे. त्यामुळे भारताचे स्वातंत्र्यच नव्हे तर भारतीय अस्मिता, भारतीय संस्कृती धोक्यात आली आहे. त्या नगाधिराज हिमालयाची मुक्तता करण्याकरिता साऱ्या भारतीयांनी आज आपली सर्व शक्ति पणाला लावली पाहिजे. परकीय शस्त्राला हिमालयाच्या पार पलिकडे लोटेपर्यंत तडजोडीची भाषा नाही. हाच एक भारतीय जनतेचा निर्धार यावेळी प्रकट झाला पाहिजे.

ज्याच्याशी प्राचीनतम असे बंधुत्वाचे नाते आम्ही जोडू पाहिले, त्या चिन्यांनी दगलबाजी करावी, विश्वासघात करावा आणि शांतताप्रिय भारतीयांच्या पाठीत खंजीर खुपसावा यापेक्षा

अधमपणाची कोणती गोष्ट जगात असू शकेल! पुराणातील राक्षसांनी जी दुष्कृत्ये केली त्याच्याच तोडीचे चिन्यांचे हे दुष्कृत्य नाही काय? जे रावणाने केले, जे भस्मासुराने केले, जे जरासंघाने केले, जे शिशुपालाने केले, तेच कपट चिन्यानी आज भारताच्या बाबतीत केले आहे. आपल्या उपकारकर्त्यावरच उलटणाऱ्या भस्मासुराचा हा अवतार नाही का? पण चीनने ध्यानात ठेवावे की भोळया शंकराने आपला तृतीय नेत्र अद्यापि उघडलेला नाही. तो त्याने उघडावा म्हणून भारतीय जनता त्या कैलासनाथाची आज प्रार्थना करीत आहे.

हिमालया, तु जगातील अत्यंत श्रेष्ठतम नगाधिराज आहेस. या विश्वात जेजे म्हणून 'सत्यं, शिवं, सुंदरम' असेल ते सारे तुझ्या ठायी आहे. तुझ्या आध्यात्मिक सामर्थ्याने कोट्यवधी दलित मानवांना तू नवचैतन्य दिले आहेस. ते तुझे सामर्थ्य आज भारतीयांच्या पाठीशी तू उभे कर! हे कैलासनाथा, युद्धामध्ये भारतीय जनता होरपळून निघण्यापूर्वीच तू तुझा तृतीय नेत्र उघड. म्हणजे हिमालयाच्या आसपास वक्रदृष्टी टाकण्याची कोणाचीही हिंमत होणार नाही.

जगन्माते पार्वती, भारतीयांच्या मस्तकी तुझा वरदहस्त कायमचा असो! त्या सामर्थ्याच्या जोरावर भारतीय जनता सत्याचा, न्यायाचा, नीतीचा, धर्माचा मार्ग अनुसरील. आणि त्याच्या आड जो कोणी येईल, त्याचा ती नि:पात करील. म्हणून नगधिराजा, तू आता जागा हो आणि या प्रसंगी भव्य दिव्य सारे सामर्थ्य भारताच्या पाठीशी उभे कर! ⟫'

**११ जानेवारी १९६३**

मनुष्य हा ईश्वरनिर्मित प्राणिमात्रातील मुकुटमणी आहे असे म्हटले जाते. त्याला मिळालेली बुद्धीची अलौकिक देणगी, त्यातून निर्माण झालेली सुसंस्कृत विचारसरणी यामुळेच कदाचित त्याला हा श्रेष्ठ मान मिळाला असावा. परंतु या सुसंस्कृत माणसातील पशुत्व कधीकधी उफाळून वर येते. आणि अनाचार, अत्याचार, बलात्कार यासारख्या दुष्कृत्याना तो प्रवृत होतो. उषा भार्गव सारखी एखादी कोवळी पोर या प्रवृतीला बळी पडते. आणि कलंकीत झालेल्या त्या शरीराने जगात वावरण्यापेक्षा मृत्यूला कवटाळणे तिला अधिक सोईचे वाटते.

या घटनेची जळजळीत प्रतिक्रिया अनेक वृत्तपत्रांच्या संपादकाप्रमाणेच काकानी खालील लेखात व्यक्त केलेली आहे.

## उषा भार्गव हिचे आत्मबलिदान ही सामान्य घटना नाही

"जबलपूर येथे उषा भार्गव या सतरा वर्षे वयाच्या कॉलेज-कन्यकेचा, गुंडानी केलेल्या पाशवी अत्याचारामुळे झालेला दु:खद अंत ही एक अलीकडच्या काळातील जबरदस्त धक्का देणारी गोष्ट आहे. या घटनेचे तात्कालिक पडसाद दंगलीच्या रूपाने मध्यप्रदेशमध्ये ठिकठिकाणी उमटलेले दिसून आले. सरकारने 'या भागात आता शांतता झाली' असे कितीही जाहीर केलेले असले तरी तेथील जनमानसातील क्षोभ अद्यापि शमलेला आहे असे म्हणवत नाही. सरकारने आपल्या नित्याच्या शिरस्त्याप्रमाणे 'दोन जमातीतील दंगल' असे या घटनेला आगळेच स्वरूप दिले. त्यामुळे मूळ घटनाच दुर्लक्षिली जाण्याचा धोका आता निर्माण झाला आहे. याचे प्रत्यंतर पं. नेहरूंच्याच उद्गारात दिसून येते. या घटनेचा उल्लेख 'एक सामान्य घटना (Small incident) या शब्दात ते करतात, आणि 'एकंदरीत समाजाचे आरोग्य बिघडले आहे' असे म्हणून या प्रकरणाची ते निरवानिरव करतात.

पं. नेहरू म्हणतात त्याप्रमाणे ही घटना खरोखरच क्षुल्लक आहे का? भारतातील एका निष्पाप

बालिकेवर असा दुर्धर प्रसंग यावा आणि 'या समाजात, या देशात, या जगात आपला त्राता कोणी नाही' अशा निराशेच्या भरात तिला प्राणार्पण करावे लागावे हीच शोकांतिका आहे.

पं. नेहरूंचे लक्ष कांगोकडे आहे, अल्जेरियाकडे आहे, लाईसकडे आहे, आफ्रिकेकडे आहे, आंतरराष्ट्रीय घडामोडींकडे आहे म्हणून तर ते ही घटना उपेक्षणीय मानत नसतील ना? स्वतःच्या देशातील आपल्या प्रजेच्या दुःख विमोचनापेक्षा, जगातील लोकांच्या दुःखनिवारणाची चिंता त्यांना फार लागलेली दिसते. म्हणूनच त्याना ही घटना क्षुल्लक वाटते का?

येथे महात्माजींच्या आयुष्यातील एका घटनेचा उल्लेख करावासा वाटतो. सन १९३१ चा तो समय असावा. महात्माजी भारतीय जनतेची बाजू मांडण्याकरिता दिल्ली येथील व्हाईस रिगल लॉजमध्ये वाटाघाटी करण्यासाठी गेले होते. अखिल भारतीय जनतेचे लक्ष त्या घटनेकडे लागून राहिले होते. महात्माजी वाटाघाटी संपवून बाहेर आले, आणि दूर ठिकाणी आपल्या आश्रमात असलेल्या एका सामान्य माणसाच्या आजाराची त्यानी प्रथम विचारपूस केली. भारतीय राजकारणाने त्यांचे चित्त व्यग्र होते, तरी आपल्या आश्रमवासी माणसाला ते विसरले नाहीत. देशाच्या व्यापक राजकारणापुढे 'सामान्य माणसाचे जीवन ते काय?' असे त्यानी मानले नाही. यात त्यांचा समभाव दिसून येतो. हा समभाव जर राज्यकर्त्यांमध्ये नसेल तर त्यानी नाझी राजवटीबद्दल अगर कम्युनिस्ट राज्यपद्धतीबद्दल का नाके मुरडावीत? कटांगामध्ये लुंमुम्बाच्या खुनाबद्दल तुम्ही हंबरडा फोडता, पार्लमेंटमध्ये मोठी वक्तव्ये करून अश्रू ढाळता, पण आपल्याच देशात जबलपूर येथे एका कोवळ्या कुमारिकेचा ज्या तऱ्हेने अंत झाला त्याबद्दल तुम्ही मूग गिळून स्वस्थ बसता! दोन अश्रूही ढाळीत नाही याला काय म्हणावे!''

## श्रेष्ठ नीतिचा व असामान्य कर्तृत्वाचा<br>महान प्रतापी पुरुष–श्रीशिवाजी

''शिवाजी ही स्वातंत्र्याची प्रेरक शक्ती आहे. महाराष्ट्राचा तो प्राण आहे! ते ओज आहे! महाराष्ट्राचा तो लौकिक आहे! ती अजरामर किर्ती आहे! मराठ्यानी गेल्या दोन महायुद्धांमध्ये जे पराक्रम गाजविले व जे विजय संपादन केले, त्याची शिवाजी ही प्रेरक शक्ती होती, ही गोष्ट इंग्रज राज्यकर्त्यांनाही कबूल करावी लागली आहे. आजही बेळगावच्या 'मराठा लाइट इन्फट्री'मध्ये शिवाजी महाराजांच्या जयजयकारानेच त्यांच्या कार्याचा शुभारंभ होत असतो. अशा या अलौकिक पुरुषाच्या चरणी महाराष्ट्रातीलच काय, भारतातील स्वातंत्र्यप्रेमी यच्चयावत प्रजाजनांचे श्रेष्ठ–कनिष्ठ, गरीब–श्रीमंत, सामान्य–असामान्य, सर्वांचे भाव विनम्र व्हावेत हे स्वाभाविक आहे.

या पुरुषाचा महाराष्ट्राला केवढा मोठा आधार आहे! जणू सह्याद्रीच पाठिशी आहे. हा पुरुष म्हणजे महाराष्ट्राचे भाग्य आहे. आम्ही केवळ भावनोत्कटनेने हे बोलत आहोत असे नव्हे तर या पुरुषात असे अनेक अलौकिक गुण होते की इतक्या गुणसमुच्चयाचा पुरुष भारतातच काय पण जगाच्या इतिहासात देखील सापडेल की नाही याविषयी शंका वाटते.

या पुरुषामध्ये अशी विलक्षण आकर्षक शक्ती होती की, जो त्याच्या सान्निध्यात येई, तो भारला जाई व त्याचा एकनिष्ठ सेवक बने. आपल्याभोवती जमलेल्या कित्येकामध्ये त्यानी स्वदेशाभिमान व स्वधर्मनिष्ठा निर्माण केली. त्याचा उपयोग स्वराज्य– स्थापनेसाठी केला. न्या. मू. रानडे म्हणतात, ''जिवाला जीव देणाऱ्या अशा शेकडो पराक्रमी व बुद्धिमान लोकांची त्यांना जोड होती. त्यापैकी एकही वीर संकटकाळी स्वकर्तव्याला विसरला नाही, किंवा शत्रूपक्षाला जाऊन मिळाला नाही. कित्येकानी आपण आपल्या कर्तव्यकर्मास जागलो असे म्हणून ऐन विजयाच्या

वेळी आपले प्राण सोडले. या त्यांच्या त्यागावरून त्यांची महती दिसून येतेच, पण त्याचबरोबर शिवाजीवरील त्यांचे विलक्षण प्रेम व स्वामीनिष्ठाही उघड होते.''

शिवाजीने केलेल्या पराक्रमाइतकेच किंबहुना त्यापेक्षा जास्त, राज्यकारभार चालविण्याकरिता जी कार्यकुशल यंत्रणा त्याने निर्माण केली आणि उदात्त अशा राजनीति–तत्त्वाचा कित्ता घालून दिला, यावरून त्याच्या मोठेपणाची व दूरदृष्टीची पारख होते. शिवाजी महाराजांनी सामान्य लोकांमध्ये स्वधर्माची व महाराष्ट्रनिष्ठेची जी ज्योत पेटवून ठेवली, त्यामुळे शिवाजी महाराज महाराष्ट्रापासून दूर आग्र्याच्या तुरुंगात दिल्लीश्वराच्या अटकेत असता त्यांच्या राज्यकारभारात व व्यवस्थेत किंचितही ढिलाई निर्माण झाली नाही. शिवाजीविषयींच्या निष्ठेपासून रेसभरदेखील कोणीही ढळला नाही.

जगात अनेक थोर पुरुष होऊन गेले, ते राजवैभवात गुरफटले होते. पण शिवाजी हा असा पुरुष होता की, राजवैभव त्याच्या पायाशी असूनही त्याविषयी त्याला आसक्ती नव्हती. त्याच्या ठायी वैराग्य होते, संन्यस्त वृत्ती होती. त्यामुळे तो तीनवेळा राजत्याग करून अरण्यात जाण्यासाठी निघाला, त्या त्यावेळी त्याला मार्गावर आणण्याचे काम तुकाराम, रामदासादि संताना करावे लागले.

शिवाजी धर्मनिष्ठ होता पण धर्मवेडा नव्हता. सर्व धर्माकडे समभावाने पहाणारा तो होता. केवळ मुसलमान म्हणून त्याने कधी कोणा मुसलमानाचा द्वेष केला नाही की कोणाला तुच्छ लेखले नाही. काही प्रसंगी त्याने स्व–खर्चाने मुसलमानाना मशिदी बांधून दिल्या. याचा पुरावा इतिहासात आहे.

शिवरायाचे चारित्र्य अत्यंत शुद्ध होते. स्त्रियांविषयी त्याच्या ठिकाणी अपार आदर होता. स्त्रियांची अप्रतिष्ठा झालेली त्याला कधीच सहन होत नसे. त्याबद्दल त्याने कित्येक वेळा आपल्या सैनिकाना कडक शासन केले आहे. लढाईमध्ये हाती आलेल्या शत्रूपक्षाकडील स्त्रियांना तो मोठ्या आदरपूर्वक वागवी आणि मोठ्या इतमामाने त्यांची घरी पाठवणी करी.

शिवाजी महाराज पराक्रमी होते, राजकार्य धुरंधर होते, मुत्सद्दी होते, लोकसंग्राहक होते. पण या सर्वांहून त्यांचा मोठा गुण म्हणजे त्यांची श्रेष्ठ नीतिमत्ता आणि उदात्त चारित्र्य हा होय. हेच गुण महाराष्ट्राला मार्गदर्शक ठरण्याजोगे आहेत.''

**ता. २७ एप्रिल १९६०**

## शिवसेनेविरुद्ध ही आगपाखड कशासाठी?

''म्हैसूरचे अर्थमंत्री श्री. रामकृष्ण हेगडे व इतर सदस्यानी नुकते विधानसभेत शिवसेनेच्या नावाचे खडे फोडून छाती बडवून घेण्यास सुरुवात केली आहे, याचा अर्थच कळत नाही. शिवसेनेने अशा कोणत्या भयानक गोष्टी केल्या आहेत की ज्यासाठी कन्नड वृत्तपत्रानी आकाशपाताळ एक करावे? शिवसेनेच्यानिमित्ताने त्यानी महाराष्ट्रावर चांगलीच आगपाखड केली आहे. 'डेक्कन हेराल्ड》 पत्राने 'महाराष्ट्र सरकार जर शिवसेनेच्या दडपणाला बळी पडून त्याच्या अतिरेकी मागण्यांना शरण जाईल, तर देशाचे भवितव्य धोक्यात येईल' असे बजावले आहे. 'ही संघटना राष्ट्राच्या ऐक्याला तडे पाडणारी आणि महाराष्ट्रातून विशेषतः मुंबई शहरातून– ज्या मुंबई शहरावर अखिल भारताचा हक्क आहे– महाराष्ट्रीयेतराना हुसकावून लावण्यासाठी कटिबद्ध झालेली आहे' असाही आरोप या इंग्रजी पत्राने केला आहे.

इतके अकांडतांडव कशासाठी? शिवसेनेने अशी कोणती अघोरी कृत्ये केली आहेत की

ज्याच्यासाठी तिच्यावर ही सारी आगपाखड चालली आहे? महाराष्ट्रावर संकुचिततेचा आरोप करण्यापूर्वी राज्याराज्यातून राज्यपातळीवर ज्या काही उलथापालथी उघडउघड चालल्या आहेत, त्या कितपत उदात्त स्वरूपाच्या आहेत, याचा जर कोणी आढावा घेईल तर तो उद्‌बोधक होईल. भारतातील सर्वच राज्ये कमी अधिक प्रमाणात संकुचित व कृपण मनोवृत्तीची झाली आहेत. त्यात कमी कृपण कोण असेल तर ते महाराष्ट्र राज्यच होय. तामिळनाडू, आंध्र, केरळ, बंगाल कोठेही पहा. खुद्द म्हैसूर राज्यात देखील कोणत्या उदात्त भावनांचा परिपोष चालला आहे तोही पहा. कन्नडिगांखेरीज परक्यांना म्हैसूर राज्यात कोणती क्षेत्रे मोकळी आहेत, ते त्यानी कृपा करून दाखववे. प्रत्येक राज्य आपल्यापुरतेच पहात आहे. कोणीही आपल्या व्यापक दृष्टीचा टेंभा मिरवू नये!

म्हैसूर सरकारने केंद्र सरकारला नुकतीच विनंती केली आहे की, ‘म्हैसुरातील केंद्रीय उद्योगधंद्यात नेमणुका करताना कन्नडिगांना अधिक पसंती द्यावी.’ मात्र हीच मागणी महाराष्ट्र सरकारने पदरात पाडून घ्यावी म्हणून शिवसेनेने आग्रह धरला की तिला संकुचिततेचे, क्षुद्र मनोवृत्तीचे स्वरूप येते! तसे पाहू गेले असता, मुंबई शहर हे बाहेरच्या राज्यातील सर्वांनाच चरण्याचे एक चांगलेच कुरण झाले आहे. तेव्हा या कुरणापैकी काही खास जागा महाराष्ट्रीयांकरिता राखून ठेवा, असा पुकारा शिवसेनेने केला म्हणजे तो द्रोह समजला जात आहे. हे कितपत न्यायाला धरून आहे? कन्नडिगांना तर महाराष्ट्राच्या नावाने खडे फोडण्याचे काहीच कारण नाही. मुंबईच्या सचिवालयात कन्नडिगांची भरती शेकडोनी झालेली आहे. मोठमोठ्या हुद्द्यावर ते आहेत. मुंबईतील उद्योगधंद्यामध्येही त्यानी प्रतिष्ठेच्या जागा अडविलेल्या आहेत. मुंबई येथे हजारोनी त्यांची वस्ती आहे. आजकाल ज्या अल्पसंख्यांकाना कर्नाटकात स्थान नाही त्याना मुंबईने आसरा दिला आहे. आणि हेच लोक बेळगाव–निपाणीसारख्या शहरांवर महाराष्ट्रीयांचा हक्क नाही, हे सिद्ध करण्यासाठी पुढे येत आहेत. सभातून तसे ठरावही करीत आहेत. ही त्यांची कृतज्ञतेची व उदात्ततेची लक्षणे समजावयाची काय?

शिवसेनेवर आग पाखडताना खुद्द सीमाभागात कन्नडिगानी मराठी भाषिकांवर गेल्या दहा वर्षात जे अनन्वित अत्याचार केले त्यामध्ये त्यांच्या मनाचे कोणते औदार्य दिसून आले आहे? मराठी भागातील सार्वजनिक संस्थांच्या नावाच्या पाट्या, बसेसवरील नावाचे फलक, मैलाचे दगड, स्टेशनवरील प्लॅटफॉर्मची तिकिटे, सरकारी कचेऱ्यातील फॉर्म, सरकारी परिपत्रके, मनिऑर्डर फॉर्म या सर्वावरील मराठीचे पूर्णपणे उच्चाटन करण्यात आले आहे. कन्नडिगांखेरीज कोणालाही येथे नोकऱ्यात प्रवेश नाही अगर प्रतिष्ठेची जागा नाही. हे सारे करण्यात म्हैसूर सरकारने कोणता हेतू साधला आहे? शिवसेनेवर आग पाखडण्यापूर्वी स्वत:च्या पायाखाली काय जळत आहे हे रामकृष्ण हेगड्यानी पहावयास हवे होते. महाराष्ट्राच्या नावाने खडे फोडण्याचा तर कन्नडिगाना मुळीच अधिकार नाही!’’

वृत्तपत्राचे लिखाण करताना संपादकाला विविध प्रकारच्या भूमिका घ्याव्या लागतात. घडलेल्या गोष्टीबद्दल सरळसरळ निवेदन, मतप्रतिपादन, मार्गदर्शन इत्यादी गोष्टी अग्रलेखातून मांडल्या गेल्या, तरी हा सरळसरळ निवेदनाचा भाग कित्येक वेळा अपुरा वाटू लागतो. म्हणूनच वेळोवेळी घडलेल्या घटनाविषयी छोटीछोटी स्फुटे लिहिण्याकरिता लहानमोठी सदरे निर्माण झालेली असावीत.

उपहास, विडंबनात्मक विनोदी लिखाण ही अशाच विविध सदरांपैकी होत. प्रचलित मराठी वृत्तपत्रांवरून थोडी नजर फिरविली, तर प्रत्येक वृत्तपत्रात अशाप्रकारचे सदर अधूनमधून प्रसिद्ध होत असल्याचे आढळून येईल. या सदरातील लिखाण नेहमीच दर्जेदार आणि लक्षात राहण्याजोगे असेल असे नाही. पण त्याला तात्कालिक महत्त्व मात्र जरुर असते.

तरुण भारतात 'बंडूनाना' या टोपणनावाखाली काकानी जे स्फुटलेखन केले, त्याची गणना वरील प्रकारातच करावी लागेल. या प्रकारच्या लिखाणात काका उपरोधाचे शस्त्र वापरतात, पण या उपरोधाला वैयक्तिक निंदा नालस्तीचा वास येत नाही. मधूनमधून बोचकारे काढले जातात. मात्र ते रक्तबंबाळ करीत नाहीत. साऱ्या लिखाणाचाच थाट, लेखणीने पगडी उडवावी अशा स्वरूपाचा असतो. पण शेवटपर्यंत संयम मात्र कोठेच सुटत नाही. उलट साऱ्या लेखनाला विनोदाची एक झालर असते. या दृष्टीने काकांनी लिहिलेले दोन तीन लेख वानगीदाखल पुढे दिले आहेत.

## स्वयंवरासाठी जमलेले वीर

"गडकऱ्यांच्या 'एकच प्याला' नाटकात तळीराम अत्यवस्थ स्थितीत अंथरूणावर खिळून पडलेला असतो. त्याचे प्राण वाचविण्यासाठी वैद्य, डॉक्टर वगैरे औषधोपचारासाठी पुढे सरसावतात. प्रत्येकजण 'माझ्या औषधाने रोगी बरा झालाच पाहिजे. अचूक गुणकारी औषध, रामबाण औषध!" असे जोरजोराने हात आपटून सांगतो, व त्या वैद्यडॉक्टरांची आपापसात चांगलीच जुंपते. अशापरिस्थितीत तळीराम वैतागाने म्हणतो, "असे आपापसात भंडून तुम्ही जर एकमेकांचे जीव घेऊ लागलात, तर मग माझा जीव कोण घेईल? देवा, या माझ्या हितचिंतकांपासून माझे रक्षण कर!"

याप्रसंगी तळीरामाची आठवण होण्याचे कारण असे आहे की शेतकरी–कामकरी यांच्या नावाचा जयघोष करून प्रत्येक राजकीय पक्ष त्यांच्याविषयी हल्ली तळमळ व्यक्त करू लागला आहे, हेच होय! या प्रत्येक पक्षाने शेतकरी–कामकऱ्यांच्या कल्याणाचा जणू विडाच उचलला आहे. सोशालिस्ट, कम्युनिस्ट, कम्युनॅलिस्ट, रॉयिस्ट, ह्यूमॅनिस्ट, लयून्याटिक्स हेच काय, पण पुरोगामी, प्रतिगामी, बहुजनसमाजवादी वगैरेपैकी प्रत्येक पक्षोपपक्ष बेलभंडारा उचलून सांगतो की, 'शेतकरी–कामकऱ्यांच्या कल्याणाचा आम्हसी निश्चयच केला आहे. श्री.जयप्रकाश नारायणांपासून तो येथील हॉटेल कामगार संघाचे वासू देशपांडे यांच्यापर्यंत, जेधे–मोऱ्यापासून तो शामराव देसाई–कोवाडकरांपर्यंत, एम.एन. रॉयपासून तो बा. रं. सुंठणकरांपर्यंत, शार्दूलसिंगापासून तो शेरी–मंडगीपर्यंत, प्रांताध्यक्ष निजलिंगप्पापासून तो प्रभूजी कुट्टेपर्यंत सारेच बाहू उभारून, आक्रोश करून सांगतात की, 'शेतकरी–कामकऱ्यांचे आम्हीच प्रतिनिधी आहोत."

इतके सारेजण आपल्या उद्धारासाठी बद्धपरिकर झालेले पाहून बिचारा शेतकरी–कामकरी घाबरून जाणार नाही तर काय करील! जिकडे पहावे तिकडे त्याच्याच नावाचा जयघोष! 'इन्किलाब झिंदाबाद!' 'भांडवलशाही नष्ट करा!', 'मालकशाही नष्ट करा!', 'जमीनदारी नष्ट करा!' 'शेतकरी कामकऱ्यांचे राज्य स्थापन करा' अशा घोषणा सर्वत्र सभातून व मिरवणुकीतून होत आहेत. यामुळे शेतकरी–कामकऱ्यांचे पाय अद्यापि जरी जमिनीवरच असले, तरी त्यांना स्वर्ग मात्र दोन बोटे राहिला असल्यास नवल नाही! पण खरा प्रकार पाहिला तर प्रत्येकजणाने त्याच्या डोक्यावर पाय देऊन स्वत:च्या पुढारीपणासाठी त्याचा शिडीप्रमाणे उपयोग करावा असेच घडत नाही काय?

शेतकरी–कामकरी वर्गाचे कल्याण करणाऱ्या या साऱ्या हितचिंतकांमधील ही स्पर्धा पाहून स्वयंवरासाठी जमलेल्या या अनेक वीरांपैकी 'कोणाच्या गळ्यात माळ घालू?' असा गोंधळ शेतकरी–कामकरी वर्गाच्या मनात निर्माण झाल्यास त्यात मुळीच नवल नाही! अशा मन:स्थितीत ते म्हणत असतील की, "बाबानो, माझ्या कल्याणासाठी असे एकेकटे येऊ नका! सारे मिळून या. तोपर्यंत मला सुखाने राहू द्या."

'समाजवादी' व 'बहुजनसमाजवादी' पक्षाचे नेते गोरे–जेधे–मोरे म्हणतात की, 'नेहरू–पटेल

भांडवलवाल्यांच्या आहारी गेले आहेत. त्यांच्या मंत्रिमंडळात भांडवलवाले दबा धरून बसले आहेत.' पण हाच प्रश्न उलटवून जर कोणी या पक्षनेत्याना असा प्रश्न केला की, 'काय हो, तुमच्या पक्षात भांडवलवाले नाहीत काय?' तर त्यांचे उत्तर असे की, 'आम्ही स्वत: भांडवलवाले असलो म्हणून काय झाले! भांडवलवाल्यांच्या आहारी आम्ही थोडेच गेलो आहोत! आम्ही तुम्हाला ग्वाही देऊन सांगतो की, जेव्हा राज्यसत्ता आमच्या हाती येईल तेव्हा आमच्या इस्टेटी सर्वात अगोदर आम्ही आमच्या सरकारच्या स्वाधीन करू! तोपर्यंत आमच्या भांडवलशाहीचा प्रश्नच उपस्थित होत नाही. 'आधी केले मग सांगितले' ही समर्थांची उक्ती आम्हाला मुळीच पटत नसून 'आधी सांगितले आणि मग केले' ही कार्ल मार्क्सची शिकवणच आम्हाला मान्य आहे.''

**– ता. २६ मे १९४८**

## शिवाजीची घोडचूक

''श्री. यशवंतराव चव्हाण यांचा विचार शिवाजीच्या पाऊलावर पाऊल टाकून मराठी साम्राज्य स्थापन करण्याचा आहे, या श्री. हेगडे याच्या मताशी आमचे विचार तंतोतंत जुळतात. शिवाजी हा आक्रमक होता. शिवाजीने स्वराज्य स्थापनेचा घोळ घातला म्हणून भारताला भयंकर आपत्तीना तोंड द्यावे लागत आहे. जिकडे पहावे तिकडे शत्रूच शत्रू निर्माण झाले आहेत.

भारतात कोठेही एकता दिसत नाही. सर्वत्र वितुष्टे दिसत आहेत. काश्मीरचे भांडण पंधरा वर्षे झाली तरी संपले नाही. हिंदुस्थान–पाकिस्तानचे युद्ध तर अखंड चालूच आहे. या कटकटी तर नित्याच्याच होऊन बसल्या आहेत.

शिवाजीने त्या काळी स्वराज्य–स्थापनेची मोठीच घोडचूक केली. ही चूक हिमालया एवढी मोठी होती. त्यामुळे आज हिमालयाएवढ्या अडचणी भारतासमोर उभ्या आहेत. सारा हिंदुस्थान जरी मुसलमानी धर्माचा झाला असता तरी काय बिघडले असते! आज हिंदू–मुसलमानांचा जो झगडा चालू आहे, तो उद्‌भवला नसता. हिंदुस्थान–पाकिस्तान अशी राष्ट्राची दोन शकले पडली नसती. अखंड हिंदुस्थानाऐवजी अखंड पाकिस्तानची निर्मिती झाली असती म्हणून काय बिघडले असते! देशाचे अखंडत्व तरी टिकून राहिले असते ना? राष्ट्रीय एकात्मतेची जी हाकाटी सध्या चालली आहे, तिची गरजच उरली नसती आणि 'हम सब एक है' चा सुंदर देखावा सर्वत्र पहावयास मिळाला असता. मशिदी समोरील वाद्यांचा प्रश्नच उद्‌भवला नसता. त्या कारणावरून हिंदू–मुसलमानामधील तंटेही झाले नसते. आणि सारे एकत्र येऊन मशिदीत नमाज पढण्यात दंग झाले असते. असे सारेच इस्लामी झाले असते, तर कोणाचे कोणाशी भांडण होणार!

म्हणून मला वाटते, शिवाजीने स्वराज्यस्थापनेची भयंकर चूक केली. लोकमान्य टिळकांनी तीच चूक केली. त्यानी शिवाजीचा कित्ता गिरविला म्हणून आज साऱ्या आपदा राष्ट्राला ग्रासत आहेत.

इंग्रजांचे राज्य काय वाईट होते! ते आसेतुहिमालय पसरले होते! एकछत्री होते. इंग्रजी सत्तेखाली आम्ही सुखासमाधानाने नांदत होतो. म्हणून म्हणतो की शिवाजीने केलेली चूक टिळकांनीही केली. त्याचा पुरावा अलीकडच्या इतिहासात पहावयास सापडतो. लो. टिळकानी हुबळी–गदगपर्यंत दोरे काढले, आणि मराठीत 'स्वराज्याचा मंत्र' कर्नाटकात घुमविला लोकमान्यांचे हे कर्नाटकावरील आक्रमणच नव्हे का?

अशा या आक्रमणाविरुद्ध मंत्रीमहाशय हेगडे यानी जी हाकाटी केली, ती कन्नड अभिमानाची द्योतकच नाही का? कर्नाटक हा केव्हाही, कधीही आक्रमक बुद्धीने वागला नाही, वागत नाही. त्यासाठी त्यानी कधीही लढाई केली नाही की तलवार गाजवली नाही. फक्त आपले नसेल त्यावर त्यांचा नैसर्गिक हक्क पोहोचतो. बेळगाव–निपाणी–कारवारच्या सीमाभागावर त्यांचा जन्मसिद्ध

हक्क आहे. ते त्यांचे आक्रमण नाही. कारण पुराणांतरी कधी काळी त्यांचे राज्य तेथे होते असे ते सांगतात. गोव्यासाठी त्यानी कधी लढा दिलेला नाही किंवा सत्याग्रह देखील केलेला नाही. कारण ते आक्रमक नाहीत. फक्त गोव्यावर त्यांचा हक्क आहे. आणि तोही ऐतिहासिक, भौगोलिक, सांस्कृतिक, राजकीय अशा सर्वदृष्टीनी!

एकंदरीत शिवाजीसारख्या पुरुषाने स्वराज स्थापनेचे जे दिव्य केले, ते धडधडीत इतरांवर आक्रमण आहे, ती घोडचूक आहे, साम्राज्यवाद आहे, अशी श्री हेगडे यांच्याप्रमाणे माझीही श्रद्धा आहे. कर्नाटकीय असे अनैतिक मार्गाने जाणार नाहीत! त्याना फक्त सहज ते संपादन करता येईल ते हवे आहे, आणि असा हक्क सांगणे हे आक्रमण नव्हे.''

**– तरुण भारत, १९६४**

## असे आहे आमचे सामर्थ्य!

''रेल्वे सत्याग्रहाची कल्पना ज्याच्या सुपीक डोक्यातून निघाली तो धन्य होय! म. गांधीनी पुरस्कारिलेल्या सत्याग्रहाच्या कल्पना त्यापुढे निस्तेज वाटतात. काय तो मिठाचा सत्याग्रह! एखादी चिमुकली मिठाची पुडी विकण्यास सत्याग्रही पुढे होतो काय आणि पोलीस त्या गिरफदार करून तुरुंगाची हवा दाखवतात काय! शिरोडा, धारासना, दांडी या ठिकाणी मिठाचा सत्याग्रह होतो आणि त्यासाठी केवढी धुमश्चक्री होते! आणि किती लोक लाठ्याकाठ्यानी रक्तबंबाळ होतात! त्यामानाने आजचा हा रेल्वे रूळावरचा सत्याग्रह किती सुखावह आहे! येथे पोलिसाच्या लाठीकाठीची मुळीच भीती नाही. असे सामर्थ्य या सत्याग्रहात भरलेले आहे. म्हणून मी म्हणतो, धन्य तो कर्नाटकाचा अभिनव सत्याग्रह आणि धन्य ते कर्नाटकाचे 'मुखंड'!

या सत्याग्रहात लहानथोर सारे एकजात सामील! त्याना ना कशाची डर! हे सामर्थ्य त्याना 'प्राप्त झाले तर कसे? रेल्वे इंजिनपुढे सत्याग्रह करणेही काही साधी गोष्ट नाही. त्याला तशीच छाती लागते. कर्नाटकाचा महान पुरुष तो गुदल्याप्पा हळ्ळीकेरी कसा ताठ रेल्वे रूळावर उभा आहे पहा! त्याच्या छातीत धडधड झाली नाही. त्याला पाहून इंजिनच्या छातीतच धडधड झाली! हा पराक्रम काही साधासुद्धा नाही. तो टेबलावर कसा निश्चित बसला आहे पहा! त्याला पाहून काळभैरवाने ठोकलेल्या आसनाची आठवण होते. त्याच्या देहयष्टीकडे पाहिले तर कोणाच्याही छातीत धडकीच भरावी, असा भलादांडगा हा गृहस्थ! रेल्वेपुढे उभा नव्हे आडवा झाला तरी इंजिनची पुढे जाण्याची काय बिशाद आहे!

गुदल्याप्पा हळ्ळीकेरी हे काही लहानसहान गृहस्थ नाहीत. कायदेमंडळाचे अध्यक्षस्थान त्यानी भूषविले आहे. कायद्यानेच समाजाचे नियंत्रण होते असे नव्हे तर जरुर पडेल तेव्हा कायद्याला आडवा पाहून त्यावर उभे राहिल्यानेही समाजाचे नियंत्रण होऊ शकते हे त्यानी सिद्ध केले आहे.

या रेल्वे सत्याग्रहाला एवढे बळ आले तरी कोठून, याचा विचार करणे प्राप्त आहे. जो तो अस्तन्या वर करून आगगाडीला आव्हान देत आहे. कितीतरी नरवीर या सत्याग्रहामध्ये तुम्हाला दिसतील. ते पहा आपले स्नेही, लालबुंद चेहऱ्याचे व गोटीबंद बांध्याचे एम.एल.सी. जी. बी. पाटील! त्याना आज कोण अवसान आले आहे! रेल्वेगाडीपुढे सत्याग्रह करून तीन दिवसांची नव्हे, एक दिवसाची महान शिक्षा त्यानी भोगली. याबद्दल त्यांचे प्रचंड अभिनंदन केले पाहिजे. अरे, हे पहा दुसरे आमचे गुतीगोळी वकील! त्यांच्या चेहऱ्याकडे जर कोणी पाहिले तर त्यांच्या अंगात अशी वीरश्री शिरेल असे कल्पांतीही कोणास वाटणार नाही. पण आज ते बेफाम झालेले

दिसतात. आगगाडीला ते आव्हान देत आहेत. ते पहा, जवळ उभे असलेले रामभाऊ पोतदार त्यांचे क्षेत्र वेगळे, चित्रपटाच्या रसरंगात ते सदैव रंगलेले असायचे! तेही आज रेल्वे सत्याग्रहाला हजर झाले आहेत.

आता या सत्याग्रहात नाही कोण? हाच प्रश्न उभा राहतो. एकवेळ यल्लम्माच्या यात्रेला लोक कमी पडतील, पण या सत्याग्रहाला कमी पडलेले नाहीत. दररोज त्यांची संख्यावाढतच आहे. लोकांचा लोंढाच्या लोंढा यासाठी वाहून येत आहे.जिल्ह्यातील अवघ्या ट्रक्स या लोकांना आणण्यासाठी पुरेनात (त्यासाठी पोलिसांच्या परवान्याची जरुरीच काय!) एवढी तोबा गर्दी या सत्याग्रहींनी बेळगावला केली होती.

ती पहा, बेळगाव रेल्वे स्टेशनवर इंजिनभोवती झालेली तुफान गर्दी! या सत्याग्रहीत आपणाला कोण कोण दिसत आहेत, ते नीट न्याहाळून पहा. त्यात वाली आहेत, सुग्रीव आहेत, टक्केद आहेत. रायबागचे वसंतराव पाटील ब्याकूड एम.पी. आहेत. पण जांबुवंताप्रमाणे इंजिनच्या 'क्रोबार'वर विजयी मुद्रेने उभे असलेले हे कोण? अरे, हे तर बेळगाव जिल्हा स्कूलबोर्डाचे श्री. साणीकोप! यांचा कित्ता आता शिक्षकानी खुशाल गिरवावा!

या सत्याग्रह्यात बसाप्पा अरगावी आहेत, मल्लाप्पा होमसनी आहेत, निपाणीचे कोठीवाले आहेत, डॉ. पणदे आहेत, एम.एल. खडेद आहेत. अशा बड्या बड्या आसामी आहेत. यांच्या सत्याग्रहाचा आगळाच दिमाख होता. ते रस्त्यावरील गाड्या अडविण्याकरिता सहकुटुंबसहपरिवार आले होते. जणू लग्न महोत्सवाकरिताच ते उपस्थित होते. या सत्याग्रहात ताशा होता, वाजंत्री होते, बँड होता. इतका सर्वव्यापी व महोत्सवी सत्याग्रह यापूर्वी झाला नाही व पुढे कधी होणार नाही.

या आंदोलनात काही और किमया आहे यात काही शंकाच नाही. पुराणांतरीच्या सुरस कथा देखील या घटनेपुढे फिक्या पडतात. अरे, आज हे पोलीस पहा कसे शेळपट झालेले आहेत! त्यांची नेहमीच उफाळून येणारी मग्रुरी आज कोठे गेली? सत्याग्रहासारख्या प्रसंगी आव्हान देणारी यांची मुद्रा आज हसरी, लाजरी का बनली आहे? मराठी लोकांच्या बाबतीत कर्दनकाळ ठरलेला आणि घराघरात शिरून झुंडशाही गाजवणारा तो लुईस, गांधीच्या आश्रमातील शेळीसारखा आज मऊ बनला आहे. त्याचे ते इतर अधिकारी वीरभद्रय्या, दोरास्वामी, कल्याणशट्टी, मुदलियार, हेगडे, ढाणकशिरुर आज कसे सत्याग्रहीसमोर 'नमोऽस्तुते नमोऽस्तुते' करून पूर्ण उभे राहिले आहेत. या सत्याग्रहाचा महिमाच तसा अगाध आहे!

जगाच्या पाठीवर कधीही, कोठेही झाला नाही. असा हा अजोड सत्याग्रह आहे. येथे मारझोड नाही, खडतर तुरुंगवास नाही. पोलिसांच्या संरक्षणात सारे कसे शांतपणे चालले आहे! पण जणू उत्पात झाल्यासारख्या याच्या बातम्या 'ऑल इंडिया ब्राँड कास्टिंग' ने ध्वनिक्षेपित केल्या. या विराट सत्याग्रहाने जर कोणी दिङ्मूढ झाले असतील तर ते कामराज, मुरारजी देसाई आणि वर्किंग कमिटीचे इतर सभासद!

असला सत्याग्रह करण्याची मराठी माणसाची काय बिशाद आहे! त्याने सिंहगड जिंकावा, पुरंदर सर करावा, शिवनेरीवर भगवा झेंडा लावावा, लाहोरच्या युद्धआघाडीवर तुफान करावे, 'हाजीपीर खिंड लढवावी, रणगाड्यांशी मुकाबला करावा, आणि सत्याग्रह करण्याचा प्रसंग आलाच तर, दीर्घ मुदतीच्या खडतर शिक्षा भोगाव्या.पण रेल्वेपुढे सत्याग्रह करण्याची त्यांची कुवत काय! ते दिव्य कोणी करावे? म्हैसूरवाल्यानी करावे! कन्नडिगांनी करावे! निजलिंगप्पा–गुदल्याप्पाने करावे, कौजलगीने करावे, आप्पण्णगौडा पाटलाने करावे! म्हणून आज सर्वत्र कर्नाटकाचा जयजयकार होत आहे! काँग्रेस वर्किंग कमिटीमध्येही हा सत्याग्रह गाजणार आहे. जय कर्नाटक! जय म्हैसूर!''

**ता. ५-७-१९६६**

# प्रकरण बारावे

# असा मी गौरीहर पूजिला!

### माझी त्यांची पहिली ओळख

माझी डॉक्टर बहीण (पूर्वाश्रमींची कु. हिरा गव्हाणकर व नंतरची सौ. आशा धोंड) बेळगाव येथे मिलिटरी डिपार्टमेंटमध्ये नोकरी करीत होती. तिला घरकामात मदत करण्यासाठी मी पण तिच्याकडेच रहात होते. ठाकुरांचे व आमचे, त्यांच्या मोठ्या बहिणीकडून नाते लागत असल्यामुळे, आमचे त्यांच्या घरी जाणे–येणे होते. १९३२ सालातली गोष्ट. मी त्यांच्या घरी गेले असता त्यांची आई (अक्का) मला म्हणाल्या, ''उद्या बाबू सुटून येणार. त्याचे मित्र पण त्याच्याबरोबर असणार. तेव्हा मी स्वयंपाक करते. पण तू जरा वाढायला येशील का?'' मी एकदम होकार दिला, कारण मलाही त्या व्यक्तीला पहायची उत्सुकता होतीच. यालासुद्धा मागचा थोडा इतिहास होता. ठाकुरांच्या वडिलांचे स्नेही कै. वासुदेवराव परुळेकर म्हणून होते. ते एकदा मालवणला माझ्या माहेरी आले असताना, सहज माझ्या वडिलांकडे म्हणाले होते, ''तुमची ही मुलगी माझ्या मुलाला करून घेणार होतो. पण आमचे गोत्र एक झाले. तथापि माझ्या शेजारी माझ्या मित्राचा मुलगा आहे. त्याना मी सांगू शकेन.'' श्री. परुळेकर यानी त्यांच्याविषयी सर्व माहिती माझ्या वडिलांना सांगितली होती. माझे वडील (कै. शंकरराव गव्हाणकर मालवण) कट्टर देशभक्त. त्यानी आम्हाला देशभक्तीचे बाळकडूच पाजले होते. प्रभातफेरी, दारू गुत्यावर पिकेटिंग करणे, खादी विकणे, सूत काढून खादी तयार करणे, गावातील प्रत्येक सभेस जाणे, सत्याग्रही लोकांना आपल्या हातून जी काही मदत होईल ती करणे, या सर्व कामांची दीक्षा माझ्या वडिलांनीच दिल्यामुळे, आणि त्या सर्व वातावरणातच आम्ही वाढलेलो असल्यामुळे डॉक्टर–वकील यापेक्षा देशभक्त नवराच मला अधिक पसंत होता. अर्थात करीन तर असल्या माणसाशींच लग्न करीन असे मी मनोमनी ठरवून टाकले होते.

श्री. बाबुराव ठाकुर तुरुंगातून सुटून आले. मी आपल्या रीतीप्रमाणे पाय धुण्यासाठी तांब्या भरून बाहेर ठेवला व आत निघून आले. पण त्यांना आपल्या आईला भेटण्याची उत्कंठा इतकी

होती की, ते सरळ आपल्या तुरुंगातल्या बिस्तऱ्यासह 'अक्का, अक्का' करीत स्वयंपाक घरापर्यंत गेले. त्यांना त्यांची आई फार प्रिय होती. ती त्यांचे दैवत होती. याचवेळी मी त्यांना प्रथम पाहिले. त्यांनी मला पाहिले की नाही ते मला सांगता येत नाही. कारण मी कोण व इथे का आले हे त्यांना त्यावेळी ठाऊकच नव्हते. मग सर्वांची जेवणे झाली. वाढण्याचे काम मी केले आणि मी पण जेवण करून घरी गेले. त्यानंतर दोनवर्षे अशीच गेली. आमच्या लग्नाची गोष्ट काही निघाली नाही त्यांची आई 'लग्न करून घे' म्हणून सारखी त्यांच्यामागे लागायची. ती म्हणायची, ''बाबा, एकदा लग्न करून घे. मग मी सुखाने मरेन.'' तेव्हा हे लगेच चिडून म्हणायचे 'असे असेल तर मी मुळीच लग्न करून घेणार नाही. कारण मी लग्न करून घेतले की तू मरणार!'' असा त्यांचा वारंवार वादविवाद व्हायचा. हे मला आमचे लग्न झाल्यानंतर मागाहून कुणीतरी सांगितले. माझे वडील हिंडलगा जेलमधून दोन वर्षाचा कारावास भोगून जूनमध्ये सुटले आणि आमचे लग्न ४ जुलै १९३४ रोजी व्हायचे निश्चित झाले.

लग्न हा विधि आयुष्यात एकदाच व्हायचा म्हणून तो थाटाने करण्याची हौस यांच्या घरच्या मंडळींना फार होती, आणि याच्या उलट माझे वडील अगदी थोडक्या खर्चात केवळ धार्मिक विधीपुरताच खर्च करावा असे म्हणणारे होते. मग दोघांचे जमायचे कसे? अगदी लग्नाच्यादिवशी दोघांचे फिसकटले. पैसाआडका, हुंडापांडा, मानपान यापायी नव्हे तर, शब्दाशब्दात तेढ उत्पन्न होऊन माझे आईवडील, भाऊबहीण सर्व बेळगावात असूनही माहेरचे एकही माणूस लग्नाला उपस्थित न होता आमचे लग्न पार पडले. स्वयंवर झाले म्हणा ना! मला यानी आपल्या घरात सकाळी आणून ठेवले आणि सायंकाळी गोरज मुहूर्तावर लग्न झाले. लग्न फारच थाटात साजरे झाले. जणू त्यांच्यावरील प्रेमामुळेच लग्नाचे वेळी पाऊस धो धो ओतत असलातरी लोक अलोट संख्येने आले होते. यांचा स्वभाव रागीट पण तितकाच करारी व प्रेमळ. लग्न समारंभ संपताच मला बरोबर घेऊन सासू–सासऱ्यांच्या पाया पडून परत आले.

वडिलांचा राग त्यानी माझ्यावर न काढता मला फार प्रेमाने वागविले. आमचे दिवस सुखात चालले होते. पण 'घी देखा लेकिन बडगा नही देखा' या म्हणीप्रमाणे देशभक्त नवरा पसंत केला, पण त्याचा वारंवार होणारा बंदिवास ध्यानात घेतला नव्हता, तो पहावयास मिळाला. माझे लग्न झाले आणि एक दोन महिन्यातच काँग्रेसरोडवर यांचे भाषण होऊन याना जेलमध्ये जावे लागले. मला वाईट वाटले नाही, उलट अभिमानच वाटला. त्या काळी तुरुंगात जाणे हे शूरपणाचे लक्षण मानले जाई. थोड्या दिवसातच त्यांची तुरुंगातून मुक्तता झाली. पुन्हा आमचा सुखाचा संसार सुरू झाला. तरी बावीस वर्षे ज्या माहेरच्या माणसांमध्ये काढली, त्याना एकदम सोडणेही मला बरे वाटेना. आता हा तुटलेला दुवा कसा जुळवावयाचा हा माझ्यापुढे प्रश्न होता. मला काही हे माहेरी जाऊ देत नसत. पण एकदा योगायोग जुळून आला. पहिल्या बाळंतपणासाठी माहेरी जाणार म्हणायचे, आणि हे नको म्हणायचे! शेवटी माझ्या म्हणण्याला हे कबूल झाले. पण एका अटीवर. ती अट ही की, माझ्या आई–वडिलांनी आपल्या घरी येऊन राहून, जेवून–खाऊन नंतर त्यांनी मला जाताना बरोबर घेऊन जावे. किती झाले तरी आतड्याचे प्रेम ते! माझे वडील सर्व राग विसरून, यांच्या घरी येऊन, एक दिवस राहून मला आपल्याबरोबर घेऊन गेले. त्यावेळी मला पहिली मुलगी 'नलू' झाली. त्यानंतर दोन्ही घराण्यांचे सर्व काही सुरळीत चालू झाले असले, तरी या दोघांच्याही मनातली अढी शेवटपर्यंत कधीच कमी झाली नाही. माझे बाबा यांच्या घरी यायचे, रहायचे पण समोरासमोर दोघे कधीच बोलले नाहीत. लांबूनच एकमेकांची काळजी घेत. बाबा हयात असेपर्यंत हे आपल्या सासुरवाडीला कधीच गेले नाहीत. मी तेवढी मााहेरी जात–येत असे. नलू मागून पाठोपाठ दोन मुलगे झाले, ते तिकडेच वारले. त्यानंतर मी बाळंतपणासाठी माहेरी जाण्याचे सोडून

दिले. नंतर 'पुष्पा' झाली. हे पुन्हा तुरुंगात गेले. त्यावेळी बाबाना येथील हिंडलगा तुरुंगात आणून ठेवले होते. ते दोघेही एकमेकांना तुरुंगात भेटत. कारण त्याना एकाच बराकीत ठेवले होते. पण दोघेही आपसात एकमेकांशी बोलण्याचे टाळीत असत. काही दिवसानी याना हिंडलग्यातून नाशिकच्या तुरुंगात पाठविण्यात आले. तेथे ते एक वर्ष होते. ते तुरुंगात असलेतरी त्यांचे लक्ष घरी कोणी मिळवत नाही व वडील आजारी असतील याकडे असायचे. घरच्या परिस्थितीकडे पाहून ते चळवळीपासून कधीच मागे फिरले नाहीत. त्यांच्या वडिलांनी त्यांना तुरुंगात पैसे पाठविले तर ते ओरडायचे की, "मी येथे तुरुंगात रिकामटेकडा बसलो आहे. मला पैसे पाठवू नका. मला कसलीही जरुर लागत नाही. तुम्हाला घर सांभाळायचे आहे." वगैरे वगैरे.

मला तुरुंगातून यांची पत्रे येत असत की, 'तू छापखान्यात मदत केली असतीस तर बरे झाले असते.' मीही त्यांना उत्तरात लिहीत असे की, 'आपले लग्न झाले त्यावेळेपासून मला आपल्याबरोबर नेऊन छापखान्याची माहिती देत गेला असता तर बरे झाले असते. मी त्या कामातही गोडी लावून घेतली असती.' मी एकदा पैसासाठी त्याना विचारले की, 'तुम्ही आपल्याकडे चार पैसे का ठेवून घेत नाही?' त्यावर त्यानी नाशिकच्या तुरुंगातून कळविले होते की, 'मी व माझा भाऊ यशवंत दोघेही आपापले पैसे स्वतंत्रपणे आपापल्याकडे ठेवू लागलो तर वडिलांना काय वाटेल? आपल्याला नोकरी नाही व आपले दोन्ही मुलगे आपले पैसे स्वत:कडेच ठेवतात, असे त्याना वाटू नये म्हणून मी माझे पाकीट वडिलांच्या स्वाधीन करीत आलो आहे. मला खर्चाला किंवा कोणत्याही कामासाठी पैसा लागला तर माझ्या वडिलांकडेच मागून घेऊ लागलो. तेव्हापासून छापखान्याचा पगार देणे वगैरे सर्व व्यवहार माझ्या वडिलानी म्हणजे तात्यांनी पाहिला.' त्यामुळे पैसे देण्याघेण्याची अडचण त्याना कधी भासली नाही. त्याचप्रमाणे मला छापखान्यात नेऊन माहिती देण्याचा किंवा घेण्याचा प्रश्नच उद्‌भवला नाही.

यांच्या लहानपणाविषयी मी निश्चितपणे काय लिहू शकणार! तथापि मी यांच्या घरी आल्यानंतर जे माझ्या कानी आले व जे काही मी पाहिले तेच मी स्मरणाने या ठिकाणी नमूद करीत आहे. यांचा जन्म ता. २६ डिसेंबर १८९९ रविवार रोजी झाला असला पाहिजे. त्यांच्या वेळचे नात्यागोत्यातील कोणी आज नसल्यामुळे आणि त्याकाळचे कागदपत्र, जातकपत्रिका–कुंडली उपलब्ध नसल्यामुळे नक्की काहीच सांगता येत नाही. यांचा जन्म चंदगडला श्रीपादवाडी येथे त्यांच्या आजोळी झाला. त्यांच्या अगोदरची एकदोन मुले गेल्यामुळे हे झालेले मूल तरी धोंड्यागुंड्याप्रमाणे लाभू दे. या त्या काळच्या समजुतीप्रमाणे घरच्या वडिलधाऱ्या सर्व मंडळींनी यांचे नाव 'धोंडू' असे ठेवले., पण याना समजू लागल्यानंतर ते त्यांना कधीच आवडले नाही. ते आपल्या आईला वारंवार विचारीत की, 'माझे असले नाव का ठेवले?'

ते ५–६ वर्षाचे झाल्यानंतर शाळेत जाऊ लागले. पण परसात कोठेतरी लपून बसून ते मधून मधून शाळा चुकवीत असत. पुढे शाळेची गोडी लागल्यानंतर मात्र ते व्यवस्थित शाळेत जाऊ लागले. लहानपणी ते थोडे भित्रे होते. कोठे काही कारणाने जमावाने जयजयकार केला तर ते आपल्याशीच विचारीत असत की, 'हे सर्वच लोक असे ओरडतात कशाला? यांना काय झाले आहे?'

शालेय जीवनात हॉकी, क्रिकेट हे त्यांचे आवडीचे खेळ असत. त्यातल्या त्यात हॉकीची त्याना विशेष आवड. हा खेळ खेळताना त्यानी अनेकदा ढोपरे फोडून घेतले आहेत. ते एक वर्षाचे असताना त्याना देवी आल्या. त्यातून ते मोठ्या शर्थीने वाचले. त्यांच्या हातून पुढे अनेक लोकोपयोगी कामे व्हावयाची होती, म्हणूनच त्यांच्या जीवावरील हे गंडांतर टळले, असे म्हटल्यास

ते सुसंगतच ठरेल.

सर्व गोष्टीमध्ये 'प्रमुखा'चा मान यानाच द्यावा लागे. एखादा पदार्थ चारचौघाना वाटायचा तर तो यानी वाटला पाहिजे. मग तो सर्वांना वाटता वाटता याना काही उरले नाही तरी चालेल, अशी यांची वृत्ती! सत्याग्रहाचे जणू बाळकडूच याना मिळाले होते असे म्हणावयास हरकत नाही. घरी कोणीही यांच्या आधी जेवलेले याना आवडत नसे. तसे चुकून कधी झाल्यास त्यादिवशी यांचा उपवास! हा त्यांचा रुसवा मग कोणास तरी काढावा लागत असे. असा त्यांचा हट्टाग्रह त्यांच्या वयाच्या पंधरा–सोळाव्या वर्षांपर्यंत चालू होता. पण आता त्यांचे दोन्ही वेळचे जेवण घरातील सर्व माणसांचेच नव्हे तर गडी माणसांचेही जेवण झाल्यानंतर होत असते. आता तो पूर्वीचा रुसवा कसा राहणार!

यांच्या लहानपणापासूनच घरातील सर्व मंडळीवर यांचे अत्यंत उत्कट प्रेम असे. त्यांची मामी होती त्यांच्याच वयाची. मामी म्हणण्यापेक्षा ती त्यांची एक जिवाभावाची मैत्रीणच होती. हे तुरुंगात असताना १९३० साली ती वारली. हे तुरुंगातून सुटून येईपर्यंत आपण जगावे असे मामीना वाटत होते. यांची मुक्तता झाल्यानंतर याना मोठ्या मिरवणुकीने घरापर्यंत आणावे अशी यांच्या मित्रमंडळींची इच्छा होती. परंतु मामीच्या निधनानी वार्ता याना समजताच हा सर्व समारंभ स्थगित करण्यात आला.

हे वडिलांना वचकून असल्यामुळे यांचा सर्व रुसवा–फुगवा आपल्या आईजवळ चाले. आईवर त्यांचे अलोट प्रेम. आई आजारी पडली होती. त्यावेळी गावातील सर्व डॉक्टर बोलावून त्यानी आईच्या पुढ्यात हजर केले होते.तसे पाहू गेले तर तात्यांचे म्हणजे त्यांच्या वडिलांचे आपल्या या मुलावर फार प्रेम. पण तात्यांची सर्व हयात फौजदारी पेशात गेल्यामुळे त्यांचा स्वभाव फार कडक बनला होता. आपला चिरंजीव सरकारविरुद्ध उठाव करणारा निपजल्यामुळे प्रत्येक गोष्टीत तात्यांचा याना विरोध होत असे. आपल्या मुलाला सरकारकडून त्रास पोहोचू नये हाच तात्यांचा उद्देश याच्या मुळाशी होता.

एकदा शहापूरला सभा व्हावयाची होती व त्यात यांचे भाषण व्हावयाचे होते. त्याठिकाणी इंग्रजांचे पोलीसदल मोठ्यासंख्येने उपस्थित होते. लाठीहल्ला होणार व कार्यकर्त्यांना अटक केली जाणार याची बातमी सर्वतोमुखी झाली होती. तात्यांना वाटे की, आपल्या मुलाने त्या आगीत उडी टाकू नये. पण मुलाचे सळसळते रक्त त्याला कसे गप्प बसू देणार? राग आला म्हणजे आपले डोके आपटून घ्यायची सवय तात्यांना होती. त्याप्रमाणे त्यानी डोके आपटून घ्यावयास सुरुवात केली व ते बेशुद्ध होऊन पडले. पण हे न सांगताच सभेला निघून गेले व तेथे त्यांचे भाषणही झाले. पण जाताना एका मित्राला सांगून गेले होते की, डॉक्टरना बोलावून तात्यांना जरुर ते उपचार करा. तोपर्यंत मी येतोच.

हा सर्व प्रसंग घडून गेल्यानंतर तात्या घरच्या मंडळीसमोर यांच्या धडाडीची स्तुती करीत असत. समोरासमोर ते बोलत नसत. आठ आठ दिवस अबोला धरीत, आणि मग पुन्हा बोलणे सुरू होई. पितापुत्रांचे एकमेकांवर अतिशय प्रेम असले, तरी त्या दोघांचा स्वभावच एक दुसऱ्याविरोधी होता. त्यामुळे नेहमीच खटके उडावयाचे. पांगिरे प्रकरणाच्या वेळी तर तात्याना झोपच लागत नसे. ते म्हणायचे की, 'हे आमचे चिरंजीव सरकारविरुद्ध उठले आहेत. रात्री–अपरात्री वाटेल तेथे जातात. सरकारने याना काही केले तर घ्या काय!' या जाणीवेने तात्यांचा जिवात जीव नसावयाचा. तात्या असेपर्यंत घरात काय किंवा छापखान्यात काय, याना काहीच पहावे लागत नसे. त्यामुळे बाहेरची सार्वजनिक कामे, शाळा, सत्याग्रह चळवळी सर्व काही यांना करता आले. तात्या असताना

यानी घरात माणसे किती किंवा गोठ्यात जनावरे किती हे देखील पाहिले नाही! फक्त बाहेरच्या सार्वजनिक कार्याला जीवन वाहून घेतलेले! तात्यांच्या पश्चात मात्र याना या सर्व गोष्टीत लक्ष घालावे लागले.दोन्ही वेळच्या जेवणापूर्वी गोठ्यात जाऊन जनावरांना वैरण घातल्याशिवाय यानी आपल्या तोंडात घास घातला नाही. ते जेवायला बसले तर त्याना पक्वान्नाची गोडी नसे. याना झुणकाभाकर अधिक प्रिय. सर्वसामान्य माणूस जे खातो तेच आपण खावे हाच त्यामागे एक विचार. जेवणाकडे यांचे लक्षच नसते. सर्वांनी कडू म्हणून ठरविलेली भाजी ते चवीने खाऊन टाकीत. ते जेवत असताना वारंवार म्हणत असत की, 'गरीब लोकांचा पगार काय व ते काय खात असतील! डोंबारी काय खात असतील? शिळे, नासके खाऊन जगतात बिचारे! आणि तुम्हाला सणाच्या नावाखाली रोज पक्वान्ने खावयास हवीत! नाही केली तर चालणार नाही काय?' यांच्या जेवणाच्यावेळी छापखान्यात आलेल्या उपाशी माणसाला घरी आणून आपल्यासाठी ठेवलेले जेवण दोघाना वाटणी करून वाढावयास लावीत. कारण त्यांची जेवणाची वेळ म्हणजे अवेळच असावयाची. दोन प्रहरी २॥ –३ वाजता व रात्री ११–११॥ वाजता!

तात्या गेल्यानंतर हे घरात लक्ष घालू लागले. आपल्या मुलांची नावे, वर्ग, इयत्ता समजून घेण्याची बुद्धी याना होऊ लागली. घरात येताच सर्व मुलांची चौकशी हे करू लागले. यांना मुलांचे लाड करणे अगर त्यांना अंगाखांद्यावर घेणे कधीच ठाऊक नाही. नाही म्हणावयास त्यातल्या त्यात त्यानी पुष्पाला जवळ केले आणि आपल्याबरोबर तिला अनेक ठिकाणी फिरवली. एकदा विमानतळावर हे पं. जवाहरलाल नेहरूंना भेटावयास जाताना पुष्पाला बरोबर घेऊन गेले. नेहरूनी कौतुकाने तिच्या गळ्यात हार घातला. तो फोटोही घरी आहे. एवढ्या मोठ्या माणसाने आपल्या छोट्या मुलीच्या गळ्यात माळ घातली हे पाहून यांना धन्यता वाटली. आपल्या मुलांच्या अभ्यासाकडे लक्ष देण्यास यांना वेळच मिळत नव्हता. दाढी करताना जो वेळ फुकट जातो, त्या वेळात हे मुलाना काही शिकवत असत. हे इतके रागीट असूनही यानी मुलांच्या अंगावर कधी हात टाकला नाही. कोणी शेजारी आपल्या मुलास मारताना पाहून यांचा जीव कळवळतो. ते त्यांच्या आईबापापर्यंत जाऊन 'का विनाकारण मुलाला मारता?' म्हणून चौकशी करतील. मुलांना यांच्या नजरेचा इतका धाक आहे की घरी वडील येताच मुले चूपचाप होतात. काही विचारावयाचे, सांगावयाचे झाल्यास आईमार्फत विचारतात.

याना शिक्षणाची फार आवड आहे. सर्वांनी शिकावे म्हणून आपल्या नात्यातल्या मुलामुलीना स्वत:पैसे भरून यानी कॉलेजात घातले आहे. कोणी विद्यार्थी अर्ज वगेरे घेऊन आल्यास त्याची विचारपूस करून त्याचेकाम केल्याशिवाय हे राहणार नाहीत. प्रथमदर्शनी यांच्याबरोबर बोलण्यास आलेली व्यक्ती गोंधळूनच जाते. पण हळूहळू धीर चेपल्यावर आलेल्या माणसाला यांचा स्वभाव कळून येतो व आपले काम यांच्याकडून फत्ते होणार असा त्याला विश्वास वाटू लागतो. म्हणून कित्येकजण म्हणतात की,त्यांचे रागावणे जमेस धरावयाचे नाही. त्यांच्या मागचा त्यांचा हेतू पहावयाचा. हे जितके धीराचे आहेत, तितकेच आजाराला भित्रे आहेत. घरात कोणी आजारी पडले किंवा स्वत:च आजारी झाले की हे घाबरलेच! एवढ्या तेवढ्या गोष्टीला हे चिडतात हे आम्हाला माहीत असल्यामुळे सर्वच गोष्टी त्यांच्या कानावर घालण्याचे आम्ही टाळीत असू. यांचा राग शांत झाल्यावर यांच्या सारखा माणूस नाही. अन्यायाची त्याना फार चीड आहे. तितकेच हे विसराळूही आहेत. त्याना आजची गोष्ट उद्या विचारा. ती त्यांना सांगता येणार नाही. नातीगोती तर कधीच त्यांच्या लक्षात येत नाहीत. माणसांचे चेहरे पण ते केव्हा केव्हा विसरतात. यांच्यासमोर जास्त खर्च केल्यास यांना खपत नाही. पण यांच्या मागे वाटेल तेवढा खर्च केल्यास हे खोलात जाऊन त्याची चौकशी करीत नाहीत.

माझे लग्न त्यांच्याबरोबर ता. ४ जुलै १९३४ रोजी झाले व मी त्यांची सहधर्मचारिणी म्हणून

घरात आले. आमचे लग्न कशातऱ्हेने पार पडले हे ध्यानात घेऊन हे मला फार जपत. वाचायला पुष्कळ पुस्तके व वर्तमानपत्रे वगैरे आणून देत, आणि 'खूप वाचा, इंग्रजी वाढव' म्हणून मला आग्रह करीत. पण घरच्या कामाच्या रगाड्यात व मुलांच्या संगोपनात मला माझे शिक्षण व ज्ञान वाढवता आले नाही. मुलाना मात्र हिंदी, इंग्रजी, ड्रॉईंग व मराठी मीच शिकवले. यांनी मुलांच्या अभ्यासकडे कधीच लक्ष दिले नाही. यांची मुले कोणत्या वर्गात शिकत आहेत हे देखील कोणी विचारल्यास त्याना सांगता येत नाही. मला त्यांना सांगावे लागे की आज आपल्यामुलीचा नंबर वर आला, दुसरी मुलगी पास झाली वगैरे वगैरे.

आमच्या घरातले वळण जुने होते. पतिपत्नीनी फिरावयास जाणे त्यात बसत नव्हते. पण यांना चांदण्यात फिरण्याची फार हौस. तात्या व घरातली इतर सर्व मंडळी झोपलेली पाहून, पायाचा आवाज न करता आम्ही दोघे बाहेर जात असू व फिरून येत असू. आमचे लग्न झाल्यानंतर चारच महिन्यानी काँग्रेसचे अधिवेशन मुंबई येथे भरणार होते.आपल्याबरोबर मला मुंबईला घेऊन जाण्याचे यांच्या मनात होते. पण सांगायचे कसे? मुंबईस जाण्याच्या आदल्या दिवशी यानी आपल्या आईस विचारले की, 'अक्का, मी मुंबईला जाणार आहे. तू येणार का?' ती म्हणाली, ''नाही रे बाबा'' मग यानी बहिणीला म्हटले की 'चिमाक्का, तू मुंबईला येणार का?'' तिने उत्तर दिले की, 'दिवाळी जवळ आली आहे, तेव्हामी नाही येऊ शकणार!'' सर्वांना असे विचारण्यात यांचा हेतू हा होता की कोणीतरी म्हणावे 'मग तिलाका घेऊन जात नाहीस?' पण कोणीच काही बोलेना. शेवटी यानी स्पष्टच सांगितले की, 'मी मुंबईला जाणार आहे आणि माझ्याबरोबर तिलाही घेऊन जाणार आहे.' यांच्यापुढे बोलण्याची कोणाची  छातीच नव्हती. शेवटी आम्ही काँग्रेसला गेलोच. काँग्रेस कशी भरते ते पाहिले. आणि दिवाळीच्या अगोदर दोन दिवस घरात हजर झालो.

याना गाण्याची फार आवड. म्हणून त्यानी मला गायन शिकविण्यासाठी  मास्तर ठेवला. माझे संगीत शिक्षण यथातथाच झाले, पण याच्या आवडीचा फायदा घेऊन मी मुलींना संगीताच्या शाळेत घातले. त्यासाठी मी किती खर्च केला व करीत आहे याची चौकशी देखील यानी कधी केली नाही.

पूर्वी हे रागीट होते. त्यामानाने आता पुष्कळच थंड झाले आहेत. आमचे लग्न होऊन इतकी वर्षे झाली असली तरी छापखान्याची अगर बाहेरची कसलीच गोष्ट हे घरी कधी बोलणार नाहीत. आम्हाला लोकांकडून कळली तरच ती कळायची. आपल्याला बाहेर कितीही त्रास झाला, तरी ते घरी दाखवून देत नाहीत. घरात  कोणी येवो जावो, इतका खर्च तितका खर्च असे हे कधीच म्हणणार नाहीत. उलट घरी आलेल्याचा योग्य पाहुणचार न झाल्यास ते जाब विचारतील. पूर्वी रात्री–अपरात्री सभा, बैठका संपवून ते घरी येत व ठेवलेले थंड तर थंड अन्न खात असत. याना थंड–ऊनचे काही वाटतच नाही. हे मला वारंवार म्हणत की, 'गरम गरम अन्न वाढून तू मला वाईट सवय लावलीस. मी आपला मिळेल ते थंड तर थंड खाणारा मनुष्य.' मला वाटे की, दमूनभागून, भुकेजून हे येणार. जरा गरम गरम वाढल्यास चार घास जास्त जातील. याना अजूनपर्यंत हॉटेलात जाऊन चहाफराळ करण्याची सवय नाही. हॉटेलची पायरी हे अजूनपर्यंत चढलेले नाहीत. आता तर पूर्वीइतका चहाही घेत नाहीत. विडीकाडीचे देखील याना व्यसन नाही. झुणकाभाकर हा त्यांचा आवडीचा पदार्थ. कपडे जाडेभरडे, खादीचे. मी त्याना अनेकदा म्हटले की, 'एवढा पैसा मिळवता तर कपडे एवढे जाड का? जरा पातळ तरी घ्या' यावर 'मला असलेच कपडे आवडतात' हे त्यांचे उत्तर.

त्यांचा जेथे जेथे सत्कार झाला, त्या ठिकाणी मीही गेले होते. गाड्याबरोबर नळ्याची यात्रा

म्हणतात त्यातलाच प्रकार! त्यानी काही कामगिरी केली म्हणून त्यांचा सत्कार होतो. पण मी मात्र त्यांची पत्नी एवढ्याच नात्याने त्यांच्या मानसन्मानात वाटेकरी झाले. मलाही त्यावेळी खूप वाटायचे की, आपणही चार शब्द बोलावेत. पण तोंडातून एक शब्द बाहेर पडेल तर शपथ! मला बोलण्याचे धैर्यच नाही. तो सोहाळा पाहून त्यांच्या कार्याबद्दल अभिमान वाटायचा. ते स्वत: असल्या सत्कार–सोहाळ्यापासून मनाने अलिप्तच असतात. पुढे पुढे करून मोठेपणा मिळवावयाचा हव्यास त्याना कधी नव्हता व नाही. पुष्कळ सत्कार ते टाळतात. पण अगदीच निरुपाय झाल्यास लोकांचा हिरमोड होऊ नये म्हणून सत्काराला ते उपस्थित राहतात. मला हे सर्व पाहून अभिमान वाटतो आणि एखाद्यावेळी असेही वाटते की मी गाड्याचा केवळ नळा नसून एक चाक आहे. मी घर नाही का सांभाळले? ते तुरुंगात किती वेळा गेले, पण घरचे कसे होईल म्हणून त्यानी कधी पर्वा केली नाही, ते माझ्यामुळेच! त्याना आपल्या देशापेक्षा जास्त काही प्रिय नाही. वडिलार्जित पैसा अगर कोणाचीही मदत नसताना त्यानी आपल्या एकट्याच्या जीवावर धडाडीने छापखान व साप्ताहिक चालविले आणि ऊर्जितावस्थेला आणले. अशा या स्वाभिमानी, देशाभिमानी स्वातंत्र्यवीराची पत्नी होण्याचे भाग्य लाभल्याबद्दल मला धन्यता वाटते आणि ईश्वराचे मी शतश: आभार मानते.

**– सौ. स्नेहलता ठाकुर**

## परिचितांच्या दृष्टीतून

# जिद्दीचे पत्रकार बाबुराव ठाकुर

'तरुण भारत' मासिक स्वरूपात असताना १९२३-२४ साली लेखक या नात्याने तरुण भारताशी माझा प्रथम संबंध आला. त्याचे संपादक बाबुराव ठाकुर याना मी पाहिले नव्हते. किंवा त्यांचा माझा परिचय नव्हता. बेळगावचे श्री. पुंडलीकजी यांचा व माझा फार परिचय. त्यानी मला 'तरुण भारता'साठी लेख लिहिण्यास सांगितले, आणि मी वाईच्या प्राज्ञ पाठशाळेतून आणि नंतर सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजातून ते लिहिले.

बेळगावला निरनिराळ्या कारणाने माझ्या खूप खेपा झाल्या. पण बाबुरावांशी माझा साक्षात संबंध फार उशिरा म्हणजे पत्रकार या नात्याने आला. आणि उत्तरोत्तर तो वाढत गेला. त्या मानाने संयुक्त महाराष्ट्राच्या किंवा साहित्य संमेलनाच्या निमित्ताने आमचे संबंध कमी आले. त्या दोन्ही क्षेत्रात वावरणारी माणसे निदान प्रारंभी तरी निराळी होती.

१९५० साली बेळगावास मराठी पत्रकार परिषदेचे नववे अधिवेशन आचार्य अत्रे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष होते. श्री. बाबुराव ठाकुर. त्यापूर्वी किंवा नंतरही बाबुरावांनी पत्रकार संघटनेत फारच थोडा भाग घेतला. पुण्या-मुंबईच्या पत्रकारांचेच संघटनेत विशेष प्राबल्य होते. काँग्रेस, ग्रामशिक्षण-प्रचार, राणी पार्वतीदेवी कॉलेज, भाषिक प्रांतरचना, स्वतःचा छापखाना व वृत्तपत्र ही बाबुरावांच्या हालचालीची मुख्य कार्यक्षेत्रे, परिणामकारक वक्ते आणि पत्रकार म्हणून बाबुरावांचे नाव चांगले प्रस्थापित झाले होते. साप्ताहिक तरुण भारत दैनिक करण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा फार जुनी. मधूनमधून माझ्याजवळ ते ती बोलूनही दाखवीत. संधी साधून एकदा मी ते जाहीरही करून टाकले! ते पाहून बाबुराव म्हणाले, "तुम्ही जाहीर केले. आता मला दैनिकाचा विचार तातडीने करणे भागच आहे." तरीही हे स्वप्न साकार होण्यासाठी अनेक वर्षे जावी लागली. नवे वृत्तपत्र, त्यातून दैनिक काढणे दिवसेंदिवस खर्चाचे आणि यातायातीचे होत चालले बाबुराव अनुकूल संधीची वाट पहात होते.

१९६४ साली गोव्यात मडगाव येथे 'गोमंतवाणी' पत्राचा संपादक म्हणून काही महिने माझा मुक्काम असताना बाबुराव तेथे दुसऱ्या काही निमित्ताने आले. मुख्यतः बेळगाव-गोव्याच्या प्रश्नावर आमचे बोलणे झाले.

लवकरच चांदा येथे मराठी पत्रकार परिषदेचे अधिवेशन व्हावयाचे होते. आणि परिषदेच्या नवीन घटनेप्रमाणे पुढील वर्षासाठी तेथे अध्यक्ष निवडला जावयाचा होता. वृत्तपत्रक्षेत्रातील बाबुरावांची तपश्चर्या फार मोठी आहे. म्हणून मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्षपद त्याना मिळणे जरूर आहे, ही कल्पना माझ्या डोक्यात चमकून गेली. मी स्वतः चांद्याला जाऊ शकलो नाही. पण तेथे गेलेल्या काही प्रतिनिधींना माझी कल्पना मी सांगितली. त्याना ती एकदम पसंत पडली. बाबुराव प्रचंड बहुमताने परिषदेचे कार्याध्यक्ष म्हणून निवडून आले. बाबुरावांचा मराठी पत्रकारांच्या संघटनेशी एकदम अगदी निकटचा संबंध आला. १९६५ साली जळगाव येथे झालेल्या मराठी पत्रकार परिषदेच्या १८ व्या अधिवेशनाचे ते अध्यक्ष झाले.

बेळगाव–कारवारच्या ज्वलंत प्रश्नाला बाबुरावानी आपल्या भाषणात प्राधान्य देणे स्वाभाविक होते. मराठी पत्रकार परिषदेच्या धोरणाशीही ते सुसंगत होते. कारण परिषदेच्या जवळजवळ जन्मापासून भाषिक प्रांतरचना आणि विद्यापीठे या प्रश्नावर ती जखंड जोर देत आली आहे. बाबुरावांना परिषदेचे अध्यक्षस्थान देण्यात आले. त्याच्या अनेक कारणापैकी सीमावादासंबंधी त्यांची मते व कार्य पत्रकारांच्या संघटनेशी एकदम अगदी निकटचा संबंध आला. १९६५ साली जळगाव येथे झालेल्या मराठी पत्रकार परिषदेच्या १८ व्या अधिवेशनाचे ते अध्यक्ष झाले.

बेळगाव–कारवारच्या ज्वलंत प्रश्नाला बाबुरावानी आपल्या भाषणात प्राधान्य देणे स्वाभाविक होते. मराठी पत्रकार परिषदेच्या धोरणाशीही ते सुसंगत होते. कारण परिषदेच्या जवळजवळ जन्मापासून भाषिक प्रांतरचना आणि विद्यापीठे या प्रश्नावर ती जखंड जोर देत आली आहे. बाबुरावांना परिषदेचे अध्यक्षस्थान देण्यात आले. त्याच्या अनेक कारणापैकी सीमावादासंबंधी त्यांची मते व कार्य पत्रकारांच्या डोळ्यासमोर होतेच. जळगावच्या काँग्रेस कमिटीने वरील प्रसंगी बाबुरावांचा स्वतंत्र सत्कार केला. तेव्हा बाबुरावानी बेळगावच्या बाबतीत राज्यकर्त्यांकडून वर्षानुवर्षे होत असल्याचे अन्यायाचे स्वरूप पुन्हा निर्भयपणे मांडले. सीमाप्रश्नाच्यादृष्टीने बाबुरावांची अध्यक्षीय कारकीर्द चांगलीच गाजली.

सीमाप्रश्न अगदी निकराला आला तेव्हा प्रचाराचे एक प्रभावी साधन म्हणून, बाबुराव 'तरुण भारत' दैनिक करण्याच्या उद्योगाला मनापासून लागले. त्याबाबतीत माझ्याबरोबर अनेकदा त्यांचे बोलणे झाले. बेळगावसारख्या ठिकाणी– ना कर्नाटक ना महाराष्ट्र–अशा प्रदेशात मराठी दैनिक चालणे फार अवघड. म्हणून अनुकूल सल्ला देताना मी फारच आढेवेढे घेतले, हे येथे कबूल केले पाहिजे. पण मी घेतलेल्या प्रत्येक शंकेला बाबुराव उत्तर देऊन माझे समाधान करण्याचा प्रयत्न करीत. सांगितलेल्या प्रत्येक अडचणीचा परिहार करीत. मनुष्यबळ आणि द्रव्यबळ तोकडे असल्यामुळे बाबुरावांची होत असलेली तारांबळ, भेट झाली म्हणजे ते माझ्याजवळ निःसंकोच बोलून दाखवितात. दैनिकाच्या रोजच्या रगाड्यामुळे पूर्वीप्रमाणे त्याना बेळगाव सोडून फारसे फिरता येत नाही. त्यांच्या चळवळ्या स्वभावाला एका जागी डांबून राहणे आवडत नाही. पण पत्रकाराची जिद्द त्याना सर्व अडचणी सोसायला लावते.

**– श्री. शं. नवरे, मुंबई**

२३–५–६७

## सामान्याशी समरस झालेला साधा सरळ माणूस

साधा सरळ माणूस चेहऱ्यात रुबाब नाही. कपड्यात रुबाब नाही. पुढारी म्हणून ओळखता येणार नाही. पुढं पुढं करण्याची वृत्ती नाही. सामान्यत खपणारा. दिसायला पण सामान्य सामान्याशी

समरस झालेला सामान्यांची सुखदु:ख आपली समजणारा. त्यांची दु:ख ती आपली दु:खे समजून ती निवारण्यासाठी आटापीटा करणारा. त्या आपुलकीमुळेच विशेषाशी मुकाबला करणारा. कष्ट, त्रास, त्याग, जो पडेल तो आनंदाने पत्करणारा–जणू आपल्या कुटुंबावरच आघात झाला आहे अशा भावनेने.

त्यांची माझी ओळख झाली ती कोल्हापूरच्या राजेशाही अमदानीत. राजाप्रजेच्या झगड्याला नुकतीच सुरुवात झाली होती. प्रजेवर कसलाही अन्याय केला, अत्याचार केला, स्त्रियांची कसलीही विटंबना केली तर आपलं कोण काय करणार, दाद कोण घेणार, या घमेंडीत त्यावेळचा संस्थानी अंमल चालू होता. इथेच नव्हे तर बहुतेक सर्व संस्थानात! आपल्या शत्रूवर गाडी घालून त्याला चिरडला तर अपघात म्हणूनच नोंद होणार! अन्यायाची चौकशी करणारे न्यायाधीश राजाच्या मर्जीवर अवलंबून! अशावेळी पांगिरे प्रकरण उदभवले.

पांगिरे गावी एका स्त्रीचा पोलीस अधिकाऱ्याने अनन्वित छळ केला. तिच्या देहाची विटंबना केली. तिच्या पावित्र्याला आग लावली. लिहिता येणार नाही अशी त्या बाईची अवस्था केली. त्या अवस्थेचा फोटो घेणेही अशक्य होतं!

संस्थानी अंमलाखाली दबलेल्या व पोसलेल्या, मुस्कटदाबी केलेल्या पत्रांना या अन्यायाला प्रसिद्धी देता आली नाही. ती छाती त्याना झाली नाही. राजेशाहीवर व अधिकाऱ्यांच्या अन्यायावर टीका करणारे पत्र अपवादात्मक! टीका केली तर दुसरा अंक निघणे कठीण! अन् संपादकाला गावात फिरणं त्याहून कठीण!

अशावेळी 'तरुण भारता'च्या संपादकानी–बाबुराव ठाकुर यांनी त्या पांगिरे स्त्रीची आर्त हांक ऐकली आणि ते तिच्या सहाय्याला धावून आले. तीक्ष्ण पात्याप्रमाणे त्यांच्या लेखणीचे फटकारे राजवटीवर बसू लागले. त्या खणखणाटाने संस्थानी कार्यकर्ते जागे झाले. तो आवाज संस्थानाबाहेरच्या प्रजेच्या कानावर जाऊन आदळला! बाहेरची पत्रे खडबडून जागी झाली. त्यानीही आपल्या लेखण्या उचलल्या. सर्वत्र काहूर उठले. संस्थानी सत्ता हादरली. रेसिडेंटला दखल घ्यावीच लागली.

श्री. बाबुराव ठाकुर आम्हाला जवळ आले ते या प्रसंगानं. जातिसंबंधाहून आणि रक्त संबंधाहूनही ही जात जवळची ठरली व ते संबंध जे जुळले ते आजतागायत. दोन तपे होऊन गेली–त्याहूनही जास्त–तरी ते कायम आहे. कारण त्यात स्वार्थ कसला तो नव्हता. स्वार्थ असला तर तो संकटग्रस्ताना हात देणाऱ्याचा सेवेचे ढोंग करून तुंबडी भरणाऱ्याचा नव्हे! दु:खिताकडे धाव घेणे हा बाबुरावांचा धर्म आहे, स्वभाव आहे.

यानंतर बाबुराव जवळ आले ते सीमाभागाच्या लढ्याच्या निमित्ताने. ते आणि त्यांचे सहकारी डॉ. कोवाडकर, बा. रं. सुठणकर, त्या सर्वांनी मला अध्यक्ष करून एकाहून एक प्रचंड सभा भरविल्या. मला 'हीरो' बनवलं. मी पण बेळगावकरांच्या जीवनाशी समरस झालो.संयुक्त महाराष्ट्र समितीनेही त्याला मान्यता दिली. मला सत्याग्रहींचा सेनापती केलं. मीही त्या जनसमर्दाच्या लाटेवर नाचत तुरुंगात गेलो.

पत्रकार म्हणूनही बाबुरावांचे व माझे संबंध बरेच आले. माझी पत्रके, माझे लेख, माझ्या गोष्टी वेळावेळी 'तरुण भारता'मधून येत. आजही त्यांच्या पत्राची भेट येतच असते.

श्री. बाबुरावांची लेखणी प्रसंगी जहाल असते पण दर्जा सोडून ती खाली येत नाही. ती

भावनेनं रंगणारी आहे, पण निंदा–नालस्तीने बरबटलेली वा अश्लीलतेच्या घाणीत बुडलेली आढळणार नाही. ती तात्त्विक भूमिका सोडून खाली उतरणार नाही.

जीव तोडून सेवा करतील. पुढारीपणासाठी धडपडणार नाहीत. त्यांची टीका व्यक्तीवर असो किंवा पक्षावर असो, ती द्वेषमूलक असणार नाही. चळवळीसाठी चळवळ त्यानी केली नाही. त्यासाठी जनतेची दिशाभूल केली नाही. सवंग लोकप्रियतेसाठी सद्सद्विवेक बुद्धीशी प्रतारणा केली नाही.

बाबुरावांचे मला अनुभव आले ते हे! बाबुराव, सुंठणकर, डॉ. कोवाडकर यांच्या भेटी आता पडत नाहीत. पण त्याच्या आठवणी नेहमी ताज्याच वाटतात. त्यांचं आदरातिथ्य, त्यानी दाखविलेली आपुलकी व अगत्य मी कधीही विसरणार नाही.

३०–५–६८ – **भाई माधवराव बागल**, कोल्हापूर

## प्रखर प्रवृत्तीचा लढाऊ पत्रकार

मुंबई मराठी पत्रकार संघाच्या वर्धापनदिनाचे व संमेलनाचे प्रमुख पाहुणे म्हणून व महनीय प्रवक्ते म्हणून बेळगावच्या 'तरुण भारत' या पत्राचे संपादक श्री.बाबुराव ठाकुर यांची योजना करण्यात आली. महाराष्ट्रात ज्या संपादकानी आजही चिकाटीने, धडाडीने आणि निष्ठेने आपला पत्रव्यवसाय, व्रत म्हणून चालू ठेवलेला आहे आणि त्यासाठी अनेक अडचणीना जे तोंड देत राहिले आहेत, त्यामध्ये श्री. बाबुराव ठाकुर यांची प्रामुख्याने गणना करता येते. माझा आणि बाबुराव ठाकुरांचा दीर्घकालीन स्नेहसंबंध व ऋणानुबंध आहे. बाबुराव मुंबईत केव्हाही कारणपरत्वे आले तरी आलमगीर कचेरीत काही वेळ त्यांची सवडीत सवड काढून बैठक झालेली नाही आणि त्या बैठकीतल्या गप्पागोष्टीत बेळगाव–कारवारकडचे राजकारण, सीमाप्रदेशातल्या हालचाली, राणी पार्वतीदेवी कॉलेजची प्रगती इ. विषयासंबंधी अद्यावत अशी माहिती त्यानी सादर केली नाही, असे आतापर्यंत कधीही घडल्याचे मला आठवत नाही. आलमगीरच्या जन्मापूर्वी 'विविधवृत्त' कचेरीतही बाबुरावांच्या व माझ्या अशा बैठकी होत आणि त्यामुळे त्यांचे अंतरंग, त्यांचे मनोव्यापार, त्यांचे संकल्प जाणून घेण्याची संधी मला मिळत असे. पांगिरे प्रकरणाच्यावेळी माझ्या परिचयाचे झालेले बाबुराव हे एक कष्टाळू, नेकीचे व सार्वजनिक कार्यात सत्य व न्याय यासाठी अनेक खस्ता खाणारे खंदे पत्रकार आहेत, ही जी त्यांची छाप माझ्या मनावर ठसली, तीच चालू घटकेपर्यंत कायम राहिली आहे. एवढेच नव्हे तर, त्यात त्यानी आपल्या कार्यकर्तृत्वाचे अनेक रंगही पुढे भरल्यामुळे तिला उजाळा मिळत गेला आहे.

श्री. बाबुराव ठाकुर हे स्वतंत्र वृत्तीचे काँग्रेससेवक असल्यामुळे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतही त्यानी हिरीरीने भाग घेतला. त्यानंतर बेळगाव–कारवारच्या प्रश्नावर ते जे चौफेर लढा देत राहिले आहेत त्याला खरोखरच तोड नाही. लेखनप्रभू म्हणून बाबुराव फारसे प्रसिद्ध नाहीत. पण सीमा प्रश्नावरील त्यांचे तळमळीचे जे लिखाण तरुण भारतामधून प्रसिद्ध झाले आहे ते वाचले म्हणजे हृदयाची व्यथा केवढी अभिजात व बोलकी असते व ते बोलके लिखाण कसे काळजाला जाऊन भिडते याचा प्रत्यय आल्यावाचून राहात नाही.

श्री. बाबुरावांच्या या कामगिरीप्रमाणे राणी पार्वतीदेवी कॉलेज, बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समिती, वडगावचे मराठी ट्रेनिंग कॉलेज या शिक्षण संस्थांच्या संदर्भात त्यांनी केलेल्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करणे आवश्यक आहे. १९५० साली बेळगाव येथे मराठी पत्रकार परिषदेचे जे अधिवेशन भरले त्याचे बाबुराव हे स्वागताध्यक्ष होते. आणि त्यावेळी त्यांच्या कार्यकौशल्याचा

चांगलाच प्रभाव पडला.

आलमगीरच्या 'परिचित अपरिचित' या सदरात सहा वर्षापूर्वी म्हणजे दि. ८ सप्टेंबर १९६३ च्या 'आलमगीर'च्या अंकात हे स्फुट मी लिहिले. त्यानंतरच्या सहा वर्षाच्या काळात बाबुरावांनी आपल्या तरुण भारताचे दैनिकात रूपांतर केले. जळगावच्या पत्रकार परिषदेचे ते अध्यक्षही झाले. तथापि या सहा वर्षात त्यानी आणखी जी कामगिरी केली तिने बाबुराव ठाकुर हे नाव व त्यांचे कार्य यांना विशेष झळाळी प्राप्त झाली. सीमाप्रदेशाची वेदना शिवाजी पार्कवरच्या शिवसेनेच्या प्रचंड सभेत त्यानी एवढ्या तळमळीने सांगितली की, श्रोत्यांचे अंतःकरण त्यामुळे पिळवटून निघाले. आता बाबुराव तरुण भारताचे केवळ संपादक राहिलेले नाहीत. ते अंतर्बाह्य सीमारूप झालेले आहेत. आणि एका नव्या श्रेयाकडे त्यांची वाटचाल चालू झालेली आहे.

वर्णाने काळासावळा, वृत्तीने शालीन, कर्तृत्वाने प्रखर आणि प्रवृत्तीने लढाऊ असा हा पत्रकार व सार्वजनिक कार्यकर्ता आहे. बेळगाव–कारवारचा सीमाप्रदेश महाराष्ट्रात सामील झाल्यावर त्याला कृतकृत्यता लाभणार आहे.

**–चं. वि. बावडेकर**

## काँग्रेस आमची संस्था आणि ठाकुर आमचा पुढारी

अनेक आंदोलनातील श्री बाबुराव ठाकुर यांच्या धडपडीचा इतिहास म्हणजे बेळगाव जिल्ह्यातील व विशेषतः बेळगाव शहरातील स्वातंत्र्यलढ्याच्या कित्येक आंदोलनाचा इतिहास होय. पुढाऱ्यांच्या हाताखाली असली एखाद्या उद्दिष्टाने वेडी झालेली माणसे ईश्वर व नियतीच पुरवीत असते.पण ही वस्तुस्थिती न समजल्यामुळे आपण सर्वानी मनात आणले तर आम्ही नवीन नवीन पुढारी निर्माण करू शकू, असे सामान्य कार्यकर्त्यांना वाटते. पण हा भ्रम असतो. असला भ्रम श्री. बाबुराव ठाकुरांच्या निवासस्थानात म्हणजे त्यांच्या मठीत होत असे. म्हणूनच १९२१ पासून तो तहत १९४७ पर्यंत सर्व कानडी–मराठी कार्यकर्त्यांच्या तोंडी 'काँग्रेस आमची संस्था व ठाकुर आमचा पुढारी' ही घोषणा दृढ होऊन बसली होती.

श्री. बाबुराव ठाकुरानी एखादी गोष्ट किंवा विचार डोक्यात घेतला की त्याने त्यांचे डोके भरून आणि भारून जात असल्यामुळे अन्य विचारांना आत घुसण्यास जागाच राहात नाही. म्हणूनच ते पुष्कळाना हट्टी वाटतात. जो विचार किंवा मार्ग अथवा योजना बाबुरावांचे डोके प्रथम ताब्यात घेईल त्या विचाराचे बाबुराव! त्यातून बाहेर पडण्यास त्यांना वेळ लागतो, हे मी पाहिलेले आहे. त्यांच्याशी वाद न घालता, त्यांच्याबरोबर त्यांच्याच कलाने काम करीत गेल्यास त्याना बदलून आपल्या विचाराकडे झुकविणे, हे केवळ हळुवारपणे काम करूनच साधणे शक्य आहे. ही देखील एक कलाच आहे.

बाबुराव हे भावनाप्रधान गृहस्थ आहेत. त्यांची देशभक्ती ही देखील एक उत्कट भावना आहे. म्हणूनच आवश्यक तेवढे कार्यकर्ते ते आपल्या भोवती केव्हाही आकर्षित करू शकतात. ते हाडाचे देशभक्त आहेत. त्यांच्यापायी तात्त्विक वाङ्मयाचे वाचन किंवा तत्त्वचिंतन असते तर ते उत्तम साहित्यिक झाले असते. परंतु आंदोलनाच्या बिनीवर उभे राहिल्यानंतर विचारमंथनही वेळप्रसंगी करावे लागते. अशा प्रसंगी बाबुरावांची झालेली भाषणे ऐकताना कित्येक वेळी भावनाप्रधान मनुष्य विचारकाची भूमिका करीत असल्याप्रमाणे कोणास वाटले, तर ते योग्य व वस्तुस्थितीला धरूनच आहे. बाबुरावाना कोणी दुसऱ्याने कार्यकर्ता किंवा नेता बनविलेले नाही. कोणाच्या छायेत ते वाढलेले नाहीत अथवा कोणी अभावितपणे वा सहवासाने त्यांच्यावर संस्कार केलेले नाहीत, तर

त्यांचा पिंडच तसा आहे. त्यांच्या या वृत्तीला त्यांच्या वडिलांची साथ होती असेही नाही. 'आता हे स्वातंत्र आणि स्वराज्य आणणार म्हणे!' असे उद्‌गार त्यांचे वडील अनेकवेळा काढीत असत. पण बाबुराव उत्कट भावनेने त्यातूनही आशीर्वाद व पुष्टीच मिळवीत राहिले. आणि असले हे काम हमखास कुणालाही करता येईल इतके सोपे नसते. तेथे पाहिजे जातीचे हेच खरे!

परिश्रम हा बाबुरावांच्या स्वभावातील एक असाच स्थायीभाव व वैशिष्ट्य आहे. कोणत्याही कामाला त्यांनी उच्च वा नीच मानले नाही. त्यांच्या जोडीला खांद्याला खांदा लावून ज्यांनी कामे केली, त्या कित्येक कार्यकर्त्यांना निरभिमानपणे राबत राहण्याचे संस्कार बाबुरावानी दिलेले आहेत. त्याचा परिणाम म्हणून कित्येकांच्या जीवनात क्रांती झालेली आहे. अमुक एक नीति किंवा धोरण आपल्या तत्त्वांच्या चौकटीत बसते किंवा नाही, असली अडचण त्यांना सतावू शकली नाही. म्हणूनच सामान्य कार्यकर्ते त्यांच्या नेतृत्वाखाली काम करण्यात निर्धास्त असत. नेहमीच तत्त्वांचा काथ्याकूट करीत बसणाऱ्या आणि घोळ घालीत राहणाऱ्या पुढाऱ्यास सामान्य कार्यकर्ते कंटाळू वा टाळू लागतात. जो उत्साह, जी धडपड, जी धडाडी त्यांच्यापायी कॉलेजजीवनात होती, ती आजही त्यांच्या राहणी–करणी–विचारसरणीमध्ये आहे. याचे खरे रहस्य त्यांच्या या परिश्रमाच्या स्थायीभावात आहे. म्हणून नवीन नवीन संस्था उभारणे व त्या वाढवून कार्यक्षम करणे हे बाबुरावांना अगदी सहज आणि स्वाभाविक आहे.

शुद्ध चारित्र्य, स्वच्छ आर्थिक व्यवहार, कार्याची तळमळ, आपत्तीशी टक्कर देण्याची हौस या गुणवैभवाने त्यांच्यातील सेवाभावाचा अभाव भरून निघालेला आहे. व्यक्तिशः एखाद्याची दीर्घकाळ सर्वप्रकारची सेवा करीत राहण्याची संधीच त्यांना कधी मिळालेली नाही. व्यापक अर्थाने त्यांच्याकडून झालेली देशसेवा हीच त्यांच्या जीवनाची 'सेवा' होय.

पत्रकार बाबुराव, चळवळे बाबुराव, संघटक बाबुराव ही वेगवेगळी रूपे एकाच व्यक्तीमध्ये सामावल्यामुळे त्यांचे स्वतःचे एक अनुपम व्यक्तिमत्त्व तयार झाले आहे. आपले सर्व गुण व शक्ती त्यानी गेले अर्धशतक देशाच्या स्वातंत्र्याच्या आंदोलनास वाहिली असल्यामुळे त्यांना एकप्रकारची लकाकी चढली आहे.

८–७–६९ **– पुंडलीकजी**

## विशुद्ध चारित्र्याचे त्यागी जीवन

मी राहणार बेळगावचा. जन्मही बेळगावचा. माझ्या लहानपणापासून म्हणून सन १९२०/२१ सालापासून श्री. बाबुरावांचे नाव बेळगावात ऐकू येत आहे. त्यावेळच्या राजकीय चळवळीत एक निष्ठावान सैनिक म्हणून ते गाजत होते. हा लौकिक त्यांना सहजासहजी मिळणे शक्य नव्हते. यासाठी अंगीकृत कार्याबद्दल तळमळ, ध्येयसिद्धीसाठी कराव्या लागणाऱ्या श्रमाविषयी सातत्य, एकनिष्ठा आणि विशेष म्हणजे अन्यायाबद्दल अतिशय चीड– या गुणांच्या मिलाफामुळे श्री. बाबुराव बेळगावच्या सार्वजनिक जीवनात अगदी अग्रभागी उभे आहेत.

श्री. बाबुरावांचे कार्यक्षेत्र बहुविध आहे. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक या प्रत्येक क्षेत्रात ते आपल्या कर्तृत्वाने उठावाने चमकले आहेत. मी याठिकाणी त्यांच्या सामाजिक विशेषतः शैक्षणिक कार्याबद्दल माझ्या भावना व्यक्त करण्याचा प्रयत्न करीत आहे.

त्यांचे शैक्षणिक कार्य मी सुमारे ३५ वर्षापासून पहात आहे. तो काल पारतंत्र्यातील होता.

जनतेत निरक्षरतेचे प्रमाण ९०–९२ टक्के होते. साक्षरतेचा दिवा लागल्याशिवाय अज्ञानाचा अंधकार नाहीसा होणार नव्हता. परकीय सरकार शिक्षणप्रसाराबद्दल अगदी बेफिकीर होते. अशा परिस्थितीत बेळगावातील काही शिक्षणप्रेमी नागरिकांनी शिक्षणप्रसारासाठी खेडोपाडी शाळा सुरू करण्याचे ठरविले. श्री. बाबुराव हे या आघाडीवरील सरदार होत.

आताच्या कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुका त्यावेळी बेळगाव जिल्ह्यात होता. अत्यंत मागासलेला भाग! श्री. बाबुरावानी या मागासलेल्या भागाचीच आपले कार्यक्षेत्र म्हणून निवड केली. शाळा काढणे आज फार सोपे झाले आहे. त्यावेळची परिस्थिती फार कठीण होती. त्या काळात ज्यानी शाळा काढल्या, त्यांनाच त्या कष्टाची कल्पना असणार! डोंगराळ भाग. दूर दूर अंतरावरील खेडी, मागासलेली अशिक्षित जनता. रहदारीला रस्ते नाहीत. कोणाची सहानुभूती नाही, मदत नाही. सगळाच नन्नाचा पाढा! अशाही प्रतिकूल परिस्थितीत चिकाटीने तन–मनाने खपून, त्या शहरापासून दूरच्या भागात वारंवार जाऊन, एक नव्हे, दोन नव्हे तर दीडशे अधिक शाळा त्यांनी काढल्या. या शाळात काम करणाऱ्या सर्व शिक्षकांना १९६५ मध्ये स्कूलबोर्डाच्या नोकरीत सामावून घेण्यात आले. त्यावेळी शिक्षकानी आपली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी खानापूर येथे एक निरोपसमारंभ घडवून आणला. स्वतःच्या कुटुंबाप्रमाणे सांभाळलेल्या या शिक्षकांना त्यांच्या आर्थिक स्थैर्यासाठी अत्यंत समाधानाने बाबुराव निरोप देत होते.

सार्वजनिक कार्याच्या यशसिद्धीसाठी अपार कष्ट सहन करण्याची तयारी असावी लागते. समितीच्या शाळांतून जे शिक्षक ट्रेनिंगसाठी पाठविले जातात त्याना सरकारातून थोड्याफार प्रमाणात मदत मिळत असते. या मदतीची रक्कम थोडी मिळाली होती. अद्यापि बरीचशी मिळावयाची होती. सुमारे एक हजार रुपयांहून अधिक इतका पैसा सरकारातून यावयाचा होता. आता समितीच्या शाळा सरकारात गेल्या. शिक्षक सरकारी नोकरीत सामावले गेले. वास्तविक या राहिलेल्या मदतीच्या रकमेसाठी खटपट करण्याचे काहीही कारण नव्हते. पण गरीब शिक्षकांना मिळणारी रक्कम बाबुराव थोडीच हातची जाऊ देतील! त्यानी स्कूलबोर्डात दहा–वीस वेळा जाऊन पायपीट केली. संधी मिळेल तेव्हा फोन केले. स्मरणपत्रे लिहिली, संबंधित अधिकाऱ्यांच्या गाठीभेटी घेतल्या आणि त्यानी या कामाचा पिच्छा पुरवला. अखेर काम तडीस नेले आणि गेल्या वर्षी राहिलेली मदतीची रक्कम सरकारातून मिळविली. बाबुरावाना धन्य वाटले. पण शिक्षकांना खरी धन्यता वाटली ते बाबुरावांचे औदार्य अजून पुढेच आहे. सुटीनंतर शाळा परत सुरू झाल्या. बाबुरावानी सर्व संबंधित शिक्षकांना पत्रे पाठवून बोलावून घेतले व ज्याची त्याला देणे रक्कम देऊन टाकली. पण ज्याना काही अडचणीमुळे येणे जमले नाही, त्यांच्यासाठी वर्तमानपत्रातून जाहीर करून संबंधित शिक्षकानी आपापली रक्कम घेऊन जाण्याबद्दल कळविले.

माझा व बाबुरावांचा विशेष संबंध मराठी ट्रेनिंग कॉलेज या संस्थेमुळे आला. मी राहणारा वडगावचा. संस्थाही वडगावचीच. साहजिकच माझे संस्थेत जाणे–येणे सुरू झाले. त्यामुळे बाबुरावांशी अधिकाधिक परिचय होऊ लागला. मराठी ट्रेनिंग कॉलेज या संस्थेचे ते कार्यवाह. संस्थेच्या हितासाठी व भरभराटीसाठी ते सदैव दक्ष असतात. बेळगावला येणाऱ्या कोणत्याही थोर पाहुण्याची कॉलेजला भेट ही ठरलेलीच. ही भेट घडवून आणण्यात सर्व खटपट बाबुरावांचीच असते.

या प्रसंगी मला एका गोष्टीची आठवण होते. सुमारे १० वर्षापूर्वी असेल. भारतातील एक अग्रगण्य उद्योगपती श्री. ए. डी. श्रॉफ हे येथील राणी पार्वतीदेवी कॉलेजच्या एका समारंभासाठी मुख्य पाहुणे म्हणून उपस्थित होते. बाबुरावानी नेहमीप्रमाणे मराठी ट्रेनिंग कॉलेजला भेट देण्याबद्दल

त्याना विनंती केली. भेटीचा दिवस व वेळ नक्की झाली. त्याप्रमाणे पाहुणे आले. कॉलेजातील वातावरणामुळे ते इतके प्रसन्न झाले की, जाताना त्यानी आपल्या कारखान्यातर्फे सतत तीन वर्षे चालू राहणारी देणगी संस्थेला जाहीर करून त्याप्रमाणे देऊनही टाकली.

सतत धडपड हा बाबुरावांचा स्थायीभाव आहे. प्रेसमध्ये असोत, घरी असोत या कॉलेजकडे येवोत, ते सतत गडबडीत असतात. कॉलेजच्या कामानिमित्त मी अनेकवेळा त्याना त्यांच्या प्रेसमध्ये भेटलो आहे. प्रत्येक वेळी अनेक माणसांच्या धोळक्यात बाबुराव अडकून पडल्याचे दिसले आहे. त्यांचा कामाचा उरकही दांडगा आहे. आलेल्याशी ५/१० मिनिटे बोलतील. त्यांच्या येण्याचा रोख बोलण्यावरून समजून घेतील व त्याची बोळवण करतील. पण नसता पाल्हाळ लावीत ते कधीच बसत नाहीत.

श्री. बाबुरावांच्या सान्निध्यात एखादी नवी व्यक्ती आली की ती प्रारंभीच त्यांच्या बोलण्यातील करडेपणाने गांगरून जाते. तिला बाबुराव मोठे कडक, तापट वाटतात. ते थोडे खरेही आहे. पण खऱ्या अर्थाने गरजू असणाऱ्या माणसासाठी ते किती श्रमतात, त्याची आस्थेवाईकपणे कशी चौकशी करतात, त्याची अडचण दूर करण्यासाठी कसे आटोकाट प्रयत्न करतात हे मी प्रत्यक्ष पाहिले आहे. बाबुरावांच्या स्वभावातील आणखी एक विशेष मला जाणवला. वैयक्तिक अडीअडचणी, सुखदुःख यांचा त्यांच्यावर फारसा परिणाम झाल्याचे दिसत नाही. प्रत्येकाच्या जीवनात असे प्रसंग येत असल्याने त्याचा ते फारसा विचार करीत नाहीत. पण एखादा अन्याय सार्वजनिक स्वरूपाचा असतो त्यावेळी ते इतके खवळतात की जणू काही ती आपत्ती त्यांच्यावरच कोसळलेली आहे. तो अन्याय दूर करण्यासाठी मग ते अहोरात्र झटतात.

तापट, कणखर स्वभाव सार्वजनिक जीवन स्वच्छ व निर्मळ राहण्यास आवश्यक आहे. लिबलिबीत स्वभाव अनेक मोहाना आमंत्रण देतो. बुद्धी चळण्याचा संभव असतो. शिक्षण समितीचे कार्यवाह या नात्याने त्यानी सरकारातून लाखांनी ग्रँट घेतली व शिक्षकांच्या पगारापोटी लाखाने खर्चिली. हा सर्व व्यवहार बँकेमार्फत घडला आहे. स्वतःच्या हाताने एका पैचाही व्यवहार त्यानी केला नाही. प्रत्येक कार्यात ते रस घेतील. पण मोह पडू देणार नाहीत. 'इदं न मम' हे सूत्र त्यानी सदैव दृष्टीपुढे ठेवले आहे.

**–कृष्णराव नाडगौडा**

## लोकसेवेचे खडतर व्रत घेतलेले बाबुराव

जळगावच्या पत्रकार परिषदेचे अध्यक्ष या नात्याने श्री. बाबुरावांचे ठिकठिकाणी सत्कार–समारंभ झाले. त्यातल्या त्यात मुंबईच्या सत्कार–समारंभाचे वृत्त वाचून तर मला आनंदाचे भरते आल्यावाचून राहिले नाही. ते वाचत असता सौ.ने देखील असे उद्गार काढले की, 'हा मात्र अगदी योग्य माणसाचा सत्कार होत आहे.' तिची गुणग्राहकता पाहून मलाही समाधान वाटले. मंत्रिमहाशयांचे व इतर नानाप्रकारच्या व्यक्तींचे हल्ली जे सत्कार–समारंभ होत असतात, ती एक नित्याचीच बाब झाल्याने तिकडे कोणी ढुंकूनही पहात नाही. परंतु श्री बाबुरावांसारख्यांच्या सत्काराला एक आगळेच महत्त्व आहे.

गेल्या २५ वर्षापूर्वी श्री. बाबुरावानी लोकसेवेचे जे व्रत घेतले, ते आजपर्यंत त्यांनी मोठ्या निष्ठेने चालविले आहे. स्वराज्यापूर्वी ज्या काँग्रेसचा इंग्रजांसारख्या बलाढ्य राष्ट्रालादेखील दरारा वाटत होता, अशा सर्व शक्तीमान काँग्रेसमध्ये स्वातंत्र्योत्तर काळात स्वार्थ, अधिकारलालसा,

कर्तव्यच्युति इत्यादी दुर्गुणांचे प्राबल्य झाल्यामुळे श्री. बाबुराव काँग्रेसमधून बाहेर पडले व त्यानी अनेकविध स्वरूपाचे विधायक कार्य चालू ठेवले. अशा तत्त्वनिष्ठ व त्यागी माणसाचा सत्कार होणार नाही तर कोणाचा होईल?

**–कै. मंगेशराव सबनीस**

## झुंझार स्वभावाचा चिरतरुण

श्री. बाबुराव ठाकुर यांचा व माझा परिचय १९१९ सालापासूनचा म्हणजे सुमारे ५० वर्षांचा आहे. १९१९ साली 'तरुण भारत' हे प्रथम मासिक स्वरूपात सुरू झाले. त्यावेळी बाबुराव सांगली येथील विलिंग्डन कॉलेजमध्ये शिकत होते. याच सुमारास महात्माजीनी असहकारितेची चळवळ पुकारली होती. तीत भाग घेण्यासाठी बाबुरावानी कॉलेजला रामराम ठोकला. तेव्हापासून गेली ५० वर्षे ते राजकीय, सामाजिक, शैक्षणिक अशा सर्व क्षेत्रातील कार्यात धडाडीने भाग घेत आले आहेत. या प्रदीर्घ काळात अनेक चळवळींच्या लाटा आल्या आणि गेल्या. पण कधीही न डगमगता बाबुराव अविरत कार्य करीत राहिले.

सुरुवातीला कै. गोविंदराव याळगी यानी बाबुरावांच्या उत्साहाचा पुरेपूर उपयोग करून घेतला. दोघांचाही स्वभावधर्म एकच. पण बाबुरावांना श्री. याळगी यांच्यासमवेत कार्य करण्यास फार काळ मिळाला नाही. कारण श्री.याळगी पुढे लवकरच निवर्तले. त्यांच्या कार्याचा वारसा बाबुरावांकडे आला. असहकार चळवळीत बाबुराव अगदी आघाडीवर होते.सभा, लेखन, सत्याग्रह इ. सर्वच गोष्टीत बाबुरावानी बेळगावात पुढाकार घेतला होता.

श्री. बाबुरावांनी स्वतःचे असे एक कार्यकर्त्यांचे मंडळ तयार केले. त्या काळात बहुजनसमाज काँग्रेस चळवळीस विरोधी होता. अशापरिस्थितीत बाबुरावानी बहुजनसमाजातील डॉ. कोवाडकर, कै. मुंडेकर वगैरेंचे सहकार्य मिळविले. शिवाय कै. शिवराम कोप्पळ, कै. केशवराव गोखले इ. तरुण कार्यकर्त्यांचा एक नवा गट त्यानी तयार केला. व गेली ५० वर्षे त्या सर्वांशी प्रेमाचे संबंध कायम राखले. बाबुराव यांचा पिंडच चळवळ्या! चळवळीशिवाय त्याना चैन पडत नसे. कोणीही त्याना आपली गाऱ्हाणी सांगावीत. लगेच बाबुराव ते काम स्वतःचेच समजून कायावाचामने झटून त्याचा पिच्छा पुरवितील.

काशीबाई हणबर प्रकरणी त्यानी दाखविलेल्या धैर्याची वाखाणणी करावी तेवढी थोडीच! तत्कालीन कोल्हापूरच्या संस्थानी राजवटीतील पोलिसांच्या दमन यंत्रणेची तमा न बाळगता त्यानी हे प्रकरण धसास लावले व गुन्हेगारास न्यायासनासमोर खेचले.

गेली सतरा–अठरा वर्षे सीमाप्रश्नासाठी चाललेल्या महाराष्ट्र एकीकरण समितीच्या सर्व चळवळीत बाबुराव आघाडीवर आहेत. किंबहुना सीमेची ही चळवळ बाबुरावानी व त्यांच्या तरुण भारत पत्राने जिवंत ठेवली आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्तीचे होणार नाही.

श्री. बाबुराव ठाकुर यानी आर्थिक अडचणीमुळे केव्हाही लाचारीने शरणागती पत्करली नाही. या ठिकाणी एक आठवण मुद्दाम नमूद करावीशी वाटते. ना खेरांचे मंत्रिमंडळ असताना एकदा कै. खेर बेळगावी आले होते. दे. भ. गंगाधरराव देशपांडे यांच्या घरी बरीच मंडळी जमली होती. श्री. खेरांच्या सभेच्या व्यवस्थेसाठी मध्येच श्री. ठाकुर उठून गेले.तेव्हा त्यांच्याविषयींच्या गोष्टी निघाल्या. त्याकाळी बाबुराव अतिशय आर्थिक अडचणीत होते. तेव्हा आम्ही श्री. खेरांना सूचना केली की,

बाबुरावांच्या बंधूंना जर त्यानी न्यायखात्यात मोठी नोकरी दिली तर त्यांची अडचण काहीशी दूर होईल. बाबुरावाना हे कळताच त्यानी स्पष्ट शब्दात कळविले की, ''सार्वजनिक जीवनक्रमात असा गैरफायदा घेणे मला मुळीच पसंत नाही. माझ्या अडचणी मी पाहून घेईन.'' या निःस्पृह नीतितच बाबुरावांचे यश आहे, यशाचे मर्म आहे.

श्री. बाबुरावांचे सार्वजनिक व खासगी आयुष्य निष्कलंक आहे. त्यामुळे ते निःस्पृह व थोडेफार फटकळही आहेत. म्हणूनच ते वयाने वृद्ध होऊनही मनाचे तरुणच राहिले आहेत. त्यांच्या झुंझार वृत्तीमुळे आम्ही त्यांना थट्टेत 'झुंझारराव' या टोपणनावाने संबोधतो.

**– कै. बाबुराव दामले, खानापूर**

## अन्यायाविरुद्ध लढणारा दमदार नेता

१९२९–२१ सालापासून बाबुरावांच्या नावाचा उल्लेख ऐकू येऊ लागला. मला त्यांचा परिचय पहिल्यांदा केव्हा झाला हे नक्की आठवत नाही. माझ्या कल्पनेप्रमाणे १९२१ साली जेव्हा जिल्हा, तालुका व शहर काँग्रेस कमिट्यांची रचना झाली, त्यावेळीच हा परिचय झाला असावा. १९२८ साली जिल्हा काँग्रेस कमिटीची स्थापना झाली तेव्हा श्री. बाबुरावांची सेक्रेटरी म्हणून निवड झाली. त्यांनी काँग्रेसच्या कामास धडाडीने सुरुवात केली. जिल्ह्यात कोठेही लोकांवर अन्याय झाल्याची बातमी त्याना कळताच ते धावून येत, व त्या प्रकरणाची सरकारात दाद लावून घेऊन कामाची तड लावीत.

बेळगाव शहर हे मराठी भाषिक आहे व त्याचा समावेश महाराष्ट्रात झाला पाहिजे, या मागणीसाठी बाबुरावानी म. ए. समितीमार्फत झालेल्या प्रत्येक चळवळीत प्रामुख्याने पुढाकार घेतला आहे. त्यांचा राष्ट्राभिमानही तसाच जाज्वल्य आहे. १९२० सालापासून झालेल्या प्रत्येक चळवळीत त्यानी हिरीरीने भाग घेतला असून कित्येक वेळा त्यानी खडतर व दीर्घ मुदतीचा कारावासही भोगला आहे.

अन्यायाविरुद्ध–मग तो कोणत्याही स्वरूपाचा असो–निकराने झुंज देणे हा बाबुरावांचा स्वभावच आहे. याचे आमच्या भागातील उदाहरण द्यावयाचे झाल्यास निपाणीजवळ पट्टणकुडीचे राजगिरे खून प्रकरणाचे देता येईल. ज्योति रामा राजगिरे यांच्या हत्येस जबाबदार असणाऱ्या आरोपींना बाबुरावानी न्यायासनासमोर खेचले व त्याना योग्य शासन करविले. तसेच मयताच्या पत्नीस व अज्ञान मुलास सरकारकडून दीर्घ मुदतीची वार्षिक मदत मिळवून दिली.

दुसरे उदाहरण निपाणीतील १९४० सालचे हायस्कूल शिक्षक प्रकरण होय. निपाणी नगरपालिकेने केवळ जातिद्वेषाने प्रेरित होऊन म्यु.पल हायस्कूलमधील काही नामवंत शिक्षकांना काही तरी निमित्त चिकटवून एकाच ठरावाने एकदम कमी केले. त्याची या भागात मोठी तीव्र प्रतिक्रिया झाली. सरकारने या प्रकरणाच्या चौकशीकरिता कमिटी नेमून नागरिकांचे साक्षी–पुरावे घेतले. पत्रके, प्रतिपत्रके प्रसिद्ध झाली. सत्यपरिस्थितीचे वर्णन करणारे एक महत्त्वपूर्ण पत्रक निपाणी येथील बऱ्याच स्वतंत्र नागरिकांनी तयार केले व ते छापून देण्याबद्दल येथील सर्व छापखानेवाल्याना विचारले. पण ते छापण्याचे धैर्य कोणाही छापखाना मालकाने दाखविले नाही. म्हणून ते पत्रक श्री. बाबुराव ठाकुर यांच्याकडे पाठविण्यात आले. त्यानी ते जसेच्या तसे छापून दिले. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणातील म्यु.पालिटिचे ते कृत्य कसे अन्याय्य व द्वेषमूलक होते, ही गोष्ट जगजाहीर झाली. शाळाखात्यामार्फत झालेल्या चौकशीत शिक्षकांच्या बाजूने निकाल होऊन शिक्षकांना कामावरून

काढलेल्या मुदतीचा पगार म्यु. पालिटीस भरावा लागला व चार शिक्षकांना त्यांच्या नोकरीची मुदत पूर्ण होईपर्यंत कामावर घ्यावे लागले. त्यांचा प्रॉव्हिडंड फंड, ग्रॅच्युईटी वगैरे सर्व त्यांना द्यावे लागले.

योगायोगाने श्री. बाबुराव व मी स्वत: मिठाच्या सत्याग्रहाच्या प्रसंगी एकाच वेळी हिंडलगा जेलमध्ये गेलो व तिथेच आम्ही शिक्षा पूर्ण केली. त्या ठिकाणी आमचा दोघांचा असा नित्य गीता वाचनाचा कार्यक्रम असे. शेवटी आम्हा दोघांची सुटका एकाच दिवशी झाली. त्यावेळी आमचा दोघांचाही बेळगावकरांतर्फे सत्कार करण्यात आला.

**– रा. गो. कागवाडे, निपाणी**

## एक निरलस समाजसेवक

सन १९२१ मध्ये म. गांधींनी सुरू केलेल्या असहकार आंदोलनाच्यावेळी माझे बंधू कै. गोविंदराव यांच्याकडे सल्ला मसलतीसाठी श्री. शिवराव कोप्पळ व श्री. बाबुराव ठाकुर हे नेहमी येत असत. तेव्हापासून पुढे काँग्रेसच्या कामात श्री. बाबुरावांचा व माझा परिचय वाढत गेला.

बेळगाव शहरात काँग्रेसचा प्रचार श्री. बाबुरावांच्या धडाडीमुळे वाढतच गेला. त्यांना केवळ बेळगाव शहराचे कार्यक्षेत्र पुरे पडेना. आम्ही जिल्ह्यात मराठी भागात दौऱ्यावर जाताना श्री. बाबुराव बरोबर असायचे. ते काही काळ बेळगाव जिल्हा काँग्रेस कमिटीचे सेक्रेटरी होते, व कर्नाटक प्रांतिक काँग्रेसचे सभासद तर अनेक वर्षे होते. त्यानी आपल्या मराठी भाषणाने कर्नाटक प्रांतिक काँग्रेस गाजविली आहे.

१९३० च्या मिठाच्या सत्याग्रहाच्यावेळी बेळगाव येथे जिल्ह्यातील सर्व तालुक्यातून सत्याग्रही येत. त्यांच्यासाठी येथे राहण्या–जेवण्याची व्यवस्था करण्याचे व वेळोवेळी सत्याग्रहासाठी स्वयंसेवकांची पथके पाठविण्याचे महत्त्वाचे काम श्री. बाबुरावानी उत्तमप्रकारे केले. शिबिरात जवळ जवळ १५० पर्यंत स्वयंसेवकांची संख्या असावयाची. शहरवासियांच्या मदतीने त्यानी शिबिराची व्यवस्था चोख ठेवली होती.

१९३१ च्या प्रारंभी धनशेट्टी वगैरेना फाशी देण्याच्या दिवशी बेळगावच्या कलेक्टरानी एक हुकूम काढून सभा–मिरवणुकीला बंदी केली होती. हा बंदीहुकूम मोडण्याचे ठरवून श्री. बाबुराव ठाकुर व श्री. शिवराव कोप्पळ यानी शिबिरातून ५० स्वयंसेवकांनिशी गावात मिरवणुकीने जाऊन संध्याकाळी मार्केट झेंडा चौकात सभा घेण्याचे ठरविले. इकडे पोलिसानी ही मिरवणूक होऊ द्यावयाची नाही असे ठरवून लाठीधारी पोलिसांची जमवाजमव केली.

पोलिसांची ही सूड घेण्याची वृत्ती लक्षात घेऊन श्री. गंगाधररावजी देशपांडे व श्री. नाराणयराव जोशी यानी हा हुकूम न मोडता झेंडा चौकातच एक सभा घ्यावी (हुकुमात सभेला बंदी नव्हती) असे श्री. बाबुरावाना सांगितले. त्यांच्या तरुण मनाला ते पटेना. त्यानी शिबिरातून मिरवणूक काढलीच. मिरवणुकीचा मार्ग ठरलेला नसल्याने ही मिरवणूक गल्लोगल्ली फिरू लागली. लाठीधारी पोलिसांच्या मोटारी खडेबाजार पोलीस स्टेशनजवळ उभ्या होत्या. ही मिरवणूक कोठे अडवावी याबाबत त्यांचा निर्णय ठरलेला नव्हता. दोन तास मिरवणूक गावभर फिरली होती. आता तरी त्यानी झेंडा चौकात मिरवणुकीचे रूपांतर जाहीर सभेत करावे, असा सल्ला त्याना देण्यात आला. तोही त्याना मानवला नाही. खडेबाजार पोलीस स्टेशन समोरून मिरवणूक न्यावयाची, असा श्री. बाबुरावानी हट्ट धरला. कृष्णा कॅफेसमोर पोलिसांनी मिरवणूक अडवली. या आधी दोन तीन महिन्यापूर्वी स्वयंसेवकानी परदेशी कपड्याची होळी केली होती. त्यावेळी गोळीबाराचा प्रसंग आला होता. परंतु तेव्हा श्रीमती बसव्वा कळसण्णवर या शूर महिलेच्या

प्रसंगावधानामुळे तो प्रसंग टळला. यावेळी निदान लाठीहल्ला करून स्वयंसेवकांची डोकी तरी फोडावी, अशी पोलीस अधिकाऱ्यांची इच्छा होती. त्यासाठी कित्येक फलटणी मधून भरती केलेल्या खास पठाणांना आणले होते. लाठीहल्ला टाळावा अशी त्यावेळचे सिटी मॅजिस्ट्रेट श्री. सयानी यांची इच्छा होती. परंतु पोलीस अधिकाऱ्यांच्या उत्साहापुढे त्यांचे काही चालले नाही. अखेर लाठीहल्ला झाला व स्वयंसेवकांची डोकी फुटलीच. या लाठीहल्ल्यात १६५ लोक जखमी झाले.

स्वातंत्र्योत्तर काळ श्री. बाबुरावानी आपण हाती घेतलेल्या शिक्षणकार्यात आणि 'तरुण भारत' पत्र यशस्वीरीतीने चालविण्यात व्यतीत केला. काँग्रेस कमिटीशी त्यांचा प्रत्यक्ष संबंध राहिला नाही. पूर्वी ब्रिटिश राजवटीत नागरिकांवर हरघडी घडणाऱ्या अन्यायावर तरुण भारतात कडक टीका येत असे, तशीच स्वराज्याच्या काळातही लोकांवर घडणाऱ्या अन्यायावर निर्भीड टीका करून तो चव्हाट्यावर आणण्याचे काम श्री. बाबुरावानी चालूच ठेवले.

देशात भाषावार प्रांतरचना करण्यासाठी राज्य पुनर्रचना मंडळ नेमले गेले. त्या मंडळाचा अहवाल प्रसिद्ध झाला. त्यात सीमाभागावर मोठाच अन्याय झाल्याचे दृष्टोत्पत्तीस आले. हा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर श्री. बाबुरावानी सीमाभागातील काँग्रेसप्रेमी लोकांची एक परिषद बेळगाव येथे म्यु. पालटीच्या सभागृहात भरविली होती. सीमावासीयांवर झालेला अन्याय दूर करून घेण्यासाठी श्री. बाबुराव दिल्लीला गेले. त्यांच्या बरोबर श्री. बा.रं. सुंठणकर व मीही होतो. त्यावेळचे काँग्रेसचे अध्यक्ष श्री. ढेबरभाई आणि काँग्रेस वर्किंग कमिटीपुढे सीमाभागावर झालेल्या या अन्यायाचे परिमार्जन झाले पाहिजे, असे आम्ही ठासून सांगितले. वर्किंग कमिटीने या सीमाप्रश्नाचा विचार करण्यासाठी एक उच्चाधिकार समिती नेमली. या समितीवर काँग्रेसचे अध्यक्ष श्री. ढेबरभाई, पं. जवाहरलाल नेहरू, मौलाना आझाद व श्री. गोविंदवल्लभ पंत हे होते. या समितीपुढे सीमाभागाची बाजू मांडण्याकरिता निपाणी, कारवार, बेळगाव येथील काँग्रेसचे कार्यकर्ते हजर होते. बेळगावची बाजू मांडण्यात श्री. बाबुरावानी भाग घेतला होता.

श्री. बाबुरावांच्या संबंधी लिहावयाचे म्हणजे १९२० पासूनचा बेळगाव शहराचा काँग्रेसचा इतिहास लिहावा लागेल. ते काँग्रेस संस्थेशी एकजीव झाले होते. आम्ही काही जण म्हणत असू की 'बाबुराव आमचे पुढारी व काँग्रेस आमची संस्था!' गांधीवधानंतर उद्‍भवलेल्या परिस्थितीत बाबुरावानी सर्व ठिकाणी जातीने फिरून शांतता स्थापण्याच्या कामात मदत केली. गोवा सत्याग्रहाच्यावेळी श्री. बाबुरावानी अत्यंत धडाडीने कार्य केले. बेळगावसारख्या ठिकाणी पावसाळ्यात सर्व भारतातून सत्याग्रहासाठी येणाऱ्या हजारो सत्याग्रहींची रहाण्याजेवण्याची व गोव्याच्या सीमेपर्यंतच्या प्रवासाची सोय करण्याची जबाबदारी गोवा विमोचन संस्थेवर पडली होती. त्यासाठी श्री. बाबुरावानी जातीने प्रयत्न केले. अशा या निरलस समाजसेवकाला परमेश्वराने दीर्घायुरारोग्य द्यावे ही प्रार्थना.

**– जीवनराव याळगी**

## मी पाहिलेले बाबुराव

श्री. बाबुराव ठाकुर यांचा व माझा परिचय १९२८ साली सायमन कमिशन वरील बहिष्काराच्या आंदोलनप्रसंगी झाला. त्यावेळी मी शहापूरच्या चिंतामणराव हायस्कूलमध्ये शिकत होतो. सायमन कमिशनच्या आगमनाच्या निषेधार्थ विद्यार्थ्यांची एक जाहीर सभा भरवावी असा विचार करून त्याबद्दल काँग्रेस नेत्यांचा सल्ला घ्यावा म्हणून मी माझ्या एका सहाध्यायसह श्री. जीवनराव याळगी याना भेटलो त्यानी आम्हाला श्री. बाबुराव ठाकुर यांच्याकडे पाठविले. त्यावेळी ते जिल्हा काँग्रेस कमिटीचे कार्यदर्शी होते. आम्ही रात्री ८ च्या सुमारास बाबुरावाना भेटण्यासाठी 'तरुण भारत'

छापखान्यात गेलो. आमच्या येण्याचा उद्देश आम्ही त्याना थोडक्यात सांगितला. त्यावर ते म्हणाले, 'येथील मिशन हायस्कूलमध्ये सायमन मास्तर आहेत ना, त्यांनी एक विद्यार्थी संघ स्थापन केलेला आहे. त्याच्यावतीने सायमन कमिशनच्या निषेधार्थ विद्यार्थ्यांची जाहीर सभा बोलावण्याचे ठरले आहे. चिंतामणराव हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना घेऊन तुम्ही त्यात सामील व्हा म्हणजे झाले.'

श्री. बाबुरावांच्या सल्ल्याप्रमाणे आम्ही मारुतीच्या देवळात भरलेल्या विद्यार्थ्यांच्या सभेत सामील झालो माझ्या राजकीय जीवनाचा 'श्रीगणेशा' या प्रमाणे बाबुराव ठाकुर यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. देशसेवेची त्यांची तळमळ व देशासाठी काही ना काही सतत करीत राहण्याची त्यांची प्रवृत्ती यांचा माझ्या मनावर फार परिणाम झाला. त्यांची लोकसंग्रहवृत्ती व योजकता या गुणामुळे मी स्वाभाविकच त्यांच्या प्रभावळीत ओढला गेलो.

१९३० साली काँग्रेसने संपूर्ण स्वातंत्र्याचे ध्येय घोषित करून त्याच्या प्राप्तीसाठी सविनय कायदेभंगाचा लढा पुकारला. म. गांधींची दांडीयात्रा सुरू झाली. देशभर नवचैतन्याचे वारे वाहू लागले. देशात एक नवा मनूच उगवला. बेळगाव शहरात कायदेभंगाच्या लढ्याची संघटना करण्याचे, प्रभातफेऱ्या, झेंडावंदन, सभा, मिरवणुकी इत्यादी कार्यक्रम पार पाडण्याचे काम बाबुरावानी अंगावर घेतले. १३ एप्रिलला देशात सर्वत्र मिठाच्या सत्याग्रहाचा कार्यक्रम करण्यात आला. मी व विनायकराव करगुप्पीकर यानी त्या दिवशी चंदगडला जाऊन तेथे मिठाचा सत्याग्रह करावा असा आदेश ता. १२ एप्रिल १९३० रोजी रात्री ८ वा. श्री. बाबुराव ठाकुर यांच्याकडून आला व बेकायदा मिठाचे पुडकेही आले. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी चंदगड येथे जाहीर सभा भरवून आम्ही दोघानी मीठ विकले. श्री. दादा बांदेकर आदी तिघानी ते घेतले. ता. १४ रोजी आम्हा पाचही जणांची हिंडलगा जेलमध्ये रवानगी झाली. अशाप्रकारे मला सक्रिय राजकारणाची व देशसेवेच्या असिधाराव्रताची दीक्षा बाबुरावानी दिली असे म्हटले तर वावगे होणार नाही!

कायदेभंगाच्या चळवळीच्या काळात बाबुरावानी बेळगावात गल्लीवार संघटनेचे जाळे विणले. या संघटनेमार्फत रोज प्रचंड प्रभातफेऱ्या निघत असत. रात्रीच्या शाळा काढून साक्षरता प्रसाराचे कार्य व गल्लीतील लोकाना रोज वर्तमानपत्र वाचून दाखवून देशात काय चालले आहे समजावून देण्याचे कार्य या संघटना करीत असत. अर्ध्या तासाच्या आत अर्धा मैल लांबीच्या अचाट मिरवणुकी काढणे व जाहीर सभाना अफाट जनसमुदाय जमविणे या संघटनामुळे सुलभ झाले होते. बाबुराव रोज सायकलवरून गावभर चक्कर मारून या गल्लीवार संघटनाशी संपर्क ठेवीत व त्याना मार्गदर्शन करीत. अनेकवेळा मी त्यांच्याबरोबर गल्लोगल्ली फिरलो आहे.

१९३१ च्या मार्च महिन्यात म. गांधी व व्हॉइसरॉय लार्ड आयर्विन याच्यात तडजोड होऊन सर्व राजबंद्यांची तुरुंगातून सुटका झाली. पण गांधी–आयर्विन तडजोड फार दिवस टिकली नाही. गोलमेज परिषदेला गेलेले गांधीजी रिक्त हस्ताने परतल्यावर जानेवारी १९३२ मध्ये दडपशाहीचे सत्र सुरू करून सरकारने देशातील सर्व नेत्याना पकडून तुरुंगात डांबून टाकले. बाबुरावाना अर्थातच पहिल्याच दिवशी अटक झाली.

१९३०–३२ च्या कायदेभंगाच्या चळवळीत, १९३३–३४ च्या अस्पृश्यता निवारणाच्या आंदोलनात, १९३५–३७ च्या कायदे कौन्सिलच्या निवडणुकीत, मध्यंतरीच्या नगरपालिकेच्या निवडणुकीत आणि १९४२ च्या 'चलेजाव' लढ्यात शहराने जी अपूर्व कामगिरी केली, बेळगावच्या जनतेने जे अलोट धैर्य, त्याग व संघटना कौशल्य दाखविले, त्याचे बहुतेक सर्व श्रेय १९३०

सालच्या कायदेभंगाच्या चळवळीत बाबुरावानी केलेल्या गल्लीवार संघटनेस बव्हंशी आहे, असे मी मानतो.

नगरपालिकेचा कारभार–नगराची अभिवृद्धी व नागरिकांचे हित दृष्टीपुढे ठेवून चालवावा, आपल्या सत्तालोलुप व स्वार्थी स्वयंप्रतिष्ठेसाठी नगरपालिकेच्या यंत्रणेचा नगरपित्यानी वापर करू नये म्हणून श्री. बाबुरावानी 'तरुण भारत' पत्रातून त्यांच्या कारभारावर वारंवार कोरडे ओढलेले आहेत. पण हे नगरपिते गेंड्याच्या कातडीचे असल्याने त्या कोरड्यांचे वळ त्यांच्या पाठीवर कधीच उठले नाहीत. तथापि ते फटकारे अगदीच फुकट गेले असेही नाही. त्यांचा थोडाबहुत परिणाम नगरपालिकेच्या कारभारावर निश्चित झाला आहे.

तरुण भारतातील लेखानाच काय, बातम्यानाही आकर्षक व अर्थपूर्ण शीर्षके देण्यात बाबुरावांचा हातखंडा. प्रतिपक्षाची भंबेरी उडविणारे आवेशपूर्ण लेख व त्यांची चटकदार शीर्षके हे तरुण भारताचे वैशिष्ट्य आहे.

त्या काळात 'तरुण भारत' कार्यालय म्हणजे राष्ट्रीय चळवळीचे केंद्र झाले होते. कायदेभंगाची चळवळ अगर अस्पृश्यता निवारण, खादीप्रचार, साक्षरता प्रचार नगरस्वच्छता इत्यादी कोणतेही कार्य असो, त्याची संघटना व संचालन तरुण भारत  कार्यालयातून होई व बाबुराव हे त्या सर्व आंदोलनाचे अध्वर्यु असावयाचे. मी, अण्णूगुरुजी, वामनराव बिद्री, द. ल. अध्यापक वगैरे कार्यकर्ते तुरुंगात नसलो म्हणजे तरुण भारत कार्यालयात हमखास असावयाचो.

काही एक काम करावयाचे बाबुरावानी मनावर घेतले म्हणजे ते तडीस नेण्यासाठी त्याचा पिच्छा पुरविल्याशिवाय ते सोडीत नाहीत. दरवर्षी बेळगावला प्लेगचा प्रादुर्भाव न चुकता होई, आणि त्याची सुरुवात बहुधा गोंधळीगल्लीतून होई. त्याप्रमाणे एकदा गोंधळीगल्लीत उंदीर पडू लागल्याचे समजताच बाबुरावांनी 'मुले कुठार' या न्यायाने झाडून साफ करून टाकली. एकूण एक घरे, परसू व गटारे साफ करण्याचे ठरविले. दुसऱ्या दिवशी त्यानी बुट्ट्या, खराटे जमविले आणि स्वत: पुढाकार घेऊन स्वयंसेवकांच्या पथकासह सबंध गोंधळीगल्लीतील घरे, परसू व गटारे साफ करण्याचे ठरविले. रोज सकाळी ८ ते १२ पर्यंत असे हे काम आठ दिवस चालले.

अस्पृश्यता–निवारणाच्या आंदोलनाच्या वेळीही भंग्याचे काम हीन दर्जाचे नव्हे, हे बेळगावकराना पटवून देण्यासाठी त्यानी सार्वजनिक पायखाने साफ करण्याची मोहीम काढली या त्यांच्या कार्यात स्वयंसेवकच  काय पण कै. केशवराव गोखले व कै. बळवंतराव दातार याच्यासारखे पुढारीही सामील झाले. हरिजनांना मंदिरप्रवेश मिळवून देण्याच्या बाबतीतही बाबुरावानी असाच पुढाकार घेतला. मारुतीच्या देवळात हरिजनाना घेऊन प्रवेश करण्यासाठी ते मिरवणुकीने गेले असताना पुजाऱ्याने देवळाचे दरवाजे बंद करून टाकले. तेव्हा बाबुरावानी दरवाजा फोडून हरिजनांसह आत प्रवेश केला.

बेळगाव जिल्ह्यात बरीच वर्षे धुमाकूळ घातलेल्या अंगडी–चिकोडी पक्षाच्या राजकारणाच्या मगरमिठीतून मुक्त करून या जिल्ह्याला काँग्रेसच्या वर्चस्वाखाली आणण्याला ज्या कार्यकर्त्यांचे परिश्रम कारणीभूत झाले त्यात बाबुरावांची गणना प्रामुख्याने होते. १९३७ च्या असेंब्ली–निवडणुकीत दिवंगत अंगडीनी 'काँग्रेसशी माझा मतभेद का? (Why I differ from Congress?) म्हणून एक पत्रक काढले होते. त्याचा बाबुरावानी तरुण भारतातून खरपूस समाचार घेतला. त्या लेखाचा मथळाच 'भले भले भंपकराव!' भेदक होता. या लेखाच्या तडाख्याने व निवडणुकीत आपटी

खाल्ल्याने रा. ब. अंगडीनी अगदी हाय खाल्ली! पुढे काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतरच रावबहादुरांचा हृदयरोग बरा झाला! पंडितप्पा चिक्कोडी तर पूर्वीच हतप्रभ झाले होते. त्यांनी राजकारणातून केव्हाच पळ काढून विणकर संघाच्या औद्योगिक सहकारी मंडळाचा आश्रय घेतला.

कायदेभंगाच्या चळवळीच्या काळात तुरुंगाच्या बाहेर असू तेव्हा आम्ही काही कार्यकर्ते 'तरुण भारत' कार्यालयात रोज जमत असू आणि चळवळीच्या कार्यक्रमाची आखणी करून त्याप्रमाणे कामाला लागत असू. त्यावेळी बेळगावात कै. वामनराव कानविंदे 'परीक्षक' नावाचे एक मराठी साप्ताहिक चालवीत. स्वतंत्र विचाराच्या पांघरूणाखाली चळवळीवर टीका करणारे सरकारधार्जिणे लिखाण त्या पत्रात प्रसिद्ध होत असे. त्यात तरुण भारत कार्यालयात जमणाऱ्या आम्हा मंडळींचा 'धों. रा. कंपू' म्हणून कुत्सितपणे उल्लेख केला जाई. 'रोज सकाळी भल्या पहाटे हे 'धों. रा. कंपूचे' लोक प्रभातफेरी काढून रस्त्याने गाणी म्हणत जातात आणि त्यामुळे लोकांची झोपमोड होते. सरकार त्याना अटक का करीत नाही?' अशा अर्थाचा मजकूर त्या पत्रात एकदा आला होता. पण त्यावेळी आपल्या या हितचिंतकांचा मोफत सल्ला ऐकण्याच्या मन:स्थितीत ब्रिटिश सरकार नव्हते!

तरुण भारताच्या तालमीत अनेक पत्रकार, ग्रंथकार व लेखक तयार झाले आहेत. कल्याण रामचंद्र आंबेवाडी, वि. गं. देशपांडे, बा. कृ. गलगली, बा. रं. सुंठणकर, बर्वे, मराठे, अच्युतराव देशपांडे इत्यादी नावे या संदर्भात सांगता येतील.

देशाच्या स्वातंत्र्यासाठी १९२१ च्या असहकार आंदोलनापासून १९४२ च्या 'चलेजाव' लढ्यापर्यंत ज्या चळवळी झाल्या त्यामध्ये बेळगावच्या अनेक नेत्यानी व कार्यकर्त्यांनी आपापल्यापरीने कार्य केले आहे. तथापि श्री. बाबुराव ठाकुर व त्यांचे 'तरुण भारत' पत्र यानी बजावलेल्या कामगिरीला काही आगळेच स्थान आहे. काही काळ बेळगावातील सर्व प्रकारच्या राष्ट्रीय चळवळींचे धागेदोरे बाबुराव ठाकुर व त्यांचे 'तरुण भारत' पत्र याभोवती विणले गेले होते, आणि त्या चळवळीची सर्व सूत्रे 'तरुण भारत' कार्यालयातूनच हालविली जात. या वस्तुस्थितीला अनुलक्षूनच बाबुरावांनंतर बेळगाव जिल्हा काँग्रेसचे कार्यदर्शी झालेले कै. द. ल. अध्यापक हे ''काँग्रेस आमची संस्था–ठाकुर आमचे पुढारी!'' अशी घोषणा करीत.

**– डॉ. जयदेवराव कुलकर्णी**

याशिवाय काकानी केलेल्या कार्याविषयी व त्यांच्या स्वभाववैशिष्ट्यासंबंधी अनेक परिचितांनी आपले मनोगत व्यक्त केले आहे. त्यामध्ये श्री. पाटकर (मराठी ट्रेनिंग कॉलेज वडगाव), श्री. एम. एन. कुलकर्णी (दुंडगे), श्रीमती इंदु पंडित (बेळगाव) प्रभृतींच्या नावाच उल्लेख करता येईल.

# परिशिष्ट

**पान नं.**

२. काकांचे वडील कै. राजारामपंत ठाकुर
३. काकांची थोरली भगिनी श्रीमती चिमाक्का
४. काकांचे बंधू कै. यशवंतराव ठाकुर
५. भारतवैभव समाजाची स्थापना
५. तरुण भारत मासिक स्वरूपात काढण्याचा संकल्प
५. काकानी स्वातंत्र्यसंग्रामात उडी घेतली आणि कॉलेजवर बहिष्कार टाकला.
८. २ जानेवारी १९४७–वडील राजारामपंत ठाकुर यांचे निधन
८. ३० जानेवारी १९४८–बंधू यशवंतराव यांचे निधन
१०. आम्ही पाच भावंडे
११. काकांचे कौटुंबिक जीवन
१२. काकांचे दैनंदिन जीवन
१६. १९२१ साली कॉलेजवर बहिष्कार टाकून असहकारितेच्या आंदोलन उडी घेतली.
१६. १९२१ साली कॅम्पमधील दारू गुत्यावर पिकेटिंग
१७. काका व कै. शिवराव कोप्पळ याना पिकेटिंगबद्दल अटक व शिक्षा
१७. म. गांधींची किल्ला मैदानावरील पहिली प्रचंड सभा, काका व कै. कोप्पळ यांचे स्वयंसेवक संघटनेचे नेतृत्व.
१७. स्त्रियांनी अंगावरील अलंकार गांधींच्या झोळीत टाकले.
१८. हजारोंची सभा गाजविणारी एक निरक्षर महिला–सौ. शांताबाई कोप्पळ.
१८. काकांचा पहिला खडतर तुरुंगवास
१९. सिंदूर लक्ष्म्या व नरशा या प्रसिद्ध दरोडेखोरांच्या सहवासात व त्यानी सांगितलेल्या गमतीदार गोष्टी.
२१. मध्यरात्री तुरुंगातून दरोडेखोरांच्या पलायनाची रोमांचकारक कथा.
२१. 'घराण्याला कलंक लागला'– नातेवाईकांच्या समजुती
२२. काकीनाडा काँग्रेसमधील एक मनोरंजक प्रसंग
२२. बेळगाव येथे भरलेले २४ सालचे काँग्रेसचे अधिवेशन
२२. त्यावेळच्या स्वयंसेवक संघटनेचे प्रमुख काका व कोप्पळ
२३. मुळशी सत्याग्रहाच्या प्रचारासाठी सेनापती बापटांचे बेळगावी आगमन
२३. १९२१ मधील कै. शिवरामपंत परांजपे यांच्या अध्यक्षतेखाली भरलेले बेळगाव येथील मराठी साहित्य संमेलन. कन्नड तरुणांनी केलेला गंगाधरराव देशपांडे यांचा निषेध.
२३. १९२३ साली तरुण भारत मासिकाच्या प्रकाशनात खंड १ ऑगस्ट १९२८ पासून तरुण भारत साप्ताहिक स्वरूपात सुरू.
२३. तरुण भारत– काँग्रेस चळवळीच्या प्रचाराचे प्रभावी साधन.
२४. बेळगावातील प्रभातफेऱ्यांची ५२ पथके.
२४. मिठाच्या सत्याग्रहासाठी बेळगाव जिल्ह्यातून चार सत्याग्रही पथकांचे संघटन.
२५. मध्यरात्री निघालेली अभूतपूर्व प्रचंड मिरवणूक.
२५. ३० साली पोलिसांकडुन चार वेळा तरुण भारत प्रेसची झडती व २ हजारांची प्रेसकडून जामीनकी
२६. जानेवारी ३२ मध्ये कायदेभंगाबदूल काकांना एक वर्षाची शिक्षा व नासिक जेलमध्ये रवानगी.

२६. हरिजनोद्धार व मंदिरप्रवेश यासाठी उभारलेली चळवळ. काँग्रेसरोडची कुळकथा (१९२४) आणि कै. शिवराम कोप्पळ व काकांना अटक.
२७. काँग्रेसरोडची हायकोर्टापर्यंत गाजलेली केस.
२७. कै. अण्णासाहेब लठ्ठे यांच्याशी परिचय.
२८. कै. अण्णासाहेब लठ्ठे यांचा काँग्रेस–प्रवेश
२९. १९३७ साली कै. लठ्ठे यांची मुंबई प्रांताच्या अर्थमंत्रीपदी निवड
२९. कै. गंगाधरराव देशापांडे व लठ्ठे यांचा निकट संबंध.
२९. १९३८ साली हरिपुरा येथील काँग्रेसला काकांची उपस्थिती.
२९. लोकल बोर्ड व म्यु. पालट्या हे प्रतिगाम्यांचे अड्डे– त्यावर तरुण भारताने सतत चालविलेला कडाडून हल्ला.
३०. म्यु. पालटित स्थापन झालेला नवा राष्ट्रीय पक्ष. जुने १४ बुरुज ढासळले!
३०. ४२ च्या काँग्रेसच्या मुंबई येथील अधिवेशनास काकांची उपस्थिती : त्यानंतर नासिक जेलमध्ये स्थानबद्द.
३१. १ वर्ष १० महिन्यांच्या कारावासानंतर २७ मे १९४४ मध्ये मुक्तता.
३१. १९३८ साली चंदगड तालुक्यात शैक्षणिक व रचनात्मक कार्याचा काकानी घातलेला पाया.
३२. चंदगड भागातील सत्तर खेड्यातून जोड रस्त्यांचे स्वालंबनाने केलेले प्रचंड कार्य.
३२. कमिशनर पेरी यानी मुक्तकंठाने केलेली कार्याची प्रशंसा
३३. काकाना भारत संरक्षण कायद्याखाली अटक करण्याची राजनिष्ठांची कारवाई
३३. 'बाबुरावांचे रचनात्मक कार्य प्रत्यक्ष पाहिले आहे. त्यांच्या विरुद्ध कोणतीही कारवाई नको'– कमिशनर पेरी यांचा आदेश.
३५. १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्यसोहाळा साजरा करण्याकरिता बेळगाव शहरात निघालेली प्रचंड मिरवणूक.
३५. ता. ३० जानेवारी १९४८ रोजी म. गांधींची हत्या: शोकप्रदर्शनार्थ बेळगावात निघालेली प्रचंड मिरवणूक. त्यानंतर उभ्या महाराष्ट्रात उसळलेली जाळपोळीची लाट.
३६. रा. स्व. संघ व हिंदुमहासभा यांच्या पुरस्कर्त्यांवर झालेले प्रखर हल्ले : प्रभोभ आवरण्यासाठी काका, श्री. जीवनराव याळगी व श्री. राघुअण्णा मंडगी यानी बजावलेली कामगिरी.
३६. परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी शहरात मिलिटरी आली.
३७. निपाणी, चिकोडी, चंदगड भागात विध्वंस, लुटालूट व जाळपोळ यांचा भडकलेला वणवा : चंदगड महालातील अत्याचाराचे काही प्रकार.
३८. तांबुळवाडी येथे ही विध्वंसाची लाट थोपवून धरण्याचे काका आदीनी केलेले कार्य.
३९. संस्थानी हद्दीतील निर्वासितांच्या मुक्ततेसाठी बेळगावातील स्वयंसेवक संघटनेचा प्रचंड ताफा आजारे भागात शिरला. त्यावेळी तरुण भारताने बजावलेली कामगिरी.
४२. श्री. ना. ग. गोरे यांच्या नेतृत्वाखाली सेनापती बापट यांच्यासह गोव्यात प्रवेश करण्यासाठी बेळगावात आलेले सत्याग्रहींचे पथक
(ता. १४ मे १९५५) – १८ मेला सावंतवाडी मार्गे गोव्यात प्रवेश
४३. श्री. नानासाहेब गोरे यांना पोर्तुगीजानी केलेली अमानुष मारहाण
४४. २८ मे १९५५ रोजी श्री शिरूभाऊ लिमये यांच्या नेतृत्वाखाली ७१ सत्याग्रहींचे दुसरे पथक गोव्यात प्रवेश करते झाले.

४४. बेळगाव येथील गोवा विमोचन समितीने सत्याग्रही पथकांच्या सहाय्यार्थ बजावलेली कामगिरी.
४४. कॉं. राजाराम पाटील यांच्या नेतृत्वाखाली १२५ सत्याग्रहींची बेळगावात आलेली चौथी तुकडी.
४४. हिंदुमहासभेचे खासदार श्री. वि. घ. देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली आलेली ४७ सत्याग्रहींची पाचवी तुकडी.
४५. गोवा सत्याग्रहात ठार झालेले केशवराव थोरात व पूर्व बंगालमधील नित्यानंद सहाय यांचे पार्थिव देह अंत्यदर्शनार्थ टिळकवाडी येथील गणेशचौकात.
४५. ता. १५ ऑगस्ट १९५५ रोजी गोमंतकात फार मोठ्या प्रमाणावर सत्याग्रह.
४६. कॅसलरॉक बोगद्यात अनेक गोवा सत्याग्रही ठार.
४६. गोवा–विमोचनात बेळगाव शहराचा वाटा.
४७. अखेर गोमंतक मुक्त झाला.
५०. ४०–४१ साली चंदगड तालुक्यात सत्तर गावचे रस्ते श्रमदानाने तयार करण्याचे कार्य.
५०. ४०–४१ साली चंदगड तालुक्यात सत्तर गावचे रस्ते श्रमदानाने तयार करण्याचे कार्य.
५०. बेळगाव जि. प्रा. शिक्षण समितीचे कार्य : ३८ साली १७५ शाळा सुरू केल्या.
५१. १९६६ साली शिक्षकांसकट शाळा सरकारच्या स्वाधीन केल्या.
५२. ता. १७ जून १९४२ रोजी मराठी ट्रेनिंग कॉलेजची स्थापना.
५३. राणी पार्वतीदेवी कॉलेजचे स्थलांतर : कै. अण्णासाहेब लठ्ठे यांच्या निवासस्थानी भरलेली पहिली सभा.
५४. डॉ. हेरेकर यांचे शोचनीय निधन : प्रचंड स्मशानयात्रा.
५५. राणी पार्वतीदेवी कॉलेज–सीमाभागातील मराठी जनतेचे शैक्षणिक व सांस्कृतिक विकासाचे महत्त्वाचे केंद्र
५६. पांगिरे प्रकरण– काशीबाईंची करुण किंकाळी
६०. अत्याचाराचा कळस : स्त्रीदेहाची घोर विटंबना
६१. श्रेष्ठी समितीचा अहवाल
६२. कै. दा. वि. गोखले यानी बाबुराव ठाकुर यांच्या कार्याची केलेली प्रशंसा
६३. काशीबाईंवरील अत्याचारामुळे म. गांधींना झालेले दु:ख.
६४. ज्योती रामा राजगिरे प्रकरण.
६५. पट्टणकुडी येथे जाऊन बाबुराव ठाकुर यानी ज्योतीच्या आईची व बायकोची भेट घेतली.
६६. खैर महंमद पठाण यांची रात्रौ बंगल्यात भेट घेतली.
६७. चौकशीसाठी सी. आय. डी. इन्स्पेक्टर मुजुमदार यांची खास नेमणूक.
६८. पट्टणकुडी प्रकरणी श्री. बाबुराव ठाकुर याची साक्ष.
७०. पट्टणकुडी प्रकरणी मुंबई हायकोर्टाचा निकाल. आरोपीना विविध मुदतीच्या शिक्षा.
७२. शामराव देशमुख प्रकरण :
७३. शामराव देशमुखाची दुर्दैवी कहाणी.
७५. शांताबाईला फौजदार नीलगारची दमदाटी
७६. फौजदार नीलागारनी पंचनामा न करता रात्रौच्यावेळी शांताबाईंच्या घरी जाऊन चार तोळ्यांचे बिलवर घेतले.

७६. दुसऱ्या दिवशी पोलीस कोठडीत गजामागे देशमुखाचे प्रेत लटकत होते.–शांताबाईने हंबरडा फोडला.
७७. देशमुखाची ही आत्महत्याच म्हणून ठरविण्याची पोलिसांची घाई.
७८. निपाणीच्या जाहीर सभेत न्यायालयीन चौकशीची मागणी : म्हैसूर सरकारने लोकशाही राजवटीला कलंक लावला.
८०. महाराष्ट्र–म्हैसूर सीमेचे आंदोलन.
८२. १७ जानेवारीचा रक्तलंच्छित दिवस
८३. ९ मार्च सत्याग्रहाचे पहिले आंदोलन.
८४. १ नोव्हेंबरचा काळादिन
८५. सत्याग्रह–आंदोलनाचे दुसरे पर्व
८७. दिल्लीच्या वेशीवर सीमाभागाचे गाऱ्हाणे
८७. बार्डोलीची आठवण करून देणारा करबंदीचा लढा.
८९. सीमाप्रश्नासाठी शिवसेनेचे आंदोलन
९०. आचार्य अत्र्यांचे देहावसान.
९०. सीमाभाग पोरका झाला : बॅ. नाथ पै यांचे निधन.
९४. ता. २२ एप्रिल १९७३ ची सीमा परिषद
९४. वृत्तपत्र क्षेत्रातील कर्तृत्वाबद्दल गौरव
९६. तरुण भारताचा रौप्यमहोत्सव
९९. ‘सकाळ’ कारानी केलेला त्रिमूर्तीचा गौरव
१०१. जळगावच्या मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष
१०५. तरुण भारताचे दैनिकात रूपांतर
१०७. ओघळलेले मोती
११२. यशवंताच्या स्मृतीस अश्रूंची अंजली.
११४. डॉक्टरांच्या प्रेमळ स्मृतीस माझे अश्रूसिंचन
११६. अण्णासाहेब (लट्ठे) यांच्या प्रेमळ स्मृतीस.
१२२. निवडक संपादकीय
१४५. असा मी गौरीहार पूजिला
१५४. परिचितांच्या दृष्टीतून जिद्दीचे पत्रकार बाबुराव ठाकुर.

**श्री. बाबुराव ठाकुर** हे एक झुंजार पत्रकार, एकनिष्ठ समाजसेवक आणि सत्प्रवृत्त, निर्भीड माणूस म्हणून मला परिचित आहेत. या माणसाने लौकिक यशाची आकांक्षा धरली असती, तर ते यश त्यांना केव्हाच लाभले असते. या माणसाने जरी सत्तेची भीती बाळगली असती, तर निष्ठेने चालविलेल्या यांच्या साप्ताहिकाचे केव्हाच राष्ट्रव्यापी दैनिकात रूपांतर झाले असते. सत्यापायी कधीच सत्तेची कदर केली नाही. इंग्रजांची राजसत्ता असो वा स्वतंत्र भारताची लोकशाही सत्ता असो पण यामध्ये, सर्वसामान्य माणसाच्या हक्कासाठी निष्ठेने सर्वस्व पणाला लावणारा असा संपादक, नेता माझ्या पाहण्यात नाही. यांच्या सहवासात अनेक नेते, विचारवंत आले – मोठे झाले.

परिसाची कथा यापेक्षा वेगळी काय असते !

**– रणजित देसाई**